म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.

१२२०५

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. क्रं. २६८७९
संग्र : शाखा (स्थळ प्रत)

१.१९९०५

# चाणाक्षपणाचा कळस !

ते दिवशीं ठाकुरद्वारच्या देवळांत ह्मणजे काय मजा ! जिकडे तिकडे नुसती गम्मत उडून गेली होती. दिव्यांचा उजेड तर काय अगदीं मी ह्मणत होता. अंधाराला ह्मणून कशी ती एवढी दिखील जागा नव्हती. मुख्य देवळांत काय किंवा आजूबाजूच्या मारुतीच्या वगैरे देवळांत काय, जिथें तिथें गाणेंच गाणें चाललें होतें. इकडे दहा वीस गाणारणी बसल्या होत्या. तिकडे पांच चार बसल्या होत्या. आणखी एकामागून एक गात होत्या. कोणी भाटे लोकांतील मोठ्या सावकार आपलें कांहीं कार्य झाल्यास असा असा उत्सव करीन असा नवस के होता; व पुढें त्याप्रमाणें त्याचें कार्य झालें ह्मणून त्यानें हें सर्व केले होतें. गांवांत जितक्या ह्मणून गाणारणी होत्या तितक्या साऱ्या ति अगदीं झाडून आणल्या होत्या. असा थोरला जंगी उत्साह असल्यामुळें लोकांची पण अशी गर्दी उडून गेली होती बुवा ! कांहीं पुसूं नये मारे चेंगराचेंगरीन् आरडा आरडीन् एकच धुमाकूळ ! कोणाचें पागोटें उडालें, कोणाचें धोतर फाटलें, कोणाचा खिसा कातरला, कोणाला पोलिसाचा चाबूक बसला, ह्मणून जो तो आपापल्या परीनें रडत ओरडत होता. अगदीं पुढच्या मंडळींत मात्र काय थोडीबहुत स्वस्थता असेल तेवढीच. बाकी त्यांना तरी ऐकूं येण्याच्या नांवानें पांचजन्यच होता. या पुढच्या मंडळींत दोघे तरुण गृहस्थ होते. ते आपल्या भाषांतच कांहीं गाणारणींवर, कांहीं लोकांवर टीका करीत होते. बोलतां बोलतां मध्येंच त्यांच्यापैकीं एक दुसऱ्याला ह्मणाला " मग काय? यशवंतराव, चलायचं ह्मणतोस? अरे हो खरंच मी अगदींच विसरलों होतों. आपल्याला त्या ह्यांच्याबरोबर हिंडायला जायचं आहे ब्याक्बेवर नाहीं का?"

त्यावर दुसरा ह्मणाला:—"माझं तर असं ह्मणणं आहे बाबा. भो

:गीच ह्या त्रासांत रखडतो ! धड ऐकायला येईना धड दिसेना. हा
ास नको आणखी ही मारामारी नको. चला कसे आपण इथून ! त्यां-
्न तुला रहायचं असेल तर रहा बोआ. आपण तर अगदीं कंटाळ-
ो आतां. "

" इथें कोणाला अगदीं हौस आहे राहण्याची ! आपलं ह्मटलं ए-
त्दा काय उत्साह आहे तो पहावा एकदां. पुरे झालं पण. आपली
अगदीं हौस पुरली. "

" चला तर मग. "

असें ह्मणून दोघेही मोठ्या कष्टानें त्या भयंकर गर्दीतून बाहेर पड-
ले. तरी यशवंतरावाचें उपरणें थोडेंसें फाटलेंच. बाहेर मोकळ्या हवें-
त आल्यावर दोघांस जरा बरें वाटलें. तेव्हां यशवंतराव ह्मणालाः—

" उपरणें फाटो, कांहीं होवो, एकदां जिवानिशीं सुटलों एवढंच
 समजायचं. चला आतां तिकडे. पण कायरे जगन्नाथपंत, त्या
ृणरावाला 'हो' ह्मटल्याप्रमाणें आपण चाललों खरे पण तो आप-
लीं तीं पांखरं तर नाहीं ना बरोबर आणणार ? तसं असलं तर आपण
आ त्या तसल्या ह्यांत पडत नाहीं. नाहींतर ते आहेत फंदी. पण
आपली अब्रू जायची. " " छेरे यशवंतराव, तूं अगदीं भिऊं नकोस.
ाय वेडा तर नाहींस ? आपल्या सारख्यांना बोलावून तो रांडा आणी-
ल का बरोबर ? त्यांतून त्यानं आणल्याच तर मग आपलं नशीब. ते-
वढा वेळ बसावं. पुन्हां कानाला खडा लावून घ्यावा. कृष्णरावाच्या
मैत्रीचं पुन्हां नांव नको. हे असले ढंग आपल्याला गरिबाला नाहीं
उपयोगी. पण त्यानं एवढा आग्रह करून आपल्याला बोलावलं आहे-
न तर एकदां जावं झालं अन् त्यांत जागा आपली आहे ती अगदीं
किनी तरी एकीकडे आहे. जरी यदाकदाचित् आपण ज्याला भितों तें
आलं तरी फारशी काळजी नाहीं. कृष्णराव फराळाचं सामान घेऊन
परस्पर तिथें येणार आहेत, आपण इकडून परस्पर जाऊं. अनंतरावा-
ला दिखिल त्यानं फार फार आग्रह करून बोलावलं आहे, पण तो
कुठें आज भेटलाच नाहीं. "

" मला आज तीन एक वाजतां मी आफिसांतून येत होतों तेव्हां
तो भेटला होता. आज यमुनाला नाटक दाखवायचं आहे तेव्हां मी

तिकडे जाईन असं तो ह्मणाला होता. तो त्या वेळीं यजमानणीचे पैसे आणायला चालला होता कोटांत. "

" हं मग झालं तर मग ! पैसे घेऊन तो परत गेला असेल तो यजमानणीनं जाऊं दिला नसेल झालं ! त्यांत कांहीं मोठंसं नवल नाहीं. ती फारच सुरेख आहे असं ह्मणतात तें खरं कारे ? कोणीसं मला ते दिवशीं ह्मणालं कीं ती एक लाखांत बायको आहे ह्मणून ! "

" पण कायरे ? अनंतरावाचा आणखी तिचा कांहीं संबंध आहे अशी जी आपल्या वाडींत गुणगूण आहे ती खरी आहे का ? मला नाहीं वाटत असेलशी ! "

" मला नाहीं वाटत तें अगदींच खोटं असेल ह्मणून. ती बाईच मोठी विलक्षण आहे. अनंतरावय् स्वरूपानं चांगला आहे. त्याचान् त्याच्या बहिणीचा तोंडवळा बराच जवळ जवळ आहे. ती पोर मात्र रूपानं काय किंवा गुणानं काय मोठी छान आहे खरी. पहा बरं आपल्या त्या वाडींत कुणाशीं बोलणं का बसणं का हसणं कांहीं तरी ? आपलं घर बरं कीं आपुण बरी. तुला नाहीं वाटत ती पोरगी फार चांगली आहे ह्मणून ? "

हा प्रश्न विचारतांना जगन्नाथपंतानें यशवंतरावाकडे किंचित् स्मित हास्य करून रोखून पाहिलें, त्यावर किंचित् विनयानें यशवंतराव ह्मणतो. " खराखरच बोआ, त्या मुलीसारखी सद्गुणी मुलगी फार क्वचित् ! लोक ह्मणतात ल्याहायला वाचायला आलं आणखी शाळेंत असल्या ह्मणजे मुली मोठ्या चाह्याटळ होतात. पण हें पहा बरं हिचं उदाहरण. फारच सुशील मुलगी बोआ. माझान् अनंतरावाचा ह्मणजे भावासारखा स्नेह. पण ती एक दिवस दिखील माझ्याशीं अमर्यादेनं बोलत नाहीं कीं कांहीं नाहीं ! लोक वाडींत ती मोठी झाली, अजून लग्न झालं नाहीं, शाळेंत जाते ह्मणून हंसतात, पण कोणी तिच्याविषयीं वाईट कांहीं बोलत नाहीं. तीही कोणाला एका उत्तरानं दुखावीत नाहीं. पण हा अनंतराव मात्र तिची घ्यावी तशी काळजी घेत नाहीं. तो सकाळीं आठ नऊ वाजतां जातो तो रात्रीं दहाच्या सुमाराला येतो. मीं त्याला पुष्कळदां सांगितलें कीं असं करूं नको ह्मणून; पण तो ह्मणतो मला बंगल्यांतून सोडीतच नाहींत, त्याला काय

करावं ? ह्मटलं ह्मणजे **अनंतरावाला यमुना** कीं **यमुनेला अनंतराव** याखेरीज एकमेकांना कोणी मायेचं ह्मणून नाहीं.

" माझं जर मत विचारशील कीं नाहीं, **यशवंतराव**, तर **अनंतरावानं** तिचं आतां लग्न करून टाकावं "

" अरे तो कुठें नाहीं ह्मणतो आहे ! पण चांगलं स्थळ मिळालं पाहिजे ना ! त्या पोरीचा मंगळ तर जिथें तिथें नडतो. बाकी हुंडापांडा कांहीं तो कमी नाहीं देणार. बापाच्या वेळचं थोडं बहुत होतं, तें आणखी आईचे दागदागिने ते सारे **यमुनेला** देणार आहे. जुळलं मात्र पाहिजे कुठें तरी. "

" **यशवंतराव**, तुझी बायको नुकतीच मेली आहे, तुं रे कां नाहीं करीत लग्न तिच्याशीं ! लोकांच्या सारखा तूं मंगळ बिंगळ पहातोस काय ? "

हें **जगन्नाथपंताचें** बोलणें ऐकून **यशवंतराव** मागें वळून एकदम ह्मणला " अरे तो कोणरे तो ! **परशुरामपंतच** तो ! इकडेच येतो आहे. आपला आवाज ऐकून ओळखील दिखिल तो ! त्याला टाळायचा असेल तर असा या बंगल्याच्या सांवलींत हो ह्मणजे झालं. नाहींतर तो आलाच बघ. " हें त्याचें बोलणें मघांचा विषय कसा तरी बदलावा ह्मणून होतें. परंतु समोरून येणारा गृहस्थ **परशुरामपंतच** होता.

" येऊं दे कीरे " **जगन्नाथपंत** ह्मणतो. " त्याच्या एकंदर बोलण्या चालण्याची मला मोठी मौज वाटते. त्यानें बरेच ढंग केलेले दिसतात. चार देशचं पाणी प्यायला आहे. त्याला बरीच माहिती झाली आहे. त्या **झोटिंगाबादच्या राणी**विषयीं ज्या काय गोष्टी सांगत असतो तो!"

" कायरे, पण हा **परशुरामपंत** धंदा काय करतो ? माझी त्याची ओळख **कृष्णरावावरून** झाली. अन् आमच्या हापिसांत कधीं कधीं कांहीं माल खरेदी करायला ह्मणून येतो. "

" तो ह्मणतो बोआ मी त्या अमक्या कंपनीचा एजंट आहें ह्मणून. पण मला कांहीं तें खरं नाहीं वाटत. माझी अशी समजूत आहे कीं, तो पोलिसाच्या गुप्त खात्यांतला आहे. **डिटेक्टिव्ह** असावा तो. अन् ह्मणूनच मला त्याची मोठी गम्मत वाटते. "

इतकें यांचें बोलणें होतें आहे तों ज्याच्याविषयीं भापण चाललें

होतें तो गृहस्थ अगदीं जवळ आला. तो साधारण दिसण्यांत चांगला असून चाळीसपासून पंचेचाळीस एक वर्षांचा असावा. त्यानें कल्ले ठेवले होते. व त्याचे डोळे फार चंचल व पाणीदार दिसले. त्याच्या सर्व चेहेऱ्यावरून तो मोठा हट्टी व हेकेखोर असावा असें वाटे. तो जवळ आल्याबरोबर या दोघांस "नमस्कार **जगन्नाथपंत**, **यशवंतराव**, आमच्या सारखेच तुह्मी कंटाळून आला वाटतं."

"होय बोआ. काय त्रास तो ! धड ऐकणं नाहीं कांहींच नाहीं." असें ह्मणालाः—

"असेंच तें. कां पण आमचा अंदाज बरोबर झाला कीं नाहीं तुमच्याविषयीं ! आह्मीं एकदां कांहीं गोष्टीकडे पाहिलं कीं त्यांतलं इंगित आह्मांला कळतं. अहो, पण तुह्मी आज दोघेच कसे इथें ? तुमचा **अनंतराव** कुठें आहे ! जाल तिथें तुमचं त्रिकूट जायचं ह्मणून ह्मणतों."

"तो आपल्या कामाला गेला आहे. त्याला **यजमानणी**चे ५००० रुपये आणायचे होते कुठूनसे. तिकडे गेला होता तो. रुपये घेऊन **यजमानणी**कडे गेला आहे द्यायला."

"त्याची **यजमानीण** कोण? ती **झोंटिंगाबाद**ची अफूबाज राणी ती?"

"अफूबाज ह्मणजे ?"

"अफूबाज नाहीं त काय शिंची तिला अशी नागिण लागते अफूची ! मला ठाऊक आहे ती. मी ह्मांच्या त्या **झोंटिंगाबादे**ला गेलों होतों एकदां माल घेऊन !"

"हं हं ? मग तुह्मांला तिची माहिती असेल ? आह्मांला तरी कांहीं सांगा."

"काय आहे त्यांत अर्थ. कोणी ह्मणतात ती अगदीं वेडी आहे. कोणी ह्मणतात ती फारच भयंकर आहे. काय पाहिजे तें करील. आधीं त्यांचा गोषाबिषा तर तिनं टाकलाच आहे. चांगल्या गाडीच्या खिडक्या उघड्या टाकून हवी तिकडे हिंडते. तिला बायको ह्मणेल कोण ? पुरुषापेक्षां अधिक कृती आहेत तिच्या. कोणी कांहीं ह्मणतात कोणी कांहीं ह्मणतात. पण एकंदरींत एवढं खरं दिसतं कीं, ती बाई काय करील न् काय नाहीं याचा कांहीं नेम नाहीं."

" पण तिचा नवरा आहे ना ? "

" ते नवरे काय ? एक विक्षिप्तच आहेत. तो आपला बंगला सोडून कधीं बाहेर दिखिल पडत नाहीं. आहे आपला मेषपात्र्या झालं. त्याला तो बुद्बळांचा जो नाद आहे ! सारा दिवस अन् रात्र आपला बुद्बळं खेळत असतो. एक दोघे खेळायकरतांच शंभर रुपये देऊन ठेवले आहेत ! अन् बाकी वेळ राहील त्यांत दारू पितो. आणखी काय पाहिजे ? गुलामाच्या जवळ पैसा आहे खूप. संस्थान सरकारांनीं घेतलं त्याच्या बदला येतात दरमहा तीन चार हजार रुपये! करतो चैन झालं!"

" अन् बायकोचे हे ढंग त्याला आवडतात ? "

" काय असेल तें असो. पण दोघं शेजारीं शेजारींच पण निरनिराळ्या बंगल्यांत रहातात. तो कधीं तिच्याकडे पहातय् सुद्धां नाहीं. पण त्याचा कांहीं नेम नाहीं. एखाद् दिवशीं तिला ठार मारायचा तो ! विक्षिप्त आहे झालं ! संस्थान सोडावं कां लागलं ? असेच तिथें दोन चार खून केले तेव्हां बसली लाथ झालं. "

" अरे बापरे ! मग **अनंतरावाला** सुचवून ठेवलं पाहिजे आपला संभाळून ऐस म्हणून. "

" कां कांहीं आहे का काय त्यांचं तिकडे ? "

"छे छे ! भलतंच एखादं ! ही काय ही शंका ! तिचा खाजगी कार-भार करावा लागतो, जमाखर्च वगैरे त्याला ठेवावा लागतो म्हणून आपलं मीं म्हटलं" हें जें **जगन्नाथपंत** बोलला तें **परशुरामपंतास** आपल्या मित्रासंबंधाची कांहीं दुर्वार्ता कळूं नये या इच्छेनें बोलला. नंतर तो **यशवंतरावाकडे** वळून म्हणाला:—"चलरे बोआ आपल्याला उशीर होतो. मग तो **कृष्णराव** उगीच—"

मधेंच **परशुरामपंत** म्हणतो:—"काय? तुम्हाला **कृष्णरावाचं** आमंत्रण आहे का? चला तर मग मला तिकडेच जायचं आहे. चला तर मग" असें म्हणून तिघे झपाट्यानें चालूं लागले. **यशवंतरावाच्या** मनांत या **परशुरामपंताबरोबर** जावें असें मुळींच नव्हतें, परंतु तो आल्यानें त्याला एक बरें वाटलें कीं, पोक्त वयाचा मनुष्य असला म्हणजे **कृष्णरावानें** कोणी दुसरें बरोबर आणलें असलें तरी हरकत नाहीं. **यशवंतराव** हा मोठा चालीचा व फारच सभ्य होता. त्याचा व **अनंतरावाचा** मोठा स्नेह. **परशुराम**-

पंताच्या तोंडून त्या झोटिंगाबाद संस्थानच्या राणीची हकीकत ऐ-कून त्याला आपल्या मित्राबद्दल मोठी काळजी उत्पन्न झाली असें दि-सलें. कारण त्यास जी खरी माहिती होती ती विलक्षण होती. दुसरें असें होतें कीं, त्याच्या मनांतून यमुनेशीं लग्न करावें असें फार होतें. तो पंचवीस वर्षांच्या आंतच होता; त्यास एका कंपनीच्या आफिसांत चाकरी होती: त्याची पहिली बायको नुकतीच वारली होती: ती अ-गदींच लहान होती. यमुना ही फार सुशील व शिकली संवरलेली अ-सल्यामुळें त्याला फार आवडे. परंतु त्यानें होऊन अनंतरावास कसें ह्मणावें ! अशी स्थिति होती तेव्हां अनंतरावाविषयीं त्यास विशेषच काळजी वाटेल यांत नवल काय ? परशुरामपंतापासून आणखी कांहीं बातमी लागली तर मिळवावी असा हेतु धरून व अनंतरावास एकदां गांठून सर्व सांगून त्याला ती चाकरी सोडून देण्याचा उपदेश करावा असा निश्चय करून तो त्या दोघांबरोबर चालला.

रात्र चांदणी होती. वारा मोठा मजेनें वहात होता. आणि तो ब्याक्बेचा रस्ता. मग काय ! आनंदाला कमीपणा ह्मणून नाहींच. त्यां-तून आज बहुतेक चंगी लोक ठाकुरद्वाराकडे गुंतल्यामुळें ब्याक्बेवर सामसूम होतें. असेच तिकडून कंटाळून आलेले यांच्यासारखे दोन चार असामी दूर हिंडत होते. अशी मजेदार वेळ आणखी जागा मग काय! परशुरामपंतांनीं आपल्या खिशांतून एक काडी काढून ओढून जोड्यांत धरून बिडी पेटविली. नाहींतर काडी रहावी कशी आणखी बिडी पेटावी कशी ? जगन्नाथपंत संगीत सौभद्रांतलें एक पद गाऊं ला-गले. अस्तु.

याप्रमाणें ते तिघे चैनीनें चालले होते, इतक्यांत त्यांना जेथें जाव-याचें ती जागा त्यांस दिसली. परंतु त्या ठिकाणीं कोणीही दिसलें नाहीं. त्या सर्वांचा कृष्णराव ह्मणून कोणी एक मोठा श्रीमंत स्नेही होता, त्यानें या सर्वांस " आज रात्रीं आपण ब्याक्बेवर अमुक ठिकाणीं बसून फराळ वगैरे करूं. शनवारच आहे तेव्हां कांहीं हरकत नाहीं." असें ह्मणून फार फार आग्रहानें बोलाविलें होतें. तें ठिकाण या सर्वां-चें नेहमीं बसण्याचें ठिकाण होतें. अगदीं समुद्रकांठावर असून जरा रस्त्यापासून खालीं होतें. या चौघां पांचजणांनीं तेथले दगड खालीं वर

करवून पांच सात असामींस बसण्यासारखी सपाट जागा केली होती.

हे तिघे त्या जागीं जाऊन पहातात तों, **कृष्णराव**ही नाहीं व त्याची गाडी वगैरे कोठें नाहीं. तेव्हां त्यांस अचंबा वाटला. **परशुरामपंतांनीं** आपलें घड्याळ काढून पाहिलें तों अकराला एक कीं दोन मिनिटें कमी. तेव्हां त्यांनीं असा विचार केला कीं, आणखी कांहीं वेळ आपण थोडेसे हिंडूं व मग पुन्हां येथें येऊं. ह्मणजे ठीक पडेल. **कृष्णरावास** कांहीं कारणामुळें उशीर लागला असेल. रात्र मोठी मजेची असल्याकारणानें त्यांस हिंडण्याची थोडी मौज वाटली. त्या तिघांचा हिंडण्याचा विचार होऊन ते थोड्या अंतरावर जों जात आहेत तोंच **परशुरामपंत जगन्नाथपंता**च्या खांद्यावर एकदम हात मारून व मोठ्यानें ओरडून ह्मणालाः—

" तो पलीकडे खालीं उतरून मागें पुढें पहात चाललेला मनुष्य पाहिलात का त्या होडक्याकडे चालला आहे ? त्याच्या पाठीवर तें ओझें कसलं बरं असावं ! "

" कुठें हो ? हं. तो ( नीट न्याहाळून ) त्याची ती टोपी कोळ्यासारखी दिसते आहे. असेल कोणी कोळीबिळी. मासे पकडायला चालला असेल त्या होडक्यांत बसून. "

" अत्तां रात्रीं अकरा वाजतां मासे धरायला ! आणखी एकटा ! काय तुह्मी ह्मणतां तरी काय ? "

"असेल शिचा कोणी; आपल्याला काय त्याच्याशीं करायचं आहे!"

" तर मग " **परशुरामपंत** मोठ्या थाटानें ह्मणतो " आज रावजी आमचा चाणाक्षपणा किती आहे हें तुह्मांला दाखवतों चला. उगीच नाहीं ह्मटलं हा **परशुरामपंत** चार देशचं पाणी पिऊन आलेला ! "

" काय ह्मणतां काय **परशुरामपंत** ? मला कांहींच कळत नाहीं तुह्मी काय ह्मणतां तें. चाणाक्षपणा कसलान् आहे काय ? "

" तर मग मी तुह्मांला सांगतों तें ऐका. हा आंत चाललेला मनुष्य कोळी नसून चोर आहे. त्याच्या पाठीवर जें ओझं दिसतं आहे तें चोरीच्या मालाचं आहे. "

" मग काय तो माल समुद्रांत टाकाय् करतां चालला आहे का तो? खाशी ! तो चालला आहे तर समुद्रांतच."

"तेंच काय तें पाहूं आतां; चला या माझ्याबरोबर. आपण त्याला विचारूं."

"अन् त्यानं 'तुह्मी कोण विचारणार?' ह्मणून आपला पाणउतारा केला तर?"

"आपण त्याला धरून मारून गांठोडं उघडून दाखवायला लावूं"

तो मोठमोठ्यानं आरडेल, ओरडेल. आपल्याला पोलिस स्टेशनावर जावं लागेल. तें लचांड कांहीं आपल्याला नको. नमस्कार आपल्याला. आह्मी आपले जातों कसे!"

"कांहीं चिंता नाहीं पोलिसापर्यंत खटलं गेलं तरी! माझी अगदीं पक्की खात्री झाली कीं तो मनुष्य चोर आहे. जा तुह्माला पाहिजे तर आह्माला सोडून! आपण जाऊन ह्मटल्याप्रमाणें करणारच" असें ह्मणून **परशुरामपंत** झपाट्यानें त्या मनुष्याकडे जावयास निघाला. **जगन्नाथपंत**-ही "काय वेडा प्राणी हा! बरं बोआ, चल आह्मी येतों. कांहीं मारामारी विरामारी झाली तर उगाच एकट्याला सोडून हे पळाले असं जिकडे तिकडे होईल. चल **यशवंतराव**" असें ह्मणून त्याच्या पाठोपाठ चालूं लागला. **यशवंतरावानें**ही तसेंच केलें.

तो ओझें घेतलेला मनुष्य मोठ्या झपाट्यानें चालला होता. तो मागें पुढें पाही व चालूं लागे. व कांहीं वेळानें तो एक क्षणभर उभा राहिला. त्यानें मागें पाहिलें तों त्यास हे दिसले. तेव्हां तो आपली पूर्वीची दिशा सोडून सरळ चालूं लागला. तेव्हां **परशुरामपंत** ह्मणतो "अहो आपण आतां या इकडे असे उभे राहून तो करतो काय एवढें आधीं पाहूं या. मग काय तो विचार" त्यावर त्याला थोडें लागेल अशा तऱ्हेनें **जगन्नाथपंत** ह्मणतो "तर मग त्याला विचारण्याचा न् धरण्याचा सारा निश्चय गेला वाटतं कोणीकडे?"

"थोडा वेळ दम धरा. तो पहा काय करतो आहे तें. त्याला खालीं उतरून समुद्राकडे जायचं आहे असं दिसतं."

"कोळीच हो, तो. तुह्मी काय भलत्याच नादीं लागलां आहां?"

"अगदीं बोलूं दिखिल नका. तो कोळी कांहीं नव्हे. त्याला कुठें खालीं उतरूं द्या मग मी सांगतों काय आहे तें. त्याला त्या ओझ्यामुळें चालायला येत नाहीं जलद असं दिसतं. तो त्या तितका गेला

नाहीं तोंच आपण धरूं त्याला. तुम्ही येतां आहां म्हणून ' आपण ' म्हटलं हो ! बाकी तुम्ही भीत असलां तर आपले जा कसे. "

" आम्ही भितों ! शाबास ! तर मग आम्ही तुमच्याबरोबर येणारच. मलाय् आतां यांत गम्मत वाटायला लागली आहे. "

**यशवंतराव** कांहींच बोलला नाहीं, आपला मुकाट्यानें त्या दोघांबरोबर चालूं लागला. इतक्यांत तो ओझेवाला मनुष्य खालीं उतरूं लागला. त्याबरोबर **परशुरामपंत** " चला ! चला ! " असें मोठ्यानें म्हणाला. व तडक पळत सुटला. त्याच्या पाठोपाठ ते दुसरे दोघेही पळूं लागले.

तो ओझेवाला मनुष्यही झपाट्यानें चालूं लागला. तो समुद्रांत जातो कीं काय असें ह्या तिघांस वाटलें. अगदीं खालीं गेल्यावर दगडांतूनच तो पळूं लागला. जवळ कुठें पडाव नाहीं होडकें नाहीं, मग हा चालला होता तरी कुठें हें लक्ष्यांत आल्यावर **जगन्नाथपंतास** तो मनुष्य कोळी वगैरे नसून चोर असावा असें पक्कें वाटलें, व **परशुरामपंता**पेक्षांही तो जास्त उतावळा होऊन " कोणरे तो ! उभा रहा जरा, मासुळी असली तर दे आम्हांला " असें मोठ्यानें ओरडला.

तें ऐकण्याबरोबर तो मनुष्य दचकल्यासारखा झाला; त्यानें मागें वळून पाहिलें व त्या तिघांपैकीं एक मनुष्य अगदींच जवळ येऊन ठेपला असें पाहून त्यानें पटकन् आपल्या पाठीवरचें ओझें खालीं टाकलें व तो तडाख्यानें पळूं लागला. तेव्हां **परशुरामपंत जगन्नाथपंतास** म्हणतो " छे, छे, हें तुम्हीं असं ओरडायचं नव्हतंत. तो निसटेल पहा आतां. धांवून त्याला धरा तरी. नाहींतर तो पळेल. तुम्ही चांगले तरणेताठे आहां. धांवा. "

**जगन्नाथपंत** मोठ्या आवेशानें म्हणतो " **यशवंतराव**, चल चल आपण त्या मादरचोदाला धरूं. " असें म्हणून ते तिघेही सैरावैरा धांवूं लागले. तो मनुष्य पुढें दगडांतून चाललेला, **जगन्नाथपंत** तिकडूनच त्याच्या पाठोपाठ आणि **यशवंतराव** व **परशुरामपंत** वरून. इतक्यांत तो ओझेवाला मनुष्य एका दगडाला अडखळून पडला. **जगन्नाथपं** त्याच्या अगदीं जवळ गेला, व धरला गुलामाला असें म्हणत त्याचा ह? तही त्यानें धरला. इतक्यांत त्या मनुष्यानें जो त्याला हिसडा दिला

हात सोडवून घेऊन तो तडक वर गेला, तो पार नाहींसा झाला; मनुष्य जीवावर उदार झाला ह्मणजे जसा त्याला कांहीं कृत्य करण्यास आवेश येतो तसा त्याला आवेश आला होता. **यशवंतराव परशुरामपंत** वगैरेंच्या दृष्टी समोरून तो गेला; पण त्यांस सांपडला नाहीं. त्या तिघांनीं आपल्याकडून खूप मेहनत घेतली, पण तें कांहीं जुळलें नाहीं. तो निसटला तो निसटलाच. कोठें दिसेना. बराच वेळ इकडे तिकडे धांवाधांवी झाल्यावर ते तिघे जेव्हां एके ठिकाणीं जुळले, तेव्हां **यशवंतराव** ह्मणतोः—" निसटला शिचा. मोठा बहादर पळणारा. चला आतां त्या ओझ्यांत तरी काय आहे तें पाहूं. आपल्या या गर्दीत तें नुसतं काय आहे हें दिखिल आपण पाहिलं नाहीं. तो का चोरीचा माल आहे का त्याचं जाळं आहे ? एवढा डोंगर पोंखरला, आतां आहे तरी काय हें पाहूं या. "

**परशुरामपंत** मोठ्या आढ्यतेनें ह्मणतो " अजून तुह्माला जाळं असावं असंच का वाटतं आहे ? मी खात्रीनंच सांगतों कीं, त्यांत चोरीच्या मालापेक्षांही भयंकर कांहीं तरी असावं. तो जो इतका अगदीं जीवावर उदार झाल्यासारखा होऊन पळाला, तो उगीच नाहीं. त्याला पक्कं वाटलं असावं कीं, आपण सांपडलों तर वांचत नाहीं. "

**जगन्नाथपंत** हें ऐकून मोठ्यानें हंसला व ह्मणतोः—" तर मग काय त्यांत खूनबिन केलेलं माणस आहे असं तुमचं ह्मणणं का काय ? "

" नुसतं ह्मणणं इतकंच नाहीं, पण तुमची खात्री करून देतों चला. पहा बरं आमच्या चाणाक्षपणाची तरी मजा बघा. तें पहा तिथें आहे तें बोचकं, चला " **जगन्नाथपंतास** व **यशवंतरावास** तेंच पाहिजे होतें. कारण आतां त्या गांठोड्यांत काय आहे तें पाहण्याची त्यांची उत्कंठा फारच बलवत्तर झाली होती. थोड्याच वेळांत ते त्या गांठोड्यापासून थोड्या अंतरावर आले. तेव्हां **यशवंतराव** ह्मणतोः—

" अहो, बोचकं अजून तिथेंच आहे. मला वाटलं आपली ही पळापळी ऐकून पोलीस आलं असेल आणखी त्यांनीं तें बोचकं घेतलं असेल आपल्यां ताब्यांत. पण आमचं पोलिस कसलं! दाद ना फियोद!"

" ह्मटलं ह्मणजे त्या रेल्वे फाटकापाशीं पोलिसचे शिपायी असतात उभे. "

"पण पाहिजेत तेव्हां नसायचे. असो. चला बघा काय त्यांत आहे तें ह्मणजे मग आपले जाऊं कृष्णरावाच्या तिकडे."

"तुह्मी जा पाहिजे तर. मी हें काय आहे तें पकं पाहिल्याखेरीज कधीं यायचा नाहीं."

"बरं चला. पहा तर खरं आधीं. आह्मी थांबूं तितका वेळ. मग तुह्मी आह्मी जाऊं."

"असं कांहीं मजेदार काम असलं कीं मला जसं कांहीं स्फुरण चढतं. अन् तुह्मी कां असं करतां ? मी आपल्या हातानं सारं काम करून काय तो पत्ता लावीन."

"अहो **परशुरामपंत**, आह्मी दिखिल कांहीं भिणार नाहीं. पण आह्मी पडलों लोकांचे चाकर. उगीच कांहीं किचाट असलं अन् कांहीं साक्षी बिक्षीचा प्रसंग आला ह्मणजे पोलिसचं खटलं तें. ह्मणून आपलं अंमळ--"

"मग **यशवंतराव**, अहो **जगन्नाथपंत** तुह्मी आपले जा कसे. हें प्रकरण मला दिसतं आहे भयंकरांपैकींच. जा. मी हरतऱ्हा करून तुह्मांवर साक्षी बिक्षीचा प्रसंग आणणार नाहीं. त्यांतूनय् नाइलाज झाला तर मग--"

"मग हें काय तें आह्मांला बघूं तर द्याल. हो एवीं तेवीं आमच्यावर साक्षी बिक्षीचा प्रसंगच जर आला तर मग आपलं काय आहे तें पाहून तरी घेतलेलं असावं."

"तर मग अजून तुह्मांला शंकाच आहे ह्मणायची ? या तर."

असें ह्मणून ते त्या गांठोड्याजवळ जातात तों तें बोचकें नसून एक मोठें थोरलें पोतें आहे असें त्यांस दिसलें. **जगन्नाथपंतांनीं** त्या पोत्यास पायानें डंवचून पाहिलें; **परशुरामपंत** खालीं बसले व पोतें चापशीत चापशीत आपल्याशींच पुटपुटतात:--

"हं. ठीक. आतां शंकाच नाहीं उरली. कोणी ह्मणेल यांत नुसतंच गवत भरलं आहे. पण खून करणारा चांगला कुशल नाहीं. कोणी सहज पाहिलं असतं तर ओळखलं असतं कीं, यांत मुडदा भरला आहे ह्मणून."

तें ऐकून **जगन्नाथपंतास** चमत्कारिक झालें व तो तावडतोब ह्मणतो:--

" काय ? **परशुरामपंत** ! असं काय बडबडतां ? अजून पोतं फोडून पाहिलं नाहीं तोंच ' खून ! मुडदा ! ' असं काय ह्मणतां ? "

पोत्याचें तोंड सुतळीनें शिवलें होतें, तीं तोडून **परशुरामपंत** तोंड मोकळें करीत करीत ह्मणतातः—" काय ह्मणतां **जगन्नाथपंत** ? पहा एकदां मी ह्मणत होतों तें खरं कां खोटं ? "

**जगन्नाथपंत** असा वांकून पहात होता, तों पोत्यांत काय होतं तें पाहून झट्कन् ताठ झाला, व **यशवंतराव** तर तें पाहून मागेंच सरकला. त्यांस दोन पाय दिसले. तेव्हां **परशुरामपंत** ह्मणतो हा बाईचा मुडदा आहे. मला तें वाटलंच होतं. आपण पाठीमागें लागलों होतों, त्या माणसाची शक्तीच सांगत होती कीं हा बाईचा मुडदा असावा ह्मणून. त्याच्या एकट्याच्यानें पुरुषाचा मुडदा नेववला नसता. आणखी हें पाहिलंत का ? या इथें गुलामानं धोंडे बांधले आहेत. वेडगळ कुठला ! एवढाले धोंडे बांधून कुठें प्रेत कांठाला यायला राहिलं असतं का ? वाळूंत रुतून बसायला किती जड धोंडे पाहिजेत ! "

" अहो **परशुरामपंत**, ही वेळ बडबडत बसण्याची का आहे ! पोलिसाला बोलवा ! " **जगन्नाथपंत** मोठ्यानें ह्मणतो. " चला चला. **यशवंतराव**, उगीच बसून उपयोग नाहीं. "

" खरंच नाहीं. " **परशुरामपंत** ह्मणतो " पण तिला बाहेर तर काढून पाहूं द्या. पुरुषासारखे पुरुष तुह्मी आणखी भितां काय ? एक क्षण दिखील लागणार नाहीं तिला बाहेर काढायला. एकदां त्या बाईचा चेहरा आपण पाहूं आणखी मग चालते होऊं. पण आधीं चेहरा पाह्यला पाहिजे. तुह्मी धरा इकडून. आणखी मी तिकडून पोतं घेतों ओढून ! "

" तो कशाला ? काय ती आपल्याला ओळखूं येणार आहे का काय ? "

" त्याचा काय नेम ? असली कदाचित् कुठें पाहिलेली तर ! "

असें ह्मणतां ह्मणतांच **परशुरामपंत** दुसऱ्या बाजूला गेला व जसा एखादा मनुष्य छत्रीवरचा अभ्रा काढीत असला ह्मणजे त्याला कांहींच वाटत नाहीं, त्याप्रमाणें शांतपणानें तें पोतें हलकें हलकें ओढूं लागला. ओढतां ओढतां ह्मणतो " अरे गुलामांनो तिला सगळी गुरफटून टा-

कली आहांत काय कपड्यांत ? शिवून टाकली आहे आणखी ! मोठे त्रिलंद खुनी बाबा ! बहुतेक तिच्या हातालाही दगड बांधले असतील गुलामांनीं ! आहेतच.—हं ! कशाला ही कोण, तें कधीं ओळखायला येतं आहे ! तिचं मुंडकं आहे कुठें ? फार त्रिलंद दिसतात हे खुनी लोक ! इतके अकलवंत असतील असं नाहीं मला वाटलं !"

**जगन्नाथपंत** तो भयंकर प्रकार पाहून ओरडतोः-काय भयंकर हो!"

**यशवंतराव** तर इतका दचकला कीं त्याला त्याच्या सोबत्यानें धरलें नसतें तर तो धाड्कन् खालीं पडलाच असता. **परशुरामपंता**चा तर्क खरा झाला. त्या पोत्यांत खून केलेली बाई होती. आणि तिचें धड मात्र त्यांत होतें. मुणकें कापून टाकलें होतें. धडांतून रक्त मुळींच गळत नव्हतें. मुणकें इतक्या सफाईनें कापलें होतें कीं जसें कांहीं एकाद्या यंत्रानेंच तें काम केलें असावें असें वाटेल. **परशुरामपंत** फार गंभीरपणानें त्या मुडद्याची तपासणी करीत होता. त्याच्या चित्ताचें नुसतें लय लागून गेलें होतें. त्यास दुसरें तिसरें कांहीं ठाऊक नव्हतें. कांहीं वेळानें तो "मोठे त्रिलंद लोक बाबा ! मोठे बिलंद !" असें ह्मणत ह्मणत उठला व आपलया दोघां सोबत्यांकडे वळून ह्मणालाः— "कसं काय हो ! हें प्रकरण तर मोठं भयंकर दिसतं आहे ! आणखी याची चांगलीच चौकशी होईल. तुमच्यावर साक्षी त्रिक्षीचा प्रसंगय् येईल. त्यांतून होतां होईल तों तो तुह्मांला टाळायचा असेल तर तुह्मी आपले मुकाट्यानं जा कसे इथून. एवढं मात्र करा कीं त्या रेलवे फाटकाजवळ किंवा कुठें पोलिसचे शिपाई असतील त्यांना इकडे पाठवून द्या. त्यांना तिकडे कोणी 'खून खून' ह्मणून ओरडलं सांगा ह्मणजे ते येतील. मी सांगेन त्यांना सारा मजकूर. तुमचं नांव नाहीं सांगणार ह्मणजे झालं. जा तर."

**जगन्नाथपंत** लागलींच "बरं तर आह्मी जातों." असें ह्मणाला, त्यावर **परशुरामपंत** त्यास आणखी ह्मणतोः—"इकडे अगदीं नाइलाजच झाला तर मला तुमचीं नांवं सांगावीं लागतील; पण तोंपर्यंत कांहीं मी तुमच्याविषयीं चकार शब्द दिखील काढणार नाहीं. तुह्मीं दिखील ही गोष्ट तिसऱ्याला कळूं देतां उपयोगी नाहीं हो, नाहींतर मला स्पष्टपणानं तुमचीं नांवं सांगावीं लागतील. तुह्मी आतां पाहिलं हें अ-

मर्दी सारं विसरा. आपल्या आपल्यांत् देखील पुन्हां त्याचा उच्चार करूं नका. "

" त्याची तुह्मांला काळजी नको. आह्मी ही गोष्ट कानच्या कोंपऱ्याला दिखील कळूं देणार नाहीं. पण आमच्या साक्षी दिल्याखेरीज तुमचं चालेल कसं ? "

" त्याच्याशीं तुह्मांला काय करायचं आहे ?—पण आधीं आतां तुह्मी जा कसे, इथें उगीच किती वेळ उभे राहाणार! मी दिखील कांहीं फार वेळ नाहीं उभा रहणार ! पोलिसच्या गळ्यांत घातलं कीं आलोंच. "

**यशवंतराव** व **जगन्नाथपंत** त्याचें बोलणें चाललें होतें तोंच तडक निघाले, ते त्या फाटकापासून थोडे अंतरावर येतात तोंच त्यांस दोन पोलिसचे शिपाई दिसले. **परशुरामपंतानें** सांगितल्याप्रमाणें **जगन्नाथपंतानें** त्या शिपायांस सांगितलें. त्यासरसें ते शिपाईही **परशुरामपंत** होता त्या बाजूला निघून गेले.

तेंव्हां **जगन्नाथपंत** ह्मणतो " आतां तो **परशुरामपंत** मरो कीं कांहीं करो तिकडे; आपण आपले **कृष्णरावाच्या** तिकडे जाऊन तो आला आहे का पाहूं "

" आतां नको बाबा. " **यशवंतराव** ह्मणतो " पुरे झाला तो फराळ तुला त्याची आठवण तरी कशी झाली कोणाला ठाऊक ! तो **कृष्णराव** कसला येतो ! तो गेला असेल आपल्या अंगवस्त्रांना घेऊन थेटराबिटरांत. त्यांतून आला असला तर अजून का बसला आहे ? "

" अरे चल पाहूं त्या जागीं असला तर; नाहींतर चालले परत. इथें काय ? "

" नको बोआ आतां. आपल्याला झोंप येते आहे. "

" अरे चलरे. "

असें भाषण होऊन ते दोघे चालूं लागले.

**जगन्नाथपंत**—कायरे बोआ मला तर वाटतं कीं हा **परशुरामपंत** कुठल्या कंपनीचा एजंट नाहींन् फिजंट नाहीं. तो निःसंशय डिटेक्टिव आहे.

**यशवंतराव**—मला दिखील असंच वाटतं बोआ. अन् तुला सांगतों, त्याची संगती आतां जितकी होईल तितकी कमी केली पाहिजे.

**जगन्नाथपंत**--माझा तर अगदीं निश्चय झाला आहे तसं करायचं ह्मणून. तो आपल्या हापिसांत नित्य येतो आणखी कांहीं तरी देवघेव करीत असतो. पण आतां मोठं सावधगिरीनं राहिलं पाहिजे बाबा. हो, कोण्या वेळीं काय किचाट आणील आणखी काय नाहीं, त्याचा काय नेम ! हें आतांचंच काय होईल कांहीं मला कळत नाहीं. बरं एक. कीं, आपलीं नांवं नाहीं त्यांत यायचीं नाहीं तर--मरूं दे तो **परशुरामपंत** शिंचा. तो मोठा वस्ताद खरा पण आं. तो नेहमीं आपल्या चाणाक्षपणाबद्दल ऐट मारतो ती कांहीं निवळ खोटीच ह्मणतां येत नाहीं. हो, बरी आठवण झाली. कायरे हें काय लचांड असावं ? **यशवंतराव**, अरे मी इतकं ह्यानं बोलतों आहें आणखी तूं असा दुर्मुखलेला कां दिसतो आहेस ? चल, असं जरा कांहीं हें धर. हें काय हें ? आपण आलों आतां अगदीं जवळ. ती पहा मंडळी दिखील दिसताहेत. नाहीं का ? ए **यशवंतराव**, अरे असं काय करतो आहेस! अरे पाऊल उचल.

**यशवंतरावाच्या** मनांतून पुनः कांकूं करण्याचें आलें होतें व तो तसें कांहीं बोलणार इतक्यांत **जगन्नाथपंत** मोठ्यानें ओरडून ह्मणतो "ओ ! हो ! काय मजा आहे ! हा पहा **आनंदराव** देखील आला."

खरोखरच **आनंदराव** तिकडून येत होता. त्यानें या आपल्या स्नेह्यास कांहीं पाहिलें नव्हतें. तो आपल्या विचारांत इतका निमग्न झाला होता कीं, त्याला **जगन्नाथपंत** दिसला नाहीं इतकेंच नाहीं, पण **जगन्नाथपंत** त्याला आडवायला लागला असतां दोघांची टक्कर होण्याची वेळ आली; पण तितक्यांत सांवरून त्यानें वर पाहिलें तों **जगन्नाथपंत** व **यशवंतराव** त्याच्या दृष्टीस पडले, तेव्हां तो ह्मणतो " काय तुह्मी एवढ्या रात्रींचे इथें ? तुह्मी इथें भेटाल असं माझ्या स्वप्नीं दिखील आलं नाहीं."

" आह्मी ती आज **ठाकुरद्वारां**तली मजा पाह्यला गेलों होतों; ती पाहून तिकडे **कृष्णरावा**कडे चाललों आहोंत. त्यानं आज आपल्या नेहमींच्या जागीं फराळाबिराळाचं आणण्याचा बेत केला आहे. तुला दिखील बोलावलं आहे. तुला दिसली असतील मंडळी दुरून. तूं तिकडूनच आलास नाहीं का ?"

" दिसली कांहीं मंडळी खरी. पण आतां इतक्या रात्रींचा--"

" अरे चलरे. "

थोडासा आग्रह झाल्यानंतर तोही कबूल होऊन चालूं लागला. थोड्या वेळानें **जगन्नाथपंत** त्याला ह्मणतोः--

" पण **आनंदराव** तूं इतका वेळ गेला होतास कुठें ? आज तुझ्या मनाला स्वस्थता नाहीं असं वाटतं ? हा काय चेहरा अगदीं उतरून गेला आहे ! अगदीं जसा एखादा मनुष्य त्रासून नाहीं तर घाबरून जावा कीं नाहीं तसं दिसतं. नाहींरे **यशवंतराव** ? "

" कांहीं नाहींरे ! उगीच. ही कामाची दगदग झालं. **आनंदराव** एकदम ह्मणाला—"

" बरं, चल आह्माला नसलं सांगायचं तर नको सांगूं. पण उशीर झाला आहे तर पावलं तर उचलशील लवकर लवकर. "

या वेळीं ते ज्या ठिकाणीं होते त्या ठिकाणापासून त्यांना जाण्याचें स्थान जवळच होतें, यामुळें ते तिथें तेव्हांच जाऊन पोंचले. तेथे पोंचल्यावर पहातात तों **कृष्णराव** व कोणी दोघी स्त्रिया तेथें बसून यथास्थित फराळ करीत आहेत.. हे जाऊन पोंचण्याबरोबर **कृष्णरावानें** व या स्त्रियांपैकीं एक थोडीशी ज्यास्त निर्लज्ज होती तिनें " खाशी काय हा उशीर " असें मोठ्यानें ह्मटलें. कांहीं वेळानें यांसही **कृष्णरावाच्या** ब्राह्मणानें मसाल्याचें दूध वगैरे वाढलें. इतर फराळाचेंही दिलें. नंतर **कृष्णराव** ह्मणतोः—

" काय **यशवंतराव**, आपल्याला उशीर कां झाला हें कांहीं कळत नाहीं. होता कुठें इतका वेळ ? "

तोंडांतला घास खात खातच **यशवंतराव** ह्मणतो, " काय करावं हो मध्येंच जरा आपला एक स्नेही भेटला, त्यानं जरा खोटी झाली. त्याच्याही मनांतून इथें यायचं होतं—"

" हं ! हं ! **परशुरामपंत** असतील बहुतेक ! **कृष्णराव** लागलींच ह्मणतो. " त्यांना मीं बोलावलंच होतं. मग कां नाहीं आणलंत त्यांना ओढून ? "

त्यावर ती मघाची निर्लज्ज स्त्री **चिमाजी** मोठ्यानें ह्मणतेः—" **परशुरामपंत** कोण ? ते एजंट ह्मणून हिंडतात ते ना ? बरं झालं ते नाहीं आले ते ! माझी अगदीं पक्की खात्री आहे कीं, तो डिटेक्टिव्ह आहे.

त्यांत अगदीं शंकाच नाहीं. "

**यशवंतराव** मध्येंच ह्मणालाः—" छे ! छे ! मला नाहीं असं वाटत ! "

**कृष्णरावः**—कां ! तो पुण्यास गतवर्षी होतानाहो **चिमाजी** ?

**चिमाजीः**—" होता इतकंच नाहीं. पण शुक्रवारांत माझ्या घरीं दिखील आला होता. तो येऊन गेल्यावर पुढें मीं संशय आल्यावरून चौकशी करवली. तेव्हां कळलं कीं, तो मुंबईचा डिटेक्टिव्ह आहे. आणखी त्या **गोकुळदासशेट**च्या इथें चोरी झाली, त्या चोरीचा शोध लावायकरितां आला होता. "

**राधाजीः**—(दुसरी स्त्री) मग बरं झालं तो नाहीं आला तें. या डिटेक्टिव्हांना नुसतें ठेंचून टाकावें.

**कृष्णारावास** या सर्व गोष्टी माहीत नव्हत्या असें नाहीं. परंतु त्याला त्या गोष्टींचा खल व्हावा असें वाटलें नाहीं. तेव्हां तो ती गोष्ट बदलूं लागला. परंतु तितक्यांत **चिमाजीस** कांहीं आठवलेंसें झालें व ती एकदम ह्मणालीः—

" नाहीं पण तो आज इथें आला असता तर बरं असतं. आह्मीं आज एक कांहीं विलक्षण गोष्ट पाहिली ती तरी त्याला सांगून दिली असती. ह्मणजे त्यानें तिचा तपास लावला असता. "

**यशवंतरावास** भान न राहून तो झट्कन् ह्मणतोः—" काय, तुह्मीं दिखील कांहीं विलक्षण गोष्ट पाहिलीत ह्मणतां ? "

आपल्याशीं हा गृहस्थ बोलला असें वाटून त्या वेश्येस जरा आनंद झाला व तेवढ्यावरच ती खूप होऊन मोठ्या थाटानें ह्मणतेः—" फारच विलक्षण गोष्ट आह्मीं पाहिली. आह्मी गाडींतून येत होतों आणखी फणसवाडीच्या नाक्यावरून इकडे **विद्यारामभाई**च्या वाडीकडे वळलों तों, मुगभाट गल्लीच्या तिथेंच एका गाडीची आणखी आमच्या गाडीची टक्कर व्हायाचा बेत आला. त्याबरोबर आमच्या गाडीवाल्यानं सांवरून धरलंन् पर मी बाहेर डोकें करून जों पहातें तों एक मोठी थोरली जंगी गाडी अशी भिंतीच्या बाजूला उभी आहे आणखी तिचं दार उघडं असून एक असा शिपाया सारखा दिसणारा माणूस त्यांतून भलं थोरलं कांहीं तरी काढतो आहे असं दिसलं. मग काय ओझं होतं का

काय कांहीं समजत नाहीं. गाडी होती कोणाची पोत्याची. कांहीं भाड्याची नाहीं दिसली. आह्माला विलक्षण वाटलं तें तो शिपाई कांहीं काढीत होता तें. मला तें भलं थोरलं पोतं असावं असं वाटलं."

**जगन्नाथपंत** इतका वेळ मोठेंसें लक्ष्य देऊन ऐकत नव्हता. परंतु ती पोत्याची गोष्ट ऐकून तो बराच उत्सुक झाला. **यशवंतराव** ह्मणजे कमी उत्सुक होता असें नाहीं. **अनंतरावाचें** मात्र यांच्या या बोलण्या चालण्याकडे मुळींच लक्ष्य नव्हतें. ती दुसरी स्त्री **राधाजी** याजकडे कांहीं चमत्कारिक तऱ्हेनें पहात होती, परंतु तें त्याच्या ध्यानांतही आलें नाहीं. त्याचें मन दुसरीचकडे कोठें तरी गुंतलें होतें. तो आपल्या त्या विचारांत अगदीं गर्क होऊन गेला होता असें दिसलें. **जगन्नाथपंत** मात्र मोठ्या उत्सुकतेनें ह्मणतोः—"आणखी पुढें? पुढें काय झालं?"

ही त्याची उत्सुकता पाहून आपल्या बोलण्यावर **जगन्नाथपंत** एवढा उत्सुक आहे असें वाटून "आपण आज जिंकली" असें वाटणारी ती स्त्री जास्तच ऐटीनें ह्मणतेः—

"मग काय? मग त्या शिपायानं तें गाडीचं दार लावून टाकलं आणखी तो खालीं इकडे वळला. आणखी गाडी पाठीमागें वळली. घोडे पण काय होते त्या गाडीचे! त्या कोचमेनानं चाबकाला हात घालण्याबरोबर जे तडक निघाले ते एका क्षणार्धांत नाहींतसे झाले."

"आणखी तो पोतंवाला?"

"तो आह्मी गाडी पहाण्यांत गुंतलों तों तो पट्कन् कोणीकडे नाहींसा झाला."

**जगन्नाथपंत** त्यावर ह्मणतो. "विलक्षण गोष्ट खरी! हो. रात्रीं दहा अकराच्या सुमाराला आणखी कोणाच्या स्वतांच्या गाडींतून पोतं काढून घेऊन जायचं! काय असेल तें खरं. नाहींतर कांहीं यकश्चित् गोष्ट असेल झालं."

"पण गाडीचे कोचमेल बिचमेल सिद्दी जातीचे होते असं वाटतं" **कृष्णराव** हलकेच ह्मणाला."

हे शब्द ऐकून **अनंतराव** किंचित् जागा झाल्यासारखा झाला व पुढील बोलणीं विशेष लक्ष्य देऊन ऐकूं लागला.

"वा!" **जगन्नाथपंत** झट्कन् ह्मणतातः—"तर मग गाडी को-

णाची तें तेव्हांच कळेल. इथल्या परभू भाल्यांच्या गाड्यांना कांहीं सिद्धी कोचमेल नाहींत."

"ती कोण संस्थानिकाची राणी आली आहे ती !" राधाजी ह्मणते, "तिच्या गाडीवर असेच कोचमेल दिसतात."

**जगन्नाथपंत**:—ह्मणून कांहीं ती पोतीं गाडींत घालून इकडे मुगभाटाकडे कशाला येईल.

**कृष्णराव**:—छे ! छे ! तिची गाडी नव्हे ती.—पण त्याचा काय नेम सांगावा !

**अनंतरावाला** हे शब्द ऐकून कसेंसेंच झालें. तो अगदीं चमत्कारिक चेहेरा करून ह्मणतोः—कांहो, नेम नसावा असं कां ह्मणतां ? कांहीं तुह्मांला माहिती आहे वाटतं त्यांतली ?

**कृष्णराव**:—छे ! छे ! साऱ्या जगाला जी माहिती आहे तीच आह्मांला. आह्मांला विशेष काय असायची ! कांहो पण तुह्मी अगदीं तिचा पक्ष घेऊन भांडायलाच उठतां ?

**अनंतराव** आपले ओंठ चावून तो अगदीं कांहीं तरी उत्तर देण्याच्या बेतांत होता. परंतु त्यानें यत्न करून ते शब्द अगदीं दाबून टाकले. **यशवंतरावाच्या** ही गोष्ट तेव्हांच लक्षांत आली व तेवढ्याकरितां त्यानें बोलण्याचा विषय बदलण्याचाही यत्न केला. परंतु **जगन्नाथपंतानें** तो गाडीचा व पोत्यांचा मजकूर ऐकल्यापासून त्याला अगदीं चैन पडेनासें झालें होतें. त्यांनीं रात्रीं जो खून पाहिला होता, त्याला व या गाडीच्या हकीकतीला अर्थातच मेळ बसत होता. तेव्हां त्याला त्या गाडीविषयीं आणखी आणखी प्रश्न विचारण्याला स्फुरण येई व तो विचारीही. **अनंतरावाला** तें कांहीं आवडेना. तो शेवटीं "**जगन्नाथपंत**, आतां आपण जाणार. तुह्मी येतां कीं नाहीं ? चोहोंचा सुमार झाला. दोन तास तरी झोंप मिळाली पाहिजे. चला." असें ह्मणाला. **यशवंतरावानेंही** तशीच घाई केली. तेव्हां **जगन्नाथपंतही** उठला व ती सर्वच मंडळी निघाली. **कृष्णराव** व त्याच्या त्या वेश्या या आपल्या गाडींत बसून चालत्या झाल्या व त्यांनीं आग्रह केल्यामुळें आणि यालाही त्या गाडीची व पोत्यांची हकीकत ऐकण्याची मोठी उत्सुकता असल्या कारणानें, आपल्या स्नेह्यांस आपण पायीं

लावून वेश्या बरोबर असतांना त्यांच्या गाडींत आपण जात आहों या-बद्दल कांहींच मनांत न आणतां **जगन्नाथपंत**ही त्यांच्या बरोबर गेला. त्याची ती हकीकत जाणण्याविषयींची उत्सुकता फारच उत्कट झाली होती, त्याला त्याचा इलाज चालेना. त्याच्यापुढें तो इतर सर्व गोष्टी विसरला. असो,

**अनंतराव** व **यशवंतराव** जे निघाले ते प्रथम **जगन्नाथपंता**च्या नादी स्वभावाविषयीं थोडा वेळ बोलून कांहीं वेळ **कृष्णरावा**वर व त्या वेश्यांवरही त्यांनीं टीका केली. शेवटीं आपण पुन्हां असल्या फंदांत पडावयाचें नाहीं असा निश्चय केला. मनुष्यानें अशी बाहेरख्याली क-रण्यापेक्षां आपल्या आपल्या आवडीप्रमाणें बायको करावी व संसार करावा हें फार चांगलें. अशा संबंधीं त्यांचें बरेंच बोलणें झालें. तें बोलणें चाललें असतां—

**यशवंतराव**—आपण तर बुवा आतां अगदीं निश्चय केला आहे कीं, आतां जें लग्न करावयाचं तें आपल्याला आवडेल त्या मुलीशीं करायचं. लोकांच्या ओंजळीनें कांहीं पाणी प्यायचं नाहीं. कां खरं कां नाहीं?

"तूं कर बाबा तसं" **अनंतराव** मोठ्या निराशेनें ह्मणतोः "माझं जर विचारशील तर तुह्मीं रात्रीं मला भेटायच्यापूर्वीं मी समुद्रांत जाऊन जीव द्यावा कीं काय ह्या विचारांत होतों."

**यशवंतरावः**—"**अनंतराव**! अरे हें ह्मणतोस तरी काय? तु-झ्या मनांत असले विचार यावे? आणखी तूं असं केल्यावर त्या यम-नीचं कसं व्हावं?"

"तोच तर विचार पडतो. तिचं एकदां लग्न होऊन गेलं असतं ह्मणजे मग मी अगदीं इतका दिखिल राहिलों नसतों. तिला एकदां तुझ्यासारखा सुशील नवरा मिळाला असं मीं पाहिलं ह्मणजे मी सुटलों तिच्या ऋणांतून."

हे शेवटले शब्द ऐकण्याबरोबर **यशवंतरावा**चें मन मोठें विलक्षण झालें. त्याच्या मनांत जी गोष्ट पूर्णपणें वागत होती तीच आज बोल-ण्यांत निघाली; परंतु ती आतां पुढें स्पष्टपणें कशी काढावी? **अनंत रावा**च्या बोलण्यावरून आपल्या मनांत काय आहे हें त्यास मुळींच

ठाऊक नाहीं असें दिसतें. त्याला जर तें ठाऊक असतें तर तो अशा तऱ्हेनें कधींच बोलला नसता. थोडा वेळ असा विचार करण्यांत **यशवंतराव** गढून गेला होता. परंतु कांहीं वेळानें तो तुटक तुटक शब्दांनीं व चमत्कारिक तऱ्हेनें ह्मणतोः—

" **अनंतराव,** तूं आणखी मी अगदीं जीवश्च कंठश्च स्नेही, तरी देखील मला बोलायला थोडीशी लाज वाटते. पण तुला आतां मी अगदीं मन मोकळं करून सांगतों. " तूं जी आतां गोष्ट बोललास ती अगदीं माझ्या मनांतली बोललास. "

" **यशवंतराव,** तूं ह्मणतो आहेस हें खरें धरावयाचें कीं कांहीं तरी माझ्या मनाला बरें वाटण्याकरितां बोलतो आहेस ? "

" **अनंतराव,** तुला मीं आज जर सांगितलं कीं आज जवळ जवळ सहा महिने माझ्या मनांत तूं आतां बोललास ही गोष्ट घोळते आहे तर तूं मला काय ह्मणशिल बरं ? "

" मी ? मी कांहीं ह्मणणार नाहीं. उलट असं ह्मणेन कीं यमनीचं नशीब ह्मणून असे विचार तुझ्या मनांत घोळले. "

" पण **अनंतराव,** " **यशवंतराव** किंचित् गंभीरपणानें ह्मणतो, " जसा आपण आपल्या विचारांविषयीं व हिताविषयीं विचार करतों तसा या यमनीचाही विचार पहायला नको का ? ती सुजाण आहे. तिचं तिला हिताहित कळतं आहे. तर तूं तिचा विचार घे आणि नंतर मग पुढला विचार. इकडे पहा, आधीं आपल्या मुलींना स्वतांच्या लग्नाविषयीं विचार करण्याची दुर्दैवानं कधीं पाळी येत नाहीं. त्यांतून जर एखादीला आली तर ती आपण कां दवडावी ? "

" छे ! छे ! **यशवंतराव,** तूं अगदीं चुकतो आहेस. आजपर्यंत जितकीं मीं स्थळं यमनीकरतां पाहिलीं तितक्या साऱ्यांची हकीकत मी तिला सांगून तिचा विचार घेतल्याखेरीज राहिलों नाहीं. तसंच तिला हेंही विचारीन, पण आतां त्याची शंका नकोच. मी तुला खात्रीनं सांगतों कीं, तिचा विचार विचारायला दिखील नको. तिला मोठा आनंद होईल. कारण ती तुला माझ्याप्रमाणें मानते. त्यांतून मी आतां तिला विचारीनच उद्यां—पण आतां रस्त्यांत कशाला या गोष्टी ? "

हें त्यांचें बोलणें झाल्यावर इतर कांहीं गोष्टी झाल्या त्यांत बोलतां

बोलतां **अनंतराव** ह्मणतोः—" तुमचं दोघांचं लग्न झालं ह्मणजे आमची सारी इस्टेट मी यमनीच्या नांवानं लिहून देईन, आणखी एक पांच चार हजार रुपये घेऊन कुठें तरी परदेशाला जाईन."

" कांरे बाबा ही कां तुझी इच्छा ? इथें काय तुला त्रास झाला ? तुझ्यासारखा सुखी आहे कोण ? एक वेड जर तुझ्या डोक्यांत नसतं तर तुला काय कमी होतं ? पण तूं लग्नाची गोष्ट बोलूंच नका ह्मणतोस त्याला नाइलाज आहे. श्रीमंती आहे. तारुण्य आहे. असं असून जेव्हां तूं लग्न करायचं नाहीं ह्मणून हट्ट धरून परदेशाला जाणार ह्मणून ह्मणतोस, त्या तुला एवढं झालं आहे तरी काय ? एवढा तुझ्या सुखावर विंबा घातला तरी कोणी ?"

या बोलण्याच्या सुमारास ते दोघे गिरगांवांतील पोर्तुगीज लोकांच्या देवळा जवळ आले; तेथें काय ! यावेळीं अजून कोणी दिसत नव्हेतें यामुळें यांस बोलण्यास शंका वाटली नाहीं. " **यशवंतराव** काय सांगूं तुला ? आज आतां ओघ आलाच आहे तर तुला सांगतों. आमची जी यजमानीण आहे तिनं माझ्या सर्व जन्माचं मातेरं मांडलेलं आहे." **यशवंतरावास** या **अनंतरावाच्या** शब्दांनीं मोठेंसें आश्चर्य वाटलें नाहीं असें दिसलें. मग त्याला त्या गोष्टीची थोडी बहुत माहिती होती ह्मणून कीं काय कोण जाणे ! तो स्तब्धच होता.

**अनंतराव**—तिनें सर्वोपरी माझा नाश करायचा ह्मणून निश्चय केला आहे असं दिसतं. माझ्याशीं ज्यांचा ज्यांचा ह्मणून संबंध आहे त्यांचा त्यांचा ती मोठा द्वेष करते. माझा स्वतांचा तिला मोठा तिट्कारा आहे. आजच एकंदर हकीकत काय झाली ती मी तुला सांगतों ह्मणजे तुला सगळा प्रकार काय आहे तो कळेल. मी तुला आज दुपारीं कोटांत भेटलों होतों खरा ?

परंतु येथें कोणी मनुष्य आपलें बोलणें ऐकतो आहे असें वाटून **यशवंतराव अनंतरावास** ह्मणतो " **अनंतराव**, आतां असं नको. आपण आतां आपल्या वाडींत जाऊन तुझ्या बंगलींत एकीकडे जाऊन बसूं; आणखी मग मला तूं सारी हकीकत सांग. नाहींतर माझ्या खोलींत चल."

**अनंतरावास**ही तें बरें वाटलें व ते लागलींच आपल्या वाडींत जा-

ऊन **अनंतरावाच्या** घरीं गेले., तेथें गेल्यानंतर **अनंतरावानें** त्यांस आपली हकीकत सांगण्यास सुरुवात केली.

" मी तुला भेटलों तेव्हां रुपये घेऊन चाललों होतों. यजमानणीच्या बंगल्यावर गेलों. परवांच्या दिवशीं आमचं भांडण झालं तेव्हां मी राजीनामा देतों ह्मणून सांगितलं होतं. पण महिना भरला नव्हता तेव्हां तें तसंच राहिलं. माझ्या मनांत काय होतं कीं तेवढे ते रुपये पोंचवावे आणखी मग लवकर निघून येऊन जेवावं अन् गाडी करून यमीला ठाकुरद्वार दाखवून आज तें संगीत नाटक तिकडे गेटी थिएटरांत आहे, तें दाखवावं. तिनं कधीं पाहिलंच नाहीं अजून ह्मणून ह्मटलं न्यावं एकदां. असा माझा बेत होता. मी बंगल्यावर गेलों आणखी ती **गुलनार** ह्मणून आमच्या यजमानणीची अगदीं मोठी प्रीतींतली विश्वासाची अशी लवंडी आहे तिच्याजवळ रुपये देऊन यजमानणीला न भेटतां येण्याचा माझा विचार होता. पण तें कांहीं साधलें नाहीं. मी कंपाऊडांत पाऊल टाकतों तों यजमानीण माझीच वाट पहाते आहे असं कळलं. मग काय करणार ? मी आंत गेलों, ते रुपये पुढें ठेवले. तिनं ते रुपये घेतले आणि पटकन् पेटींत न मोजतां टाकून दिले. मी कुर्नुसांत करून जाणार तोंच ती काय ह्मणते; " **अनंत** आज माझ्याबरोबर हिंडायला आलं पाहिजे. " मी आपल्याकडून पुष्कळ सांगितलं कीं तें कांहीं नाहीं मला कामं आहेत. " " काय आहेत कामं " ह्मणून अगदीं तिनं पिच्छाच पुरवला. मी आपल्या बहिणीकरितां एवढा अगदीं हा असतों हें पाहून तिला मोठा विषाद वाटतो. तिनं लागलींच सांगितलं कीं, कांहीं चालायचं नाहीं, आलं पाहिजे. "

"आणखी मग तूंही गेलास हिंडायला ?" **यशवंतरावानें** विचारलें.

" मग काय करावं बाबा ? त्यांनीं आपल्या सर्व चाकर माणसांना घालवून लावलं, माझ्या गळ्याला मिठी मारली. मला निर्दय ह्मटलं. कठोर ह्मटलं. दोघांनीं पळून जाण्याचा विचार सुचवला. फार काय ? ती मला ह्मणाली ' **अनंत** तूं कबूल असलास तर आज रात्रीं आपण कुठें तरी निघून जाऊं. माझा तुझ्यावरच काय तो या जगांत जीव आहे. ' हें सारं नाटक मीं आपल्या बरोबर बाहेर हिंडायला यावं ह्मणून होतं. शेवटीं मी तरी काय करूं ? येतों हिंडायला ह्मणून ह्मटलं.

घरीं यम्नीकडे निरोप पाठवतों ह्मटलं तर तें दिसील तिनं करूं दिलं नाहीं." इतकें बोलून **अनंतराव** थोडा वेळ स्तब्ध राहिला तेव्हां—

**यशवंतराव**—मग काय झालं ?

**अनंतराव** पुढें ह्मणतोः—**यशवंतराव,** आज आतां सारंच सांगण्याचा मीं बेत केला आहे, तर आतां मूळपासून हकीकत सांगतों ती ऐक. पहिल्यानं हिच्या कारभाऱ्याची जागा मला कशी मिळाली हें तुला ठाऊक आहेच. मी कारभार पहायला लागून थोडे दिवस झाले नाहींत तोंच यजमानणीनें एक दिवस मला एकांतांत गांठला आणखी प्रेमाचीं बोलणीं लावलीं. तुला ह्मणून खरं सांगतों माझंही मन विरघळलं. पुढें त्यांनीं मला काय आग्रह केला कीं, मीं एक कुठें तरी आडबाजूला जागा घ्यावी, आणखी तिथें दोघांची गांठ पडावी. मींही त्याप्रमाणें तिकडे गांवदेवीकडे त्यांनीं सांगितल्याप्रमाणें एक लहानसा बंगला घेतला आहे. तेथें आह्मी नेहमीं भेटतों. काल आह्मी हिंडायला गेलों ते असे आपोलो बंदराकडे गेलों. तिथें गेल्यावर तिनं मला उतरायाला सांगितलं. आणखी काय तिच्या मनांत आलं तें तूं आतां निराळी गाडी करून माझ्या बंगल्यावर ये. मला काम आहे. मी जातें असें ह्मणून निघून गेली. मी अगदीं आश्चर्यानें चकित होऊन गेलों. आणखी आतां घरीं जायचं, यजमानणीच्या बंगल्यावर कांहीं जायचं नाहीं, असा जों विचार करतों आहें तों तिचा तो एक सिद्धी आहे तो पळत पळत माझ्यापाशीं आला, आणखी माझ्याजवळ येऊन त्यानं सांगितलं कीं, "बाईसाहेब गांवाला जाणार आहेत तेव्हां तुह्मांला आतां बंगल्यावर बोलावलं आहे." मी एक व्हिक्टोरिआ करून गेलों. तिथें जातों तों यजमानीण मुळींच नाहीं. आतां येतील मग येतील असा विचार करतों आहें तों रात्रीचे दहा वाजले. तेव्हां शेवटीं स्वारी आली आणखी शेवटीं एवढे शब्द बोलली. ते शब्द मला अगदीं पाठ आहेत. मी कधीं विसरणार नाहीं. "मूर्खा, तुझ्या सारखा पाजी कोणी नाहीं. माझं तुझ्यावर इतकं प्रेम असतां तूं माझ्याशीं कपट करतोस ? तुला मान नाहीं. ऐट नाहीं. ती जर तुझ्या ठिकाणीं असतीं तर मीं तुला देव ह्मणून भजलें असतें. मीं आजपर्यंत जसा तुला वांकवला तसा तूं वांकत गेलास हाच तुझा अवगुण. आपलें

तेंच खरें करण्याकरितां तूं एखाद वेळ नाहीं. नेहमीं मला मारलें असतेंस तर मीं तुला फारच मान दिला असता. पण तुझ्यांत ती कर्तबगारीच नाहीं. रड्या तूं. रडतच ऐस. मला ठाऊक आहे कीं, तुझं माझ्यावर फार प्रेम आहे. पण तें रडकं प्रेम काय उपयोगाचं ? मी जातीची मुसलमानीण. मला रडके लोक मुळींच आवडत नाहींत. मी आज जाणार आहें लांब एका गांवाला. पुष्कळ दिवसांनीं येईन. मी इथें आल्यानंतर पुन्हां तूं माझ्या घराची पायरी चढतां कामा नये. मला कुठें पाहिलीस तर बोलतां कामा नये." आणखी कितीतरी ती बोलली अद्वातद्वा ! कांहीं त्याला पारावारच नाहीं. आपला मी खालीं मान घालून होतों. त्यांचें बोलणें संपल्याबरोबर बाईसाहेब चालत्या झाल्या. बोलणें संपलें असें पाहून मी वर डोळे करून पहातों तों त्या कुठें आहेत ? किंचित् वेळ बसून मी हिरमुसल्या तोंडानें बाहेर पडलों.

"काय विलक्षण बाई बोआ ही !" **यशवंतराव** मध्येंच ह्मणतो. "तुला काय सांगूं **यशवंतराव**, आज आतां सर्व गोष्टी मी तुझ्यापाशीं कबूल करतों आहें, तर आणखी तिच्या विलक्षणपणाची एक गोष्ट सांगतों ऐक. तिनं कांहीं सांगितलं तरी ऐकतों कीं नाहीं हें निव्वळ पाहण्याकरितांच ह्मणून माझ्याकडून तिनं एकदां एका कागदावर दुसऱ्याचीच खोटी सही करून घेतली. अशी कांहीं गळ घातली ते दिवशीं तिनं, कीं शेवटीं मीं तिच्या ह्मणण्याला कबूल होऊन केली खोटी सही !" "अरे पण काय भयंकर गोष्ट ही ! आज सुटलास तिच्या तडाक्यांतून एकदाचा. आपलं नशीब सभज बरं मग पुढें काय झालं !"

"बाहेर पडल्यावर मला असं वाटलं कीं, त्या अवदसेचा प्राण घ्यावा. मी अगदीं वेडावून गेलों. तिथल्या तिथेंच बंगल्या भोंवतीं हिंडू लागलों. बराच वेळ झाल्यावर एका चाकराला विचारलें तर त्यानं सांगितलं कीं, बाईसाहेब माठीमागल्या दारानें गाडींत बसून गेल्या. मग तें खरं वाटेना ह्मणून तबेल्यांत जाऊन पहातों तों, गाडीही नाहीं. तेव्हां ती खरोखरच बाहेर गेली असं समजून आपला इकडे वळलों."

**यशवंतराव**:—कायरे पण तो तिचा नवरा अगदीं तिच्याकडे पहात नाहीं हें काय ?

**अनंतराव**:—तो काय शिचा सारा दिवस 'शराब' आणखी बु-

दवळें, जुवा, यांत मग्न असतो. तें कांहीं विलक्षण आहे. बरं चला. आतां काय? मी आतां अगदीं शहाणा झालों. अंगावरलं पाणी मांजर नाहीं तर कुतरं जसं अंग झाडून उडवून देतं तसं हें सारं आतां हें उडवून देतों; निदान यत्न तरी करतों.——बरं तर **यशवंतराव**, आज आतां मी यम्नीचं मन पहातों. आणखी मार्गेशीर्षांत तुमचं दोघांचं लग्न करून टाकूं. तुझ्या स्वाधीन तिला एकदां केली ह्मणजे सुटलों असें समजेन. इतकें यांचें बोलणें होतें आहे तों अगदीं उजाडलें, व कोण कुजबुजतें आहे ह्मणून यमुना वर आली. **अनंतरावाला** पाहण्याबरोबर यमुनेच्या चेहेऱ्यावर थोडासा आनंद व समाधान हीं दिसूं लागलीं व ती एकदम ह्मणालीः——"दादा रात्रभर कुठें होतास? माझा एक क्षणभर देखील डोळा लागला नाहीं. मीं ह्मटलं काय आहेन् काय नाहीं. अणखी काल मला नाटकाला नेणार होतास तें बरंच नेलंस?"

**यशवंतराव** जवळ बसला आहे, वगैरे कांहीं विचार न करितां **अनंतराव** अचरटपणानें ह्मणतोः——"हें पहा **यमुनाबाई**, आह्मी आपल्या लग्नाच्या खटपटींतच होतों बरं का रात्रीं. आपल्याला एक फक्कड नवरा शोधून काढला आहे. आपल्या जवळच आहे तो.——"

परंतु पुढें तो आणखी कांहीं बोलणार तोंच यमुना लाजून तेथून निघून गेली; व **यशवंतरावानेंही** **अनंतरावास** "हा काय हा अचरटपणा" असें ह्मणून गप्प केलें व आपण निघून जाऊं लागला. तेव्हां "ठरलंच तें आतां, आतां कां उगीच लाजतां?" असें ह्मणाला.

तीन दिवस होऊन गेले. वाळकेश्वरीं एका साहेबाच्या बंगल्यांत अगदीं एकीकडल्या खोलींत एक साहेब आणखी आपले **परशुरामपंत** कांहीं मोठें खलबत करीत होते.

**परशुरामपंतः**——मीं तुह्मांला सांगितलं नाहीं कीं, नेहमींची जी आपली वहिवाट आहे सगळ्या लोकांनीं पहाण्यासाठीं चौकीवर प्रेत ठेवायची ती कांहीं या गोष्टींत उपयोगाची नाहीं. कारण तुह्मी असं पहा. त्या प्रेताचं मुंडकं नाहीं, ओळखणार ओळखील काय? बरं कपड्या बिपड्यावरून ओळखायचं तर त्या पांढऱ्या कपड्याखेरीज प्रेतावर कपडा नाहीं. प्रेतावर कांहीं खूण नाहीं.

**साहेबः**——बरं. **परशुराम**, तूं ह्मणतोस ती गोष्ट खरी. पण तूं अ-

सा विचार करीत नाहींस प्रेत कोणाचं, कुठलं हें जर ओळखून काढलं नाहीं तर मग खुनी लोकांचा तपास तरी कसा लावणार ?

**परशुरामपंतः**—होय खरी गोष्ट. पण तुह्मी असं पहा. ज्या लोकांनीं हा खून केला, ते त्या मुंडक्याची विल्हेवाट लावायला राहिले असतील का ? माझी पक्की खात्री आहे कीं, त्यांनीं तें मुंडकं जाळून टाकलं असेल किंवा पुरून टाकलं असेल. अहो, बडे बिलंद लोक दिसताहेत ते. हे लोक जर मीं हुडकून काढले तर अगदीं नांव मिळवलं ह्मणून समजेन. **पारिस** शहरांतल्या डिटेक्टिव्हांच्यावर ताण केली असं होईल, हा खून उघडकीस आणला तर.

**साहेबः**—तुला जर या कामांत सिद्धि आली तर तुला मान देऊन पुष्कळ पगारही वाढवण्याचं मी तुला वचन देतों. आह्माला तूं कसकसा शोध लावणार एवढं सांग ह्मणजे झालं. आपलं तुझं काय चाललं आहे याची माहिती असावी इतकंच. वर्तमानपत्राच्या बातमीदारांना गांठून त्यांचीं तोंडं बंद केलीं आहेत. सध्यां तूं या गोष्टीचा बभ्रा होऊं देऊं नका असें ह्मणालास ह्मणून. आणखी तुझ्याकरितां चौकीवर तें धडही ठेवलें नाहीं, यामुळें लोकांना कांहीं खून वगैरे झाला आहे कीं काय याबद्दल संशय देखील येणार नाहीं. आणखी एक दोन दिवसांत या गोष्टीचं स्मरण देखील रहाणार नाहीं; पण **परशुराम**, या सगळ्या गोष्टींत एक मोठं लचांड झालं आहे असं मला वाटतं. तुला जेव्हां तें पोतं सांपडलं तेव्हां तूं एकटा नव्हतासना ? तुझ्याबरोबर आणखी एक दोन गृहस्थ होते; ते कदाचित् इकडे तिकडे बडबड करून बभ्रा करतील.

"छे. छे. त्याबद्दल आपण फिकीर करूं नका. ते एक अवाक्षर देखील काढणार नाहींत. असल्या या भयंकर खटल्यांत आपला संबंध आहे असं जगजाहीर व्हावं ही त्यांची इच्छाच नाहीं. आपल्याला साक्षीला कोणी बोलवील कीं काय हीच त्यांना मोठी भीति पडली आहे. मीं त्या दोघांनाही काल भेटून त्यांच्या मनांत काय आहे हें सारं पाहिलं. मला त्या पोत्यापाशीं सोडून ते जे गेले ते त्यांच्या एका मित्रानं फराळाचा बेत केला होता त्याचेवर तिकडे गेले. तिथें गेले तेव्हां त्या मित्रानं एक दोघी–हं–नेल्या होत्या. त्यांच्यापैकीं

एकीच्या इथें मीं जाऊन हे कांहीं बोलले कीं काय तिथें, वगैरे शोध केला; पण तिला त्याबद्दल कांहींच माहिती नाहीं. तेव्हां हे दोघे कांहींच बोलले नसावे हें उघड आहे. मला मात्र त्या बाईपासून बरीच उपयोगी माहिती मिळाली. गेल्या दोन दिवसांत मला जी माहिती मिळाली आहे याची तुह्मांला कल्पना देखील करतां येणार नाहीं."

"काय काय ती मला सांगून तरी ठेव. ह्मणजे आह्मी आपल्या चीफ ( मुख्य ) ला सांगून देऊं, तूं करशील तें आह्मां साऱ्यांना अगदीं मान्य आहे; पण विचारायचं एवढ्याकरतांच कीं इतरांची हालचाल आणखी तुझी हालचाल हीं एकमेकांला आड येऊं नयेत. हो तूं जरी या खटल्याचा तपास लावतो आहेस तरी दुसऱ्या मंडळींनाही तपास लावायला हुकूम केला पाहिजे आहे, त्या खेरीज कसं व्हावं ? "

परशुरामपंतानें विचार करतों आहें असें दाखवून मान हालविली, आणि थोड्या वेळानें मोठ्या डौलानें ह्मणतो ( परशुरामपंतास थोडासा फाजील डौल होता एवढेंच कायतें वावगें होतें. ):—आपण माझ्यावर एवढा विश्वास ठेवतां यांत मला मोठा सन्मान वाटतो. आणखी त्या सर्व विश्वासाला मी चांगला पात्र आहें, असं मी आपल्या उद्योगानं दाखवीन. आपल्याला माहीतच आहे कीं, माझी नजर मोठी सूक्ष्म आहे, आणि माझ्या अंगीं चाणाक्षपणाही भरला आहे. या चाणाक्षपणामुळंच मला कोणच्याही अगदीं भयंकर गुंतागुंतीच्या खटल्यांतल्या मुद्याच्या गोष्टी तेव्हांच कळतात. जी गोष्ट इतरांच्या स्वप्नांत देखील त्यांना सुचायची नाहीं अशी गोष्ट माझ्या तेव्हांच लक्ष्यांत येते. आणि अशी मुद्याची गोष्ट लक्षांत आली ह्मणजे मग मी ज्या ज्या मार्गानं तिचा खरेपणा पक्का होईल त्या त्या मार्गानं जात असतों. अन् अशा तऱ्हेनं तें एकदां पक्कं खरं ठरलं, ह्मणजे मग त्यावरून एका पाठीमागून एक तर्क करून अपराधाचा पक्का तपास लावून टाकतों."

" तुझी एकंदर पद्धति माझ्या ध्यानांत आली; पण आपल्यापुढं जं खटलं आहे, त्यांत तिचा उपयोग कसा काय करणार तें दाखवलंस ह्मणजे मग पक्कीच ध्यानांत येईल."

" तेंच आतां मी करणार. आपल्याला ठाऊकच आहे कीं, डाक्ट-

र साहेबांनीं शवपरीक्षा केली त्यावेळीं असं सांगितलं कीं, ही बाई अंमल करणारी असावी. ''

" होय. मला ठाऊक आहे. आणखी त्यानं असंही सांगितलं कीं, या बाईला मारली ती धिंगामस्ती करून मारली नसावी. तसा कांहीं प्रकार दिसत नाहीं. अंगावर जखम वगैरे कांहीं दिसत नाहीं. आणखी त्यानं असं सुचवलं कीं, हिला कांहीं तरी पाजून मारलं असावं. तेव्हां—''

" हं ! तोच तर मुद्दा आहे. डाक्टर साहेबांनीं सांगितल्याप्रमाणेंच गोष्ट असावी. ही बाई अफूनं मारली गेली असावी. आपल्याला माहीत आहेच कीं, मुसलमान लोकांत अफू खाण्याची फार संवय असते. कित्येकांना तर त्याखेरीज कधींच चालत नाहीं. मी उत्तर हिंदुस्थानांत गेलों होतों तिकडे मुसलमानी संस्थानांत तर ही चाल भारी. **झोटिंगाबादेस** एकूणएक पाहिला तो अफू खाणार. ''

" तें बरोबर आहे. पण आपण हल्लीं **झोटिंगाबादें**त नाहीं. मुंबईत आहों. ''

" त्या **झोटिंगाबाद**ची राणी व राजा हल्लीं वर्षभर इथें राहताहेत. वाळकेश्वरीं त्यांनीं एक अतिशय सुंदर बंगला घेतला आहे. ''

" मग काय तुझं असं ह्मणणं ? कीं त्या राणीचं कोणी तरी डोकं-कापून धड समुद्रावर टाकायला नेलं ह्मणून ? छे. छे. हें अगदीं असंभवनीय. ''

" माझी जी कल्पना आहे ही अगदीं असंभवनीय नाहीं इतकंच नाहीं, पण पुष्कळ संभवनीय आहे असं मी सिद्ध करून देतों. आपल्याला आठवतच असेल कीं, तें धड फार सुंदर, गोऱ्या रंगाचं असं होतं. आणखी कातडी देखील अतिशय मृदु अशी होती. हात पाय कसे अगदीं रेखलेले असून श्रीमंत माणसाचेच असावेत असं दिसलं. त्यांना रांठपणा कसा तो इतका देखील ठाऊक नव्हता. इतकंच नव्हे, पण नखांना, तळहातांला, आणखी तळपायांला मेंदी दिखील लावलेली होती. एवढेपणीं मुसलमाननींखेरीज कोणी मेंदी लावीत नाहींत. ''

" पण तूं जें एकदम आपलं मत बनवलंस तें एवढ्याच गोष्टीवरून नव्हेना ? तिचाच खून झाला असं मत व्हायला याच्यापेक्षां जास्त आ-

धार पाहिजे. आणखी दुसरं असं कीं, तुझी ही जी राणी आहे ही कांहीं पडद्यांतच असते असं नाहीं. तिला पाहिजे तेव्हां पाहिजे तिकडे जाते, हिंडते, फिरते, सगळं कांहीं करते, तेव्हां ती नाहींशी झाली आहे कीं काय याचा शोध करायला पाहिजे."

"मग मीं खटपट चालविली आहे ही तेवढ्याकरितांच चालविली आहे. गेल्या शनिवारापासून ती कोणाच्या दृष्टीस पडली नाहीं. आपण ह्मणाल कीं ती आजारी असेल, तर तसं नाहीं हें मी खास सिद्ध करून देईन. शनिवारीं संध्याकाळीं ती आपल्या कारभाऱ्याला बरोबर घेऊन ( ह्या कारभाऱ्यावर तिचं फार मन आहे असं लोक ह्मणतात ) इकडे आपॉलो बंदरावर हिंडायला गेली होती. ती एका उघड्या गाडींत गेली, आणखी परतही त्याच गाडींत आली."

"नवऱ्याचा धाक मुळींच नाहीं वाटतं तिला ?"

"हत्याच्या, तें कांहींच नाहीं.तिनं खुशाल हवं तसं वागावं; पाहिजे त्याला आणावं; पाहिजे त्याला बोलवावं. शनवारीं रात्रीं ८-९ वाजतां तिची आणि त्या कारभाऱ्याची गांठ पडली होती. त्यानंतर ती नाहींशी झाली इतकीच हकीकत आज मला मिळाली आहे."

"वा ! तुझे बातमीदार माझ्या बातमीदारांपेक्षां फारच चलाख आहेत."

"अं: ! मीं माझा गडी आहे त्याला तयार करून ठेवला आहे. एकदां त्याला अशा कामाला सोडला ह्मणजे काम फत्ते झाल्याखेरीज राहणारच नाहीं. मीं त्याला सांगून ठेवलं आहे कीं, तूं जाऊन त्या राणीच्या बंगल्यांत चाकरमाणसांत मिसळून एकंदर माहिती करून घे; तसंच तिनं आणखी त्या कारभाऱ्यानं कुठें दुसरी जागा घेतली आहे तीही टेहळून ठेव ह्मणून. मी त्या नबाबाकडे संधान बांधून त्याच्याकडून करतों शोध राणी खरोखरीच नाहींशी झाली आहे कीं काय तो."

"जर अशी ती नाहींशी झाली असती तर त्यानं आधींच पोलिसला वर्दी दिली असती."

"छे. छे. अगदीं गोष्ट मनांत देखील आणूं नका. तो तिच्या संबंधांत यत्किंचित् देखील मन घालीत नाहीं. एकदां माझा तिथें प्रवेश

झाला, ह्मणजे मी त्या राणीची जी एक लवंडी आहे तिची ओळख करून घेऊन सारा कांहीं तपास लावतों. पण प्रथम मला आज त्या गांवदेवीच्या तिथें जी कारभाऱ्यानं आणखी राणीनं जागा घेतली आहे तिथें जाऊन पाहिलं पाहिजे काय आहे काय नाहीं तें. तिथल्या कुलपाला लागेल अशी एक किल्ली आहे माझ्याजवळ. माझ्या त्या गड्याचं डोकं फार फक्कड आहे. गुलामाला पुष्कळ लहान सहान पण मोठ्या उपयोगी अशा युक्ति सुचतात. तो एखाद्या कुलपाचा नमुना माप तेव्हांच घेऊन वेळीं किल्ली देखील तयार करतो. तेव्हां आधीं त्या जागीं गेलं पाहिजे. कारण राणी तिथें गेली होती अशी माझी खात्री आहे, आणि तिथून मग मात्र तिचा थांग लागला नाहीं."

"तर मग तुझ्या मतानं कोणी तिचा खून केला असावा ?"

"तिचा कारभारी **अनंतराव** ह्मणून आहे. तिची आणखी त्याची फार दोस्ती. मला त्याची पुष्कळ माहिती आहे. त्याचा इतर व्यापारही आहे. त्याच्या भागीदाराची आणखी माझी ओळख आहे."

"बरं या राणीकडे त्याची वग कशी पडली ?"

"हिचा कारभार पाहायला कोणी तरी चांगला माणूस पाहिजे ह्मणून तिनं कोणाला सांगितलं तेव्हां याची कोणी शिफारस करून लावला असेल. त्यांत कांहीं मोठंसं नाहीं. पुढें तो स्वरूपानं चांगला आहे. तीही छांदिष्ट. बसलं त्याच्यावर मन तिचं झालं, आणखी काय ? त्या जागेपासून त्याला प्राप्ति फार झाली. मला वाटतं सहा महिन्यांत त्यानं पांच सात हजारांची पुंजी सहज केली असेल !"

"मग रे तो तिचा खून कशाला करील ?"

"पहिल्यानं मला वाटलं होतं कीं त्यानं शनवारीं कांहीं रुपये कोटांतून आणले ते उपटण्याकरितां तिचा खून केला असावा ह्मणून; पण आतां नाहीं तसं वाटत. कारण ते रुपये तिच्यापर्यंत गेले असं मला शोधाअंतीं कळलं. तिच्या हातची पावती देखील दाखल झाली आहे. कदाचित् ही पावती बनावट असेल असंही माझ्या मनांत आलं. पण तो माणूस त्यांतला नाहीं, तेव्हां ती शंका गेली. मत्सरानं हें काम झालं असावं. आपल्याप्रमाणेंच ती दुसऱ्याही कित्येक लोकांशीं वागते असं त्याला वाटून आणखी हें काम त्यानं केलं असावं. तिचा त्या-

चा याबद्दल वाद झाला असावा, आणखी त्या सपाऱ्यांत टाकली गर्दन छाटून. या नायकांच्यामुळं काय होईल आणखी काय नाहीं."

"तुझं ह्मणणं कदाचित् बरोबर असेल. पण तूं असं पहा. खून केल्यानंतर तें मुंडकं काय केलं ? बरं ते घडाच्या पायाला शिशाचे गोळे, तें पोतं, पांढरा कपडा हीं काय आधीं तयार करून ठेवलेलीं नव्हत. बरं जर आधीं तयार करून ठेवलीं ह्मणावीं तर मग असं ह्मणावं लागतं कीं, हा मोठा तरबेज खुनी असावा. कारण सगळी तजवीज आधीं जय्यत करून ठेवली होती असं दिसतं. तें पोतं, ते शिशाचे पत्रे—"

"छे. छे. छे. मी तर ह्मणतों कीं, अशी तयारी केली तेव्हां हा मनुष्य खून करण्याच्या कामांत अगदीं नवखा असावा. जे अंतःकरणांत मोठे प्रामाणिक असतात, असेच लोक अशा तजविजीन् तयाऱ्या करून ठेवतात. नेहमींचा निर्दावलेला खुनी जर असला, तर तो या असल्या खटपटींत मुळींच पडायचा नाहीं. दिलं असतंन् मढं टाकून तसंच. ओळखलं तर ओळखलं कोणी."

"बरं पण या **अनंता**चा कोणी तरी आणखी साथी असावा. कारण ज्यानं पोतं खांद्यावर घेतलं आणखी ब्याक्बेवर नेलं तो कांहीं **अनंत** नव्हे."

"नव्हे. नव्हे. तो जो माझ्या हातून मनुष्य निसटून गेला, तो कांहीं **अनंत** नव्हे. ती त्या दिवशीं आमची अगदीं पच्चीच उडाली. अजून मला त्याचं मोठं आश्चर्य वाटतं कीं, माझ्या हातून तो निसटला कसा ! आणखी त्यांत असं आहे कीं, तो मनुष्य **अनंत** नव्हे असं मला खास वाटतं. अन् असं वाटायला चांगलंच कारण आहे. इकडे पहा; त्या दिवशीं आमच्या एका स्नेह्यानं ब्याक्बेवर फराळाचा बेत केला होता तिथें त्या दोघी गोंवेकरणी आणल्या होत्या ह्मणून सांगितलं नाहीं का ? त्या गोंवेकरणींपैकीं जिच्या इथें मी गेलों होतों ह्मणून मघाशीं सांगितलं, तिच्या बोलण्यांत असं आलं कीं, ब्याक्बेकडे जातांना विद्यारामभाईच्या त्या वाडीपाशीं त्यांनीं कांहीं चमत्कारिक गोष्ट पाहिली. ती एवढीच कीं, एक मनुष्य एक पोतं पाठीवर घेऊन एका ब्रूमांतून ( गाडींतून ) उतरत होता; तो उतरल्यावर गाडी परत

गेली आणखी हा माणूस व्धाक्तेकडे आला. आतां उघडच दिसतं कीं, जो मनुष्य आह्मीं पाहिला, तोच हा असावा. बरं आणखी ती बाई असं ह्मणाली कीं, त्या गाडीवरचे कोचमेन सिद्दी होते. घोडे चांगले केपहार्सेस होते. आतां आणखी शोधाअंतीं मला असं कळलं आहे कीं, ती झोटिंगाबादची राणी आणखी तो **अनंत** हीं त्या गांवदेवीच्या बंगल्यांत एकमेकांना भेटलीं, तेव्हां राणीनं आपली गाडी परत पाठवून दिली आणखी 'पुन्हां मला अमुक वेळीं न्यायला ये.' असं सांगून ठेवलंन्. त्याप्रमाणें नेमलेल्या वेळीं तो कोचमन् गाडी घेऊन त्या ठिकाणीं आला." .

"हें सारं खरं असेल, पण याचं अवसान काय तें कांहीं मला समजत नाहीं.–"

"जरा थांबा त्या राणीवर एक देखील तिचा चाकर खूप नाहीं हें एक ध्यानांत धरा. मुसलमानांच्या राज्यांतल्याप्रमाणें ती आपल्या चाकरांना पाहिजे त्या शिक्षा करते, आणखी ते बिचारे निमूटपणें सोसून घेतात. कारण ती पैसेही बरेच देते; पण सगळयांच्या मनांत तिच्याविषयीं मोठा द्वेष आहे. त्यांतून तो कोचमन् आणखी खाजदार हे तर अतिशयच तिचा तिट्कारा करतात; ह्याच्याविषयीं माझी अगदीं पक्की खात्री आहे. एक ती तिची लवंडी आहे ती बरीक तिच्यावर फार प्रेम करते; पण जशी धनीण तशीच हीही असल्यामुळं हिलाही ते चाकर लोक पाण्यांत पहातात. आतां आलं का आपल्या ध्यानांत माझं काय ह्मणणं असावं तें?"

"छे. बोआ. कांहीं एक नाहीं. राणीला तिच्या चाकरांनीं मारली असं जर आपलं ह्मणणं असेल तर बरीक आलं ध्यानांत ह्मणायचं; पण तसं जर धरलं तर आपल्या पहिल्या बोलण्याला आणखी या बोलण्याला कांहींच मेळ बसत नाहीं."

"छे. छे. छे. तसं नाहीं. पहा आतां. **अनंत** आणखी ती राणी अशीं दोघं त्या बंगल्यांत बसलीं आहेत. गाडी बाहेर वाट पहात आहे. **अनंत** आधीं खेत करून ह्मणा किंवा तिथल्या तिथें खेत करून ह्मणा पण तिला ठार करतो. आतां या प्रेताचं काय करावं, हें त्याला कळत नाहीं; पण तिच्या चाकारांना जर कळलं कीं राणी मेली ह्मणून, तर

मोठंसं कांहीं त्यांना वाईट वाटणार नाहीं. उलटं बरंच वाटेल. बाहेर जाऊन तो त्यांना ती गोष्ट कळवितो. कदाचित् तो असंही सांगतो ह्मणा कीं, उभी असतां असतां घेरी येऊन ती खालीं पडली आणखी कानशिलावर पडून तिचा जीव गेला; ही अशी मेली हें कोणाला कळूं द्यायचं नाहीं असं ह्मटलं तर कांहीं युक्ति सांपडेल कीं नाहीं असं तो त्यांना विचारतो. राणी पुष्कळदां कोणाला न विचारतां न सांगतां महिना महिना दोन दोन महिने जात असते, तेव्हां ' आह्मीं तिला स्टेशनावर पोंचवली असं तुह्मी सांगणार नाहीं काय? ' असं त्यानं त्या चाकरांना विचारलं; त्याचप्रमाणें या प्रेताची व्यवस्था लावण्याविषयींही त्यानं प्रार्थना करून त्यांना सांगितलं. ते कदाचित् ऐकणार नाहींत ह्मणून त्यांना शें दोनशें रुपये देऊं केले. रुपयांची गोष्ट निघाल्या बरोबर ते सारे लोक मथले. आणखी त्यांनीं युक्ति योजिली. मुंडकं कापावं. तबेल्यांतल्या एखादा पोत्यांत धड भरावं. त्या खाजदारानं पोषाख बदलून तें पोतं खांद्यावर घेऊन त्याची समुद्रांत वाट लावावी. "

" बरं इतकं झालं. पण त्या मुंडक्याची वाट काय लावावी ? "

" माझा असा समज आहे कीं, तें राणीच्या कपड्यांत गुंडाळून जाळून टाकलं असावं. पण तें जाऊं द्या, आपण त्या **अनंता**कडे पाहूं. ते दिवशीं मी ब्याक्बेवर त्या पोत्याजवळ बसलों आणखी ते दुसरे दोघं गेले त्यांना वाटेंत अनंत भेटला. आणखी ते तिघेही फराळाला गेले. मघांशीं सांगितली ती गोवेंकरीण, तिनं त्याचा तो विलक्षण चेहरा, घाबरल्या घाबरल्यासारखं बोलणं हें सगळं पाहिलं. धड त्याला बोलायला दिखील येत नव्हतं. त्यानं कांहीं खाल्लं नाहीं. कशाला बोट दिखील लावलं नाहीं. आणखी तिथून लवकर उठून जाण्याची मोठी त्याला घाई झाली होती असं दिसतं. एकंदरींत त्याचं चित्त कांहीं ठिकाणीं नव्हतं. तो बावरल्यासारखा दिसत होता. इतकी या घटकेला मला माहिती आहे. जर यांत कांहीं तथ्यांश वाटत असेल तर मी आतां पुढें तपास चालू ठेवतों. नसेल तर मग कांहीं माझं बोलणं नाहीं. आपल्या हुकुमाखेरीज मला कांहीं करतां येत नाहीं. "

" खरं जर ह्मणशील **परशुराम**, तर मला ही निवळ कहाणी असावी असं वाटतं. तरी पण तूं आपला तपास चालव. आमचं पूर्ण अ-

नुमोदन आहे तुला. फक्त वेळोवेळीं काय झालं काय नाहीं याची माहिती कळवीत जा. आणखी एवढंच कीं तूं ज्या दोन गोष्टी सांगतो आहेस, याच खऱ्या आहेत अशी आमची पक्की खात्री कधीं करून देशील तें नक्की सांग. दोन गोष्टींविषयीं खात्री करायची आहे. हें धड त्या झोटिंगाबादच्या राणीचं आहे हें एक, आणखी तिला त्या अनंतानंच मारलं हें दुसरं."

"बरं तर आज तारीख कोणती बरं ? नऊ नाहीं का ? हो नऊस. बरं तर मग आपण मला एकोणीस तारखेपर्यंत अवधि दिला तर होणार आहे. त्याच्या आधींच पक्का निकाल लागेल असं मला वाटतं आहे; पण न जाणो वेळ आहे वखत आहे."

"कबूल. तितका वेळ आह्मी तुला देतों. जर एकोणिसावीपर्यंत कांहीं झालं नाहीं, तर मला कळव, ह्मणजे मग पुढें काय करायचं तें आपण ठरवूं. तर मग 'सलाम' आतां. उगीच गप्पा मारण्यांत तुझा वेळ घालवणं हें मला बरं दिसत नाहीं."

"अजूनपर्यंत मीं एक क्षण दिखील वांया घालवला नाहीं. आणखी मी आतां त्या झोटिंगाबादच्या नबाबाकडे जातों आहें. एक फक्कडशी युक्ति करून त्यांची गांठ घेतोंच घेतों. साहेबानें रजा दिल्याबरोबर परशुरामपंत आपल्या घरीं आला; व त्यानें आपल्या विश्वासु गड्याला हांका मारल्या; व तो त्यांस ह्मणाला "दामज्या ! पुढें तपास सुरू ठेवण्याविषयीं हुकूम मिळाला आहे. आतां मोठ्या शिताफीनं काम चालवलं पाहिजे. जर आपल्या हातून तपास लागला तर शें दोनशें रुपये जास्तीच मिळतील. आणखी त्यांतले पन्नास पाऊणशें तुला देईन."

"वा ! तर मग" दामज्या मोठ्या खुषींत येऊन ह्मणतो "रुपये मिळून मीं आपलं लगन क्येलंच समजाना !" बिचाऱ्याला लग्नाची मोठी हौस होती.

तो जातीचा मराठा होता. साताऱ्याकडचा गडी. पण त्याला कानडी आणखी हिंदुस्थानी अशा दोन भाषा चांगल्या येत होत्या. शिवाय मुंबईंत बरेच दिवस राहिल्या कारणानं त्याला गुजराथीही येऊं लागलं. तो जात्या मोठा बुद्धिमान् आणखी चलाख होता. त्यामुळं

कांहीं कामांत पडला तरी मार्गे ह्मणून घेत नसे. परशुरामपंतांची आणखी त्याची मुंबईंतच गांठ पडली. तेव्हां त्याची हुशारी पाहून त्यांनीं त्याला आपला विश्वासू चाकर केला. ते त्याला दरमहा चांगला देऊन शिवाय इकडे तिकडे कांहीं बक्षिसं मिळालीं तर त्यांतला देखील भाग ते त्याला देत. तो दिवसानुदिवस फारच हुशार होत चालला. निरनिराळीं सोंगं घेण्यांत तर तो फारच तरबेज झाला. असो.

"तर आतां" परशुरामपंत त्याला ह्मणतात. "आपल्याला जरा जलदी केली पाहिजे. कारण मुदत सारी दहा दिवसांची आहे. आतां जें काय करायचं तें मी तुला सांगतों. आज त्या वाळकेश्वराच्या बंगल्यांत तो झोटिंगाबादचा नबाब राहतो तिथें जाऊन चाकरी मिळवायची खटपट कर. त्याला एक चाकर पाहिजे आहे अशी मला पक्की बातमी लागली आहे. आणखी तिथें काय चाललं आहे काय नाहीं हें पक्कं आपल्याला कळलं पाहिजे; तेव्हां आपलं असं कोणी तरी तिथें पाहिजे. तर तूं जा तावडतोब तिथें. त्याच्या गड्यांचा मुख्य असेल त्याच्याकडे जाऊन पैसे दे काय वाटेल तें कर. तें तुला ठाऊक आहे सारं."

"अं: ! त्याची नको आपल्याला काळजी. त्या लोकांच्या खुब्या मला ठाऊक आहेत. खूबसा शराब पाजला कीं, काम फत्ते !"

"वेळ पडल्यास त्याला सारी हकीकत सांग. (खरी नव्हे हो !) आणखी पाहिजे तर त्याला पाहिजे तितके पैसे कबूल कर. असा त्याला भाळून टाकलास ह्मणजे लागलींच कामावर रुजू हो. रुजू झालास ह्मणजे तो त्या नबाबणीचा कोचमन् आहे कीं नाहीं त्याला आणखी त्या खाजदाराला दोघांना आपले अगदीं स्नेही करून घे. विशेषतां तिची जी ती लवंडी आहे, तिला आण हातांत. तिचा लोभ घे जडवून कसंय् करून !"

"पाहतों आतां कसं कसं जुळतंय् तें" दामड्या मोठ्या गंभीरपणानें ह्मणतो.

"हें पहा तूं अजून मोठा ऐटबाज दिसतो आहेस, तेव्हां कांहीं हरकत नाहीं. तुझे ते कल्लेन् बिल्ले ठीक आहेत अशा कामाला. पण ए मूर्खा त्या नबाबाचं लक्ष्य आहे तिच्यावर ह्मणून मीं ऐकलं आहे बरं

का ? तेवढं संभाळ. तुला आपलं सांगून ठेवतों. कसंही असो. तिला आण गोत्यांत. तुला मुसलमानी ऐटींत येतं आहे. त्या सावनुरास का कुठें होतासना तूं ! मग लेका फसलास तर तुझ्यासारखी फजिती कोणाची नाहीं. "

" पण मला वाटतं, मला हिंदुस्थानी किंवा मुसलमानी येत नाहीं असं जर दाखवलं तर जास्त फायदा होईल. मला कांहीं समजत नाहीं असं समजून तिथले चाकर लोक आपापसांत हवं तें बोलतील आणखी तें मला ऐकायला सांपडेल. "

" बरोबर आहे. बरोबर आहे तुझं ह्मणणं. तुला चाकरीला ठेवतांना जर त्या नायकानं विचारलंन् तर नाहीं येत मुसलमानी ह्मणून सांग. बरं दुसरी गोष्ट ही कीं, तुझीन् माझी रोज गांठ पडली पाहिजे. तर त्याचं कसं काय करायचं ? मला वाटतं पहांटेस असा उठून सहाच्या आधीं मला त्या पोलिस चौकीच्या मागल्या बाजूला भेटत जा. "

" ठीक आहे. आतां अडचण काय ती एवढीच कीं, " दमाजी थोडासा गुटमळून ह्मणाला " चाकरी मिळाली पाहिजे. "

" बरं जर नाहीं चाकरीचा लाग साधला, तर उद्यां संध्याकाळच्या वेळीं मला चौपाटीवर येऊन नेहमींच्या ठिकाणीं भेट. मग आपण पुढें काय करायचं त्याचा विचार करूं. आधीं आतां माझा तो टोगा वगैरे आण. मी आतां थोडासा मजेदार पोषाख करून त्या नबाबाकडे जाणार आहें. "

"दमाजीनें ताबडतोब परशुरामपंतानें सांगितलेल्या जिनसा आणून दिल्या, व पोषाख करण्यांत आपल्या धन्यास मदत केली. जातांना **परशुरामपंत** ह्मणतात. बरं तर आतां आज रात्रीं तुमची आमची गांठ पडायचीच नाहीं. तूं उद्यां सकाळीं जाशील त्या वेळीं देखील मी येईन न येईन, तेव्हां जातांना त्या बाळूला सांगून जा तूं रजेवर जातो आहेस ह्मणून. "

" ठीक आहे. तूं याच्यापूर्वी कुठें होतास असं मला विचारलं तर आहेच माझ्या जवळ काय सांगायचं त्याची तयारी. त्याची काळजी नको. फार तर काय पण—"

" ठीक आहे. ठीक आहे. तुझ्या या हुशारीमुळं तर तुझ्यावर मा-

झा एवढा विश्वास. तूं लहानसहान क्षुल्लक गोष्टींत देखील चुकत नाहींस ह्मणून तर बरं आहे."

असें बोलून परशुरामपंत निघून गेले. ते निघाले ते अनेक रस्ते ओलांडून ते गांवदेवीच्या त्या बाजूला गेले; कारण त्या झोटिंगाबादच्या नबाबाकडे जाण्यापूर्वी एकदां अनंतरावानें नबाबणीच्या सांगण्यावरून भाड्यानें घेतलेल्या जागीं जाऊन यावें असें त्यांच्या मनांत आलें. तेव्हां ते इकडे तिकडे न पाहतां त्या घराच्या रस्त्याला लागले. हें घर कुठें होतें याचा त्यांनीं या पूर्वीच तपास लावून ठेवला होता. तें घर ज्या गल्लींत होतें त्या गल्लीच्या नाक्यावर एक दारूचा पिठा होता. त्या पिठ्यावर जाऊनच दमाजीनें घराचा तपास लावला होता. त्या पिठ्याच्या समोर गर्दी आहे असें पाहून कोणी पाहूं नये ह्मणून जरा बेतानेंच पाऊल टाकीत ते पुढें गेले; तिथें एक दोघी वेश्या खिडक्यांतून तोंडें काढून बसल्या होत्या व खालीं मारवाड्यांचीं एक दोन दुकानें होतीं. गल्ली फार घाणेरडी, गलिच्छ अशी होती. हें पाहून परशुरामपंतास मोठें आश्चर्य वाटलें. कारण एवढी थोरली नबाबीण पण अशी गलिच्छ नेहमीं कोंबडीं कुत्रीं जिथें खेळतात आणि बोंबलांचा वास सुटलेला असतो अशा जागीं रोज येते तरी कशी? ज्या घरांत परशुरामपंतांना जावयाचें होतें, तें दुमजली असून बाहेरून मोठें ऐटबाज दिसणारें होतें. या बंगलीस दोनी कडून आंत जाण्यास दरवाजे होते. एक, पाठीमागें थोडासा बगीचा केला होता तिकडून व एक पुढून. एकंदरींत बाहेरून तरी असें दिसत होतें कीं, या वेळीं आंत कोणी नसावें. गल्लीचें तें एकंदर स्वरूप पाहून परशुरामपंत आपल्याशींच ह्मणतो " वः ! अशा जागीं ही नबाबीण आली त्या अर्थी तिला झालं हेंच शासन योग्य. खून होण्याजोगीच जागा ही. पण ती आपखुषीनं आली हेंच खरं धरतां येणार नाहीं. " असें ह्मणत ह्मणत तो त्या घरापाशीं गेला व " आंत जाऊन सर्व तपास केला, कीं आपल्याला या खुनाचा इत्थंभूत पत्ता खास लागणार " असें मनांतल्या मनांत ह्मणत त्यानें सर्व घराची बाहेरून नीट टेहळणी केली. " हंः ठीक आहे. आतां ती दमाजीनं दिलेली किल्ली काढून आपल्या कामाला लागावं. पण नाहीं. या रस्त्यावरल्या दारानं आंत शिरतां कामा नये. या शेरींतन जाऊन तें

मागलं दार उघडून आंत शिरलं पाहिजे. वा ! जर का ही किल्ली लागू पडली नाहीं तर मग सोळाआणे फजिती ! अन् एखाद्यानं मलाच घरफोड्या ह्मणून धरलंन् तर ! मग तर फजितीला पारावारच नाहीं. आहे माझा पट्टा आहे कमरेला. पण तो दाखविण्याचा प्रसंग न येईल तितका चांगला. हो ! मी इथें येऊन घराचा तपास करून गेलों हें कोणाला कळतां कामा नये. " इतकें बोलून तो शेरींत शिरला. त्या मागल्या दरवाज्याजवळ जाऊन त्यानें हातांत असलेल्या किल्ल्यांपैकीं एका किल्लीनें तें टाळें उघडून व तो आंत शिरला. आंत शिरल्याबरोबर त्यानें आपल्या चोरकंदिलानें इकडे तिकडे पाहिलें तों त्यांस बगीच्यांतील फुलझाडांशिवाय, व वेलींशिवाय कांहीं एक दिसलें नाहीं. पलिकडच्या बाजूस एक पत्रे मारून केलेलें छप्पर मात्र दिसलें. **परशुरामपंत** मोठा शिस्तीनें काम करणारा होता: त्यानें मनांत ह्मटलें, " त्या छपराखालीं काय आहे तें मग पाहूं सध्यां इकडे पाहूं या. " असें ह्मणून त्यानें आपल्या कंदिलाचा वर असा उजेड पाडून पाहिला, तों या बाजूच्या दोन खिडक्या किंचित् उघड्या आहेत असें त्यास दिसून आलें. तें पाहण्याबरोबर तो चपापला व आपल्याशींच ह्मणाला, " येथें कोणी तरी येऊन गेलं असावं त्यानंतर; त्याखेरीज या खिडक्या उघड्या रहावयाच्या नाहींत. शनिवारीं तीं दोघं जेव्हां इथें आलीं तेव्हां या खिडक्या अगदीं बंद करून ठेवल्या असल्या पाहिजेत. कारण खून करायला आलेले असोत, किंवा नेहमीं—प्रमाणें चैनबाजी करणारे आले असोत; लोकांनीं पाहूं नये ह्मणून खिडक्या तर त्यांनीं खास चांगल्या बंद केल्या असल्या पाहिजेत. नाहीं असं व्हायचंच नाहीं. तेव्हां या खिडक्या ज्या उघडल्या या शनवारानंतर उघडलेल्या आहेत. मग कोणी उघडल्या असाव्यात ? एक त्या **अनंतानं** किंवा त्याच्या साथीदारांपैकीं कोणी तरी; याखेरीज कांहीं कोणी इथें येऊं शकणार नाहीं. बरं साथीदार पडले त्या नबाबणीचे नौकर; तेव्हां ते तर कांहीं इथें यायचे नाहींत. हो प्रत्यक्ष आपल्या यजमानणीचा खून जिथें केला, तिथें ते पुन्हां येतील कसे ? उलट ' या रस्त्याला आह्मी कधीं आलेलों आठवत नाहीं, आणखी हें घर तर जन्म जन्मांतरीं आह्मीं पाहिलं नाहीं ' असंच ते ह्मणणार. ते ह्मणणार; ' आह्मीं

आपल्या यजमानणीला ते दिवशीं रेल्वे स्टेशनावर नेऊन पोंचवली. मग ती पुढें कुठें गेली हें आह्मांला मुळींच ठाऊक नाहीं. ' तर मग काय अनंत इथें आला असेल ? अन् आला असला तरी कशाला आला असेल ? इथलं सामान घेऊन जायला ? छे. तें सामान त्याचं स्वतांचं असो, कीं त्या नबाबणीचं असो, ( बहुतेक असेल नबाबणीचंच !) इतक्यांत कांहीं तो हलवायला येणार नाहीं. उलट त्याला जर कोणी स्नेह्यांनीं विचारलं, तर तो असंच उत्तर देणार कीं, नबाबीण कुठेंशी गांवाला गेली आहे. आणखी उलट ' काय बोआ ! गेल्या तर गेल्या पण येणार कधीं जाणार कुठें वगैरे कांहीं सांगून दिखील गेल्या नाहींत. आतां पत्रं कुठें पाठवावीं ? कामाचं कांहीं लागलं तर काय करावं? असं ह्मणून मोठ्या बुचकळ्यांत पडल्या सारखं, त्रासल्यासारखंच दाखवणार तो ! पण जाऊं द्या. आपल्या कामाला लागूं द्या आधीं, मग त्या नबाबाकडे जायचं आहे आणखी. तिथें वेळेवर गेलं पाहिजे. आधीं आतां आपली टेहळणी पुरे करून त्या छपरांत काय आहे तें पाहूं या. या बागेंत तर कांहीं विशेष दिसत नाहीं. नुकती उकरली आहे अशी माती कुठेंही दिसत नाहीं. अन् नबाबणीचं मुंडकं तो इथें पुरील कसा ? "

इतकें आपल्याशीं पुटपुटून तो त्या छपराखालीं गेला, तों तिथेंही एक साधं कुलूप अडकवून ठेवलेलें होतें. परशुरामपंतानें तें दार उघडून आंत पाऊल घातलें तों आश्चर्यानें स्तब्ध होऊन तो उगाच उभा राहिला. तें बाहेरून भिकार दिसणारें पत्र्यांचें छप्पर आंतून मोठ्या ऐटीनें सजविलेलें असें न्हाणीघर असेल असें कोणासही वाटलें नसतें. परशुरामपंत आंत पहातो तों त्या ठिकाणीं एक बरेंच मोठें वाटोळें हौदासारखें चुन्याचें बांधलेलें होतें व त्याच्यावर शावरबाथ केलेला होता. आंतून भिंतीला वगैरे देखील वाळ्याचे पडदे दिलेले. पलिकडच्या बाजूस काश्मिरी लोंकरीचे उत्तम उत्तम उबदार कपडे; तेथें एक लहानसें कांचेचें कपाट त्यांतून उत्तम उत्तम तेलें, मसाल्याच्या कुप्या, अत्तरें ठेवलीं असावींत असें दिसलें. हें सर्व पाहून परशुरामपंत आपल्याशींच मोठ्या आश्चर्यानें ह्मणतोः ! " अरेवा ! हा अनंत ह्मणजे एक मोठा गुलहौशी प्राणी दिसतो. पण छे. हें

सारं त्या नबावणीचं दिसतं. असूं द्या. कोणाचं कां असेना ! आपल्या आपल्या चौकशीला लागूं या आधीं. इथें तर कांहीं दिसत नाहीं. जिकडे तिकडे पुरी स्वच्छता दिसते आहे. कुठें इतका देखील डाग दिसत नाहीं. तेव्हां त्या दुष्टांनीं इथें तर कांहीं तें काम केलं नाहीं. बरं यांत पाणी आहे का हें तर पाहूं " असें ह्मणून दोरी ओढून पाहिली तों भर भर भर वरील चाळणींतून पाणी पडूं लागलें. तें पाहून परशुरामपंत विचार करतो, " एवढी नवाबीण ती कांहीं थंड पाण्यानं स्नान कधीं करायची नाहीं. तेव्हां इथें पाणी तापवायची देखील कांहीं तरी व्यवस्था करून ठेवली असलीच पाहिजे. " असा विचार करून तो आपला फाणस फिरवीत फिरवित पलिकडल्या खोलींत गेला. तों तेथें त्याला जें वाटलें तेंच होतें. पाणी तापविण्याकरितां सर्व योजना होती. शिवाय कांहीं पिंपें, कांहीं बादल्या व शिवाय कांहीं लांकडें वगैरेही पडलीं होतीं. शिवाय पुष्कळसे टुवाल व साबणाच्या सुवासिक वड्याही दिसल्या. अंग वगैरे घांसण्याच्या रुप्याच्या वजऱ्या होत्या. एक स्वच्छ धुवट पातळही होतें. हें नबावणीचें असावें. तें सर्व पाहून परशुरामपंत ह्मणतो, " कमाल आहे बोआ, न्हाण्याला लागणारी एक दिखील जिन्नस या ठिकाणीं नाहीं असं नाहीं. सगळी अगदीं जय्यत तयारी आहे. इतकी ज्या अर्थी तयारी आहे, त्या अर्थी न्हाऊं घालण्याकरितां नबाबीण आपल्याबरोबर नेहमीं कोणाला तरी आणीत असेल. बहुतेक त्या गुलनारलाच आणीत असावी; कारण तिच्यापासून ती कांहींच चोरून ठेवीत नसे. या दोघांची जलक्रीडा चालली असतांही तिला हजर असण्याला कांहीं हरकत नसावी. पण परवांच्या शनवारीं नबावणीनं आपल्या त्या दासीला कसं आणलं नाहीं ? कारण, खून जरी तिच्या हातून टळला नसता तरी खुनी लोकांचीं नांवं तिनं पटापट सांगितलीं असतीं " त्या खोलींत सर्व नीट नेटकें दिसलें. चुलींत राख पडली होती त्यावरून कोणी तरी आठ दहा दिवसांत विस्तव पेटविला असावा असें दिसत होतें. पाण्याच्या नळीखालचा तांब्याचा हौद पाण्यानें भरलेला होता. शावरबाथचें पीपही पाण्यानें बहुतेक भरलेलें होतें. परशुरामपंतानें सर्व ठिकाणीं मोठ्या बारकाईनें पाहिलें तों इतक्यांत त्यांच्या दृष्टीस असें पडलें कीं, चुना लावून स्वच्छ केलेली एका

बाजूची भिंत साधारणतः मनुष्याच्या उंची इतक्या ठिकाणीं तीन जागीं बरीच खरवडली आहे. " हंः हंः " तो लागलींच आपल्यापाशींच ह्मणतो, " ही भिंत खरवडून काढली आहे त्या अर्थीं हिच्यावर डाग पडलेले असावे. पण त्या नवाबणीचा आधीं जीव घेऊन मग जर तिचा गळा कापला असला तर रक्ताच्या तुताऱ्या उडायच्या नाहींत. रक्त नुसतं वाहील. अन् ही खालची फरसबंदी तर अगदीं स्वच्छ आहे. " असें ह्मणून तो खालीं नीट न्याहाळून पाहूं लागला तों त्यास विशेष कांहीं दिसलें नाहीं. परंतु पलीकडे त्याची नजर गेली तों कोंपऱ्यांत दोन फरसबंदीचे दगड नाहींत असें लक्ष्यांत आलें. त्यांच्या जागीं कपच्या वगैरे मात्र भरलेल्या दिसल्या.

" अस्सं, अस्सं, त्या घडाच्या पायाला बांधलेले आणखी पोत्यांत असलेले दगड इथलेच दिसताहेत. काय मजा आहे ! इथले दगड काढून, ते फरशीचे असे ओळखूं येऊं नयेत ह्मणून फोडून त्याच्या कपच्या येथें भरून देऊन ! शिताफी खरी ! बरं पण ती पलीकडे खुर्ची दिसते आहे, ती पाहूं या; मोडकी दिसते आहे ! "

त्या खुर्चीचा सांगाडा मात्र राहिलेला होता. वेताची बसायची जागा अगदीं फार कापून काढली होती. आणि सांगाडाही होता तो अगदीं पांढरा दिसत होता, त्यावरून हात, पाय, पाठ वगैरे सर्व जागा रंधून टाकल्या होत्या असें दिसलें.

" खरं ह्मटलं असतां त्यांनीं ही खुर्ची जाळून टाकायची. बहुतेक घाई झाली असावी, किंवा आयत्या वेळीं चूल पेटवायला काडी बिडी सांपडली नसावी. काय असेल तें असो. पण रंधा तरी कुठून आणला? कांहीं कामबिम तर चाललं नव्हतं त्या वेळीं ? कदाचित् कामावर येणाऱ्या सुताराचं ठेवून दिला असला तर असेल. पण त्या खुनांत या खुर्चीचा काय संबंध असावा ? तिचा प्राण घेतल्यावर मान कापण्यापूर्वीं फार झालें तर टेबलावर त्यांनीं तिचें प्रेत ठेवलें असतें; आणि इथें टेबल तर मुळींच दिसत नाहीं. मग खुर्चीवर प्रेताला बसवलें? काय असेल तें असो. मोठी विलक्षण केस आहे त्यांतही विलक्षण हें कीं, इथें कुठें डाग ह्मणून दिसत नाहीं. बरं पण त्या कोंपऱ्यांत काय दिसतं आहे ? हं. हे स्पंजाचे तुकडे दिसताहेत. अरे वा ! इथें कांहीं कांहीं थाट साहेबी दिसतो आहे.

साहेब लोकांच्या आंघोळीला स्पंज लागत असतात. तें कांहीं नाहीं. आतां कांहीं युक्ति प्रयुक्ति करून पाहिलं पाहिजे."

असें ह्मणून त्यानें तेथल्या दोन बादल्या घेतल्या व त्या नळी खालच्या पाण्यानें पाऊण पाऊण भरल्या. नंतर एका बादलींत त्यानें ते स्पंजाचे तुकडे टाकले, व दुसऱ्या बादलींतील पाणी फरशीवर सपाटून ओतून दिलें, फरशी एका बाजूनें उतरती करून एका कोंपऱ्यांत बागेच्या बाजूला पाणी जाईल अशी तजवीज केली होती. तिकडे पाणी गेल्याबरोबर परशुरामपंताची स्वारी खालीं वांकून ज्या भोंकावाटें पाणी जात असे, त्या ठिकाणीं न्याहाळून पाहूं लागली; नंतर त्यांनीं खिशांतील चाकू काढून दोन चिऱ्यांच्या मधील माती उकरून पाहिली, ती हातावर घेऊन उजेडांत धरली त्या मातीबरोबर कांहीं गवताच्या काड्या आल्या होत्या. त्याचा रंग नेहमींप्रमाणें नव्हता. परशुरामपंतानें त्या नीट न्याहाळून पहिल्या व बराच वेळ त्यांचा वास घेतला. नंतर ते बागेंतल्या त्या बाजूला गेले, व तेथेंही त्यांनीं त्याचप्रमाणें केलें. "बस्. बराबर आहे. मला वाटलं तसंच आहे. या खोलींतच तिचा खून झाला. अगदीं रक्तच तें. ती नवाबीण न्हाण्यांत गुंतली असतांना तिला मारली; आणखी मग या खोलींत तिचं मुंडकं धडापासून वेगळं केलं. पक्कं काय तें सगळ्या घराचा तपास केल्यावर समजेल."

इतकें ह्मणून तो पुन्हां त्या खोलींत आला, व त्यानें ते एका बादलींत भिजत टाकलेले स्पंजाचे तुकडे बाहेर पिळून पाहिले, त्या बरोबर त्यांतून तांबडें लाल, चांगलें भडक असें पाणी पडलें. तें पहाण्याबरोबर तर परशुरामपंताची खात्रीच झाली. खून कसा आणखी कुठें झाला याबद्दल आतां त्याला शंकाच उरली नाहीं.

इतकें झाल्यावर त्या न्हाणी-घरांतून तो बाहेर आला, व बगीचा वलांडून एकदम घरांत शिरला. खालच्या मजल्यांत पहाण्या सारख्या काय त्या दोन खोल्या होत्या. तेथें सामानसुमान कांहीं एक नव्हतें. परशुरामपंतानें त्या खोल्यांत व इतर ठिकाणीं जाऊन उगीच डोळा मात्र फिरवला. बाकी त्याला तिथें महत्वाचें असें कांहीं एक दिसलें नाहीं. नंतर तो हलकेच जिना चढून वर गेला; तेथें पहातो तो त्याच्या नजरेस दोन समोरा समोर असणाऱ्या, उत्कृष्ट सामा-

नानें सजवलेल्या अशा मोठमोठ्या खोल्या दृष्टीस पडल्या. एकीमध्यें खुर्च्या, कोंचें, सोफा, दिवाण वगैरे अनेक मिजासीनें बसण्याचें अगर पडण्याचें सामान होतें. दुसऱ्या खोलींत पलंग असून सर्व इतर थाट होता. ज्या खोलींत कोंचें वगैरे होतीं, त्याच खोलींत एक लहानसा दुमदार तावदानी आल्‌मिरा होता. त्याला अनेक लहान मोठे खण होते. परशुरामपंत अचानक आधीं त्या आल्‌मिऱ्याजवळ गेला. जणूं काय त्या नबाबणीबद्दल कांहीं जर कळण्याचा संभव असला तर त्या आल्‌मिऱ्यामधून कळेल असेंच त्याला वाटलें. असो. परशुरामपंत त्या आल्‌मिऱ्याजवळ गेल्यावर त्यानें त्याचा पहिला एक खण उघडण्याचा यत्न केला, परंतु तो खण उघडेना. बरेच श्रम केले तरी ते व्यर्थ गेले. शेवटीं त्यानें आपल्या बरोबर आणलेल्या किल्ल्यांचा उपयोग करून पाहिला, तेव्हां तो खण उघडला. त्यानें दुसराही उघडून पाहिला. तिसराही पाहिला; परंतु त्यास कांहींएक दिसलें नाहीं. तो अगदीं निराश झाला इतक्यांत मधल्या खणांत एक लहानशी पेटी होती ती त्यानें उघडायला हात लावतांच उघडली; परंतु तींतही त्याला कांहीं दिसलें नाहीं. तेव्हां तो अगदींच निराश होऊन ती पेटी लावूं लागला. लावायच्या वेळीं सहज त्यानें आंतून एकदां चापसून पाहिलें तों आंत एक खिळ्यासारखें कांहीं होतें, तें त्यानें दाबलें; दाबल्याबरोबर त्या पेटींत एक चोरपूड होतें तें पट्‌कन् उघडलें व त्याच्या नजरेस कांहीं नोटी पडल्या. त्या पहाण्याबरोबर तो चपापला. इतकेंच नव्हे; पण तो त्रासल्यासारखा दिसला. कारण अशा नोटीबिटी तिथें सांपडतील असें त्याला वाटलें नव्हतें; व त्या सांपडल्यामुळें आतांपर्यंत त्यानें जी खुनाची उपपत्ति बसविली होती ती सर्व ढासळलीसें झालें. "हे पैसे इथें आले कसे ?" तो मोठ्यानें ह्मणतो "त्या नबाबणीनं ठेवले असतील ? अनंतानं तर खास नव्हेत. कारण तो कारभारी भाई ! तो असे या ठिकाणीं पैसे नाहीं ठेवणार. नबाबणीनं ठेवले असतील. तेव्हां त्यानं तिला इथें पैसे ठेवूं नका, तें बरं नाहीं असं सांगितलं कसं नाहीं याचंच मला नवल वाटतं. बहुतेक असं असेल कीं, त्या नबाबणीनं त्याला नकळत ते पैसे ठेवले असतील. ही मोठी खुबीदार पेटी तिचीच दिसते आहे. हें बारिक सामान तिचंच दिसतं आहे. ही पेटी मोठी

मजेदार आहे. हिंदुस्थानांत केलेली दिसत नाहीं. तिकडची आहे. बहुतेक फ्रान्समधली असावी. मला वाटतं हा चोरकप्पा अनंताला ठाऊक देखील नसावा. मला तरी सहज सांपडला. पाहूं गेल्यास सांपडला नसता. पण न जाणों कदाचित् मी चुकत असेन. काय नेम सांगावा ! "

आपण एका पाठीमागाहून एक बसवलेले तर्क कदाचित् अगदीं खोटे असतील. असें परशुरामपंताच्या मनांत येऊं लागलें होतें तोंच ह्या नोटी एकदां किती रुपयांच्या आहेत तें पहावें असें त्याच्या मनांत आलें व त्यानें त्या मोजून पाहिल्या तों एकंदर पांच हजारांच्या होत्या. "काय पांच हजार ! बराबर पांच हजार ! " तो हळूंच पुटपुटला. शनवारीं अनंतानें आपल्या नवाबणीला कोटांतून आणून दिले तेही बराबर पांच हजारच होते. ही गोष्ट त्याच्या लक्ष्यांत आली.

"अस्सं; अस्सं; आतां बराबर आहे." परशुरामपंत मोठ्यानें ह्मणतो "एकून नवाबणीचा खून जो या अनंतानं केला हा निवळ मत्सरानं कांहीं नव्हे. मला प्रथम वाटलं होतं तेंच खरं; एवढं मी कबूल करीन कीं खून केला तेव्हां कांहीं त्याच्या मनांत चोरी करण्याचा उद्देश नव्हता; पण—आतां आल्या लक्ष्यांत कसकशा गोष्टी झाल्या त्या. अगदीं संशय नको. चित्रच माझ्यापुढें उभं आहे जसं कांहीं. त्यानं नोटी आणल्या त्या तिच्या स्वाधीन केल्या. तिनं त्या आपल्या बंडीच्या खिशांत तशाच्या तशाच घातल्या. नंतर तीं दोघं हिंडायला गेलीं. इथें आल्यावर तिचा खून झाला.- खून झाल्यावर त्याला त्या तिच्या खिशांतल्या नोटींची आठवण झाली. अर्थातच त्यांवर डल्ला मारावा असं त्याला वाटलं. त्याप्रमाणें त्यानं नोटी काढल्या; परंतु तितक्यांत त्याला वाटलं कीं, न जाणों आपण नोटी नेल्या ह्मणजे आपल्यावर संशय येईल. आपल्याजवळ इतके रुपये आले कुठून याचा संशय घेतील. तें लचांड नको. नोटी सध्यां कांहीं दिवस इथेंच ठेवाव्या. असा विचार करून त्यानं त्या या तिच्याच पेटींत चोरकप्यांत घालून ठेवल्या. शनवारानंतर कोणी तरी इथें आलं असावं असं जें मला खिडक्या उघड्या असल्यामुळं वाटलं, तें अगदीं बराबर होतं. हाच इथें आला होता. नोटी सुरक्षित आहेत कीं नाहींत हें पहायला

ती पुन्हां दिखील येईल इथें. त्याची शंका नको. आणखी आपण त्याला बरावर पकडूं."

आतां त्या नोटींचें काय करावें असा परशुरामपंताच्या मनांत विचार येऊन तो जरा घुटमळला व शेवटीं त्यानें असाच बेत केला कीं, हे रुपये असेच या कप्प्यांत घालून ठेवून पेटी जेथल्या तेथें ठेवून द्यावी. त्याप्रमाणें करून तो त्या पलिकडल्या ह्मणजे ज्या खोलींत पलंग वगैरे घातलेला होता त्या खोलींत तपास करण्याच्या विचारांत होता, इतक्यांत पलिकडल्या बाजूला एका आरशाच्या टेबलावर संथपणें टिक् टिक् करणाऱ्या एका लहानशा परंतु टुमदार टाईमपीसाकडे त्याची नजर गेली. वरील सर्व कृत्य चाललें असतांना त्याचें लक्ष्य तिकडे गेलेंच नव्हतें. त्या टाईमपीसाकडे पहाण्याबरोबर त्याला तेव्हांच दिसून आलें कीं, हें एक साधं चोविस तासांच्या किल्लीचें घड्याळ आहे. "नाहींच; माझा अदमास चुकायचाच नाहीं. शनवारानंतर तर काय, पण काल कोणी तरी इथें आलं होतं. या घड्याळाला काल किल्ली दिली असल्याखेरीज हें आतांपर्यंत चालेल कसं? मग कोण बरं आलं असावं? कोणी तरी रात्र घालविण्याच्या उद्देशानं आलं असावं. बहुतेक अनंत तर नसेल? आतां ती नबाबीण कांहीं कधीं इथें यायची नाहीं हें त्याला पक्कं ठाऊक आहे. काय त्या गृहस्थाला काळीजच नाहीं काय? छे. ज्या ठिकाणीं आपण आपल्या हातानं तिचा खून केला त्या ठिकाणीं त्याला येऊन उभं राहवलं तरी कसं? आणखी रात्रीं? मोठं कोडं आहे बोआ हें." परशुरामपंत हें गूढ काय आहे त्याची फोड करण्याकरितां आपलें डोकें खाजवीत त्या घड्याळाकडे स्वस्थ पहात उभा राहिला. "हं असं असेल" तो आपल्याशींच पुटपुटला. "तो आपला पैसा सुरक्षित आहे कीं नाहीं हें पहाण्याकरितां इथें आला. नंतर आपण त्याच्या रक्षणाकरितां इथेंच रहावं असं त्याच्या मनांत आलं; पण जसजशी रात्र होत चालली तसतसा तो घाबरत चालला. त्याला चोरांची, भुतांची वगैरे भीति वाटूं लागली व तो भेदरून येथून निघून गेला. हें कांहीं बरोबरसं जुळत नाहीं. पण त्याला इलाज नाहीं दुसरं कांहीं दिसतच नाहीं. अन् आतां विचार करायला आपल्याला वेळच् नाहीं. उशीर बराच झाला.

आतां जलदी करून तेवढी ती पलंगाची खोली पाहिली पाहिजे." असें पुटपुटून तो त्या शेजारल्या खोलींत गेला. त्यानें बराच वेळ तिथें टेहळणी केली. त्यास महत्वाचें असें कांहींच तेथें दिसलें नाहीं. "कांहीं नाहीं. इथें कोणी आलें देखील नाहीं. सर्व सामान जेथल्या तेथें आहे. अंथरुणावर कोणी पायही ठेवला नाहीं. पांघरुणें सरपोस अगदीं जशींच्या तशीं आहेत. झाली टेहळणी आतां. आपण आतां निघावेंच. इथलें हें कपाट आतां उघडून पहाण्याची कांहीं जरूर नाहीं. आतां आपण जावंच. उगीच वेळ घालवूं नये."

परशुरामपंत आतां त्या खोलींतून जाण्याच्या विचारांत होता. इतक्यांत कोणाची तरी चाहूल झाल्याचें त्याला वाटलें; त्याचे कान फारच तिखट होते. रस्त्याकडील दाराच्या कुलुपांत किल्ली घालून तें कोणी उघडीत आहे असें त्याला ऐकूं आलें. "काय लचांड आहे हें! कोणी तरी आंत येत आहे वाटतं." तो आपल्याशींच पुटपुटला. तो कांहीं भ्याला नाहीं. त्याच्याजवळ हत्यार असल्यामुळें तो बेफिकीर होता; परंतु अशा खटल्यांत जितका गुपचिपपणा असेल तेवढा बरा अशा विचारानें त्याला तें कोणाचें तरी येणें बरें वाटलें नाहीं. असो. क्षणार्धांत त्यानें त्या पलंगाच्या खोलीचें कवाड आंतून लावलें व आपण त्या दारांच्या किल्लीच्या भोंकांतून बाहेरल्या बाजूस कोण येतें तें पहात उभा राहिला. "आतां आपल्याला सारं कांहीं दिसेल. आणखी इथून निघून जाण्यापूर्वीच नवाबणीचा खून कोणी केला हें आपल्यास खास समजेल." असा विचार त्याच्या मनांत चालला होता.

परशुरामपंत आतां श्वासोश्वास देखील न करितां बाहेरल्या खोलींत कोण येतें तें मोठ्या उत्सुकतेनें पहात बसला होता. इतक्यांत कोणी तरी जिन्यांतून आपल्या पावलांचा आवाज होतो आहे कीं काय वगैरे कांहींएक काळजी न करतां वर आलें, व झट्कन् त्या कोंचा बिचांच्या खोलींत गेलें. परशुरामपंतानें नीट न्याहाळून पाहिलें तों त्यास तो वर येणारा गृहस्थ खरोखरीच अनंत आहे असें दिसलें.

तेव्हां तो चाणाक्ष डिटेक्टिव्ह मनांतल्या मनांत फुशारून आपल्याशींच ह्मणतोः—" माझा तर्क कधींच चुकायचा नाहीं तो एवढ्या गोष्टींत तरी कसा चुकेल? मीं बराबर तर्क केला होता. पण हा इथें

काय उद्देशानं आला असावा? या खोलींत मात्र त्यानं येऊं नये. म्ह- णजे झालं.—हं मला पक्कं वाटल्याप्रमाणें तो त्या आलमिऱ्याकडेच जातो आहे." पण **अनंत** इतक्यांत त्या आलमिऱ्याकडे जात नव्हता. तो हलके हलके पावलें टाकीत होता. त्याचा चेहरा अगदीं म्लान झाला होता. व त्याच्या डोळ्यांतून अश्रू आले होते. "अरेत्रा!" **परशुरामपंत** आणखी म्हणतो "हाही माझा तर्क खराच झाला. हा मोठा प्रेमळ खुनी आहे. पहिल्यानं खून करून आतां हा पश्चात्ताप पावला आहे. तरी पण त्या नोटी न्यायला आलाच आहे. छे! यानं त्या नोटी घेतल्या तर मला आतांच याला धरावा लागेल. निदान या- च्या पाठोपाठ जाऊन त्याच्यावर डोळा तरी ठेवावा लागेल. त्या- खेरीज होणार नाहीं. अन् आपल्याला तर असं नको आहे. आधीं त्या नवाबणीचाच खून झाला आहे कीं नाहीं हें सिद्ध झालं पाहिजे. आपल्याला पक्वान्नं करायला सांगितल्यावर तीं कच्चींच वाढायला नेणं हें आपण कांहीं कधीं करणार नाहीं."

नंतर **अनंत** त्या घड्याळाच्या टेबलाजवळ गेला; घड्याळाकडे त्यानें कांहीं वेळ पाहिलें, व मग घड्याळ उचलून त्यानें त्याला किल्ली दिली. **परशुरामपंता**चा धीर खचला. त्याला असें वाटलें कीं, आपला सर्व क- र्कव्यूह ढांसळला. हा गृहस्थ रोज इथें येत असावा, आणि आपण इथें येतों याची खूण म्हणूनच काय घड्याळाला किल्ली देत असावा. या- ला वेड तर नाहीं लागलं? **अनंता**चा या सर्व करण्यांत काय हेतु अ- सावा. कांहींच **पशुरामपंता**च्या लक्ष्यांत येईना. तो मोठ्या बुचकळ्यां- त पडला.

शेवटीं **अनंत** एकदांचा त्या आलमिऱ्याजवळ गेला. त्यानें सर्व ख- ण उघडून पाहिले. अगदीं शेवटला एक खण **परशुरामपंता**नें उघडून पाहिला नव्हता. तोही त्यानें उघडून पाहिला व ताबडतोब बंद केला. नंतर पुन्हां मधला खण उघडून पाहिला. पेटी काढली. **परशुरामपंता**- चा ऊर धडधडूं लागला, परंतु व्यर्थ. पेटी उघडली तशीच त्यानें लाव- ली. चोरखण मुळींच उघडला नाहीं.

याप्रमाणें सर्व खण शोधून झाल्यावर तो अगदीं निराश झालासें दि- सलें. त्यानें एक दीर्घ उच्छ्वास टाकला. कांहीं तरी सांपडेल अशा

आशेनें त्यानें सर्व खण शोधून पाहिले होते हें अगदीं उघड होतें; पण हें काय त्याला पाहिजे होतें तें कांहीं परशुरामपंतास उमगेना. पेटी लावून त्या मधल्या खणांत टाकीपर्यंत परशुरामपंतास अनंत तो चोर-कप्पा उघडून पाहील अशी आशा होती; पण ती लवकरच निर्फळ झाली. अनंतानें सर्व खण बंद केले व तो त्या खोलीच्या मध्यभागीं येऊन इकडे तिकडे सभोंवार पाहूं लागला. आणि आतां काय करावें हें त्यास सुचत नाहीं असें दिसलें. "त्या खोलीप्रमाणेंच शोधाशोधी करण्याला तो आतां त्या पलंगाच्या खोलींत तर नाहींना येणार ? संभव तर खूप आहे. पण दाराला बोल्ट लावून ठोकला आहे मीं चांगला. तो कांहीं दार फोडीत नाहीं. फार तर आपणच जातांना दाराला कुलूप लावून गेलों आहोंत असें त्यास वाटेल. किल्ली मात्र त्याच्या खिशांत नसावी!" असे विचार परशुरामपंताच्या मनांत आले. परंतु लवकर त्यांचें निराकारण झालें. अनंत जसें कांहीं आठवलेंसें करून खिडक्यांपाशीं गेला व त्यानें त्या लावून घेतल्या. नंतर क्षणार्धांत तो प्रथमतः आल्याबरोबर खिशांतील काड्यांच्या पेटीनें लावलेली व इतका वेळ शोधाशोधी करण्यांत त्यास व त्याची हालचाल स्पष्टपणें पाहण्यास परशुरामपंतास उपयोगीं पडलेली शेड मालवून तेथून जिना उतरून चालताही झाला. परशुरामपंत जागच्याजागींच एक क्षणभर उभा राहिला. नंतर तेथून बाहेर पडून पुढल्या खोलींत आला. तो झालेली एकंदर गोष्ट पाहून मोठ्या बुचकळ्यांत पडला. अनंतानें रुपयांस तर बिलकुल हात देखील लावला नाहीं. ही गोष्ट पाहून ते रुपये तेथेंच राहूं द्यावे कीं आपल्या ताब्यांत घ्यावे याविषयीं त्याला मोठी पंचाईत पडली. शेवटीं त्यानें असा बेत केला कीं, नोटी तेथेंच असूं द्याव्या, इतक्यांत कांहीं भीति नाहीं. घरावर पोलीसचा डोळा राहील अशी तजवीज करावी. अनंत जर नोटी न्यायला आलाच तर त्याला पकडण्याची अगर त्यावर नजर राखण्याची तजवीज करावी ह्मणजे झालं. याविषयीं आपल्या साहेबाजवळ हकीकत सांगून पुढें काय तें करावें. असो. थोड्याच वेळांत तो खालीं उतरला. बागेंत त्यानें इकडे तिकडे कोणी आहे कीं काय पाहिलें, व कोणी नाहींसें पाहून तो तडक बाहेर चालता झाला. रस्त्यानें मोठ्या झपाट्यानें चालला असतां त्याच्या म-

नांत पुढील विचार आले. "मीं आपल्या पाठीमागें दोन पोलिसचे शिपाई ठेवले नाहींत ही मोठी चूक केली. पण अशा गोष्टी पुढें होणार हें कुठें आपल्याला समजलं होतं? एका पाठीमागून एक शोध लागत गेले. नुसती गर्दी उडाली. आतां पहा. खून झाला तो न्हाणीघरांत झाली हें एक कळलं. अनंत रोज या बंगलींत येत असतो हें दुसरं. या ठिकाणीं ५,००० च्या नोटा आहेत. खरोखरीच नवाबणीचा कुठें पत्ता नाहीं कीं काय ही एक गोष्ट, आणखी दुसऱ्या कांहीं एक दोन बारीक सारीक गोष्टी समजल्या म्हणजे झालं. त्या दुसऱ्या गोष्टी एवढ्याच. अनंतानं त्या चोरकप्प्यांत नोटी सुरक्षित आहेत कीं नाहींत हें पाहिलं कसं नाहीं? ही एक गोष्ट. आणखी सर्व खण उघडून जें एवढं त्यानं शोधलं तें काय शोधलं?छे. तो गेल्यानंतर आपल्याला पुन्हां एकदां त्या सर्व खणांचा शोध करायला पाहिजे होता; पण वेळ कुठें होता. अन् त्यांत नव्हतंच कांहीं. आपण पहिल्यानं एकदां केलीच होती टेहळणी."

असे नानातऱ्हेचे विचार करीत करीत आमचे चाणाक्ष डिटेक्टिव्ह मोठ्या झपाट्यानें चालले होते. जातां जातां गिरगांवच्या बाजूला आल्यावर एका गल्लींत ते एका पडक्याशा घरांत शिरले. कांहीं वेळ गेल्यावर वाळकेश्वराच्या तिकडे मलबार हिल्च्या बाजूनें ऐटबाज दाढीमिशा असलेला, व थाटाचा मुसलमानी पोशाख केलेला,असा एक गृहस्थ चालला होता. रात्र फार झाली नव्हती. चांदणें चांगलें पडलें होतें. हा गृहस्थ अस्सल मुसलमान दिसत होता. तो मोठ्या ऐटीनें चालला होता. जातां जातां एका विस्तीर्ण बंगल्याजवळ तो गेला. इतक्यांत दारावरील कंदिलाच्या उजेडांत टाकलेल्या एका बांकावर दोन मनुष्य बसलेले त्याच्या नजरेस पडले. त्यांपैकीं एक सिद्दी होता, व दुसरा असाच मुसलमान जातीचा होता. त्या सिद्द्याकडे पाहून आमचे हे खानसाहेब आपल्याशींच ह्मणतात. 'या मनुष्याचा चेहेरा मोठा हरामखोर, दगलबाज, खुनी असा दिसतो, बहुतेक याचंच काम दिसतं आहे तें.' तो सिद्दी कोमेल्यासारखा दिसत होता. दुसरा मनुष्य त्याच्यासारखाच दिसत नव्हता, परंतु दिसत होता मुसलमानच. तो अंगानें जरा जाडी होता. त्याकडे पाहून खानसाहेब पुटपुटतातः—"हं

रावसाहेब, आपण किती दगलबाजी करा. मी पैजेनिशीं सांगतों कीं, समुद्रावर आपलीन् माझी गांठ पडली होती. यांत तिलप्राय संशय नको. पुराव्याला आपले कपडे कुठें तरी सांपडतील."

इतकें पुटपुटून खानसाहेब त्यांचेजवळ गेले तों त्यांच्या संभाषणापैकीं एक दोन शब्द त्यांच्या कानीं आले, त्यांत 'राणीसाहेब' अशा अर्थाचा कांहीं शब्द होता. तो ऐकण्याबरोबरही खानसाहेब आपल्या मनाशीं कांहीं पुटपुटले. इतक्यांत त्यांच्या नजरेस त्यांचेजवळ पडलेल्या दोन बाटल्या पडल्या. तेव्हां खानसाहेब ह्मणतातः—पहा, गुलामांना कामगिरी बजावल्याबद्दल पैसा मिळाला असेल, त्याची करताहेत चैन झालं." असो. तो मुसलमान गृहस्थ त्या लोकांजवळ गेल्याबरोबर मोठ्या ऐटीनें मुसलमानींत त्यांस विचारतो "कायरे सरकार स्वारी काय करिते आहे ? आणि जणूं काय नेहमींचाच येणार आहे अशा तऱ्हेनें त्यांचें उत्तर कांहींएक न ऐकतां तो पुढेंच सरसावून गेला. बंगल्याच्या पायऱ्या चढून वर गेल्यावर तेथील पहारेकऱ्याला त्यानें तोच प्रश्न विचारला तेव्हां त्यानें नबाबसाहेब आतां भेटणार नाहींत असें सांगितलें. तें ऐकून आमचे खानसाहेब किंचित् डोळे गुरकावून ह्मणतात "जा पर्दन्खां आले आहेत अशी वर्दी दे ह्मणजे ते नाहीं ह्मणणार नाहींत." तें ऐटीचें सांगणें पचलेंसें दिसलें. पहारेकरी लागलींच आंत गेला व कांहीं वेळानें परत येऊन लवून सलाम करून ह्मणतोः—सरकारांनीं आपल्यास आंत घेऊन येण्यास सांगितलें आहे." खानसाहेबांनीं त्याजकडे तिरस्कारयुक्त हास्य करून पाहिलें. जणूं काय "कां मीं सांगितलं नाहीं मला ते बोलावणार ह्मणून ?" असेंच त्याचे मनांतून बोलावयाचें होतें. असो.

त्या भालदारानें खानसाहेबांस आंतल्या दालनांत नेलें, तेथें रुजामेन् गालिचेन् नैचेन् एकजात थाट उडून राहिला होता. तेथून वर जाणाऱ्या जिन्यावरही गालिच्या हांतरलेला होता. त्यावरून जातांना आमच्या खानसाहेबांस अगदीं लाज वाटली असावी; निदान संकोच तरी वाटला असावा; परंतु त्यांनीं तसें दिसूं दिलें नाहीं. उलट असें दाखविलें कीं, आपण या सर्व गोष्टींला अगदीं अनुभवलेले आहोंत. जिन्यावरून वर गेल्यावर आणखी एका भालदारानें खानसाहेबांस सलाम

केला. पहिला भालदार निघून गेला. दुसऱ्या भालदारानें खानसाहेबांस आंतल्या बाजूच्या दिवाणखान्यांत नेलें. तेथें एका भरजरीच्या चादरीनें आच्छादिलेल्या कोंचावर नबाबसाहेब पडलेले असून त्यांच्या तोंडांत नेच्याची नळी होती. त्या नळीवर मोतीं व हिरे गुंफलेले होते. त्यांच्यापुढें एक टेबल असून त्यावर एक बुद्धबळांचा पट व त्यावर रत्नजडित बुद्बळें होतीं. शेजारच्या आडव्या कोंचावर दोघे मुसलमानभाई बसले होते. व नबाबसाहेबांच्या उशाशीं एक लवंडी हातांत एक बाटली व एक प्याला घेऊन उभी होती. नबाबसाहेबांचे डोळे अगदीं तारवठलेले, चेहेरा अगदीं फिक्कट, केंस अगदीं पिकून गेलेले, शरीर अतिशय कृश झालेलें व क्षणोक्षणीं ' ए लवंडी, शराब ! ' या सप्ताक्षरी मंत्राचा एकसारखा जप चाललेला; अशी एकंदर स्थिति होती. आमचे आगंतुक खानसाहेब ती स्थिति पाहून अगदीं चकित झालेसे दिसले नाहींत. त्यांस पूर्वींची माहिती असावी. त्यांनीं फार लवून मुसलमानी रीतीनें मुजरा केला; भालदारसाहेब आपला नेहमींचा मंत्र ह्मणाले व नबाबसाहेबांनीं हातानें एका बाजूच्या कोंचावर बसण्याविषयीं आमच्या खानसाहेबांस आज्ञा केली व चाकर माणसांस ' हमकु उठाव ' ह्मणून हुकूम करून त्यांनीं त्याप्रमाणें केल्यावर मग त्यांनीं पुढील प्रश्न केला. सर्व संभाषण अस्सल मुसलमानींत चाललें होतें. " काल आमच्या नांवांनीं जें पत्र आलं तें आपलंच काय ? "

" हांजी. पत्र पाठवल्यानंतर देखील माझ्यानं रहावेना, ह्मणून मग मी उत्तराची वाट न पहातां तसाच आज आलों. कारण माझ्या अंगांत जर गुण आहे तर तो पाहून आपला कसाही राग झाला, माझ्या उतावळेपणाबद्दल, तरी तो मी खास घालवीन अशी माझी खात्री आहे."

" मग काय ? मला जशीं बुद्बळं खेळायला येतात अशींच आपल्याला येतात असं आपलं ह्मणणं ? "

" आजपर्यंत खेळांत हार ह्मणून कधीं गेलों नाहीं. जर गेलों तर आज पहिल्या प्रथम जाईन ह्मणाना ! आपल्यापासून हार गेलों तर एवढं तरी समजेन कीं एक वेळां हारलों पण आपल्यासारख्यांची मुलाखत तरी झाली."

" माझ्याशीं खेळेल त्याला मी पाहिजे तें इनाम देतों असं ऐकून

आलों असं का ह्मणाना ? ”

“ नाहीं; तसं मुळींच नाहीं. या कामांत आपला अगदीं गैरसमज आहे. मीही आपल्या इतका जरी नाहीं तरी बराच श्रीमंत आहें. मला पैशाची मुळींच जरूर नाहीं. मी शौकाखातर खेळतों. तिकडे मद्रासकडचा रहाणारा मी. आपला खेळण्याचा शौक ऐकून तिथून आपल्या झोटिंगाबादेस येण्याला निघालों होतों; तों वाटेंतच कळलं कीं, आपण हल्लीं इथेंच आहां ह्मणून ? ”

“ हे शब्द ऐकून नवाबसाहेब जरा चकित झालेले दिसले, व मग ह्मणाले:—हे दोघे लोक बसले आहेत यांपैकीं अगदीं ज्याला खेळायला येत नाहीं असं ह्मणतां येत नाहीं. त्याची दिखील आज बरोबरी करणारा कोणी नाहीं. माझ्यापासूनच कायतो तो हार जातो. यांना मीं पगार देऊन ठेवले आहेत. तेव्हां यांना आधीं हार खाऊं द्या आपल्याकडून, मग मी स्वतः खेळेन. तोंपर्यंत भलत्याशींच मी खेळत नसतों. समजलं ? ”

“ एवढंच ना ? आतां हा डाव मांडलेलाच आहेना ? ठीक आहे. हिरव्याचा हिरमोड झाला आहेसा दिसतो आहे; ठीक आहे. खेळा तांबड्याच्या बाजूनं कोणी, सहा डावांत तांबड्यावर मीं मात करतों. माझ्यापाशीं यांना कांहीं दिवस शिष्यत्व करावं लागेल शिष्यत्व ! ”

“या बोलण्यावर त्या दोघां भाडोत्री खेळणारांनीं थोडेंसें तिरस्कारयुक्त पाहिलें; व नवाबसाहेब जरा व्याजोक्तीनें ह्मणाले. ‘ हं ? हं ? ’ तर मग पाहूंच तुमची कर्तबगारी ! ”

“आमचे खान खेळण्यांत खरोखरींच पटाईत होते. ते मुसलमान खेळणारेही त्याप्रमाणेंच होते असेंही त्यांनीं दोन डावांतच ताडलें; परंतु नबाबास हार खायाला लावल्यास चाकरीवर पाणी येईल, ह्मणून ते स्वतांच नेहमीं हार घेत असें त्यास दिसलें. डावास सुरुवात झाली व आमच्या ख़ानांनीं ह्मटल्याप्रमाणें मात करून दाखविली. तेव्हां नबाबसाहेब खुष होऊन ह्मणाले ठीक आहे. तुमचे आमचे दोन डाव होऊं द्या तुह्मी बरे दिसतां खेळणार ! पण इकडे पहा, जर तुह्मी हरला तर पुन्हां या बंगल्याची पायरी चढतां कामा नये. ” “ बरं जर जिंकलों तर ” तर आपल्याला चांगलें बक्षीस मिळेल. नबाबसाहेब ! मी जो

खेळायला आलों आहें, हा कांहीं पैशासाठीं आलों नाहीं हें आपल्याला मीं कळवलंच आहे. मी आपल्यासारखाच सुखी आहें. मला कशाचीच जरूर नाहीं. आपण अट घालतां तशी मींही घातली पाहिजे इतकंच. तर मी जें मागेन तें आपण केलं पाहिजे. वचन होत असेल तर बोलतों. मीं हरलों तर पुनः कधीं येणारच नाहीं, तेव्हां आपण तसं मला सांगायला नको; शिवाय मीच पाहिजे तर हरल्याबद्दल दंड ह्मणून ५०० पासून १००० रुपयांपर्यंत देईन."

"बरं जर तुह्मी जिंकलांत तर?" मी जिंकलों तर? मी जिंकलों तर आपण मला आपला मोठा प्यारा दोस्त असं ह्मटलं पाहिजे; जेव्हां पाहिजे तेव्हां इथें येण्याची अगर बंगल्यांत पाहिजे तिथें जाण्याची मला मोकळीक मिळाली पाहिजे. इतर लोक येतात तसा मी नाहीं असं समजलं पाहिजे. आणखी असं आपण समजायला लागलां असं दाखवायला तात्रडतोब एक गोष्ट केली पाहिजे." "कोणची बोला पाहूं" "माफ असेल आणखी वचन मिळेल तर बोलतों." "आच्छा वचन आहे. बोला" "राणीसाहेब आह्मांला आईप्रमाणें आहेत, त्यांच्या दर्शनाचा लाभ नित्य घडेल अशी तजवीज केली पाहिजे. मी आपल्या पोरासारखा आहें असं समजून चाललं पाहिजे. हें मी मागतों एवढ्याकरितांच कीं इतर चार लोकांप्रमाणेंच मी नाहीं असं समजलं जावं." नवाब मोठ्यानें ओरडून ह्मणतो "काय? हा माणूस दिवाणा तर नाहीं?" "छे. छे. मी चांगला शुद्धीवर आहें. मी कांहीं जास्त मागत नाहीं. राणीसाहेब मला आईप्रमाणें आहेत. त्यांचं मला केव्हांही आलों तर दर्शन व्हावं. त्या कांहीं कोणाच्या नजरेस पडत नाहींत असं नाहीं. उघड्या गाड्यांतून हिंडतात, नाटकाला जातात, सगळं कांहीं होतं तेव्हां."—

बोलून चालून नेटिव्ह राजे. नवाबभाई ते! जशी मर्जी फिरेल त्याप्रमाणें फिरणार! पण आमच्या या धारिष्टाच्या खानाचें नशीब! राजेसाहेबांची लहर लागली व त्यांनीं तेव्हांच "ठीक आहे तूं ह्मणतोस त्याप्रमाणें होईल" असें उत्तर दिलें. पण त्याबरोबर असें सांगितलें कीं, "जर तूं ह्मणतोस त्याप्रमाणें मी हार गेलों नाहीं तर तुला इथल्याइथें उठबशा काढायला लावून चाबकाखालीं बडवीन." "ठीक आहे.

कांहीं हरकत नाहीं " असें खानांनीं उत्तर दिलें. ते भाडोत्री खेळणारे होते त्यांची पांचांवर धारण बसली. कारण त्यांस नबाब हार जाऊन हा गृहस्थ नेहमीं येथें येणार असें पक्कें कळून आलें. आणि असें झालें ह्मणजे नबाबास रोज खेळणारा मिळाल्यावर तो आपल्याला घालवून लावणार असेंहि त्यांस दिसून आलें. अस्तु सर्व ठराव झाल्यानंतर डाव मांडला तेव्हां खान ह्मणतो " सरकारांनीं आधीं खेळावं."

**नबाबः**—" ठीक आहे. तुझी फार खात्री दिसते मला जिंकण्याबद्दल. पण इकडे पहा इथें अगदीं पद्धतवार खेळलं पाहिजे बरंका ? एकवार प्यादं हलवलं कीं, मागें घेतां कामा नये. प्याद्याला हात लावला कीं, खेळलंच पाहिजे " ठीक आहे. कबूल आहे मी अगदीं याप्रमाणें खेळेन पण आपण मात्र पाहिजे त्याप्रमाणें खेळावं. असो.

डावाला सुरुवात झाल्यावर प्रारंभीं नबाब थोडेसे फुशारून गेले; परंतु पुढें शेवटीं खानांनीं त्यांजवर डाव दिलाच. तो सर्व डाव पाहण्याजोगा होता. नबाबांची आधींची फुशारलेली व मगची दुर्मुखलेली मूर्ति या दोहींचा विरोध मोठा चमत्कारिक होता. शेवटीं नबाब साहेबांनीं आपण हरलों असें कबूल केलें. मात्र ' आज माझं मन ठिकाणावर नव्हतं तेव्हां उद्यां पुन्हां खेळलं पाहिजे मग दाखवतों ' असं ह्मटल्याखेरीज ते राहिले नाहींत.

**खानसाहेबः**—" कांहीं हरकत नाहीं पण मला वचन दिल्याप्रमाणें आतां झालं पाहिजे."

**न०**—" हं. हं. अलबत्, पण आतां ती निजली आहे कीं काय करते आहे शोध केला पाहिजे. ती इथें आहे कीं गांवाला गेली आहे हें दिखील मला ठाऊक नाहीं." इतकें बोलून त्यानें आपल्या त्या लवंडीकडे पाहिलें, तों तिनें तेव्हांच सांगितलें कीं दोन चार दिवसांपासून राणीसाहेब कुठें बाहेरगांवीं गेल्या आहेत. इथें नाहींत.

" गांवाला गेली आहे ? कुठल्या ? " " तें कांहीं कळत नाहीं " नबाबास हें ऐकून आश्चर्य मुळींच वाटलें नसावें असें दिसतें.

" कधीं गेली कधीं ?" मागल्या शनिवारीं रात्रीं सिद्धी सुलेमान त्यांना कुठल्याशा स्टेशनावर पोंचवून आला." " बरं आपल्याला नवीन नोकर ठेवायचा होता तो ठेवला ? " " हां ठेवला सरकार. आजच स-

काळीं. पण त्याला हिंदुस्थानी येत नाहीं." "कांहीं हरकत नाहीं."

**नबाबः**—( खानाकडे वळून ) "आतां काय ? इलाज नाहीं. पण ती आल्यावर पाहूं. तूं आतां रोज इथें खेळायला मात्र आलं पाहिजे." वरील सर्व संभाषण ऐकून खानाला पाहिजे होतं तें मिळून समाधान झाल्यासारखं दिसलं. नंतर तो तेथून उठून **परशुरामपंत** रहात होता तेथें गेला. **परशुरामपंताच्या** खोलींत गेला तों तेथें दमाजी खेरीज कोणी नव्हतें. खान आंत जाण्याबरोबर दमाजी चपापून उभा राहिला; परंतु पुनः आपल्याशींच मोठ्यानें हंसून ह्मणतोः—"वाः पोषाख तर खूप केला होता आज !" **परशुमापंत** दाढीमिशा उपटून टाकून ह्मणतो "मीं तर साधली तुझं काय झालं बाबा ? तुझं बीं रुजलं एवढं मला कळलं, पण पुढं काय झालं ?" "पुढं काय व्हायचंय् ? पुढं एवढंच कीं पैसे पेरले ह्मणजे सारं कांहीं होतं आहे." "पैशाचं काय मोठंसं ? पैसे पाहिजे तितके पेरूं. बरं पण कायरे त्या सिद्दी कोचमनाला गांठला होतास का तूं ? तो मोठा हरामखोर दिसतो बाबा !" "मीं पाहिला यत्न करून. पण तो फार लफंगा दिसतो. इतकंच नाहीं ते आपापसांत काय बोलतात तें दिखील एकलं मीं. विशेष कांहीं नाहीं." "बरं तर आतां जा तूं. परवां मला भेट. आतां सकाळ झाली कीं मी साहेबाकडे जाईन. काल निरोप पाठविल्याप्रमाणें त्या गांवदेवींतल्या बंगलीवर पहारा ठेवला कीं नाहीं त्यांनीं, कुणाला ठाऊक ?" 'मग काय फत्ते आहे वाटतं ?' 'फत्ते ह्मणजे ? आणखी दोन दिवसांत खुनी माणसाला पकडून देतों. आपलं नांव झालं ह्मणून समज. आतां शंकाच राहिली नाहीं. बक्षीस मिळालं. अगदीं खिशांत पडलं का ह्मणेनास !'

थोड्याच वेळांत दमाजी निघून गेला. **परशुरामपंत** अंथरुणावर पडला. पण त्याला झोंप कुठली ? तो सकाळपर्यंत विचारांत होता. सकाळ होऊन आठ नऊ वाल्यावर तो एका व्हिक्टोरिआंत बसून निघाला व गाडींत पाय ठेवतांना आपल्याशींच ह्मणतो "या **अनंतरावजी**, आतां आपला समाचार घेतों."

## २

दुसरा शनवार आला. आदल्या शनवाराप्रमाणेंच **अनंतरावानें** आपल्या बहिणीस गेटी थेटरांत संगीत नाटक पहाण्यास नेण्याचें कबूल

केलें होतें; व त्याप्रमाणें तो आज तिला खास नेणार होता. इतकेंच नव्हे परंतु त्यानें **यशवंतरावासही** आपल्या बरोबर येण्यास सांगितलें होतें. **अनंतराव** व **यमुना** यांचा बहुतेक इतिहास वाचकांस ठाऊकच आहे. **अनंतरावानें** आपल्या बहिणीस लहानपणापासून कशा तऱ्हेनें वाढविली वगैरे गोष्टी मागें आल्याच आहेत. त्याचप्रमाणें **यशवंतरावाचा** व **अनंतरावाचा** किती स्नेह होता हेंही मागें कळलेंच आहे. **यमुना** व **यशवंतराव** हीं एकमेकांशीं बहीण भावंडांप्रमाणें मन मोकळें करून बोलत असत. **अनंतराव** नबाबणीचा कारभारी झाल्यापासून त्याचें चित्त बावरल्यासारखें असतें; तो नियमानें घरीं येत नाहीं. लग्न करूं नये असें त्याला वाटलें. वगैरे हितगुजाच्या गोष्टी त्या दोघांत चालत; व त्यामुळें त्या दोघांत अज्ञात असें प्रेम उत्पन्न झालें होतें. **अनंतराव** हा पक्का सुधारक, आचरट ब्राह्मण्याला, व रिकामटेकड्या लोकमताला जुमानणारा नव्हता. शिवाय दोघंच दोघं असल्यामुळें आणि पैशाची कांहीं मोठीशी वाण नसल्यामुळें त्यानें आपल्या बहिणीला बरीच मोठी होऊं दिली होती, व तिला शाळेंत वगैरे पाठवून बरीच सुशिक्षित करून ठेवली होती. ती अद्यापिही शाळेंत जात असे. तिचें मराठी भाषेचें शिक्षण पुरें होऊन इंग्रजीही चार पांच इयत्तांपर्यंत तिचें ज्ञान होतें. साधारण गलिव्हर, स्यांडफर्ड वगैरे पुस्तकें तिला वाचून समजत. तिला वाचण्याचा फार नाद असे. घरांत ती सर्व कामकाजावर देखरेख ठेवून आपलें शिकणें संभाळीत असे. ती शिवण्या टिपपण्यांत मोठी हुशार असे. स्वभावानें फार चांगली. उद्धटपणा बिलकूल कसा तो तिला ठाऊक देखील नव्हता. सारांश ती लहानपणापासून स्वतंत्र असूनही ती शिक्षणानें फारच नम्र व हुशार झाली होती. तिला आपल्या इकडील पुराणांतील कथांची वगैरेही माहिती होती; कारण तिला भारतसार वगैरे ग्रंथ फार आवडत. पांडवप्रताप, हरिविजय, भक्तलीलामृत वगैरे ग्रंथ तिनं वाचून काढले होते. कोणचेंही पुस्तक लागल्यास **अनंतराव** तिला कधीं नाहीं ह्मणून ह्मणत नसे. भिकार प्रहसनें आणि नाटिका फाटिका अशीं मोठमोठालीं नांवें घेतलेलीं घाणेरडीं चोपडीं मात्र तिच्या हातीं त्यानें कधीं पडूं दिलीं नाहींत; व तिनेंही तीं कधीं मागितलीं नाहींत. चांगल्या चांगल्या गोष्टी

तो तिला वाचावयास देत असे. तिला . मुक्तमाला फार आवडे. असो. अशी ती सद्गुणी व सुशिक्षित असल्यामुळें व यशवंतरावाचें मतही सुधारणापक्षाकडचें असून अनाडी सात आठ वर्षांच्या पोरीशीं लग्न लावून घेण्यापेक्षां लोकमताला अंमळ गुंडाळून ठेवून अशा चांगल्या सुशील सुशिक्षित मुलीशी लग्न लावणें त्याला बरें वाटत असल्यामुळें त्या दोघांचीं मनें तेव्हांच जुळलीं. तरी त्यांनीं एकमेकांस किंवा लोकांस ही गोष्ट कधींही कळूं दिली नाहीं. आसपासचे टवाळ लोक कितीही कुटाळ्या करूं लागले, तरी त्यांनीं कधीं तिकडे लक्ष दिलें नाहीं. गेल्या शनवारीं काय तें एकमेकांचें मन एकमेकांस व **अनंतरावासही** कळलें. त्याचे मनांत तर ही गोष्ट होतीच. पुढें त्यांचें अगदीं लग्न वगैरे करण्याचें ठरलें. फक्त मुहूर्त काय तो ठरावयाचा राहिला होता. असो. आज ह्मणजे दुसऱ्या शनवारीं रात्रीं आठ एक वाजण्याच्या सुमारास **यशवंतराव अनंतरावाच्या** घरीं आला. नंतर तीं तिघेंही नाटक पहावयास जाण्यास सिद्ध झालीं. एका व्हिक्टोरिआंत बसून तिघेंही गेटी थेराजवळ गेलीं. तेथें उतरण्याबरोबर **अनंतराव** ह्मणतोः—" बरं आतां तुह्मी दोघं आंत जाऊन डाव्या बाजूचा पहिलाच रिझर्व बाक्स घ्या. ज्यास्त पैसे पडले तरी हरकत नाहीं. गर्दी नको. अन् या सौभद्राला तर कोण गर्दी होते ही पहा. ही पाहिलीतका मंडळी. काय लोक हे! धन्य आहे या लोकांची. आण्णा किर्लोस्कर नुसता झुलवतो आहे आज काल जगाला. हं. जा. पहा एकदां मनमुराद. आज किती दिवस नाद लागला आहे हिचा. **यमुना** तें ऐकून एकदम ह्मणते " जा ह्मणजे? तूं नाहीं का येत दादा?"

" मी येतोंग. तुह्मी आंत जाऊन तिकीट काढून बसतां आहां, नाटकाला प्रारंभ वगैरे होतो आहे तों मी येतोंच. मला इथें जवळच जरा काम आहे, ह्मणून ह्मणतों तुह्मी चला आंत."

" आतां कसलं रात्रींचं काम आलं आहे बाबा? मी नाहीं बाबा जायची तुझ्याशिवाय. हें रे काय हें? लोक काय ह्मणतील बरं मी अशी गेलें तर!"

**यशवंतरावः**—" बरोबर आहे बोआ हें ह्मणणं. आपल्याला दि-

खील बरं नाहीं वाटत तें."

**अनंतराव**:—अहो मी कांहीं तिला भलत्याबरोबर का जायला सांगतों आहें ? लोकांशीं काय आपल्याला करायचं आहे. आपलं जर मन शुद्ध असलं तर कोणाची भीति नाहीं. नाहींतर लोक काय थोडीं कां आह्माला नांवं ठेवताहेत? चला. मग मोठमोठालीं कामं तुह्मी करणार तीं कशीं ? मला फार वेळ लागायचा नाहीं. मी तावडतोब येतों वीस पंचवीस मिनिटांच्या आंत.

यावर कोणी कांहीं बोललें नाहीं. **यशवंतराव** पुढें झाला, **यमुना** **अनंतरावा**कडे पहात पहात त्याच्या पाठीमागून गेली. **अनंतराव** "जातां जातां थट्टेनें ह्मणतो आतां बाक्सांत बसून गुल्गुल् गोष्टी सांगूं लागलां ह्मणजे मग माझी लवकर आठवण नाहीं व्हायची कांहीं." **यमुना** हलकेंच 'हें रे काय हें तूं आपला—' एवढें ह्मणाली. ती पुढें कांहीं बोलणार तोंच **अनंतराव** स्मित करून ह्मणतो 'पुरे. पुरे. मी आल्यावर मग पुढलं काय तें ऐकेन.

**यशवंतराव** अधिक कांहीं बोलला नाहीं. परंतु त्याच्या चेहऱ्यावरून तो नाखुष झाला असावा असें दिसलें. त्याला हें **अनंतरावाचें** करणें बिलकुल पसंत पडलें नाहीं. 'आपल्या उपवर बहिणीला लोकदृष्टीनें तरी अगदीं परक्या मनुष्याबरोबर नाटक गृहांत एकटी सोडून जाणें अगदीं बरें नव्हे असें त्याला वाटलें. दुसरी गोष्ट ही कीं, रात्रीच्या वेळीं, भलत्याच वेळीं **अनंतराव** गेला असावा कुठें याचा त्याला अंदाज होईना. ती नवाबीण तर आली नसेल ? छे ! पण आली असती तर तो आज घरींच आला नसता. काय वेडगळ माणूस पहा. दुसरा कांहीं नाहीं तर त्याला हाच एक नाद लागला आहे. चांगला शिकलेला, सवरलेला, मोठमोठ्या गोष्टी सांगतो; आह्माला उपदेश करतों; पण एवढ्या कामांत कसा चुकतो बोआ ! नाहींतर कसा लाख्या मनुष्य पण एवढ्यानं गेलं. काय चमत्कार असेल तो असो. चांगल्या सुशिक्षित ह्मणाविणाऱ्यांत देखील अशा कांहीं तरी भलत्याच नादाला लागलेले लोकांच्या गोष्टी आपण थोड्या ऐकतों ? त्यांतलाच हा एक. पण लक्षण ठीक नाहीं. एखाद्या भलत्याच कचाट्यांत सांपडून कांहीं भलतंच न होवो ह्मणले झालं.' अशा तऱ्हेचे अनेक विचा-

र त्याच्या मनांत येऊन त्याचें मन शुद्ध झालें; परंतु त्यानें एकही गोष्ट **यमुने**ला सांगितली नाहीं. त्यानें पुढें होऊन एक रिझर्व्ह बाक्साचें तिकीट काढलें. **यमुना** मोठ्या दिलगिरीनें त्याचे बरोबर गेली. तीं दोघें एका स्टेजजवळच्याच बाक्सांत जाऊन बसलीं. त्यांच्या भविष्याप्रमाणें पुष्कळ लोक त्यांचेकडे पाहूं लागले, यांनीं अर्थातच त्यांचेकडे लक्ष्य दिलें नाहीं. ठिकाठिकाणच्या लोकांनीं आपले डोळे व ज्यांच्याजवळ होत्या त्यांनीं आपल्या दुर्बिणी यांच्या बाक्सकडे वळविल्या; परंतु **यमुना** आपली मोठ्या विनयानें मान खालीं घालून **यशवंतरावा**पासून किंचित् अंतरावर बसली. थेटर अगदीं गच्च भरून गेलें होतें; फक्त रिझर्व्ह बाक्सांपैकीं एक दोन बाक्सा रिकाम्या होत्या. अतिशय गडबड, शिव्या, टाळ्या हापटणें वगैरे गोष्टींस सुरुवात झाली होती. इतकी सगळीकडे गडबड चालली होती, पण **यमुने**ला ती कांहींच ऐकूं आली नाहीं. तिच्या मनांत नानातऱ्हेचे विचार घोळत होते. त्यांत आपला भाऊ आपल्याला सोडून गेला असावा कुठें, एवढ्या रात्रीं मुंबईच्या या भागांत त्याचें काय काम असावें वगैरे विचार अर्थातच प्रबल होते. काय करील बिचारी ! तिचा सर्वथैव आपल्या भावावर जीव होता. तो भाऊच आतांशा असे वेडे वेडे चाळे करूं लागला त्यामुळें तिला मोठी काळजी वाटत असे. तिला असे वाटे, हा कोणच्या खटपटींत असतो, आणि कोणच्या नाहीं. कोण्या वेळीं काय प्रसंग येईल आणि काय होईल याबद्दल देखील तिला अत्यंत काळजी वाटे. ती स्वतां मोठी चाणाक्ष आणि चतुर असल्यामुळें, ती एवढ्या तेवढ्यावरून तेव्हांच तर्क करीत असे. त्याप्रमाणें तर्क करून करूनच व **यशवंतरावा**च्या बोलण्यांत वगैरे आलेल्या दूरदूरच्या संबंधांवरून तिनें कांहीं कांहीं गोष्टी ताडल्या होत्या. असो. या वेळीं तिचें लक्ष कशाकडे लागेना. तिच्या मनांत पुष्कळदां असें आलें कीं, **यशवंतरावास** कांहीं माहिती असल्यास विचारावें; परंतु दोन गोष्टींमुळें तिचा धीर बसेना. एक वेळां वाटे न जाणों, कदाचित् कांहीं भलतेंच असलें तर ! दुसऱ्या वेळीं वाटे न जाणों, आपण बोललों तर तें बरें दिसणार नाहीं. असा तिचा विचार चालला होता. इतक्यांत कर्मधर्म संयोगानें काय मजा झाली पहा. त्यांच्या शेजारचीच रिझर्व्हबाक्स रिकामी होती. तीमध्यें दोघी बायका येऊन बसल्या. या

गोंवेकरणी होत्या. आणि **यशवंतराव** व त्याचा स्नेही **जगन्नाथपंत** हे, आपल्या स्नेह्यानें ठ्याक्लेवर केलेल्या फराळाला गेले होते तेव्हां ज्या त्यानें बरोबर आणल्या होत्या, त्याच बाया त्या होत्या. हें पाहून **यशवंतरावाची** त्रेधा उडाली. त्याला वाटलें न जाणों वेश्या त्या. जर का त्या एखादा शब्द आपल्याशीं बोलल्या तर उगीच पंचाईत व्हावयाची. आपण कांहीं न करितां न सवरतां **यमुनेच्या** मनांत कांहीं भलताच संशय यावयाचा. अशी त्याच्या मनाची संदिग्ध स्थिति असतां त्यानें त्या बाया काय करताहेत हें हलकेंच पाहिलें. त्यानें मान तिकडे केली मात्र. तों **राधाजी** त्याचेकडे पाहून हंसली आणि **चिमाजीनें** मान हलविली. **यशवंतरावानें** आपली मान चटकर फिरविली, व आधीं झालेली गोष्ट **यमुनेनें** पाहिली कीं काय याचा त्यानें निर्णय केला. त्याला असें वाटलें कीं, आपलें नशीब ह्मणून आपल्या पलीकडे दुसऱ्या बाजूला **यमुना** आहे. शिवाय **यमुना** आपल्या विचारांत मग्न होती हें कांहीं वावगें नव्हतें. असो. आतां पुन्हां असा प्रसंग होऊं नये ह्मणून त्यानें काय केलें कीं तो त्या दोन्ही बाकसांच्या मधल्या पडदीजवळ अगदीं बसला. हेतु हा कीं, आपण त्यांस दिसूं नये. असा तो बसतो आहे तों खालच्या बाजूस त्याची दृष्टि गेली, व **जगन्नाथपंत** त्याच्या दृष्टीस पडला; त्याकडे पाहून तो त्याला नमस्कार वगैरे करणार तों **परशुरामपंतही** त्याच्या दृष्टीस पडला. त्याला पहाण्याबरोबर काय असेल तें असो, **यशवंतरावानें** आपल्या कपाळाला आंठ्या घातल्या. त्याचें त्या मनुष्याविषयीं अगदीं चांगलें मत नव्हतें. त्यांतून तो डिटेक्टिव्ह असावा अशी त्याला पक्की शंका आल्या दिवसापासून तर त्याचें त्याविषयीं मन अधिकच विटलेंसें दिसलें. इतक्यांत **परशुरामपंतानें** त्याजकडे पाहिलें, व त्यास नमस्कार केला. तो नमस्कार अर्थातच त्यास घ्यावा लागला. **जगन्नाथपंत** आतां खालींच कुठेंसा बसला; व **परशुरामपंत** गर्दींत कुठें नाहींसा झाला. याप्रमाणें सर्व स्थिति चालली असतां **यमुनेच्यानें** अगदीं रहावेना; तेव्हां ती **यशवंतरावास** ह्मणते "दादाला कां बरं जाऊं दिलं, मला आज कसंसंच वाटतं आहे." हे शब्द उच्चारतांना तिचे डोळे पाण्यानें अगदीं भरून आले होते. तें पाहून **यशवंतरावाच्यानें** कांहींच बोलवेना. तो तरी बिचारा काय

करणार ! परंतु कांहीं तरी उत्तर दिलें पाहिजे. ह्मणून ती ह्मणाली "त्यानं माझं ऐकलं नसतं मीं कितीही आग्रह केला असता तरी. मला वाटतं त्याला खरोखरींच कांहीं तरी जरूरीचं काम असावं, नाहींतर तो जाताना." **यमुना** त्यावर ह्मणतः—"असेल; पण मला आपलं असं वाटतं आहे कीं, आजची रात्र कांहीं सुखांत जात नाहीं आपली. कांहीं तरी संकट ओढवणार आहे."

"हें काय हें भलतंच ! असा मनांत मुळींच विचार आणूं नये. तो चांगला आनंदांत आहेन्." "होय. इथें येईपर्यंत चांगला आनंदांत होता; पण आपण गाडींतून उतरल्याबरोबर पहातें तों त्याचा चेहरा कांहीं आनंदी राहिला नव्हता. काय असेल तें असो. तो गेला तो कांहीं तरी भयंकर काळजींत गेला असं मला वाटतं. सहज कांहीं गेला नाहीं."

"पण तुमच्या मनांत तरी काय येतं आहे ? कोणचं संकट येईलसं वाटतं ? **अनंतराव** कांहीं भलत्या सलत्या फंदांत पडणारा मनुष्य नाहीं. त्याच्या वाईटावर कोणी आहे असं नाहीं." "काय असेल तें असो. पण खरं पुसाल तर मला वाटतं कीं कोणी तरी स्त्री—"

पुढें तिच्यानें बोलवेना. परंतु **यशवंतरावानें** त्या तुटक वाक्यावरून तिच्या मनांतल्या सर्व गोष्टी ताडल्या; व त्याच्या पोटांत धस्स झालें. आणि इतक्यांत शेजारल्या बाक्सांतून पुढील शब्द त्याच्या कानीं पडले, "अग ती त्या **अनंतरावा**ची बहीण. हीं दोघं बसलीं आहेत यांचं लग्न लागावयाचं आहे असं ह्मणतात." पण तो **अनंत** नाहीं कुठें तो ?" "तो बसायचाच." हे शब्द ऐकून पुढें काय आतां त्या बोलताहेत तें ऐकण्यासाठीं त्यानें आपलें लक्ष्य तिकडे दिलें. **यमुना** आपली खालीं मान घालून हलकेच अश्रु ढाळीत होती. इतक्यांत पडदा वर उचलून नाटकास सुरुवात झाली. त्यामुळें शेजारल्या मंडळीचें बोलणें तितकेंच राहिलें. प्रारंभींचा नटी सुत्रधाराचा प्रवेश संपला. अर्जुन आपलें लांबलचक आत्मगत भाषण करण्यासाठीं आला. शेजारची मंडळी आपापसांत कुजबुजूं लागली. त्यांनीं अनेक वेळीं तें नाटक पाहिलें असल्यामुळें त्यांस कांहीं त्यांत मजा वाटेना असें दिसलें. **यशवंतरावाचें** लक्ष्य त्या काय बोल-

तात इकडे लागलें. **यमुना** स्तब्धच होती; तिला कांहींच मजा वाटेना. इतक्यांत काय चमत्कार झाला कीं **परशुरामपंत** शेजारल्या बाक्सांत आला. त्यास **चिमाजी** ह्मणतातः—"काय हो तुह्मांला नाहीं का लोकांची भीति? तुह्मी बरे आलांत आमच्या इकडे? काय मजा आहे बोआ! आमच्या इथें लोक आले ह्मणजे कसे पण लाडीगोडी करतात. अन् आतां! आह्मी इथें आलों ह्मणजे कोणी आह्मांला विचारतो तरी का? आमच्या घरीं आल्यावर हे लोक कसं कसं बोलतात हें जर यांच्या बायकांनीं ऐकलं, तर कळेल त्यांना. हे लोक खरे खरे कसे असतात ते!"

**परशुरामपंत** मध्येंच ह्मणतोः—"का आज फार हत्यार धरलं आहे लोकांवर!"

यावर असल्याच प्रकारचें पुष्कळ वेळ बोलणें चाललें होतें. त्यांत **राधाजीनें** ह्मटलें: "अहो, लांत्र कशाला गेल्या शनवारींच आह्मांला दोघींना बरोबर घेऊन **कृष्णराव** गेले होते व्याक्बेवर; तिथें आणखी तिघे गृहस्थ आले होते. तों आज आह्मीं इथें पाहिलें तर आमच्याकडे पहायला दिखील लाजतात! त्यांतला एक गृहस्थ दुसऱ्या गृहस्थाच्या बहिणीशीं लग्न लावणार आहे ह्मणे. पहा!—" पुढें ती काय बोलली हें **यशवंतरावास** ऐकूं आलें नाहीं. त्याला एवढेंच बोलणें फार ओंगळसें दिसलें. त्याच्या मनांत आतां असें येऊं लागलें कीं आपण **यमुनेला** घेऊन जावें. कारण त्या नाटकापासून तिलाही आनंद होत नव्हता; त्यालाही होत नव्हता. परंतु आपण एकटेच तिला घेऊन गेलों तर लोक काय ह्मणतील, काय टीका करतील असें मनांत येऊन तो तसाच तेथें बसला; पण त्याला तें बरें वाटेना.

शेवटीं काय असेल तें असो. **परशुरामपंतानें** साहजिकपणें ह्मणा किंवा मुद्दाम ह्मणा, पण तो विषय बदलला. त्यांचें आतां नाटकाविषयीं बोलणें चाललें. बोलणें चालतां चालतां गाण्याच्या चांगले वाईटपणाबद्दल चर्चा निघाली व अर्थातच हिंदुस्थानचें नांव निघालें. गाणें हा विषय निघाल्यावर इंदूर, ग्वाल्हेर, उत्तर हिंदुस्थान यांचीं नांवें निघाल्याखेरीज कधींच रहात नाहींत. हिंदुस्थानचें नांव निघतां निघतां ती **राधाजी** मधेंच ह्मणतेः—"आतां हिंदुस्थानचें नांव निघालं

त्यावरून मला आठवलं; कायहो, तुह्मांला ठाऊक असेल, ही शेजा-रच्या बाक्सांत बसली आहे, हिचा भाऊ त्या नवाबणीचा कारभारी आहे ह्मणे. खरं का? आणखी दिखील कांहीं वाईट संबंध आहे ह्मणे.”

परशुरामपंतः—कांहीं ठाऊक नाहीं बोआ. तुह्मांला कोण आलं सांगायला?

राधाजीः—तुह्मांला ठाऊक नाहीं असं होईल तरी कसं? सगळ्या गांवाला ठाऊक आहेन्.

परशुरामपंतः—छे! भलतंच एखादं! तुह्मांला त्या कृष्णरावानं कांहीं तरी दिलं सांगून झालं. हें वरील संभाषण यमुनेच्या देखील कानीं पडलें व तिचा चेहेरा अगदीं फिका पडला. तिनें आजपर्यंत आपल्या भावाविषयीं असें कांहीं ऐकलें नव्हतें. तें आजच ऐकलें. यशवंतरावानें कधीं तिला कांहीं सांगितलें नव्हतें. तिला रडूं कोस-ळलें. यशवंतरावाचीही स्थिति फार चमत्कारिक झाली व तो तिला ह्मणालाः—मला वाटतं इथून आपण आतां जावं. इथें बसण्यांत कांहीं अर्थ नाहीं. इतकें तो बोलतो आहे तो राधाजी आणखी ह्मणाली, “मीं ऐकलं हें जर खर असेल, तर मग त्याची इति श्री झाली असं-च समजावं. ती बाई मोठी जहांबाज आहे. तिच्या त्या जहागिरी-च्या गांवचा आमच्या इथें एक तबलजी येतो, त्यानं ज्या तिच्या एके-क भयंकर गोष्टी सांगितल्या आहेत त्या ऐकल्या ह्मणजे असं वाटतं कीं, ती कोणाचं काय करील न् काय नाहीं.” हे शब्द ऐकून तर य-मुनेच्या मनाची आणखी काय स्थिति झाली असेल याचा वाचकांनींच विचार करावा. ती वर्णन करून सांगतां येणार नाहीं. यशवंतरा-वाची तर त्रेधाच उडाली. यमुना चांगली रडूं लागली. तरी तिनें लोकांना कांहींएक कळूं दिलें नाहीं. यशवंतरावानें पुन्हां तिला आ-पण जाऊं या ह्मणून विचारलें परंतु तिनें ‘दादा येईपर्यंत असेच बसूं’ असें ह्मटलें. यशवंतरावाला अर्थातच आणखी कांहीं बोलतां येईना. इकडे शेजारल्या बाक्सांतील मंडळींचें बोलणें आणखी कांहीं गोष्टींवर चा-ललें होतें. होतां होतां राधाजी ह्मणते, “कायहो परशुरामपंत, आज दोन तीन दिवस साऱ्या मुंबईभर जी ही खुनाची बातमी पसरली आहे ती काय आहे? फार भयंकर खून झाला आहे ह्मणतात. तुह्मांला अ-

सेल त्याची माहिती. ”

**परशुरामपंतः**—खून ? कसला खून ? तुह्मांला बऱ्या बोआ साऱ्या बातम्या लागतात असल्या !

**राधाजीः**—तो हो. कुठें ह्मणतात मुंडक्याशिवाय धडच पोत्यांत घालून ठेवलेलं व्याक्त्रेवर सांपडलं. हें वाक्य ऐकून **यशवंतरावाच्या** पोटांत धस्स झालें व तो दचकल्यासारखा झाला. त्याला आजपर्यंत असें वाटत होतें कीं, आपण ज्या विलक्षण प्रसंगांत सांपडलों होतों त्याचा सर्व लोकांस अगदीं विसर पडला असावा.

**परशुरामपंतः**—हं हं तो खून होय ? त्याचं काय आहे कुणाला ठाऊक ? मीं दिखील कुठेंशी ऐकली खरी हकीकत त्या गोष्टीची. पण मला वाटतं तो कांहीं खून नसावा !

**चिमाजीः**—काय ह्मणतां ? खून नसावा ? हेः ! गेल्या शनवारीं व्याक्त्रेवर जातांना आह्मीं जी मजा पाहिली, तें पोत्यांत्त पाठीवर घेऊन जाणाऱ्या माणसाचीन् त्या बूमची, ती जर आह्मीं पोलिसास कळविली तर मला वाटतं त्या खुनाचा कांहीं तरी पत्ता लागेल आणखी—

**परशुरामपंतः**—हेः तुह्मीं पाहिलं याचान् या खुनाचा संबंध काय बोआ !

**राधाजीः**—संबंध सांगूं ! त्या पोत्यांतच तें धड घालून नेलं असं मला वाटतं.

**परशुरामपंतः**—भलतंच एखादं. असं बोलूं तरी नका; नाहींतर रिकामा पोलिसचा टपका यायचा तुमच्यावरन् मग साक्षीन् जबान्यान् घाला रिकामे हेलपाटे !

**चिमाजीः**—अन् आह्मांला वाटतं आहे त्याप्रमाणें त्या नबाबणीचीच जर का ती बूम असली, तर मग काय मजाच उडेल नव्हे ? पण जाऊंद्या तुह्मी ह्मणतां तर आह्मी बोलत नाहीं. नको तो साक्षांचान् जबान्यांचा त्रास. पण आपलं एक सांगितलं तुह्माला.

**परशुरामपंतः**—त्यांत कांहीं अर्थ नाहीं, ती तुमची कल्पना आहे. कुणाला सांगाल तर विनाकारण गोत्यांत पडाल. हें तो ह्मणतो आहे तों पहिला अंक संपला व पडदा पडला. त्याबरोबर तो उठून जाऊं लागला.

**राधाजीः**—कां तुह्मीही आह्मांला सोडून चालला का ? कांहीं पानपट्टी तंबाखू त्रिंबाखू.—

**परशुरामपंतः**—"छे! मला फार काम आहे, आतां एका गृहस्थाला भेटायचं आहे. पुन्हां मग दुसऱ्या अंकाला सुरुवात झाली ह्मणजे मग पंचाईत पडेल. तो पहा तो पाहिलात **जगन्नाथपंत** त्याच्याजवळ थोडंसं काम आहे माझं." असें ह्मणून तो उठला, **यशवंतरावाचें** लक्ष्य त्याजकडे होतेंच. तो खालीं गेला, परंतु **यशवंतराव** पहातो तों तो **जगन्नाथपंताकडे** न जातां दुसऱ्याच एक चमत्कारिक दिसणाऱ्या गृहस्थाजवळ बोलत उभा राहिला इतकेंच नव्हे पण तो त्या गृहस्थाला बरोबर घेऊन बाहेरही गेला. शेजारच्या बाक्सांत आतां कांहीं तरी गप्पा चालल्या होत्या. इतक्यांत दुसऱ्या अंकासाठीं पडदा उघडला. **परशुरामपंत** पुन्हां खालीं आंत आला. **यमुना** व **यशवंतराव** यांस **अनंतराव** केव्हां येतो याखेरीज कांहीं सुचेना. **यशवंतराव** इकडे तिकडे पहात होता. **यमुना** मुकाट्यानें खालीं पहात होती इतक्यांत **यशवंतरावाच्या** तोंडून एकदम "आला एकदांचा" असे शब्द बाहेर पडले. **यमुनेनें** वर पाहिलें. खरोखरीच **अनंतराव** थेटरांत आला व क्षणार्धांत इकडे तिकडे पाहून वरही आला. **यमुनेच्या** चेहऱ्यावर किंचित् टवटवी आली. **यशवंतरावही** समाधान पावलासें दिसलें. **अनंतराव** आला तो कांहीं एक न बोलतां आपल्या बहिणीच्या व **यशवंतरावाच्या** मधें बसला. जणूं काय आपण गेलों होतों यांत विशेष कांहींच नाहीं असें त्यास वाटत असावें असें दिसलें.

**यमुनाः**—चांगलीं बाबा तुझीं वीस पंचवीस मिनिटं ! तास दीड तास झाला तरी तुझा ठिकाण नाहीं. मीं ह्मटलं मुळीं परत येतो आहेस कां नाहीं कुणाला ठाऊक ?

**यशवंतरावही** हलकेंच त्याच्या कानांत ह्मणतोः—"तूं केव्हां येशील असं मला झालं होतं. या शेजारल्या बाक्सांतल्या मंडळींचा भारी त्रास झाला. तीं कोण तीं ओळखलींच असशील. तीं काय बोलत होतीं काय नाहीं तें तुला सांगेन मग. तीन वेळां माझ्या मनांत आलं जावं आतां घरीं ह्मणून. छे. फार उशीर केलास तूं यायला. आधीं जायचंच नव्हे.

" काय त्या मागल्या शनवारीं ब्यागेवर आणलेल्या गोंवेकरणी ?"

" हो. हो. त्यांच्याकडे मघाशीं तो **परशुरामपंत** आला होता, त्यानंतर काय जी त्यांची वडबड चालली होती, ती चालली होती. तें सगळं सांगेन मी तुला मग.

" तो **परशुरामपंत** ? काय असेल तें असो. त्या माणसाचा मला भारी राग यायला लागला आहे आतांशा. मी तुम्हांला सोडून जेव्हां गेलें तेव्हां तो बराच वेळ माझ्या जवळ जवळ असा हिंडत होता. पुन्हां मी आतां आलों तरी तसंच. दाराजवळ आपला तो पहातों तों उभाच. मला वाटतं आज दोन तीन दिवस मी जाईन तिथें तो असतो. मला तर दोन चारदां असं वाटलं कीं, तो माझ्या पाळथीवर आहे. काल दोन वेळां माझ्या मनांत त्याला चांगली तंबी द्यावी असं आलं होतं. उडवूं का एकदां जाऊन तिकडे. तो आहेच अजून तिथें.

" छत्. छत् इथें भलत्याच ठिकाणीं ? त्यांतून आपल्याबरोबर **यमुना** आहे."

" बरं इथें नाहीं तर नाहीं. पण उद्यां जर मला तो भेटला तर त्याचा चांगला कान पिरगाळीन. त्या दोघांचें हें बोलणें फारच हलकें झालें. शिवाय तिकडे स्टेजवर गाणें चाललें होतें. पेटीचा सूर मोठा धरला होता, यामुळें **यमुना** इतकी जवळ होती तिलाही कांहीं ऐकूं आलें नाहीं. **यमुनेचें** चित्त कांहीं नाटकाकडे लागेना. आतां येथून जावें असें तिच्या मनांत आलें तेव्हां ती हलकेंच **अनंतरावास** ह्मणते:--

" बरं आहे नाटक. मोठं मजेदार आहे. पण माझा जीव अगदीं उबला इथें बसून. शिवाय माझ्या डोळ्यांतून पाणी यायला लागलं आतां."

**अनंतरावानें** तिच्या मनांत काय होतें तें तेव्हांच ताडलें व तो तिला ह्मणाला " तुला कंटाळा आला असला तर माझा कांहीं आग्रह नाहीं तूं इथें बसच ह्मणून ! अन् तुझं आज मनच् लागत नाहीं असं दिसतं. अन् हेंग काय ? तोंड कां असं अगदीं उतरल्यासारखं झालं ! मी गेल्यापासून रडत होतीस वाटतं ? वेडी कुठली. आणखी मग आतां तूं मला सोडून जाशील तेव्हां !

" इश्श! हेंरे काय तुझं? रडूं कशाला मी! तुझं आपलं कांहींना कांहींच असतं! चला आतां ह्मणजे झालं. माझं कपाळच दुखायला लागलं या जाग्रणानं. पुन्हां एखाद दिवशीं येऊं आणखी. **यशवंतराव** तें ऐकून तात्रडतोब उठला. त्याला तेंच हवें होतें. तिघेंही उठलीं. **यशवंतराव** पुढें होता त्यानें पाहिलें तों ज्या मनुष्याशीं **परशुरामपंत** बोलत होता तो यांच्या बाक्साच्या दाराशीं उभा--! त्याला पहाण्याबरोबर तो माणून झटकन् एकीकडे झाला. **यशवंतरावाला** वाटलें कीं, हा मनुष्य मुद्दाम तेथें बसलेला असावा. कोणाची तरी तो पाळथ राखीत असावा. कोणाची बरें असावी? **अनंतरावाची** तर नसेल! पण कां बरं असावीं. छे! **अनंतरावाशीं** या संबंधानें नीटपणीं बोललें पाहिजे. त्याखेरीज उपयोग नाहीं. इत्यादि अनेक विचार **यशवंतरावाच्या** मनांत आले. थोड्याच वेळांत ते तिघेही बाहेर पडले. थिएटराच्या बाहेर पडले तों **यशवंतरावानें** तेथें उभ्या असणाऱ्या व्हिक्टोरिआंपैकीं एका व्हिक्टोरिएस त्यानें हांक मारली. व्हिक्टोरिआ जवळ आली. **यमुना** आंत चढून बसली. **यशवंतराव** तिच्या समोर बसला, **अनंतरावानें** आंत जाऊन **यमुनेच्या** शेजारीं बसण्याकरितां चढण्याच्या पायरीवर पाय दिला. इतक्यांत एक अनोळखी गृहस्थ त्याचेजवळ येऊन ' जरा कांहीं बोलावयाचें आहे, बाजूला याल तर मेहेरबानी होईल ' असें त्यास ह्मणाला. त्या गृहस्थास पाहून **अनंतरावास** फार आश्चर्य वाटलें; व त्यानें जावें कीं न जावें असा क्षणमात्र विचार केला. परंतु अशा सभ्य गृहस्थानें मोठ्या सभ्यपणानें केलेली विनंति मान्य न करणें हें बरें नव्हे; असें वाटून तो लागलींच थोडासा बाजूला झाला. त्यांचें त्यांचें जें बोलणें झालें तें फार थोडा वेळ झालें. तें बोलणें संपल्याबरोबर **अनंतराव** व्हिक्टोरिआजवळ आला, व **यमुनेकडे** वळून ह्मणतो " मघाशीं ज्या गृहस्थाची गांठ घ्यायची होती तो गृहस्थ येथें आला आहे असं समजतं आहे. त्याची गांठ घेणं जरूर आहे. कारण काम मोठं महत्वाचं आणखी निकडीचं आहे. मी जाऊन येतों जरासा. तूं जा **यशवंतरावाबरोबर.** " हे शब्द बोलतांना त्याचें चित्त जरा बावरल्यासारखें झालेलें दिसलें. त्याच्या डोळ्यांत कांहीं निराळेंच पाणी खेळूं लागलेंसें दिसलें; व या एकंदर चिन्हांवरून त्यास आतां क-

ळलेली बातमी आनंदाची असावी असें दिसून आलें. त्याचा चेहरा नेहमींपेक्षां जास्त सतेज दिसला. तो कांहीं वेळ थांबला. **यमुने**कडून कांहींच उत्तर येईना असें पाहून तो किंचित् हंसत हंसत ह्मणतो " काय **यमुनाबाई** रडायला लागला कीं काय ? भारी बाबा एखाद्या पोरीसोरीसारखी करतेस तूं ! अन् आतां लग्न झाल्यावर मी कुठला प्रत्येक वेळेला ? " "**यशवंतरावा**स हें बोलणें फार कडू लागलें. **यशवंतरावास अनंतरावा**नें केलेला कामाचा बहाणा मुळींच खरा वाटला नाहीं. व तो लागलींच ह्मणतोः—बरं आतां असं करा, आपण जाऊन या लवकर. आह्मी इथेंच वाट पहातों. " " छे. छे. भलतंच एखादं. मला परत यायला फार वेळ लागेल. आतां त्या **यमुने**ची कशी तरी समजूत घालून तिला घेऊन जा ह्मणजे झालं. " इतके शब्द बोलून **अनंतराव** चालताही झाला. ज्या गृहस्थानें त्यास कांहीं बातमी सांगितली होती तो पलीकडे उभाच होता त्याचेजवळ जाण्याबरोबर **अनंतराव** त्यास ह्मणतोः—" कुठें आहेत त्या ? "

" त्या स्टेजवर आहेत. त्यांना येण्याला फार उशीर झाला. बायकांची जागा तर अगदीं भरून गेली. एक दिखील बाक्स रिकामा राहिला नाहीं. ह्मणून म्यानेजरांनीं त्यांना स्टेजवर एका वुइंगांत जागा करून दिली आहे. तिथें पडद्याच्या आड बसल्या आहेत त्या. "

" पण मी इथें थेटरांत आलों आहें असं त्यांना कळलं कसं ? मीं तर कांहीं त्यांना पाहिलं नाहीं. त्या मुळीं आपल्या पाठीमागल्या बाजूनं जागा आहे का ह्मणून त्यांनीं निरोप पाठविल्याबरोबर म्यानेजर गाडीजवळ गेले व त्यांना घेऊन आले. आणखी स्टेजवर बसल्यावर मला वाटतं त्यांना आपण दिसलां असाल. आपण आपल्या बाक्सांतून उठायला लागल्याबरोबर त्यांनीं मला आपल्याकडे पाठवलं. आपल्या खाणाखुणा त्यांनीं बराबर सांगितल्यामुळं मलाही आपल्याला ओळखायला.पंचाईत नाहीं पडली. मी किर्लोस्करांच्या नाटकापैकींच एक आहें. एकदम आपल्याजवळ येऊन आपल्याशीं बोललों याबद्दल माफी मात्र असावी. त्यांतून आपण एकटे नव्हतां ह्मणून जरा—"

" अंः कांहीं हरकत नाहीं. माझ्या बरोबर माझी बहीण आणखी मेहुणा हीं होतीं. तेव्हां कांहीं हरकत नव्हती. " ' बरं तर आतां

इथें बोलत उभें रहाण्यापेक्षां चला या मागल्या बाजूनं. पुढून जरा गर्दी आहे !

असें ह्मणून ते दोघेही पाठी मागल्या बाजूस वळले व स्टेजवर जाण्याच्या मार्गानें आंत गेले. **अनंतराव** त्या गृहस्थाच्या मागोमाग चालला. स्टेजवर गेले तों तिथे थोडीशी गर्दी होती ह्मणून त्या गृहस्थानें **अनंतरावास** एका रंगाच्या खोलींत नेलें व तेथें बसविलें. ती खोली अगदीं रिकामी होती. फक्त तेथें एक दोन खुर्च्या व एक बांक आणून टाकलें होतें. **अनंतरावास** तेथें बसवून तो गृहस्थ ' मी त्यास वर्दी देऊन येतों.' असें ह्मणून चालता झाला. **अनंतरावाच्या** मनास या वेळीं कांहीं चमत्कारिक वाटलें असावें. बाहेरची मंडळी त्याजकडे टकमका पाहूं लागली. इतक्यांत त्या खोलीच्या दाराशीं एक पिंवळ्या टोपीचा काळ्या डगल्याचा आणि ज्याच्या कमरेला एक पट्टा असून ज्याच्या हातांत एक चाबूक आहे असा एक गृहस्थ चमकूं लागला. **अनंतराव** कांहीं विचार करीत आहे इतक्यांत प्रथम जो गृहस्थ त्याचे बरोबर आला होता तो आला व त्यानें **अनंतरावास** " अहो त्या खुर्चीवर बसूं नका बांकावर बसा ह्मणून सांगितलें." या वेळचा त्याचा आवाज सभ्यपणाचा मुळींच नव्हता. उलट थोडासा दरडावणीचा होता. **अनंतरावाचे** मनांतून त्याचा कान पिरगळून त्यास त्याच्या उद्धटपणाबद्दल प्रश्न विचारावा असें आलें, परंतु ही वेळ भांडण्याची नव्हे असें वाटून तो उगाच राहिला. इतक्यांत एक हवालदार व एक कानस्टेबल असे दोघे आंत आले. त्या गृहस्थानें दार लावून घेतलें. **अनंतराव** आपल्या जागेवरून उठला व दाराकडे जाऊं लागला. त्या हवालदारानें त्यास " समोरच्या बांकावर बसा ह्मणून सांगितलें. "

" काय ह्मणून मी इथें बसेन ? " **अनंतराव** संथपणें विचारतो " मी जो इथें आलों, हा कांहीं तुह्माला भेटायला नाहीं आलों. आमच्या यजमानीणबाई **झोटिंगाबाद**च्या राणीसाहेब मला बोलावताहेत असं मला सांगितल्यावरून मी इथें आलों आहें."

" आणखी त्या इथें आपल्याला भेटतील असं आपल्याला वाटलं?"

" असं जर मला वाटलं नसतं तर मी इथें आलोंच नसतों हें खास समजा."

" पण ती जीवंत नाहीं हें आपल्याला पक्कं ठाऊक आहे. "

" जिवंत नाहीं ! थट्टा आरंभली आहे कीं काय इथें ! "

"बरं तर" तो कॉनस्टेबल ह्मणतो " आपण कांहीं आपल्याला माहिती नाहीं असं दाखवणार असं दिसतं. पण आमच्या माणसानं आतां तुह्मांला जेव्हां **नबाबीण** बोलावताहेत असं सांगितलं तेव्हां तुमचा चेहेरा सपाट्यासरसा फिक्का कां पडला ? लागलींच आपण ताळ्यावर आलां, कारण जावं कीं न जावं असा विचार करायला आपल्याला थोडा वेळ लागला. न गेलं तर बरं नव्हे असं आपल्याला वाटून चुकलं. गेलों नाहीं तर आपण तिचा खून केला असं निमूटपणें कबूल केल्यासारखंच होणार. असा विचार झाला आपल्या मनांत. "

**अनंतरावानें** हें बोलणें ऐकून त्याच्या पोटांत एकदम धस्स झालें. पण तो ह्मणतोः—" तुह्मीं आधीं मला प्रश्न विचारणार कोण ? बोला. मी उत्तर देणार नाहीं. "

काय हा प्रश्न ! आह्मी कोण ह्मणजे ! आमचा पोषाखच सांगतों आह्मी कोण ते. मी कॉन्स्टेबल आहें. आणि तुझ्यावर त्या **झोटिंगाबादच्या** राणीचा खून केल्याचा चार्ज आहे. "

" काय पाजीपणाचा चार्ज हा ! "

" तर मग तूं नाकबूल करतोस गुन्हा ? बर तुझा तिचा कांहीं संबंध होता ही दिखील गोष्ट तूं नाकबूल करतोस ? "

" मी त्यांचा कारभारी होतों याच्या पलीकडे कांहीं नाहीं. "

" याद राख. एक नाहीं दोन नाहीं. यावेळीं वीस पंचवीस साक्षीदारांनिशीं सिद्ध करून दाखवितां येईल आह्मांला, कीं तुह्मी दो[illegible] गाड्यांतून हिंडायला जात होतां, काय पाहिजे तसं वागत होतां ह्मणून.'

' तुह्माला काय पाहिजे तें ह्मणा. पण मी त्यांच्या खानगी तैनातीची व्यवस्था पहात होतों एवढाच कायतो माझा आणखी त्यांचा संबंध

' बरं तूं ह्मणतोस तसं का होईना ! पण मला असं सांग आतां त[illegible] संबंध एकदम तुटला हा कसा ?

' तुटला ? निदान मला कांहीं ठाऊक नाहीं मी आतां त्यांचा क[illegible] रभारी नाहीं असं. '

" पण तीन् तूं आतांशा कुठें बाहेर जातांना दिसत नाहीं. तूं ति[illegible]

च्या बंगल्यावरही कधीं जात नाहींस. याचं कांहीं कारण असेल कीं नाहीं ? "

" याचं कारण काय असायचं आहे ? याचं कारण त्या मुंबईंत नाहींत. गांवाला गेल्या आहेत. त्यांना प्रवास करण्याची फार हौस असल्यामुळें त्या केव्हांच पाहिजे तेव्हां उठतात आणि जातात. "

" हं ! एकूण ती आतां प्रवासाला गेली आहे ! मोठाच प्रवास ह्मणायचा ! वर त्यांना जाऊन किती दिवस झाले कांहीं सांगाल ? मेहेरबानी करून सांगा.

" त्यांना मुंबई सोडल्याला जवळ जवळ आठ दिवस होऊन गेले असतील. "

त्यांतली खरी गोष्ट ही कीं, त्या गेल्या शनिवारीं रात्रीं नाहींशा झाल्या. त्या दिवशीं तुह्मी दोघें संध्याकाळीं हिंडायला गेलां होतां, आणखी पुढें आपण पुन्हां रात्रीं मी सांगायला कशाला पाहिजे ? एक नाहीं दोन नाहीं किती पाहिजे तेवढे साक्षीदार आहेत त्या गोष्टीला. नंतर काय झालं तेवढं मला सांगा. तुह्मी हिंडून परत गेल्यावर काय झालं ?

" त्यांना सोडून निघाल्यानंतर काय झालं हें मी काय सांगूं ! मला काय ठाऊक ? "

" ठाऊक नाहीं हाच आपला जबाब का ? "

" मी कांहीं एक जबाब देत नाहीं. तुमच्या कोणत्याही सवालाला उत्तर देण्याची आतां माझी इच्छा नाहीं. "

" हें पहा माफ करा. आतां उत्तर द्याल तर त्यांतच शहाणपणा आहे असं आपल्याला वाटेल. "

" त्या शनवारच्या रात्रीनंतर तुझी आणखी तुझ्या त्या राणीची गांठ पडली होती ? "

" नव्हती. " " बरं तिचं कांहीं पत्र तरी आलं होतं तुला ? "

हा कधींही कोणी करणार नाहीं असा प्रश्न ऐकून **अनंतराव** चपापल्यासारखा झाला व गोंधळला. त्यानें आपले डोळे खालीं केले, व लाजल्या सारखा झाला. लागलींच चित्तावर आला व तिरस्कारानें ह्मणतो " त्यांनीं मला पत्र लिहिलें आहे कीं नाहीं या गोष्टीशीं तुह्मा-

ला काय करायचें आहे ? ”

“ काय करायचें आहे ह्मणजे ? एवढें तुला समजत नाहीं ? त्या नाहींशा झाल्यानंतर त्यांचें तुला पत्र आलें होतें असें सिद्ध झालें कीं तूं गुन्ह्यांतून सुटलासच. ” **अनंतरावानें** पट्कन आपला हात खिशाकडे नेला तों तो कान्स्टेबल पुढें ह्मणतोः—पण त्या पत्रावर पोष्टाचा शिक्का आणखी तारीख पाहिजे. कारण जें काय तुला सिद्ध करायचें आहे तें हें कीं, शनवारच्या रात्रीनंतर **नबाबीण** जीवंत होती. ” **अनंतानें** कांहींच उत्तर दिलें नाहीं. तो पोलिस कामगार आणखी ह्मणतो “ तूं कांहीं उत्तर देत नाहींस यावरून असें दिसतें कीं, शनवारानंतर तुला कांहीं तिच्याकडून पत्र आलें नाहीं. तूं तिला सोडिल्यानंतर ती कोणीकडे गेली हें तुला ठाऊक नाहीं असं तूं ह्मणतोस; पण तूं कुठें गेलास आणखी काय केलंस हें तर तुला ठाऊक आहे कीं नाहीं ? का आह्मी त्याची आठवण देऊं ? बरं तर नंतर आपण व्याक्बेवर आपल्या स्नेह्यांबरोबर फराळ वगैरे केला. त्या ठिकाणीं तूं फार थोडा वेळ होतास. मग आपल्या स्नेह्यांबरोबर तेथून निघालास. त्यांपैकींच एक गृहस्थ जो तुझा मेहुणा होणार आहे तो तुझ्याबरोबर होता. ” हे सर्व शब्द ऐकून **अनंतराव** अगदीं संतापल्यासारखा झाला. “ ही एवढी बातमी पोलिसाला दिली कोणी ? **यशवंतरावानं** खास नव्हे. **जगन्नाथ** कुठें तरी बोलला असेल सहज. **कृष्णराव** असेल. नाहींतर त्या रांडा असतील. त्यांना गप्प बसण्याचं कांहीं कारणच नाहीं. त्यांनींच **परशुरामपंताला** सांगितलं असेल अन् तो आहे डिटेक्टिव्ह. ” असें तो आपल्या मनांत ह्मणाला इतक्यांत तो कानस्टेबल ह्मणतो ‘ पाहिलंस मला सर्व वित्तं बातमी आहे. तेव्हां मी विचारतों हें कांहीं उगीच नव्हे. मुकाट्यानं उत्तर दिलं तें बरं. ’

“ तुह्मांला वाटत असेल. पण मला नाहीं वाटत. तुह्मांला काय पाहिजे ते तर्क करा; आणखी मी उत्तर देत नाहीं यावरून काय अनुमानं बांधण्याचीं असतील तीं बांधा. ”

“ तूं सांगत नाहींस हें विशेषच ह्मणायचं. कारण या खुनाच्या चाजांतून सुटण्याला तुला फक्त एक यःकश्चित् गोष्ट सिद्ध केली पाहिजे आहे ती ही कीं, तूं संध्याकाळपासून दोन तीन वाजेपर्यंत कुठें होता,

स, नबाबीण आणि तूं इतक्या वेळांत मुळींच एका ठिकाणीं नव्हतां एवढें सिद्ध झालें कीं मग तूं सुटलास. व्यक्तेवर आपल्या स्नेह्यास भेटून फराळाला जाईपर्यंत होतास कुठें तें सिद्ध कर ह्मणजे झालें. नबाबणीचा खून रात्रीं दहा, अकरा, बारा यांच्या दरम्यान झाला ही गोष्ट सिद्ध आहे. पहा हट्ट करून कांहीं उपयोग नाहीं."

"बरं, तुह्मी ह्मणतां नबाबणीचा खून शनवारीं झाला. ही जर गोष्ट खरी तर मग मुंबईमध्यें बातमी कशी पसरली नाहीं? ती कांहीं लहान सहान नाहीं. तिचा नवरा आहे. चाकर लोक आहेत. तेव्हां त्यांच्यापैकीं एकाला देखील तिच्या मरणाबद्दल वार्ता नाहीं हें कसं?"

"कान्स्टेबल साहेबांनीं आपले ओंठ चावले. इतक्यांतच त्या पो- त्यांतील धडाविषयीं याचे जवळ बोलतां कामां नये. ही वेळ नव्हे. त्याचप्रमाणें नबाबणीच्या कोचमनला व त्या खाजदाराला धरून आ- णून त्यांची यांची दृष्टादृष्ट एव्हांशींच करतां कामां नये. त्या दोघां- वर अद्यापि फक्त पोलिसाची नजर मात्र ठेवली पाहिजे. त्याप्रमाणें ती आहेही. असा त्यांनीं आपल्या मनांत विचार केला, व मोठ्यानें ह्म- णतात "त्या सर्व गोष्टी तुला योग्य काळीं कळतील. परंतु मागल्या शनवारीं सारी रात्र तूं कशी आणखी कुठें घालवलीस हें मीच तुला सर्व कांहीं सांगतों ऐक."

"सांगा. सांगा पाहूं" अनंतराव उद्धटपणानें ह्मणतो.

"ती रात्र तूं गांवदेवीजवळ डामरगल्ली पलीकडे एका बंगल्यांत घालीवलीस. आज बरेच दिवसांपासून तूं हा सबंध बंगला भाड्यानें घे- तला आहेस. त्या बंगल्यांत जें इतकं मजेदार सामान आहे हें तूं स्व- तांच विकत घेऊन तिथें ठेवलंस?"

"अनंतरावास त्यांच्या त्या खोंचून बोलण्याचा गर्भितार्थ तेव्हांच कळून चुकला. असलें हें अपमानकारक विचारणें उगीच ऐकून घेऊं नये असें वाटून त्यानें लागलींच झटक्याचें उत्तर दिलें. "तर मग काय माझ्याकरितां कोणी स्त्रीनें तें घेऊन तिथें ठेविलें असं का आप- लं ह्मणणं?"

"आमचं ह्मणणं कांहीं एक नाहीं. आह्माला जें उत्तर पाहिजे होतं तें तूं देतोस कीं नाहीं हें पहाण्याकरितांच हा प्रश्न आह्मीं केला.

बरं. येवढं तरी बरं आहे कीं, तूं मी त्या बंगल्याचा भाडोत्री आहें एवढं कबूल करतोस. तूं आणखी ती **नबाबीण** दोघं मिळून शनवारीं गाडींत बसून हिंडायला गेला. नंतर हिंडणं झाल्यावर तुह्मी त्या बंगलींत गेलां. त्यानंतर **नबाबीण** बंगल्याच्या बाहेर मुळींच आली नाहीं."

"हें खोटं आहे. कारण त्यांनीं मला **आपालोबंदरा**च्या तिकडे सोडून त्या चालत्या झाल्या."

"आमच्या जवळ जो पुरावा आहे, त्यावरून आह्मांला असं ह्मणावं लागतं कीं, तुह्मी दोघं त्या बंगलींत गेलां व तेथें पुष्कळ वेळ होतां, **नबाबीण** कांहीं बाहेर त्यानंतर आली नाहीं."

"काय पुरावा आहे? साक्षीदार आहेत? साक्षीदार असं ह्मणत असले तर एक ते खोटं बोलत असतील किंवा आंधळे असतील."

"बरं तें कांहीं असो. पण तुला **आपालोबंदरावर** सोडून त्या गेल्या ह्मणतोस, मग तूं कुठें गेलास?"

"मला सोडून जाण्याबरोबर लागलींच त्यांचा मला निरोप आला कीं तूं घरीं निघून ये. ह्मणून मग मी त्यांच्या बंगल्यावर गेलों. आणखी त्यांचा शोध केला. तर त्या घरांत नव्हत्या. मग मला वाट पहात बसावं लागलं. बराच वेळ वाट पाहिल्यावर पुष्कळ वेळानं त्या आल्या. त्यांचं काय काम होतं तें त्यांनीं मला सांगितलं. आणखी मी निघालों. इतक्या एकंदर हकीकतीला बराच अवकाश लागला. मग मी ठ्याक्वेवरून हिंडत हिंडत घरीं चाललों होतों तों मला माझे स्नेही भेटले."

"सारी तुझी हकीकत ठीक आहे. पण इकडे पहा रात्रीं त्या जर गांवाला गेल्या, तर गेल्या तरी कुठल्या गाडीनं. रात्रीं अकरा बारा वाजतां एखादी गाडी कुठें जातेसं मला कांहीं ठाऊक नाहीं."

"मला दिखील ठाऊक नाहीं. पण तुह्मांला त्या गोष्टीबद्दल शोध हवाच असला तर त्या कोचमनला आणखी खाजदाराला विचारा ह्मणजे झालं. त्या गेल्या कुठें हें त्यांना ठाऊक असलंच पाहिजे."

"हंः हंः! असं काय? पण इकडे पहा, ते दोघे तुझे साथीदार असल्यामुळें मुळीं एक अवाक्षर देखील बोलणार नाहींत. तेव्हां त्यांना विचारून काय उपयोग."

" माझे साथीदार ! " **अनंतराव** रागानें ह्मणतो " तर मग काय, जी बाई अजून जीवंत आहे अशाबद्दल माझी खात्री आहे. त्या बाई-चा खून केल्याचा चार्ज अजून तुह्मी माझ्यावर लादतांच आहां ! बरं मीं जर खून केला तर तो कां आणखी कुठें हें मला सांगा पाहूं. "

" गांवदेवीकडल्या बंगल्यांत न्हाणी–घरांत तूं खून केलास.—पाठी-मागल्या बाजूला पत्रे घालून केलं आहे तें ! "

"तर मग काय तिचें प्रेत तुह्मांला त्या न्हाणी-घरांत सांपडलं ह्मणायचं?"

" छे. त्याबद्दल तूं फार चांगली काळजी घेतली आहेस. त्याचा मागमूस नाहीं अगदीं. "

" तर मग ती मेली आहे असं तुह्मी ह्मणतां याला पुरावा काय?"

" त्या न्हाणी–घरांत पुष्कळ माग सांपडला आहे. जिकडे तिकडे रक्ताचे डाग दिसताहेत. "

" हं ? तर मग ती जागा मला पाहिलीच पाहिजे जाऊन ! "

" तुला नेऊन दाखवूंच एकदां. त्याखेरीज कसं होईल ? "

" पण तिचा प्राण घेण्यांत माझा हेतु असेल तरी काय ? हें कांहीं सांगाल मला ? माझान् तिचा कांहीं प्रेमभाव होता असं जर तुह्मी ह्मणतां तर मग मी तिला मारीन कसा? "

" हें पहा, आपल्या प्रेम–पात्राविषयीं संशय येऊन खून झाल्याचा हा कांहीं पहिलाच प्रसंग नाहीं. पण तूं केलेल्या कृत्यांत तुझा हेतु काय आहे हें काढण्याचं आमचं काम नाहीं. बरं, **नबाबीण** गेल्या-नंतर तूं तिथें कशाला गेला होतास हें सांगशील ? गेल्या शनवारपा-सून तूं रोज संध्याकाळीं तिथें जातोस यांत तर कांहीं शंका नाहीं. अगदीं प्रत्यहीं तिथें जाण्याचा तुझा नेम आहे. "

" ही मात्र बातमी तुह्मांला खरी लागली आहे. परंतु एवढ्यावरून मीं खून केला हें कसं सिद्ध होतं हें मात्र मला कळत नाहीं. ज्या घ-रांत मीं आपल्या हातानं खून केला, त्याच घरांत मी पुन्हां पाय ठेवीन कसा ? याचा कांहीं विचार ! मी कांहीं नेहमीं—"

" तूं निरपराधी ठरावास आणखी हा भलताच आळ तुझ्यावर आ-ला आहे तो जावा हीच माझी इच्छा आहे. बोल तर मग तूं तिथें क-शाला जात होतास ? "

" मी तिथें कशाला जात होतों याचं उत्तर तुह्मांला पाहिजे आहे? ऐका तर मग. नवाबणीचें कांहीं मला पत्र बित्र तिथं मिळेल या आशेनं मी तिथें जात असें. त्या अशा पुष्कळदां पाहिजे तेव्हां जातात. आणखी त्यांचं आमचं असं ठरलेलं आहे कीं, अशा जर त्या गेल्या तर त्यांनीं आपल्या लवंडीच्या हातून पत्र त्या बंगल्यांत आणून ठेवावें. आणखी मग मीं तें तिथून घेऊन वाचावं. त्या लवंडीवर त्यांचा अतोनात विश्वास आहे. ती लवंडी पत्र घेऊन येते आणखी तिथें आलिमन्याच्या खणाविणांत ठेवते. "

" वा ! विलक्षणच पद्धति पत्र पोंचवायची. पोष्टांतून पाठवलं असतं तर ! "

" नवाबीण मुसलमानीण तिला तिची आपली जुनी पद्धतीच बरी वाटते. "

" बरं. आणखी ती गेल्यापासून तुला एक वेळां दिखील तिच्याकडून आलेलं पत्र मिळालं नाहीं ? ठीक आहे. उत्तर तर मोठं युक्तीबाज आहे खरं." त्या कान्स्टेबलानें उत्तर केलें; आणि हें उत्तर देतांना त्यानें मानेला जो हिसका दिला हा मोठा पहण्याजोगा होता. नंतर जणूं काय सहाजिकपणेंच असें तो ह्मणतो. " बरं तर तूं तिथें रोज संध्याकाळीं जात असस आणखी आजहीं गेला होतास याबद्दल आतां कांहीं मला नवल वाटत नाहीं. तूं ह्मणतोस तें अगदीं बरोबर आहे."

" मी आजही गेलों होतों हें तुह्मांला कसं कळलं ? " **अनंतराव** झट्कन् विचारतो.

" हेंचसं काय, आह्माला आणखी दिखील पुष्कळ गोष्टी माहित आहेत. उदाहरणार्थ आपल्या बहिणीला नाटक गृहांत घेऊन येऊन तिला एकटीला वर बसवून तूं आतां इतक्यांत येतों ह्मणून गेलास तो पत्र शोधण्याकरितांच तिथें गेलास. पत्र कांहीं तुला सापडलं नाहीं. पण आणखी कांहीं तरी सांपडून तें तुझ्याजवळ आहे हेंही आह्मांला माहित आहे. "

" काय ? तुह्मी ह्मणतां तरी काय ? **अनंतराव** अगदीं गोंधळून जाऊन ह्मणाला. "

" आह्मी असं ह्मणतों कीं, एक प्रकारची लहान पेटी मोठी उप-

योगाची असते. मोठमोठ्या किंमतवान् जिनसा देखील त्यांत लपवून ठेवायला येतात. त्यांत चांगले चांगले चोरखण असतात. "

" असतील अशा पेट्या. मला तर कांहीं ठाऊक नाहींत. "

" असं आहे का ? मला वाटलं कीं तुला सगळी कांहीं माहिती आहे. बरं तुझ्या खिशांत एकंदर काय काय आहे तें आम्हांला दाखव पाहूं. कां ! आतां मी काय म्हणतों तें आलं असेल आपल्या लक्ष्यांत ? " अनंतरावाचा चेहरा अगदीं उतरून गेला. परंतु त्याच्या तोंडून एक शब्दही निघाला नाहीं. "

" मग काय आपण उत्तर देत नाहीं म्हणायचें ? कान्स्टेबल साहेब म्हणतात. " कदाचित् मला ज्या ज्या कांहीं गोष्टी माहित आहेत त्या त्या सांगितल्या म्हणजे तूं देशील उत्तर. तूं आज मघाशीं त्या बंगलींत गेलास तिथें गेल्यावर रोजच्याप्रमाणें खण वगैरे उघडून पाहिलेस; पण आज एका लहानशा पेटीचा नवाच एक खण उघडून पाहिलास; आणखी त्यांतून कांहीं नोटी काढून घेतल्यास. तूं त्या मोजून पाहिल्यास, आणखी आपल्या खिशांत घातल्यास. अन् मग लागलींच त्या घराच्या बाहेर पडलास. "

" तुम्ही तिथेंच माझ्यावर नजर ठेवून होतां वाटतं तर मग ? "

" कोणी तरी तुला हें करतांना पाहिलं हें खास. मला माहिती आहे ती एवढीच आहे. आतां कांहां तुला नाकबूल जातां येणार नाहीं. कारण नोटी तुझ्याजवळ आतां आहेत. आणखी त्या कांहीं तुझ्या नाहींत. असं आम्हाला वाटतं. "

" नाहींत. माझ्या नाहींत. नबाबणीच्या आहेत असं मला वाटतं. ती इतकी श्रीमंत आहे कीं चार पांच हजारांच्या नोटी कुठेंही विसरून गेली तर तिला कांहीं त्याची दाद लागत नाहीं. केव्हां एखादवेळ त्या खणांत ठेवल्या असल्या तर त्यांना कांहीं आठवण नसेल !"

" एकून तिनं त्या नोटी त्या खणांत लपवून ठेवल्या असं तुझं म्हणणं ? बरं इतक्या खोलांत त्या नोटी घालून ठेवण्याचं कारण काय असावं ? "

"कारण? आतां त्यांचं काय कारण असेल तें मला काय ठाऊक?"

" बरं त्यांनीं त्या नोटी तिथें केव्हां ठेवल्या असाव्या ? "

" तें मला काय ठाऊक ? "

" शनवारपासून तर त्या कांहीं नसाव्यात. कारण नबाबीण शनवारीं रात्रीं मुंबई सोडून गेली असं तुझ्या सांगण्यांत आलं. "

" होय. शनवारच्या पूर्वी त्या नोटी तिथें ठेवल्या असाव्या. केव्हांही जरी ठेवल्या असल्या, तरी मला कांहीं ठाऊन नव्हतं. अशा नोटी मी ठेवणार आहें असं जर त्यांनीं मला सांगितलं असतं तर एवढ्या या रिकाम्या घरांत एवढी थोरली रक्कम मुळींच ठेवूं नका ह्मणून मीं सांगितलं असतं. मला आज अवचित् ती रक्कम दिसली. सहज पेटी चापसतां चापसतां खिळ्यासारखं कांहीं लागलं तें दाबून पाह्यलं तर पट्कन् खण दिसला. "

" मग तुला मोठं आश्चर्य वाटलं असेल नाहीं ?" कान्स्टेबल टोंचून व्याजोक्तीनें बोलतो.

" मला इतकं आश्चर्य वाटलं कीं, मी स्वप्नांत आहें. हें खरं दिसतं आहे हें कांहीं खरं नाहीं असं मला वाटलं. "

" असेल. साहजिक आहे. पण त्या नोटी तुझ्या नव्हत्या, तर तूं त्या काढून कां बरं घेतल्यास ? "

" तसं करण्याला मीं पुष्कळ आढेवेढे घेतले, पण शेवटीं मला असं वाटलं कीं, ही रक्कम त्या बंगल्यांत राहूं देणं सुरक्षित नव्हे. दुसरं मला असं वाटलं कीं, **नबाबीण** कांहीं आतां ती रक्कम न्यायला त्या बंगल्यांत येणार नाहीं. "

" असं का बरं वाटलं ? असं वाटण्याचं कारण काय ? "

" मी आतां आपल्याला अगदीं मोकळेपणीं सांगतों, कीं त्यांचंन् माझं जंगी भांडण झालं. ह्मणूनच गेल्या आठवड्यांत त्यांचेकडून मला पत्र नाहीं. मी हा पैसा त्यांचा त्यांना परत करणार होतों. "

" ज्या पेटींत त्या नोटी होत्या ती पेटीच वास्तविक तिची तिला पाठविणं हें चांगलं होतं. "

" माझ्या मनांत तेंच होतं. पण तसं करणं थोडं अडचणीचं होतं. शिवाय त्याला वेळ लागला असता. अन् मला तर हा पैसा त्या बंगल्यांत तसाच राहूं द्यावा आणखी कांहीं वेळ असं वाटेना, चोरी बिरी झाली तर करा काय ? "

" बरं मला या सगळ्या गोष्टींबद्दल काय वाटतं तें मी तुला सांगतों. शनवारीं दोन प्रहरीं कोर्टांतून पांच हजार रुपये घेऊन तूं तिला नेऊन द्यायला तिच्या बंगल्यावर गेलास."

" होय. तुह्मी ह्मणतां तें खरं आहे. अन् ते रुपये मीं त्यांच्या जवळ नेऊन दिले देखील."

" होय. तेच रुपये—नोटी ह्मण—तिनं त्या वेळीं आपले खिशा-बिशांत घातले असतील. पुढें तिचा जेव्हां तूं खून केलास तेव्हां मग शोधाअंतीं तुला त्या नोटी दिसल्या. त्या तूं घेऊन तिथेंच ठेवल्यास. नजाणों आपल्या घरीं ठेवल्या आणखी घराचा झाडा बिडा घेतला पोलिसानं तर त्यांत सांपडल्या ह्मणजे पंचाईत ! पण तुला चैन तर कांहीं पडत नसे. ह्मणून रोजच्यारोज आपल्या नोटा सुरक्षित आहेत कीं नाहीं हें पहायला तूं जात असस. चांगला एक आठवडा गेला. कुठें कांहीं गडबड नाहीं. वर्तमान पत्रांत कांहीं बोभाटा नाहीं. व बाबालाही कांहीं बातमी नाहीं असं जेव्हां तुला दिसलं तेव्हां आतां त्या नोटी न्यायला कांहीं हरकत नाहीं असा विचार करून तूं त्या आज काढल्यास. रात्रींची वेळ. कोणाला कळणार नाहीं असं वाटून तूं आपल्या मतानं मोठी शिताफी केलीस. पण तुझ्यावर पोलिसाची नजर आहे हें तुला मुळींच कळलं नाहीं. आज आठ दिवस तुझ्यावर पोलिसची नजर आहे हें तुला कळलं नाहीं ह्मणूनच असा सांपळ्यांत अडकून आमच्या हातीं सांपडलास. कितीं जरी झालं तरी मनुष्याची सगळीकडे सारखी दृष्टि रहात नाहीं."

" हं ! " **अनंतराव** निराश होऊन हळूंच ह्मणतो "नुसत्या खुनाचा चार्ज ठेवून पुरे झालं नाहीं. तुह्मी आणखी माझ्यावर चोरीचाही चार्ज ठेवतां आहां तर मग ? "

" आह्मी असं ह्मणत नाहीं कीं खून केला हा चोरीच्या उद्देशानं केला ह्मणून, पण खून झाल्यावर मग त्याचा परिणाम चोरी करण्यांत झाला. चल कबूल कर ह्मणजे झालं. तूं तिच्याजवळ संध्याकाळीं रुपये दिलेस मग तुह्मी दोघं हिंडायला गेलां. असं जर आहे तर मग तिनं रुपये ठेवले केव्हां तिथें ? कांहीं रुपये ठेवण्याकरितां मुद्दाम तिथें गेली होती ती ! "

" मला आपॉलो बंदरावर सोडून गेल्या असतील त्या. अगर रात्रीं केव्हां तिथें गेल्या असतील. तेव्हां ठेवल्या असतील नोटा तिथें. "

" तुझ्याच ह्मणण्याप्रमाणें कां होईना ! जर त्यांना तिथेंच जायचं तर तुला सोडून कां त्या गेल्या ? कांहीं तुला न कळत का रुपये ठेवायचे होते तिथें त्यांच्या मनांत ? "

" आतां हें काय मला ठाऊक ? मग केव्हां तरी त्या सहज तिथें गेल्या असतील तेव्हां आठवण होऊन ठेवल्या असतील. "

" तें कांहीं नाहीं. तूं जी जुळवाजुळवी करतो आहेस ती कांहीं ठीकसेठाक दिसत नाहीं. "

**अनंतरावा**च्या मनांत ही जबानी सुरू झाल्यापासून सर्व प्रकारचे विकार एक एक वेळां होऊन गेले—गोंधळणं, राग, निराशा. इत्यादि. आणि आतां तर त्याला अगदीं फारच वाईट वाटलें. अपमान सहन होईना. तेव्हां त्यानें मोठ्या शांतपणें ह्मटलें.

" अहो तुमच्या मनाचा निश्चय झाला आहे असं दिसतं. आतां मी एकही प्रश्नाला उत्तर देणार नाहीं. हं पाहिजे असेल तर पकडा मला. ज्याला कर नाहीं त्याला डर पाहिजे कशाला ? "

कान्स्टेबल उत्तर करतो " नाइलाजास्तव मला तसं करावं लागतं आहे खरं. परंतु माझ्याकडून होईल तितकं करून तुला सुख देईन. आतांपर्यंत तुझ्या चरित्राची जी आह्मीं माहिती मिळवली आहे तिच्यावरून तुला दोष देण्याला यत्किंचित्‌ही जागा नाहीं. इथल्या लोकांत कांहीं बभ्रा होऊं नये ह्मणून आपण इथून मोठ्या थाटानें—जणूं काय ओळखीचेच—असे बाहेर पडूं. तूं आणखी आमचे दोघे लोक व्हिक्टोरिएंत बसून ते नेतील तिकडे जा. मी दुसरीकडे जाणार आहें. मात्र तुझी मनीव्याग आणखी त्या नोटी मात्र मजजवळ दे. त्या जिनसा तुझ्या ताब्यांत मला ठेवतां कामा नयेत आतां. चल तुला आह्मीं पकडला आहे असं कोणाला कळूं देखील देणार नाहीं. "

" कां ? हा पैसा कां माझ्यापासून घेणार ? मी लांच बीच देऊन तुमच्या लोकांना फितवीन ह्मणून होय ! नको. ती नको भीति तुह्मांला मी सुटून जाण्याचा यत्न कधीं करणार नाहीं. हें घ्या काय आहे तें त्यानें नोटी व आपली मनीव्याग झट्‌कन्‌ टाकली. कान्स्टेबलानें घेऊ

आपल्याजवळ ठेवली. ह्मटल्याप्रमाणें दोघेही कांहीं तरी निराळेच बोलत बोलत—जणूं काय स्नेहीच—बाहेर पडले. बाहेर पुष्कळशा व्हिक्टोरिआ व इतर गाड्या होत्या. त्यांत एक व्हिक्टोरिआ होती तिजवळ साधा पोषाख केलेले पोलिसचे लोक होते. कान्स्टेबल **अनंतरावास** घेऊन त्या व्हिक्टोरिएपाशीं गेला. इतक्यांत **यशवंतराव** त्याच्या दृष्टीस पडला. तो **अनंतरावास** पाहून त्याजकडेच येत होता. " सांपडलास बाबा एकदांचा " **यशवंतराव** ह्मणतो.

" पण फार वेळ नाहीं कांहीं मला उभं राहायचं इथें " **अनंतराव** उत्तर करतो " मी पोलिसच्या ताब्यांत आहें. "

" पोलिसच्या ताब्यांत ! " " होय. आणखी खून आणखी चोरीचा आरोप ! इतकंच का येतें ! मोठी विलक्षण गोष्ट नाहीं ? यमुना कुठें आहे ? "

" इथेंच आहे त्या व्हिक्टोरिएंत. ती येईना एकटी घरीं—आणखी आतां हें ऐकल्यावर. "

" **यशवंतराव,** आतां तिला काय पाहिजे तें सांग. मी खरोखर कोणच्या स्थितींत आहें तें सांग किंवा कांहीं गोष्ट बनवून सांग. पण मी सुटून येईपर्यंत तिला तुझ्या स्वाधीन केली आहे. संभाळ तिला. मी सुटेन लवकरच. **यशवंतराव** कांहीं बोलूं लागला पण **अनंतराव** ह्मणतो:—" पुरे. पुरे आतां. नाहींतर तो पोलिस माणूस ह्मणेल हे खलबत करून मी निसटून जायला पहातों आहें. पोलिसची काय चुकी आहे ती आतां उमगून येऊन या प्रसंगांतून मी मोकळा होईन. जा. "

नंतर **अनंतराव** त्या कान्स्टेबलास ह्मणतो. " चला महाराज, माझ्याकडून तयारी आहे. तो कान्स्टेबल बिचारा स्तब्धपणें या दोघांचें बोलणें ऐकत होता. त्याच्यानें एक शब्दही बोलवला नाहीं. **यशवंतराव** तर नुसता घाबरून गेला. आपण कांहीं गडबड केली तरी ती निरर्थक होणार हें त्यास पक्केपणीं ठाऊक होतें; व तितक्यांत बिचारी **यमुना** काळजीनें नुसती होरपळत आहे हेंही त्याच्या लक्ष्यांत आलें. **अनंतराव** व्हिक्टोरिएंत बसण्याबरोबर तो तेथून **यमुनेकडे** गेला. "

**यमुना** तिकडे रडते आहे काय किंवा नाहीं काय, त्या कान्स्टेबलला त्याची काय मोठीशी काळजी ! **यशवंतरावानें** तिच्या भावावर

आलेला प्रसंग तिला सांगून दिल्यावर तिच्या मनाची स्थिति काय झाली असेल हें तो पहातो आहे कशाला? **अनंतरावास** घेऊन ते पोलिसचे लोक जाण्याबरोबर कान्स्टेबल साहेबही एका व्हिक्टोरिएंत बसून ज्या घरांत तो खून झाला होता त्या घरांत शेरीच्या दारानें आला. कारण पुढील दारास कुलूप होतें. **परशुरामपंत** अजूनही मागील दारानेंच येई. कारण आपण इथें येतों हें गल्लींतील लोकांस कळूं नये अशी त्याची खबरदारी होती. **परशुरामपंतानें** मी आपली तेथें वाट पहातों ह्मणून निरोप तर पाठविला होता. तेव्हां हांका मारून गडबड करण्यापेक्षां आपणही शेरीच्या दारानेंच जावें हें बरें असें आमच्या कान्स्टेबल साहेबांस वाटलें. **परशुरापंत** तेथें नुकतेंच न्हाणी-घर बंद करून पाठीमागल्या ओटीवर वाटच पहात होता. त्यास कान्स्टेबल ह्मणतो. "धरला बोआ त्याला. झालं एकदांचं."

**परशुरामपंत** मोठ्या तोऱ्यानें ह्मणतो "तर मग आमचा डाव साधला ह्मणायचा? मला वाटलंच तें तो सांपडणार ह्मणून."

"पण त्याचं जबानीच्या वेळीं जें एकंदर वर्तन पाहिलं त्यावरून माझं मन फार संशयित झालं आहे. तें इतकं कीं, तो आला त्या वेळीं **नबाबीण** खरोखरीच आपल्याला भेटणार असं त्यास वाटून आला असावा असं मला वाटतं."

"काय!" **परशुरामपंत** मोठ्यानें ओरडून विचारतो "पण त्याच्याजवळ त्या पांच हजारांच्या नोटी सांपडल्यावर देखील संशय!"

"नाहीं नोटी सांपडल्या. त्या आतां माझ्या स्वाधीन आहेत. त्यावरून त्यानं चोरी केली असं तर होतंच. पण तो थेटरांतून बाहेर पडल्याबरोबर ज्या माणसाला त्याच्याकडे पाठविला होता त्यानें **नबाबीण**बाई तुह्मांला बोलावताहेत असं सांगण्याबरोबर तो कांहीं गोंधळला नाहीं, दचकला नाहीं, कांहीं नाहीं. उलट संथपणानें ह्मणाला. चला आलों. पण माझ्याबरोबर मंडळी आहेत त्यांना कांहीं सांगून येतों."

"मी तुह्मांला आधींच सांगितलं नव्हतं तो फार वस्ताद आहे ह्मणून! त्याला पक्कं ठाऊक कीं आतां आपण येत नाहीं ह्मटलं तर गुन्हा कबूल केल्यासारखंच होईल. बरं पण तुमचा सवाल-जबाब कसा काय झाला."

" प्रथम त्यानं कांहींएक गोष्ट कबूल केली नाहीं. पण आह्मीं जेव्हां आह्मांला बरीच माहिती आहे असं दाखवलं तेव्हां ही बंगली मीच भाड्यानं घेतली आहे, असं कबूल केलं. नंतर मीं जेव्हां त्याच्यावर खुनाचा चार्ज आहे ह्मणून सांगितलं, तेव्हां इतकं मनापासून आणखी अगदीं स्वाभाविक तऱ्हेनं, त्यानं आपल्यावर हा चार्ज नाहक येतो आहे असं दाखवलं, कीं मी मोठा गुढांत पडून राहिलों. "

" वा ! मोठा जबरदस्त सोंगाड्या ह्मणायचा. दुसरं काय ! बरं खण कां शोधीत असें ह्मणून त्यानं सांगितलं ? "

" त्याबद्दल तो ह्मणतो कीं, नबाबणीनं कांहीं पत्र पाठवलं असलं तर पहावं ह्मणून शोधीत असें. ती आपल्या लवंडीबरोबर पाठवून खणांत ठेवीत असे. "

" हेः त्यांत कांहीं अर्थच नाहीं त्याच्या बोलण्यांत. बरं आह्मीं इथें ठेवलेल्या माणसानं, त्या पांच हजारांच्या नोटी खिशांत घालतांना पाहिलं त्याबद्दल काय तो ह्मणाला ? "

" त्याबद्दल ह्मणाला कीं मला कांहीं ह्या नोटी इथें आहेत हें ठाऊक नव्हतं. त्या अगदीं सहजगत्या मला दिसल्या. नीट सुरक्षित रहाव्या ह्मणून मीं आपल्या खिशांत घातल्या. "

" छेः ! छेः ! अगदींच वाईट. जर नबाबणीनं इथें त्या लपवून ठेवल्या होत्या तर याला हात लावायचं कांहींच कारण नव्हतं. खून केल्यानंतर आपणच तिथें ठेवल्या. आज रात्रीं तिथून काढून नेल्या. इतका पुरावा असल्यावर कोणची पाहिजे ती जुरी त्याला आरोपी ठरवील. हें पहा, माझ्या हातून शोध करण्यांत चुका होत नाहींत असं नाहीं. पण क्वचित् होतात एवढं खरं. " हें वाक्य बोलतांना परशुरामपंत खोटा विनय दाखवीत आहे असें तेव्हांच दिसलें. तो पुढें ह्मणतोः—" हा खून बाहेर आला तेव्हां याचा कांहीं पत्ता लागणार नाहीं असं आपले लोक ह्मणत होते. मीं दहा दिवसांची मुदत मागून घेतली. मुदतीच्या आंत पत्ता लावून खुनी माणूस तुमच्या स्वाधीन केला. "

" त्यांतला अर्थ इतकाच कीं, ज्याच्यावर पुष्कळ संशय घ्यायला जागा आहे, असा एक माणूस आह्मीं धरला आहे. खात्रीनं कांहीं त्या-

च्यावर गुन्हा लागू होत नाहीं."

"हें पहा, चौकशी होऊन जाईपर्यंत कांहींच खात्री सांगतां येणार नाहीं. पण मीं पैजेनिशीं सांगतों कीं, माजिस्त्रेटापुढें खटलं जाण्याच्या आंत **अनंतराव** कबुली देईल. त्याखेरीज त्याला दुसरा मार्गच नाहीं."

"असं व्हावं अशी माझी फार इच्छा आहे. पण सध्यां तर कांहीं तसा प्रकार दिसत नाहीं. दुसरं आणखी असं आहे कीं, त्या **नबाबणी**चं डोकं सांपडेपर्यंत कधींच पक्का गुन्हा लागूं होणार नाहीं. कैदी तर्फे वकील ह्मणेल हें धड **नबाबणी**चंच कशावरून? दुसऱ्या कोणा बाईचं असेल. अन् मुंडकं सांपडेलसं तर वाटत नाहीं."

"अं: तें नको बोलायला. त्यानं त्या मुंडक्याचा नायनाट जरी केला असला तरी दिखील आपण **अनंता**वर गुन्हा शाबीत करून देऊं. आपल्याला हें ठाऊक आहे कीं, खून याच बंगल्यांत झाला. ज्या गृहस्थानं इथें पांच हजार रुपये चोरून लपवून ठवले आणखी ते सुरक्षित आहेत कीं नाहींत हें पहाण्याकरितां जो रोज इथें येत असे त्याला आपण पकडला आहे. आह्मीं त्यानं तो पैसा इथून नेला हें पाहिलं आहे.'. तसंच शनवारीं रात्रीं—"

"हें सारं खरं आहे. पण एवढा पुरावा कांहीं बस्स होणार नाहीं. नबाबणीविषयीं आह्मांला ती नाहींशी झाल्या दिवशीं माहिती होती तितकीच आज आहे. नबाब आणखी तिचे चाकर लोक काय समजताहेत हें कांहीं कळलं नाहीं."

"हें पहा. मी रोज दोन तास त्या नबाबाबरोबर खेळायला जातों आणखी माझा चाकर दमाजी त्याच्या इथें नोकरीलाच राहिला आहे. त्यामुळं धन्यांवर आणखी चाकरांवर दोघांवरही चांगली नजर ठेवायला सांपडतं."

"बरं. मग आणखी काय बातमी लागली आपल्याला?"

"**नबाबा**ला असं वाटतं आहे कीं आपली बायको तिच्या माहेरीं कुठें गेली आहे. चाकरमाणसं असंच आपलं मत आहे असं दाखवताहेत. पण तो कोचमन सिद्दी आणखी खाजदार या दोघांना खरें. काय तें ठाऊक आहे. कोचमनानं गाडी हाकली, खाजदारानं तें पोतं

पाठीवर घेऊन समुद्रावर नेलं. या दोघांनीं **अनंतरावाला** खुनाच्या कामांत मदत केली. ती कांहीं उगीच नव्हे. आतां त्यांच्याजवळ रगड पैसा घोळतो आहे. आणखी मला असा संशय येतो कीं, त्या लवंडीनं देखील यांना मदत केली असावी. आपल्या यजमानणीप्रमाणें तीही नाहींशी झाली आहे. हें सारं कृत्य झाल्यावर ती बहुतेक कुठें तरी पळून गेली असावी. "

" पण हे आपले नुसते संशय, नुसत्या चुली पासल्या गप्पा आहेत."

" जरा मेहेरबानी करून पुढें तर ऐकाल. **दमाजीला** मुसलमानी चांगलं येतं हें कांहीं त्या दोघां हरामखोरांना ठाऊक नाहीं. हा एक दिवस निजल्याचं सोंग घेऊन पडला असतांना ते आपल्या आपल्यांत बोलत असतां खाजदार ह्मणतो:—" कां ते दिवशींची कशी मजा ! खूप शर्तीनं सुटलों. हें या इथें कमरेला लागलेलं अजून बरं होईना ! समुद्रावरले दगड ते ! आणखी पाठीवर ओझं. "

" वा ! अगदीं कबूल जबाबासारखेच. शब्द ! पण त्यांना विचारलं तर ते कांहीं कबूल करणार नाहींत असं आह्मीं बोललों होतों ह्मणून, पण इतर प्रमाणं सांपडतील ह्मणा. पण इकडे पहा. आतां त्या दोघांना पकडलं पाहिजे असं माझ्याप्रमाणें आपल्यालाही वाटत असेल. आपल्या खात्यांत ज्याला ह्मणून या खटल्याची माहिती आहे तो तो आश्चर्य करतो आहे कीं अजून कसं नाहीं यांना पकडलं ? "

**परशुरामपंत** ह्मणतो:—" मला वाटतं आणखी कांहीं वेळ वाट पहावी तें बरं. कारण हा खटला आहे विलक्षण. यांत माझ्या साक्षीवांचून होणार नाहीं. आणखी मला एकदां तुह्मीं साक्षीला उभा केलात ह्मणजे पुन्हां मला याच चाकरीवर रहातां येणार नाहीं. शिवाय या खटल्यांत देखील मला गुप्तपणानं शोध करतां येणार नाहीं. **अनंतरावाच्या** स्नेह्यांना मी डिटेक्टिव्ह आहें असं कळलं कीं, सर्वच ग्रंथ आटपला. शिवाय **नबाबाकडे** जो मी जातों हा मुसलमानी पोषाख करून जातों. तो मला मी हैद्राबादेकडला आहें असं समजतो आहे. तिकडूनय् बंदी होईल. **दमाजीला** यःपलाय करायला वेळ झाला पाहिजे. त्याची साक्ष कोर्टांत होतां कामा नये. तो डिटेक्टिव्ह सर्व्हिसमध्ये फार उपयोगीं आहे. माझं काय ! मी आतां पेन्शन घेऊन जाईन.

पोलिसपैकीं एक दोघांनाच मी ठाऊक आहें. त्यांच्यावर माझा विश्वास आहे, ते कुठें बोलणार नाहींत. इथें एक होता त्याला मीं पाठवून दिला. आतां या घरावर नजर ठेवण्याची जरूर नाहीं. कारण गुन्हेगार पकडलाच. ”

“ उद्यां आतां मी साऱ्या घरादाराला कपाटा तिपाटांना कुलपं लावून शिक्का मोर्तब करून जाईन. गल्लींतल्या पोलिसाला नजर ठेवायला सांगेन. ”

“ बस्. एवढं झालं ह्मणजे पुरे. आतांपर्यंत तर आपलं मत माझ्याशीं जुळतं आहे. आणखी झालं एवढ्यांत बरीच आपल्याला सिद्धि आली ह्मणायची. मी आज गेटी थेटरांत गेलों तों अगदीं अवचित गेलों. तिथें **अनंत** व त्याची बहीण यांना जेव्हां पाहिलं तेव्हां काय असेल तें असो मला आपलं वाटलं कीं, आज या खटल्याचा शेवट लागणार. थेटरापाशीं येण्याबरोबर **अनंतराव** चालता झाला. तो इकडेच येणार आहे हें मला ठाऊक होतं. ह्मणून आपलेकडे निरोप पाठवून आपल्यास बोलावलं. आपणही मेहेरबानी करून ताबडतोब आलां. **अनंतरावाला** ज्यानं नोटी काढून घेतांना पाहिलं त्याचा तितक्यांत निरोप आला कीं आज त्यानं नोटी घेतल्या. इतक्यांत **अनंतही** थेटरांत परत आला. पुढें जें काय करावं असं मला वाटलं तें आपल्याला कळवलं. आपल्याला तें मानवलं. आपल्या माणसाला मीं दुरून **अनंतराव** दाखविला. आणखी काय होतं तें ऐकण्यासाठीं इकडे येऊन बसलों. ह्मटलं आसपास कुठें नको. शिवाय जिथले फरशीचे धोंडे काढले होते तिथें कांहीं मुंडकं पुरलं बिरलं आहे कीं काय हें मला पहायचं होतं तेंही उकरून पाहिलं. तिथें कांहीं नाहीं. मला पहिल्यानं वाटलंच होतं तिथं कांहीं नसायचं ह्मणून, पण ह्मटलं शोधावं. शोधलं असतं तर बरं होतं असं मागून वाटायला नको. ”

“ तुह्मीं या खटल्यांत फार चतुराई दाखवली याबद्दल कमिशनर तुह्मांवर खूप होतील अशी माझी पक्की खात्री आहे. ”

“ चला तर आतां आपलं काम कांहीं उरलं नाहीं. इथें आतां जाऊन स्वस्थ झोंप घेतली पाहिजे. अं ! पण हें काय ? आपलं लक्ष माझ्या बोलण्याकडे नाहीं असं दिसतं.

" नाहींच. मला वरच्या माडींत कोणाचीं पावलं वाजताहेतसं वाटतं. "

" हें एकून नाहीं होय करीत ते दोघेही बागेंत गेले व वर पाहूं लागले तों वरच्या माडींत उजेडही त्यांच्या नजरेस पडला. तेव्हां पुढील दारापासून तर कुलुपें लावलेलीं. शेरीच्या दारांतून कोणी येईल तर या दोघांना दिसल्या खेरीज कसें जाईल? परशुरामपंतानें तो दिव्याचा उजेड पहाण्याबरोबर तो थोडासा गोंधळला. पण लागलींच ह्मणतो. ' कदाचित् अनंत काय करतो तें पहाण्याकरितां माणूस ठेवला होता तो परत आला असेल. त्याच्याजवळ किल्ली आहे. "

" पण त्याला तूं जा. आतां तुझं काम संपलं असं सांगून घालवल्यावर तो येईल कशाला परत ! "

" कांहीं त्याचं राह्यलं असलं तर ! "

" ह्मणून हुकूम तोडण्याचं कारण नाहीं. शिवाय मीं स्वतः त्याला हुकूम केला होता कीं, पुढल्या दारानं कधीं आंत जायचं नाहीं. अन् दिवा कधीं लावायचा नाहीं. "

" परशुरामपंत ह्मणतोः—" कदाचित् तो नसेल. हं, आतां आलं लक्ष्यांत. तो कोचमन आणखी खाजदार असतील. गुलामांना असं वाटलं असेल कीं, अनंतानं कांहीं तरी पैसा लपवून ठेवला आहे. तो घेऊन आपण यः—पलाय करूं. अशा हेतूनं ते शोधाशोधी करायला आले असतील. "

" बरं मग आतां काय करायचं ? "

" दुसरं काय करायचं ! ऐन् शोधाशोधी करीत असतांना त्यांना पकडायचं. "

" ते बरे पकडले जातील ! त्यांच्याजवळ सुऱ्या चाकू दिखील असतील. "

" कांहीं हरकत नाहीं. बोंबाबोंब करून त्यांना पकडूं तसे सांपडले ह्मींहीं ते तर. नाहींतर दुरून पाहून आपण मुकाट्यानं पोलिसची मदत मागूं. सात आठ शिपाई आले ह्मणजे मग तर हरकत नाहीं. " जिन्यावर कांहीं पावलं वाजत नाहींत. चट्या आंथरलेल्या आहेत. अगदीं भिऊं नका. "

" मी भिणार ? " कान्स्टेबल ह्मणतो. " अरे तुझी परीक्षा पाहिली. माझ्याजवळ माझं पिस्तूल आहे. "

" चला तर मग ! " चीफ् कान्स्टेबल आपल्या ह्मणण्याप्रमाणें वागण्यास तयार आहे असें पाहून परशुरामपंत मोठ्या आनंदानें ह्मणतो. इतका वेळ जें त्यांचें बोलणें चाललें होतें तें अगदीं हळू चाललें होतें. वरच्या मजल्यावर कांहीं ऐकूं गेलें नसेलच. जिन्याचें दार उघडलें. व ते दोघे जिना चढूं लागले. अर्ध्या पायऱ्या चढून गेले नाहींत तोंच त्यांच्या कानीं कपाटाचे एका पाठीमागून एक झपाझप खण उघडून लावल्याचा आवाज ऐकूं आला. परशुरामपंत थबकला; व आपल्या मनाशींच ह्मणतो. जर ते बोलतील तर किती बरं होईल. त्यांचा आवाज माझ्या ओळखीचा आहे. पण कदाचित् एकटा खाजदारच आला असेल. तो मोठा लुच्चा आहे. तो आला असला तर बरं. कारण तो फार भित्रा आहे. तेव्हांच भेदरेल, आणखी आमच्या स्वाधीन होईल. " परशुरामपंताला आतां असें खास वाटलें कीं, तो खाजदार आपल्या हातांत सांपडलाच. ते जिन्याच्या माथ्यावर गेले. ज्या खोलींत कोचें कपाटें वगैरे होतीं त्या खोलीचा दरवाजा उघडा होता. त्यांतून त्यानें पाहिलें तों समोरच्या आरशाच्या व घड्याळाच्या टेबलावर एक झगझगीत मेणबत्तीचा दिवा असून कपाटाजवळ एक स्त्री दाराकडे पाठ करून उभी आहे असें त्याच्या दृष्टीस पडलें. तें पाहण्याबरोबर आपले सर्व तर्क ढांसळले असें वाटून परशुरामपंत गोंधळला. पण लागलींच शुद्धीवर येऊन मनांत ह्मणतो " अरे वा ! मी असं काय वेड्यासारखं करतों आहें! ही नबाबाणीची लवंडी. अनंतरावानें रुपये ठेवलेले तिला माहिती असल्यामुळं ते आपणच उपटावे असं मनांत धरून आली आहे. मला वाटतच होतं कीं, ही या खुनांत मदतनीस असावी ह्मणून. हिला भिवडवायला किती उशीर लागतो ! असें ह्मणून तो दारांतून आंत गेला. त्या स्त्रीला यांची चाहूल मुळींच ऐकूं आली नाहीं असें दिसतें. कारण ती आपलें शोधण्याचें काम मोठ्या संथपणें करीत होती. परशुरामपंत पुढें व कान्स्टेबल मागें असे दोघे आंत गेले तों तिनें तोंड फिरविलें. परशुरामपंत तिला पाहून इतका दचकला कीं, सपाट्यासरसा मागें सरकला. आणखी त्याला इतकें आश्चर्य वाटलें यांत नवल नाहीं.

कारण त्यानें पाहिलेली स्त्री खुद्द **नबाबीण** होती. या दोघांस पाहण्याबरोबर ती पुढें आली व कोण तुह्मी ? इथें कशाला आला ह्मणून विचारूं लागली. व पुढें कठोरपणानें ह्मणते " जर तुह्मी चोरी करण्याच्या इराद्यानं आलां असाल तर मी कांहीं भीत नाहीं. माझे चाकर नोकर जवळच आहेत. असें ह्मणून ती पट्कन् एका दारापाशीं गेली.

" नाहीं. आह्मी चोरटे नाहीं " **परशुरामपंत** गडबडून जाऊन बोबडी वळून ह्मणतो.

" तर मग घरांत कसे आलांत " ती तोऱ्यानें विचारते.

कॉन्स्टेबलास ही कोण हें ठाऊक नसल्यामुळें आपण पहातों काय आणि चाललें आहे काय हें कांहींच त्याला कळेना. **परशुरामपंता**चा नूर एकदम उतरून तो विलक्षण नम्रता दाखवूं लागला हें पाहून त्याला फारच आश्चर्य वाटलें. **परशुरामपंता**प्रमाणें त्यालाही ही लवंडी असावी असें वाटून तो ऐटीनें बोलणार होता, इतक्यांत **परशुरामपंत** शुद्धीवर येऊन त्यानें त्याला कोंपर रोंवून न बोलण्याविषयीं खूण केली. मग नमून त्या स्त्रीस ह्मणतो बाईसाहेब, क्षमा असावी. मी या घरवाल्याचा नवा कारकून आहें. **अनंतरावाच्या** भाडेचिठीची मुदत संपली, आतां या कॉन्स्टेबलांना हा बंगला द्यायचा आहे ह्मणून मीं यांना 'बंगला दाखवायला आणले आहेत. "

" पण अजून इथून आमचं सामान गेलं नाहीं. आह्मी जातों ह्मणून सांगितलं नाहीं तोंच ! "

" यांना बंगला पसंत पडण्याबरोबर आह्मी घर खालीं करण्याची नोटीस देणार होतों. "

" अन् एवढ्या रात्रीं बंगला बघायचा ! काय पाजीपणाच्या सबबी या ! हें पहा आतां शहाणपणा करा आणखी इथून चालते व्हा. "

" आह्मी आतां तसंच करतों आहोंत. भलत्याच वेळीं आल्याबद्दल क्षमा मात्र असावी. "

**परशुरामपंत** खालीं मान घालून आपल्याबरोबरच्या गृहस्थाला ओढून घेऊन खालीं चालता झाला. कान्स्टेबल साहेब इतके आश्चर्यचकित झाले कीं, त्यांना नाहीं होय ह्मणण्याचें देखील भान राहिलें नाहीं. ते मुकाट्यानें **परशुरामपंता**बरोबर चालते झाले. पण रस्त्यांत गेल्यावर

ते परशुरामपंतास म्हणतात:—" हें काय झालं याचं कांहीं मला सांगशील कीं नाहीं ? तूं इतका विलक्षण नम्रपणा कां दाखवलास त्या लवंडीला ? "

" अहो ती लवंडी नव्हे. ती **नबाबीण** स्वतांच ! "

" मला असं वाटलंच. वा ! वारे वा ! तुझं चातुर्य ! तुझा चाणाक्षपणा ! खूप चांगला शोध तुझा ! आह्मांला सगळ्यांना भयंकर घोंटाळ्यांत मात्र पाडलंस. ही **नबाबीण** चांगली धट्टी कट्टी आमच्या पुढें उभी आणखी तिचा खून केला ह्मणून चार्ज ठेवून आह्मी एका सभ्य गृहस्थाला तुरुंगांत ठेवतों ! आत्तां आधीं मला त्याला सोडून दिला पाहिजे. "

" छे. छे. छे. त्याला सोडूं नका. त्यानं खून जरी केला नसला तरी चोरी केली आहे तें अगदीं पत्त्यामुद्यानिशीं सिद्ध आहे. आणखी **नबाबीण** आतां नोटीकरतां शोधाशोधी करीत होती हेंही पण तुह्मीं पाह्यलं आहे. आणखी दुसरी गोष्ट अशी कीं, **नबाबीण** जरी जीवंत असली तरी न्हाणीघरांत कोणाचाना कोणाचा तरी खून झाला आहे हें खास आहे. आणखी तो कोचमन आणखी खाजदार दोघे त्या कामांत होते हें पण खास. ही पाहिली तिची गाडी. ते पहा दोघे आहेत. "

" पण **नबाबणी**चा त्यांच्यावर फार विश्वास दिसतो " कॉन्स्टेबल खोंचून ह्मणतो.

" आपला आतां माझ्यावरचा विश्वास उडाला हें खास दिसतं. पण त्याबद्दल मला आश्चर्यय् वाटत नाहीं. आणखी खंती वाटत नाहीं. माझ्या शोधाचा पाया चकला खरा. पण आतां तुमची मदत नको मला. मी आपला मी एकटाच शोधाला लागतों. **अनंतरावास** सोडा किंवा अडकावून ठेवा. मी आपल्या आपल्या मताप्रमाणें शोध काढतों.'

" हां आतां दुसरा बेत ! पहिला जसा सिद्धीस गेला असाच जर दुसराही—"

" नाहीं आतां बेतबीत कांहीं नाहीं. कांहीं वेळानं होईल कदाचित्; पण अजून कांहीं मला आतां पुढें काय करावं तें सुचत नाहीं खरं. तें धड **नबाबणी**चं नव्हे ही गोष्ट निर्विवाद आहे. पण धड जें नेलं तें तिच्या चाकरानं. तिच्या घरांत माझा शिरकाव आहे. माझा द-

माजी तिथें आहे. पुरे. एवढ्यावर आह्मी काय पाहिजे तें शोधून काढूं. कधीं चुकणार नाहीं."

"बरं तर. खरं काय तें शोधून काढण्याला आह्मी कांहीं तुला अडथळा करणार नाहीं. पण **अनंतरावाला** चोरीबद्दल कोर्टांत आणला. तर **नबाबणीची** जबानी लागेल."

"हो. पण तिला फक्त या चोरीच्या संबंधानें मात्र प्रश्न करावे. खुनासंबंधानं कांहींएक करूं नये. पण आतां तुह्मी सर्व गोष्टी कमिशनरच्या कानावर घालालच. ते सांगतील त्याप्रमाणें करा."

याप्रमाणें त्यांचें बोलणें होऊन एका रस्त्याजवळ आले तेव्हां कॉन्स्टेबलानें एका व्हिक्टोरिआवाल्याला हांक मारिली व **परशुरामपंतास** त्यानें 'आतां तूं कोणीकडे जाणार' ह्मणून विचारलें तेव्हां त्यानें 'घरीं' ह्मणून सांगितलें. त्याप्रमाणें दोघेही दोन रस्त्यांनीं गेले. **परशुरामपंताचा** चेहेरा या वेळीं पहाण्याजोगा होता. तो रागानें लाल झाल्यासारखाही दिसत होता. व लज्जेनें ओशाळलेलाही वाटत होता. तो आपल्याशींच ह्मणतो "छे! तूं कसला आतां सुटतोस. तूं आतां गुंतलासच. तूं पैसा चोरला आहेस. मी तें सिद्ध करून देईन. ही **नबाबीण** शिंची! काय आतां हिला ह्मणावं! भलत्याच वेळेला आली मधें. जणूं काय माझी फट्फजिती व्हावी असाच तिचा हेतु. मी खरोखर याबद्दल तिचा सूड उगवीन. ती जीवंत होऊन आली आहे, पण हें तिला फार जड जाईल." याप्रमाणें इतरांवर आग पांखडून शिव्या देण्यापेक्षां **परशुरामपंतानें** आपल्या स्वतांसच जर शिव्या घेतल्या असत्या, तर फार शोभलें असतें. पण रिकामा ताठा आंधळेपणा आणतो, त्याला त्याचा इलाज काय? परंतु ज्या वेळीं हा आपल्याशीं ह्मणत होता कीं **अनंतराव** आतां सुटत नाहीं, त्याच वेळीं दुसरीकडे **यशवंतराव** शपथ वाहून निश्चय करीत होता कीं, मी आपल्या मित्राला या रिकाम्या आरोपांतून सोडवीन तरच राहीन.

३

**यमुनेचें** समाधान करणें आणखी तिची समजून घालणें हें काम फारच कठिण होतें. खरी स्थिति काय होती याविषयीं तिच्या मनांत संशय तर आलाच होता. **यशवंतरावाला** तर असें वाटलें कीं, खरी

गोष्ट तिला सांगून तिला निराशेंत बुडविण्यापेक्षां कांहीं तरी बनावट गोष्ट सांगणें अगर ती संशयांतच राहील असें करणें बरें. त्यानें कांहींबांहीं सांगून कसेंबसें समाधान केलें, व तिला तिच्या घरीं नेऊन पोंचविलें. तिला घरांत एकटें सोडतांना त्याच्या मनाची जी स्थिति झाली ती झाली. परंतु करतो काय. घरांतल्या स्वयंपाकाच्या बाईला सकाळपर्यंत तिची नीट काळजी घेण्यास सांगून तो चालता झाला. तो चालता झाला खरा, पण तो शरीरानें मात्र चालता झाला. त्याचें मन त्याचे जवळ मुळींच नव्हतें. एकाच वेळीं बहीणभावंडांनीं वांटून घेतलें होतें. यमुनेस एकटीच घरांत सोडली हें त्यास बरें वाटेना. तरी पण आपण तेथेंच निजलों असतों तर बरें झालें असतें असेंही त्यास वाटेना. लोकमताला विशेष जुमानणारा जरी तो नव्हता, तरी सर्वथैव लोकमतास लाथ मारण्याचा त्यास धीर होईना. यदाकदाचित् धीर त्यानें केलाही असता; परंतु त्या गोष्टीचा संबंध त्याच्या एकट्याशींच असता तर. या ठिकाणीं यमुनेचाही संबंध होता. त्यानें मनांतल्या मनांत लोकाचारास व लोकरूढीस यथास्थित पुष्पांजलि वाहिली. तो ह्मणाला. कायहो ही लोकरूढी ! या रूढीला आतां करावें तरी काय ? या गरीब बिचाऱ्या पोरीवर कसा प्रसंग आला आहे ! भावाची अशी स्थिति तर ती एकटी. माझ्यासारखा त्यांचा अत्यंत मित्र असतां कांहीं उपयोग आहे काय ?" असें ह्मणून आणखी त्याच्या मनांत अनेक विचार आले व एकाएकीं तो ह्मणतो " आज एखादें संकट जर तिजवर आलें तर कसें होईल ? तें कांहीं नाहीं मी जाऊन खालीं ओटीवर बांक आहे तेथें पडणार. लोक काय पाहिजे तें ह्मणोत." इतकें बोलून तो अर्ध्या वाटेवर गेलेला परतला; व खरोखरीच ह्मटल्याप्रमाणें पुन्हां अनंतरावाच्या बंगलींत ओटीवर येऊन निजला. त्यानें आंथरुणापांघरुणाकरितां हांका देखील मारल्या नाहींत. याचें नांव प्रेम. याचें नांव कळकळ ! तो येऊन पडला, पण त्या बिचाऱ्यास झोंप कुठली ! अनंतरावास या विलक्षण किचाटांतून सोडवावा कसा हा काय तो विचार. तो आपल्याशींच ह्मणतो: " अनंतरावावर चोरीचा आणखी खुनाचा चार्ज! पण यांतून सोडवायला करावं काय ? खून कोणाचा चोरी कोणाचीन् कशाची ?" ज्या गृहस्थाबरोबर अनंतरावाला त्यानें पाहिलें होतें

त्या गृहस्थाचा चेहेरा त्यास आठवत होता. हा गृहस्थ बहुतेक कोणी तरी मोठा कॉन्स्टेबल असावा असेंही त्यास वाटलें. नंतर परशुरामपंताची त्यास आठवण झाली. परशुरामपंत डिटेक्टिव्हाप्रमाणें आतांशा माझ्या पाठीमागें असतो असें अनंतराव ह्मणाला होता तें त्यास आठवलें. त्याचप्रमाणें त्यास एकदम गेल्या शनवारच्या रात्रीची आठवण झाली. त्या परशुरामपंताचेंच तर हें काम नसेल ? सकाळीं उठल्याबरोबर त्याला आधीं गांठला पाहिजे. तो नानू करील तर त्याची कानउघाडणी केली पाहिजे. त्याखेरीज दुसरा मार्ग नाहीं. तो सांपडावा कुठें ? आज त्याला जाग्रण झालें आहे तर तो सकाळीं बिऱ्हाडींच असेल. त्याला बिऱ्हाडींच जाऊन गांठला पाहिजे." इत्यादि विचार करून तो थोडासा स्वस्थ पडला इतक्यांत त्याचा किंचित् डोळाही लागला. त्यांत स्वप्नें वगैरे त्या प्रकरणींच पडलीं. तो जागा झाला तों चांगलें उजाडलेलें. त्यानें वर पाहिलें तों कांहीं हालचाल दिसली नाहीं. त्यावरून यमुना अजून स्वस्थ निजली आहे असें त्याला वाटलें. उठल्याबरोबर त्यानें डोळे वगैरे पुसले, व तो तेथून चालता झाला. त्याला एका परशरामपंताखेरिज कांहीं एक दिसेना. आपण परसाकडे, तोंड धुणें कांहींएक केलें नाहीं वगैरे गोष्टीही त्यानें लक्ष्यांत आणल्या नाहींत. तो जो तडक निघाला तो परशुरामपंताच्या बिऱ्हाडाकडे चालला. मनांतला विचार हा कीं, तो उठला नाहीं तोंच त्याला गांठावा. तो परशुरामपंताच्या बिऱ्हाडीं गेला, तों परशुरामपंत निजला नव्हता इतकेंच नाहीं, पण यशवंतरावास येण्यास पांच मिनिटें उशीर लागता, तर तो भेटलाही नसता. परशुरामपंत पोषाख वगैरे करून चहाचे फुरके मारीत होता. यशवंतराव तेथें जाण्याबरोपर परशुरामपंत जरा दचकल्यासारखा झाला, पण लागलाच नीट होऊन यशवंतरावास ह्मणतो, " वा ! यशवंतराव, एवढ्या सकाळींच आज कोणीकडे—अरे महादेव आणखी एक कप चहा आण. "

यशवंतरावः—नको. नको. मला चहा नको. मीं अजून तोंड वगैरे दिखील धुतलं नाहीं. थोडंसं आपल्याकडे काम आहे ह्मणून आलों आहें.

परशुरामपंतः—माझ्याकडे काम आहे ! एवढं काय काम आहे

बोआ ! पण बरं झालं तुह्मी वेतावर आलांत. एक दोन तीन मिनिटांनीं आलां असतां तर कांहीं गांठ पडली नसती. चहा घेतल्याबरोबर मी बाहेर गेलों असतों. बोला काय आहे तें. मग मला अतोनात काम आहे.

य०:—थोडसं गुप्त आहे. कोणी न ऐकेल तेवढं बरं.

परशुरामपंत:—कोणी नाहीं ऐकायाचं येथं. बोला तुह्मीं खुशाल.

हें त्यांचें बोलणें ऐकून आणखी कांहीं इकडे तिकडे न करितां **यशवंतराव** एकदम ह्मणाला ' **अनंतरावा**ला पोलिसानं पकडलं आहे. कां तें मी तुह्माला विचारायला आलों आहें. '

" कोणाला ? मला विचारायला आलां ? मला काय ठाऊक ? मी उठून गेलों थेटरांतून तेव्हां तुह्मी दोघे तर बसलां होतां तिथें. मग मी गेल्यावर काय झालं तें मला ठाऊक का तुह्माला ? "

" तुह्मी कांहीं ह्मणा, पण माझी खात्री आहे कीं तुह्माला सगळं कांहीं माहिती आहे. कारण पोलिसाकडून तुह्मींच त्याला पकडवला."

"तर मग काय मी पोलिस्मन आहें असं ह्मणतां का काय तुह्मी ?"

" नाहीं. तुह्मी पोलिस्मन नाहीं. पण पोलिसाला गुप्त बातम्या तुह्मी सांगतां असं मला वाटतं. "

" असं कशाला ? मी डिटेक्टिव्ह आहें असं तुह्माला वाटतं असं का स्पष्ट ह्मणांना ! वास्तविक ह्मटलं ह्मणजे तुह्मांला इथें बसूं देखील देऊं नये हें असं तुमचं बोलणं ऐकून, पण मी आपला गय करतों झालं. तुह्मांला भ्रम झाला आहे. तुमचं डोकं बिघडलं आहे असंच मी समजतों. चला. आतां मला जाऊं द्या. माझी विनाकारण खोटी करूं नका. थोडंसं तुमचं डोकं शांत होऊन ताळ्यावर आलं ह्मणजे मग या हवे तर. "

" छे ! छे ! असा कसा आतां मी तुह्मांला सोडीन ! मला जें काय बोलायचं आहे तें मी तुमच्याकडून ऐकवीन. मला पाहिजे ती माहिती मिळवीन तेव्हां मग जाऊं देईन तुह्मांला. काल रात्रीं तुह्मी आमच्या शेजारीं त्या गोंवेकरणी बसल्या होत्या त्यांच्या बॉक्समध्यें आलां होतां. तुह्मी जे त्यांच्या बॉक्समध्यें आलांत ते फक्त आमच्या बॉक्समध्यें काय चाललं आहे, **अनंतराव** येतो केव्हां हें पाहण्याकरितां

आलांत. तो कुठें गेला होता हें तुह्मांला पक्कं माहीत होतं. **अनंतराव** येण्याच्या आधीं सरासरी एक दोन मिनिटं एक असा चमत्कारिक दिसणारा माणूस तुमच्या व आमच्या बॉक्साच्या पलिकडे दरम्यान उभा राहून तुह्मांला कांहीं खुणा करीत होता. आणखी—"

"अरे वा ! तुह्मी एक स्वप्नांतली कहाणीच मला सांगतां आहां. आतां मी एक दिखील शब्द बोलत नाहीं."

"तुह्मी बोलणार नाहीं तर तुह्मांला बोलायला लावतां येणार नाहीं हें उघड आहे. पण एवढं ध्यानांत ठेवा कीं, काल रात्रींची हकीकत आणखी मागल्या शनवारीं जी गोष्ट लपवावी, बाहेर बोलूं नये ह्मणून तुह्मीं मला सांगितलंत ती सगळया आपल्या ओंळखीच्या मंडळींना कळवून जिकडे तिकडे करीन. मी साऱ्यांना त्या मुंडक्याविरहित धडाची गोष्ट सांगेन, आणखी आह्मांला लावून देऊन हा एकटाच तें पोतं आणखी धड तपाशीत बसला होता हेंही कळवीन; ह्मणजे आपला धंदा काय आहे याबद्दल कोणालाच शंका रहाणार नाहीं." **यशवंतरावाचें** हें सणसणीत धाकाचें बोलणें ऐकून **परशुरामपंत** मुळींच भ्याला किंवा विचारांत पडला असें दिसलें नाहीं. तो फक्त ह्मणालाः—

"अहो आपण ती गोष्ट बाहेर कळवाल तर ती मोठी चूक होईल. ती गोष्ट दुसऱ्याला सांगितल्याबरोबर तुमचा तुह्मांलाच पुरा पश्चात्ताप होईल. कारण त्या प्रकरणांत मी एकटाच गुंतलों असं नाहीं. आपण आणखी आपले मित्र **जगन्नाथपंत** हेही त्यांत येतील. आपल्या हातून तशी चूक होऊं नये याला माझ्या हातीं जर कांहीं उपाय असेल तर मी ताबडतोब करून आपलं समाधान करीन. बोला काय माहिती पाहिजे आहे आपल्याला ? विचारा काय तें."

"**अनंतरावाला** नेला आहे कुठें ?"

"मला वाटतं कोणच्या तरी पोलिस-कोर्टांत नेऊन ठेवला असावा. अशा प्रकरणीं बहुतकरून पोलिस-कोर्टांतच नेतात."

"बरं मला आतां जर त्याला भेटायचं असलं तर कोणाकडे जाऊन परवानगी घेतली पाहिजे ?"

"हें काय बोआ आपल्याला ठाऊक ? **अनंतरावावर** काय चार्ज ठेवून त्याला पकडला आहे हें कांहीं मला ठाऊक नाहीं. तेव्हां—पण

मला वाटतं माजिस्ट्रेटाकडे अगर पोलिस कमिशनराकडे जाऊन अर्ज करावा. त्यांना वाटलं तर ते देतील परवानगी."

"परवानगी देणार नाहींत असंच कां ह्मणाना ? तें कांहीं नाहीं. मोठमोठ्या पोलिस कामगारांपैकीं पुष्कळांची तुमची ओळख असेल."

"वास्तविक ह्मटलं ह्मणजे इतका वेळ तुह्मीं माझा अपमान केला याबद्दल मीं तुह्मांला कांहींएक उत्तर न देतां 'जा' ह्मणून सांगणंच योग्य; पण मला असं वाटतं कीं, तुमच्या मित्रावर हा असा प्रसंग ओढवला हें पाहून तुमचं मन झालं आहे चमत्कारिक; तेव्हां मानापमान कांहींच मानूं नये. या वेळीं. शिवाय माझा आणखी **अनंतरावा**चाही स्नेह बराच आहे, तेव्हां त्याच्या उपयोगीं पडायची वेळ आल्यावर मी मागें कसा घेईन ? पोलिसखात्यांत एक साहेब माझ्या फार ओळखीचे होते. होते ह्मणतों याचं कारण एवढंच कीं, मी सांगतों हे साहेब फार पूर्वींचे आहेत. आणखी अजूनही ते असतीलच. त्यांचेकडे गेलांत तर तुह्मांला सर्व कांहीं माहिती चांगल्या रीतीनं मिळेल. माझं नांव सांगा—मी अमक्याकडून आलों आहें ह्मणून, ह्मणजे ते तुमची गांठ घेतील. ते फार सुज्ञ, परोपकारी असे आहेत. त्यांचं नांव **जोल्स**. आज आहे आतां रविवार. तेव्हां उद्यां सकाळीं दहा वाजायच्या सुमाराला मी सांगतों या पत्त्यावर वाळकेश्वराच्या तिकडे जा."

"बरं तर" **यशवंतराव** ह्मणतो "आपल्या नांवानं आणखी आपल्या त्या गृहस्थांच्या हातून कितपत काम होतं हें पहातों आतां. **अनंतरावाला** पकडला आहे हें कोणासही माहिती नाहीं. आणखी तें कोणाला कळावं अशी माझी बिलकूल इच्छा नाहीं. त्याचे स्नेही सोबती विचारतील त्यांचं मी करीन समाधान. आपणही कुठें यासंबंधानं बोलणार नाहीं असा माझा भरंवसा आहे; पण जर का बोललांत तर मी दिखील सर्व गोष्टी फोडून टाकीन, सोडणार नाहीं."

इतकें बोलून **यशवंतराव** चालता झाला. **परशुरामपंत** बाहेर जाणार होता, परंतु तो तसाच स्तब्ध बसला. इतका वेळ **यशवंतरावा**नें केलेली वृष्टि त्यानें बाह्यतः आपल्याला त्याचें कांहींच वाटत नाहीं, असें दाखवून सहन केली; परंतु **यशवंतरावानें** धाक घातल्याप्रमाणें जर गोष्टी जगजाहीर केल्या तर आपल्याला बरें नव्हे हें तेव्हांच

त्याच्या लक्ष्यांत आलें. तसें होऊं नये ह्मणून मग त्यानें मुख्य कॉन्स्टेबलाचा पत्ता त्याला सांगून दिला. "**जोलरा** साहेबांचा पत्ता सांगितला" **परशुरापंत** आपल्याशींच ह्मणतो—"यापासून आपला कांहीं तोटा होणार नाहीं. साहेब माझं नांव फोडणार नाहींत. कारण त्यांना पक्कं ठाऊक आहे कीं, माझी हरकामांत गरज लागणार. या **यशवंतरावा**शीं तो फार ममतेनं कळकळीनं असा बोलेल, पण **नबाबणी**बद्दल एक अवाक्षर दिखील काढणार नाहीं. सगळ्यांत मुख्य गोष्ट मला ही केली पाहिजे कीं, या गृहस्थाला स्वस्थ ठेवला पाहिजे. जर का धाक घातल्याप्रमाणें हा बोलला तर सारी फट्फजिती होईल."

याप्रमाणें **परशुरामपंत** बाहेर जाण्याचें विसरून क्षणभर विचार करीतच बसला; व त्याच वेळीं तिकडे **यशवंतराव**ही आपल्या मनाशींच विचार करीत रस्त्यानें चालला. त्याचा विचार एवढाच होता कीं उद्यां सकाळपर्यंत थांबावें, कीं आजच्या आजच त्या **जोलरा**साहेबाला भेटून यावें. समजा कीं उद्यांपर्यंत राहिलों आणि उद्यां जाऊन कांहींच निष्पन्न झालें नाहीं तर आजचा दिवस मात्र फुकट जाऊन विनाकारण त्रास व्हावयाचा. तेव्हां आजच जाऊन काय तें पहावें; कांहीं न जुळल्यास दुसरीकडून उद्योग करायला सांपडेल. हो. आणखी, न जाणों मला उद्यां जायला सांगून हा **परशुरामपंत** आपण आज साहेबाकडे जाऊन माझ्याविषयीं कांहीं सांगणार नाहीं ह्मणून कशावरून ? तो कांहीं तितकं करायला चुकायचा नाहीं.

इत्यादि विचार करून **यशवंतराव** घरीं गेला. परसाकडें, तोंडधुणें वगैरे करून लागलींच आपल्या जेवणाचेंही काम त्यानें उरकून घेतलें तों साडेनवाचा सुमार झाला. त्यानें लागलींच व्हिक्टोरिआ करून वाळकेश्वरच्या बाजूचा रस्ता धरला. तो **जोलरा**साहेबांच्या बंगल्यावर गेल्याबरोबर त्यानें पाहिलें तों तेथें पोलिसचे लोक उभे. त्यापैकीं मुख्य हवालदाराजवळ जाऊन त्यानें आपण कां आलों तें सांगितलें. त्यावर हवालदार साहेबांनीं गुरुमाईनें ह्मटलें "**जोलरासाहेबां**ची गांठ पडण्याला एक त्यांची ओळख तरी पाहिजे किंवा त्यांच्या ओळखीच्या लोकांपैकीं कोणाची तरी चिठी पाहिजे."

"माझ्याजवळ कोणाची चिठी कांहीं नाहीं. पण मी **परशुरामपं**-

ताकडून आलों आहें."

कोणाला ठाऊक कोण तुमचे **परशुरामपंत** ते !"

" तुम्हांला ठाऊक नसतील; पण साहेब बहादूरांना ते ठाऊक आहेत. त्यांना कळवा कीं **परशुरामपंता**कडून कोणी गृहस्थ बाहेर आले आहेत. आपण कळवीत नाहीं म्हणाल तर पुढें वाईट वाटेल आपल्याला. काम आहे अतिशय जरूरीचं. मला जर त्यांनीं खोटी कां झाली म्हणून विचारलं तर सर्व हकीकत सांगेन, नाहीं तर पोष्टांतून पत्र पाठवून कळवीन. " ही बोलण्याची पद्धति पाहून तो हवालदार थोडासा चपापला. कारण त्याला असें वाटलें कीं, हा गृहस्थ कांहीं अर्जबिर्ज घेऊन आलेला नाहीं. खरोखरी कांहीं पोलिसच्या कामासाठीं आला आहे. असें वाटून तो आंत गेला. **परशुरामपंत** या लोकांना ठाऊक नाहीं हें पाहून **यशवंतराव** थोडासा बुचकळ्यांत पडला. त्याला असें वाटलें होतें कीं, **परशुरामपंतां**चें नांव घेण्याबरोबर आपणांस पहारेकरी साहेबाकडे घेऊन जातील; पण क्षणभर विचार करण्याबरोबर त्याच्या लक्ष्यांत आलें कीं **परशुरामपंत** जर डिटेक्टिव्ह असेल तर या शिपायांना कसा माहिती असावा. गुप्त खातें तें. इतक्यांत हवालदार साहेब लवून मुजरा करून 'साहेब तुम्हांला बोलावताहेत' असें म्हणाला व त्यास वाट दाखविण्यास पुढें झाला.

**यशवंतराव** त्याच्या मागून गेला. हवालदारानें एका खोलीचें दार उघडलें तों समोरच एका टेबलाजवळ कामांत गढलेला असा एक कॉन्स्टेबल त्याच्या नजरेस पडला. **अनंतरावा**ला धरून नेते वेळीं त्याचेबरोबर असणारा गृहस्थ हाच हें तेव्हांच त्यानें ओळखलें.

टेबलाजवळ दुसरी खुर्ची होती तिकडे बोट करून साहेबांनीं **यशवंतरावास** बसण्याची खूण केली, व तोंडानें " आपलं कांहीं काम आहे काय माझ्या हातून होईल असं ? " असा प्रश्न केला. **अनंतरावाचा** अत्यंत मित्र एकदम भान न राहून म्हणाला:—" काय ! तुम्हीं ताडलं नाहीं मी कां आलों आहे तो ? "

" ताडलं ? मी कशावरून, आणखी काय, ताडूं ? माझ्या ओळखीच्या गृहस्थाचं नांव सांगून तुम्ही आलांत तेव्हां मला वाटलं कीं कांहीं निरोप बिरोप घेऊन आलां असाल. पण इकडे पहा मला नाहीं

वेळ. काम आहे अतिशय, तेव्हां झट्कन् बोला काय तुमचं काम तें."

" माझं नांव **यशवंतराव**; काल ज्या गृहस्थाला आपण थेटरांत पकडलात त्याचा मी अत्यंत स्नेही आहें."

" हं. हं. आलं ध्यानांत. थेटरच्या बाहेर आल्यावर तो व्हिक्टोरिएंत बसण्यापूर्वी त्याच्याजवळ बोललांत ते तुह्मीच. बरं पण तुह्मी **परशुरामाचं** नांव सांगून कसे आलांत ?"

" त्यांनीं मला आपला पत्ता दिला आणि माझं नांव सांगा ह्मणजे आपली गांठ पडेल असं सांगितलं. मीं जेव्हां त्यांना असं ह्मटलं कीं बोआ असं कांहीं तरी करा, नाहींतर मी साऱ्या गांवभर कळवतों कीं **परशुरामपंत** हा डिटेक्टिव्ह आहे ह्मणून, तेव्हां त्यांचा इलाजच राहिला नाहीं."

" छत्. छत्. तुमची अगदीं चूक आहे ही. माझी आणखी त्याची खूप ओळख आहे, परंतु—"

" नाहीं हो. माझी चूक नाहीं. ब्याक्बेवर एक पोत्यांत घातलेलं मुंडक्यावांचून प्रेत सांपडलं त्या वेळीं मी होतोंना त्याच्याबरोबर ! आणखी त्यावर, माझ्याविषयीं **परशुरामपंताचं** आणखी बोलणंही झालं होतं. शिवाय **अनंतरावाला** धरून द्यायला कारण तोच झाला याविषयीं मीं आपली खात्री करून घेतली आहे."

**जोल्रासाहेब** कांहीं वेळ स्वस्थ बसले. ते थोडेसे गोंधळांत पडल्यासारखे दिसले. थोडा वेळ गेल्यानंतर ते एकदम ह्मणतातः—"बरं. बरं. पण तुह्मी आलात कशाकरितां मला कांहीं सांगितलं नाहींत. प**रशुरामपंताविषयीं** आपलं मत काय आहे तेंच कांहीं सांगण्यासाठीं आलां नाहीं. त्याची आमची चांगली ओळख आहे. त्याला आह्मी चांगले मानतों. काय हेतु धरून आलांत ?"

" माझ्या स्नेह्याला एकदां भेटण्याची परवानगी मागायला आलों होतों."

" तशी परवानगी देणं माझ्या हातांत नाहीं. आणखी कायद्याप्रमाणें ह्मटलं ह्मणजे अर्ज वगैरे केला पाहिजे. त्याचं उत्तर मिळेपर्यंत दोन तीन दिवस लागतील."

" तर मग काय आह्मीं दोन तीन दिवस स्वस्थ बसावं ? **अनंतरा-**

याची बहीण घरीं रडत बसली आहे. एकटी बायको माणूस, त्यांतून अतिशय लहान. माझ्या खेरीज यांत पहायला देखील कोणी नाहीं. असं असून—आपल्या भावाला पोलिसानं कां पकडला हें दिखील तिला कळूं नये ? "

" अनंतरावाला ठाऊक आहे त्याला कां पोलिसानं पकडलं आहे तें ! बस् झालं. "

" त्याच्या घरच्या माणसांना देखील कळवलं पाहिजे तुह्मीं. त्या खेरीज त्यांनीं त्याला सोडवण्याची खटपट कशी करावी ? ही कांहीं मोगलाई नाहीं. ही मुंबई आहे. "

" मला वाटतं, तुझा स्नेही व्हिक्टोरिएंत बसण्यापूर्वी तुला कांहीं ह्मणला कीं—"

" कीं माझ्यावर चोरीचा आणि खुनाचा चार्ज आहे ह्मणून. पण त्यानं चोरलं काय ? खून कोणाचा केला ? गेल्या शनवारीं ज्या बाई-चा मुडदा पोत्यांत सांपडला आह्मांला आणखी परशुरामपंताला, तिचा तर नाहींना ? "

परशुरामपंताच्या हातून झालेल्या त्या थोड्या एवढ्या चुकीची आठवण होऊन जोलरासाहेब एकदम दचकल्यासारखे झाले; ती चूक ठाऊक झाल्यावरून हा मुंबईच्या पोलिसाची पत्ती करण्यासाठीं असें बोलतो आहे कीं काय अशी त्यास शंका आली. मुंबईच्या पोलिसाची तर मोठी ख्याति. तसले हुशार पोलिस साऱ्या हिंदुस्थानांत नाहींत, तेव्हां अशा पोलिसाच्या हातून झालेली चूक बाहेर फुटूं नये ही त्याची मोठी इच्छा. शिवाय अनंतरावाला विनाकारण पकडला असें आतां त्यास वाटूं लागलें. अनंतरावानें सांगितल्याप्रमाणें खराखर नीट सुरक्षित ठेवण्याकरितांच त्यानें त्या नोटी घेतल्या नाहींत कशावरून, असेंही त्याच्या मनांत आलें. खुनाचा चार्ज तर आतां त्याच्यावरून काढून टाकलाच पाहिजे होता. कारण, जिचा खून केला ह्मणून त्यांना वाटत होतें ती प्रत्यक्ष जीवंत धट्टी कट्टी जशी त्यांनीं पाहिली. इतक्या सगळ्या गोष्टी मनांत येऊन आधींच दयाळू व गरीब स्वभावाच्या त्या जोलरासाहेबास या प्रकरणीं विशेष दया दाखवावी असें वाटलें. थोडा वेळ थांबून त्यानें यशवंतरावास ह्मटलें, " तुह्मी चांगले इमानी आहां आणखी तुमच्या मि-

त्रावर हें संकट आलेलं पाहून तुह्मांला किती दुःख झालं असेल हेंही मी जाणतों. आणखी तुमच्या मित्रानं कोणाचा खून केला नाहीं ही माझी खात्री आहे."

"तर मग त्यानं चोरी केली असं तुह्माला वाटतं आहे ?" यशवंतराव जरा दुःखानें व खोंचून बोलतो. "तें तर फारच वाईट. खुनापेक्षां चोरी फारच निंद्य. पण अनंतरावाचा प्रामाणिकपणा सगळ्या त्याच्या स्नेह्यांना ठाऊक आहे."

"होय. मला तें ठाऊक आहे. आणखी आह्मांला ठाऊक आहे कीं, अनंतरावाचा आणखी एका बाईचा विशेष स्नेह आहे. ती फार श्रीमंत आहे. तिच्या खाजगी पैशाची वगैरे सर्व व्यवस्था तो पहातो. नेहमीं एकीकडे गांठ घ्यायला सांपडावी ह्मणून त्यांनीं गांवदेवीकडे एक बंगली भाड्यानें घेतली आहे. तिचं आणखी याचं मागल्या शनवारीं कायसं भांडण झालं. तिनं याला काढून लावला. तरी हा त्या बंगलींत जात असे. तिची गांठ घेण्याकरितां नव्हेच अर्थात्. कारण ती मुंबईंत नव्हती हें याला ठाऊक होतं. कां तिथें जात होतास ह्मणून त्याला विचारतां तो कांहींच बोलेना. पण आमचा एक डिटेक्टिव्ह तिथें होता त्यानं त्याचं कृत्य पाहिलं—"

"डिटेक्टिव्ह तिथें होता ! कोणी भाड्यानं घर घेतलं ह्मणजे तिथें जाण्यांत देखील पोलिसाची भीति असते काय ?"

"एखाद्या स्त्रीच्या वर्तनाबद्दल संशय आला ह्मणजे तिच्या नवऱ्याला—"

"तर मग एकून तिच्या नवऱ्यानं तिथें डिटेक्टिव्ह—"

"तें हें मला कांहीं ठाऊक नाहीं. पण आमच्या डिटेक्टिव्हनं त्याला त्या घरांत एका पेटींतून पांच हजारांच्या नोटी काढून घेतांना पाहिलं."

"बरं घेतल्या असतील नोटी काढून. त्याचं काय आलं आहे. त्याच्या स्वतांच्या नोटी असतील, त्यानंच तिथें ठेवल्या असतील, तर काढून घेतल्या असतील. ह्मणून त्याला पोलिसानं पकडण्याचं काय कारण ?"

"तेंच कारण. त्याला पकडल्यावर मीं त्याची जबानी घेतली, त्यां-

त त्यानं असं सांगितलंन् कीं माझ्या यजमानणीच्या त्या नोटी आहेत असं मला वाटून तिच्या तिला परत देण्याकरितां मीं घेतल्या. त्या माझ्या स्वतांच्या आहेत असं त्यानं एक वेळ देखील सांगितलं नाहीं. उलट त्यानं असा बहाणा केला कीं, त्या नोटी तिथें आहेत हें आपल्याला माहिती देखील नाहीं."

"आणखी हें त्याचें ह्मणणें तुह्माला अगदीं खरं वाटत नाहीं ? असंभवनीय आहे असं वाटतं ?"

"आणखी एक गोष्ट आह्मांला पाठीमागून शोधा अंतीं कळली नुकतीच, तीही ध्यानांत घेतली पाहिजे. हे रुपये त्यानं आपल्या यजमानणीजवळ आणून दिले, त्या वेळीं ह्याचं आणखी तिचं भांडण झालं. तिनं याला चाकरीवरून दूर केला, दुसरं असं कीं ती इथें नव्हती. ती येणार केव्हां, गेली होती कुठें, वगैरे कांहींएक याला माहिती नव्हती."

"आणखी एवढ्या या गचाळ पुराव्यावरून त्याला एकदम पकडला ! प्रत्यक्ष त्याच्या यजमानणीजवळ देखील पूसतपास केली नाहीं?"

"तिच्याजवळ काय पूसतपास करायची आहे ? प्रत्यक्ष आरोपी जर सर्व गोष्टी कबूल करतो आहे, तर-अन् तिला जर आह्मी कांहीं विचारायला गेलों अगर फिर्याद कर ह्मणून ह्मणायला गेलों, तर ती या भानगडींत मुळींच पडायची नाहीं. ज्यां गोष्टी विशेष पसरू नयेत त्या पसरतील ही तिला भीति आहेच."

"पण **अनंतरावा**वरच्या आरोपाबद्दल चौकशी जर करायची आहे, तर मग तिची साक्ष घेतल्यावांचून चालेल कसं ?"

"त्याच्याशीं आपल्याला काय करायचं आहे. माजिस्त्रेट साहेबांकडे आहेत या गोष्टी. त्यांच्या मनाला येईल त्याप्रमाणें ते पाहतील."

"आणि इतका सगळा वेळ **अनंतरावा**ला तुरुंगांत ठेवणार. तो जर तिथें तसाच राहिला, तर मी खास सांगतों कीं, ही बातमी सगळ्या गांवभर पसरून त्या **नबाबणी**ची बेअब्रू होणार !"

"पोलिसला काय त्याचं ? त्या **नबाबणी**ला अब्रूची चाड असेल, तर ती पोलिसकडे येईल. तिनं येऊन एवढं सांगितलं कीं ते रुपये **अनंता**नं मला देण्याकरतांच घेतले ह्मणजे झालं. फार कशाला ? तिनं नुसतं एवढं जरी ह्मटलं कीं, माझा **अनंता**वर पुरा विश्वास आहे, तो

चोरी वगैरे कधीं करणार नाहीं, तरी पुरे झालं. लागलींच आह्मी त्याला सोडून देऊं."

"मग तिला जाऊन तुह्मी विचारीत कां नाहीं? इथें नसली तर तार वगैरे कां करीत नाहीं?"

"मीं एकदां आतां तुह्मांला सांगितलं कीं, मला स्वतांला आतां त्या कामांत कांहींएक करतां यायचं नाहीं. **अनंता**चे जे कोणी स्नेही असतील त्यांनीं जाऊन ह्या खटपटी केल्या तर फायदा होईल." इतकें ह्मणून **जोलरा**साहेब खुर्चीवरून उठून दाराकडे जाऊं लागले; तें पाहून **यशवंतराव** समजलाच कीं आतां हा जास्त कांहींएक बोलणार नाहीं. हें पाहून **यशवंतराव** मुकाट्यानें उठला, **जोलरा**साहेबास त्यानें इंग्रजी पद्धतीप्रमाणें रामराम केला व चालता झाला. रस्त्यांत आल्यानंतर त्याच्या मनांत विचारांचें काहूर उठलें. **अनंतरावा**चें तुरुंगांत जाणें अगर सुटणें आतां सर्वस्वी त्या **नबाब**णीच्या हातांत आहे हें त्यानें पक्कें जाणलें. "आजपर्यंत त्या **नबाब**णीनें त्याला अनेक दुःखें दिलीं. त्या सर्वांचा कळस करण्याचें जर तिच्या मनांत आलें, तर ती खुशाल करूं शकेल. आतां करावें कसें? तिच्या घरीं जावें, तर मुसलमानभाईशीं गांठ. बाकी तिनं गांठ घेण्याचं मनांत आणलं तर कांहींच पंचाईत नाहीं. तिच्या मनांत आलं बरीक पाहिजे. जर तिनं नाहीं ह्मटलं तर मार खायचीच पाळी. कांहीं होवो आपला स्नेह्याचा धर्म आहे तर तो केला पाहिजे, संकटं आलीं तरी भिऊन कांहीं उपयोग नाहीं. तिथें जावं, खटपट करावी, मग काय होईल तें होईल. बरं पण तिथें जाऊन ह्मणावं काय, कोणाकडून आलों आहें ह्मणून वर्दी द्यावी? मोठी पंचाईतीचीच गोष्ट आहे. अरे हो! पंचाईत कसली? **अनंतरावा**कडून निरोप घेऊन आलों आहें ह्मणून सांगावं झालं, ती काय अशी पडद्यांत बसणारी थोडीच आहे! पण **अनंतरावा**नं तर सांगितलं, कीं ती गांवाला गेली आहे ह्मणून!— पण आली असली इतक्यांत तर! शोध तर करून पहावा! तिनं एक शब्द उच्चारला तेवढा कीं सुटलाच **अनंतराव**!" याप्रमाणें अनेक विचार त्याच्या मनांत आल्यावर शेवटीं त्यानें त्या **नबाबणी**कडे जाऊन आपल्या स्नेह्याबद्दल रदबदली करण्याची तसदी घ्यावी

ह्मणून तिच्याजवळ मागणी करायला जाण्याचा त्यानें निश्चय केला. त्याला त्या **नबाबणी**चा अगदीं मनापासून तिट्कारा होता. परंतु करतो काय बिचारा ! ‘ अडला नारायण गाढवाचे पाय धरी ’ त्यांतली गत त्याची झाली. अस्तु, वर सांगितल्याप्रमाणें त्याच्या मनाचा निश्चय झाल्याबरोबर त्यानें त्या **नबाबणी**च्या बंगल्याकडचा मार्ग धरला. वाजले किती, वेळ कोणची इकडे त्याचें लक्ष्य बिलकूल गेलें नाहीं. भूकबीक कांहींएक त्यानें पाहिलें नाहीं. तो जो तडक निघाला, तो **नबाबणी**च्या बंगल्याकडे चालला. तो विचार करीत चालला असतां त्याचें सर्व लक्ष्य प्रस्तुत कार्याकडे होतें हें सांगावयास पाहिजे असें नाहीं. तिथें गेल्यावर काय बोलावें कसें बोलावें इकडे त्याचें सर्व लक्ष्य होतें. तूं त्या **अनंतरावा**वर दया कर असें ह्मणून ती ऐकेल असें त्याला वाटेना. “ जर तूं त्याला मुकाट्यानें सोडवला नाहींस तर तुझी बेअब्रू होईल. सर्व वर्तमानपत्रांतून तुझ्या नांवाचा डांगोरा पिटेल. तूं थोरा मोठ्याची बायको याचा विचार कर. ” इत्यादि गोष्टी बोलूनच जर कांहीं तिचें मन वळलें तर वळेल. नाहींतर **अनंतरावा**वर मेहेरबानी कर एवढें ह्मटल्यानें तिचें मन द्रवेल ही आशाच नको. ती कोणच्या प्रकारची बायको आहे हें तिचें जें **अनंतरावा**शीं एकंदर वर्तन आपणांस कळलें आहे त्यावरूनच दिसून येत आहे. इत्यादि विचार त्याच्या मनांत आले. शिवाय **अनंतरावा**नें पांच हजारांच्या नोटी त्या पेटीच्या चोर-कप्यांतून काढून घेतल्याची गोष्ट खरी हें जेव्हां त्यानें ऐकलें, तेव्हांपासून त्या गोष्टीविषयींही त्याचें मन किंचित् अस्वस्थ झालें. मागील शनवारीं कोटांतून पांच हजारांच्या नोटी **अनंतरावा**नें आणून आपल्या यजमानणीस दिल्याचें त्याला स्मरण झालें. त्याच नोटी चोरल्याबद्दल तर **अनंतरावा**वर आरोप नसेल ना ! पण त्या नोटी त्या पेटीच्या चोर-कप्यांत आल्या कशा ? बरं मी ह्मणतों, **नबाबणी**नं ठेवल्या असतील. ती विसरून गेली असेल. **अनंतरावा**नं घेतल्या असतील; पण हें सारं पोलिसाला कळण्याचं कारण काय ? त्या घरांत पोलीस असण्याचं कारण काय ? **अनंतराव** चोरी करणार याचं काय पोलिसाला स्वप्न पडलं होतं ! त्या मुंडक्याविरहित धडाचा शोध क-

रायला तर ते तिथें आले नसतील ? **अनंतरावाला** पकडला त्याचा आणखी त्या पोत्यांतल्या प्रेताचा कांहीं संबंध आहे कीं काय ? अशा कित्येक गोष्टी त्याच्या मनांत एकदम येऊन त्याच्या मनाचा अगदीं गोंधळ होऊन गेला. शेवटीं त्यानें असा निश्चय केला कीं, सुदैवानें **नबाबणीनें** गांठ घेतली तर तिला आपल्याला माहिती आहेत तेवढ्याच गोष्टी बोलून ती काय बोलते काय नाहीं तें ऐकावें, आणि नंतर जें सुचेल आणि बरें वाटेल तें करावें.

असो. कांहीं वेळानें तो जाऊन त्या **नबाबणीच्या** बंगल्यापाशीं पोंचला. तेथें जातो तों त्यानें एक सजवून तयार असलेली गाडी पाहिली. हा दारापर्यंत गेल्यावर यानें दारावरच्या शिपायास **नबाबणीबाई** गांवांहून आल्या काय ह्मणून प्रश्न केला. त्याचें उत्तर हवें होतें तेंच मिळालें. परंतु त्या शिपायानें आणखी त्यास सांगितलें कीं, त्या आतां बाहेर जाण्याच्या गडबडींत आहेत. तें ऐकून याला जरासें वाईट वाटलें; पण त्यानें धैर्य धरून त्या शिपायास ह्मटलें " तें मला दिसतंच आहे, परंतु आंत जाऊन **अनंतरावजीकडून** कोणी गृहस्थ आला आहे ह्मणून वर्दी द्या " असें कांहीं ऐटींत कांहीं अदबीनें सांगितलें. शिपायानें तो प्रकार पाहून कुरकुरत पण आंतली वाट धरली व थोड्याच वेळांत बाहेर येऊन आपल्याला बाईसाहेब आंत बोलावीत आहेत असें सांगितलें. ते शब्द त्या शिपायाच्या तोंडून बाहेर पडण्याचाच काय तो अवकाश ! **यशवंतरावानें** पाऊल पुढें टाकलें. शिपाई त्यास वाट दाखवण्यास गेला. **नबाबणीच्या** पुढें जाण्याबरोबर जसा त्याला आला तसा कुर्निसात त्यानें केला; **नबाबीण** बुर्खा वगैरे कांहींएक न घेतां हुक्का वगैरे घेऊन एका कोंचावर बसली होती. **यशवंतराव** आंत जाऊन कुर्निसात करून उभा राहण्याबरोबर तिनें आपल्या समोर जवळच एक गादीची खुर्ची आणून ठेवण्यास एका चाकरास हुकूम केला व ती खुर्ची आल्यावर **यशवंतरावास** बसण्यास खूण केली; व एकदम त्यास ती ह्मणाली " तुमचें नांव काय, **यशवंतराव** काय ? हा तिचा प्रश्न ऐकून **यशवंतराव** अगदीं आश्चर्यचकित झाला. हिला आपलें नांव कळलें तरी कसें ! हा प्रश्न त्याच्या मनांत आला आणि पुन्हां तिला उद्देशून त्याच्या तोंडावाटें बाहेर पडला. " आपल्याला

माझें नांव काय ठाऊक " असें विचारावें कीं नाहीं यास विचार करण्यास त्याला अवधीच सांपडला नाहीं. त्या त्याच्या प्रश्नावर तिनें " कसं ठाऊक ? ठाऊक आहे एवढं बस आहे. कसंन् काय हें काय करायचं आहे ? मला **अनंतरावानें** दोन चारदां सांगितलं होतं आपलं नांव त्यावरून मीं ताडलं. बरं पण तुह्मी आज त्याच्याकड्न आलां तें काय ह्मणून ? त्याला मीं रजा दिली आहे. आतां काय त्याचं काम माझ्या जवळ ? कांहीं पगार बिगार राहिला आहे ? "

" मी कां आलों आहें हें एकंदर सांगायला थोडासा वेळ लागेल आणखी जरा आपल्या खेरीज दुसऱ्या कोणी "—**यशवंतराव** इतकें बोलतो आहे, तों **नबाबीण** एका दासीकडे वळली आणि तिला ह्मणाली. " जा ग, मी आतां बाहेर जात नाहीं. गाडी सोड ह्मणून कोचमनाला सांग आणखी कोणाला इकडे येऊं देऊं नको. जावं. " दासी गेल्यावर ती **यशवंतरावा**कडे वळून ह्मणते " तुमचा आणखी **अनंता**चा फार स्नेह आहे काय ? " " होय. त्याचा आणखी माझा फार स्नेह आहे. शिवाय त्याचं आणखी माझं लवकरच—" " नातं जुळणार आहे. " **नबाबीण** मध्येंच ह्मणते. " तें सारं ठीक आहे. पण त्याचा आणखी तुझा जर इतका स्नेह आहे ह्मणतोस, तर गेल्या शनवारीं त्याला मीं रजा दिली आणि पुन्हां मजकडे येऊं नको असं त्याला सांगितलेलं तुला कसं माहिती नाहीं ? "

" माहिती आहे. " **यशवंतराव** ह्मणतो. " पण त्यानं मला—"

" मग तूं त्याच्या मार्फतीनं इथें कसा आलास ? त्याला कोणी सांगितलं तुला पाठवायला ? "

" त्यानं मला पाठवला नाहीं. आपली गांठ घेण्यास सुलभ जावं ह्मणून मीं त्याचं नांव सांगितलं इतकंच. मी इकडे आलों आहें हें त्याला ठाऊक देखील नाहीं. आणखी मी जो आलों हा एवढ्याच करतां कीं तो पोलिसच्या तडाक्यांत सांपडला आहे त्याला आपण सोडवावा. "

" पोलिसच्या तडाक्यांत सांपडला आहे ? अन् तो कां ? "

" आपल्या ९००० रांच्या नोटी चोरल्याचा त्याच्यावर आरोप आहे. "

नबाबीण किंचित् दचकल्यासारखी झाली. परंतु लागलीच आपली पूर्वीची शांतता धरून ती ह्मणतेः—" वा ! मोठी आश्चर्याची गोष्ट ह्मणायची. हें काय प्रकरण झालं ? "

" गांवदेवीच्या तिकडे जो आपला बंगला आहे. तिथें आपण या नोटी विसरलां होतां वाटतं. "

" हं. तरीच, आतां येत आहे माझ्या लक्ष्यांत मी शोधतां मला कां त्या नोटी सांपडल्या नाहींत तें ! पण अनंतरावाजवळ त्या आहेत असं कळलं कसं कोणाला? मीं कांहीं त्यासंबंधानं कांहीं केलं नाहीं."

" आपण गांवाला गेलां होतां तेव्हांपासून पोलिसाची नजर त्या बंगल्यावर होती. "

" ती कां ? " " तें कांहीं मला सांगतां येत नाहीं. पण पोलिसचे गुप्त हेर त्या बंगल्यांत लपून बसलेले होते त्यांनीं अनंतरावाला रुपये नेतांना पाहिलें, आणि तो नाटक गृहांत जाऊन परत येतो आहे तों त्यास धरलें. "

" किती वाजतां त्याला पकडलं ? " हा प्रश्न विचारतांना नबाबीण अगदीं गोंधळून गेल्यासारखी दिसली. .

" रात्रीं अकरा वाजतां. "

" मोठी चमत्कारिक गोष्ट ह्मणायची. ज्यांनीं त्याला पकडलं त्यांना तो काय ह्मणाला ? "

" त्यानं एवढंच सांगितलंन् कीं, हा पैसा अमुक अमुक माणसाचा आहे. माझ्या तो अवचित दृष्टीस पडला. ज्याचा त्याला द्यावा, होता तिथें असणं वाजवी नाहीं असं वाटून मीं काढून घेतला. " " मी कांहीं तो पैसा माझा मला मिळावा ह्मणून मागायला जाणार नाहीं. पण त्यानं माझं नांव घेतलंन् का ? "

" नाहीं. त्यानं एवढंच सांगितलंन् कीं ह्या नोटी एका बाईच्या आहेत. "

" पोलिसचे लोक तेवढ्यावरून समजलेच असतील ह्मणा ! "

" ते समजले असंच दिसतं. पण अनंतरावानं कांहीं सांगितलं नाहींहो. पोलिसाला आपलं नांव कळलं आहे ह्मणून तर मी इकडे आलों. "

" पोलिसाला कळो, कीं आणखी साऱ्या जगाला कळो. मी त्याच्याबद्दल कांहींच फिकीर बाळगीत नाहीं. मला एवढंच कळायला पाहिजे आहे कीं, पोलिसानं त्या बंगल्यावर कां नजर ठेवली होती?"

" तें कांहीं मला ठाऊक नाहीं. पण मला देखील त्या गोष्टीचा मोठा चमत्कार वाटतो. या **अनंतरावा**वर आलेल्या प्रसंगामुळं मला दुसरं तिसरं कांहीं सुचत नाहीं. त्याची सुटका होऊन हें प्रकरण विझावं हें माझ्या आणखी आपल्या दोघांच्याही हिताचं आहे."

" तुझ्या असेल! तुझं त्याचं नातं जुळायचं आहे म्हणून. पण माझा काय संबंध बाबा! कदाचित् पोलिस माझी जबानी बिबानी घेईल तर मी " मला कांहीं ठाऊक नाहीं असा ठोकळ जबाब देईन म्हणजे झालं. त्यांत पंचाइतीची गोष्ट काय आहे!"

" पण तुम्ही जर अशीं उत्तरं द्याल तर मोठी विलक्षण गोष्ट होईल. वर्तमानपत्रांतून नाहीं नाहीं त्या गोष्टी बाहेर पडतील. त्यापेक्षां खरं काय आहे तें सांगितल्यास कांहींच पंचाईत नाहीं. सर्व प्रकारांनीं बचाव होईल. **अनंतराव** सुटेल—"

" बरं त्याची सुटका व्हायला मला काय केलं पाहिजे?"

" करायचं म्हणून एवढंच कीं पोलिसाला असं कळवायचं '**अनंतरावा**वर माझा पक्का विश्वास आहे. त्यानं पैसे घेतले ते मला परत देण्याकरितांच घेतले यांत शंका नाहीं.' असं आपण कळवलं म्हणजे तो सुटेल. त्याच्यावरचा आळ जाईल. खटला होणार नाहीं. आपलं नांव बाहेर येणार नाहीं. कांहीं एक नाहीं."

" समजा! माझं नांव बाहेर येण्याबद्दल मी यत्किंचित् देखील परवा करीत नाहीं. फारच झालं, साक्षीबिक्षीचा प्रसंग येतोसा वाटला तर मी हिंदुस्थान सोडून जाईन."

" अन् गरीब निरपराधी मनुष्याला विनाकारण शिक्षा झाली तर कांहींच वाटणार नाहीं? आपण या वेळीं त्याला सोडवला नाहीं, तर विनाकारण त्याला त्रास होणार आहे. आपल्या एका शब्दानं काम होणार आहे. त्याच्यावर आणखी खुनाचाही आरोप आहे."

" खुनाचा आरोप!" **नवाबीण** विचारते. " त्याच्यावर खून केल्याचा आरोप आहे?"

" होय. बाईसाहेब. " मग त्या पोलिसाची अक्कलच मला कळून आली. **अनंतरावासारख्यावर** खुनाचा आरोप ! खून करायचं तें तोंडच निराळं असतं. कोंकरूं तरी ज्यास्ती धीट असेल त्याच्यापेक्षां. दुसरं आणखी असं कीं, त्याला खून करण्याजोगा असा शत्रु तरी कोण होता ? मीं त्याला इथून घालवून दिल्याबद्दल त्यानं माझा खून केला असं ह्मटलं तर असो तरी एक. पण मी प्रत्यक्ष जीवंत असतांना तसं ह्मणेल कोण ? "

" कोणाचा खून झाल्याबद्दल त्याला धरला आहे हें कांहीं मला ठाऊक नाहीं. इतकंच नव्हे, पण अजून पोलिसानं त्याच्यावर तो आरोप तसाच राहूं दिला आहे कीं नाहीं हें कांहीं सांगवत नाहीं. काल ज्या गृहस्थानं त्याला पकडला त्याच्या बोलण्यांत आज फक्त चोरीबद्दल बोलणं आलं ह्मणून ह्मणतों. "

" मी मागल्या शनवारीं कोणाला कांहीं एक न कळवतांना इथून गेलें खरी, त्यावरून पोलिसांनीं बांधले असतील तर्क **अनंतरावानं** माझा खून केला ह्मणून ! वा ! काय चमत्कार आहे तरी !" "खरोखर बाईसाहेब, अशा भलत्यान् सलत्याच चुकीमुळं एखाद्या चांगल्या गृहस्थाची अब्रू जाण्याची आणखी खराबा होण्याची पाळी यावी ही मोठी आश्चर्याची गोष्ट ह्मटली पाहिजे. पण ही चूक आपल्या एका शब्दानं नाहींशी होऊन जिकडे तिकडे ठीकठाक होण्याजोगें असून .पण–"

" **यशवंतराव,** तुह्मी थोडे रागावलां आहांसे दिसतां. **अनंतराव** कांहीं कधीं इतका आपल्या स्नेह्याच्या कळवळ्यानं रागवला नसता. पण असो. मला एकंदर गोष्टी काय आहेत त्या कळल्या कीं नाहीं ह्मणजे मग पाहूं आह्मी कांहीं करायचं असलं तर. " " पण तो असलं नीच काम कधीं करणार नाहीं ही आपली तर खात्री आहेना ? " हो बरी आठवण झाली. त्या नोटी मीं आपल्या हातानं माझ्या धाकट्या पेटीच्या चोर-कप्यांत घालून ठेवल्या होत्या. मी जेव्हां गांवांहून परत आलें, तेव्हां त्यांची मला फार आठवण होऊन मी त्या शोधून बघायला गेलें. त्या कांहीं मला सांपडल्या नाहींत. अन् नाहीं सांपडल्या तर नाहीं. मी कांहीं त्याबद्दल पुन्हां चौकशी करणार नव्हतें. पण **अनं-**

तरावानं त्या कोणाच्या हेतूनं उचलून नेल्या हें कांहीं मला सांगतां येत नाहीं. ”

“ काय ! तो चोरी करील कदाचित् असा तुमच्या ह्मणण्याचा आशय काय ! वा ! मग तर मी आपला—” “ काय इथून जाणार ? जा बापडा. माझं काय गेलं त्यांत ? तुझा स्नेही मात्र हकनाक बुडेल !”

“ छे. आपण त्याला या वेळीं न सोडवणं ह्मणजे फार वाईट ! आपल्याला दयाच नाहीं. ”

“ असं नको ह्मणूं. ” “ नको ह्मणूं तर त्याला सोडवा ह्मणजे कळेल खरं खरं. नाहींतर माझी मला कांहीं खटपट केली पाहिजे. तुमच्या मदतीवर अवलंबून रहातां उपयोगीं नाहीं. ” “ छे. छे. मी मदत करीनच. तुझ्यासारखा माणूस इतक्या तऱ्हेनं त्याच्याबद्दल विनवण्या करीत असतां मी कशी उगीच बसेन. ”

“ तर मग त्या जोलरासाहेबांस हकीकत कळवून अनंतरावाची सुटका कराल ? ”

“ हा साहेब कोण कसा आहे. मला एकदां वर्णन द्या पाहूं. ”

“ तो असा पन्नाशीच्या जवळ जवळ वयाचा, मध्यम उंचीचा, सशक्त,, गोब्रच्या तोंडाचा आहे. आणखी त्यानें कल्ले ठेवलेले आहेत ते भुरे आहेत. ”

“ हं. हं. ” नबाबीण आपल्याशींच पुटपुटते व ह्मणते “ बरं त्याचं काम काय आहे ? ”

“ तें कांहीं मला ठाऊक नाहीं. पण तो कोणी तरी मोठा पोलिस अधिकारी आहे. ”

“ असेल. पण त्याचीन् तुमची भेट कशी झाली ? ”

यशवंतराव थोडासा घुटमळला पण लागलींच ह्मणाला, “ त्यांनींच तर अनंतरावास काल पकडला. मी तिथें होतों त्या वेळीं. मीं त्याचं नांव एका पोलिसच्या शिपायाला विचारलं आणखी आज सकाळीं गेलों त्याच्याकडे. ”

“ बरं. आतां एवढंच मला सांगा. अनंतरावाला तुरुंगांत नेलं तें त्यानंच नेलं का ? ”

“नाहीं. त्यानं नाहीं नेलं. एका व्हिक्टोरिएंत अनंतरावाला बस

वल्यावर दोन पोलिसचे शिपाई त्याच्याबरोबर दिले आणखी तो दुस- रीकडेच गेला. मीं कांहीं तो कोणीकडे गेला बिला शोध केला नाहीं."

" छे. ही मोठी चूक केली तुह्मीं. बरं तो कुठें जातो हें पाहिलं पा- हिजे होतं तुह्मीं. बरं तर आतां तुह्मी जा."

" पण बाईसाहेब आपण खास पोलिसांत एवढं कळवून अनंतरा- वाची सुटका करणार ना ?"

" आज रात्रीं ८।९ वाजतां पुन्हां इथें येऊन भेटला मला तर मी सांगेन काय तें, आतांच कांहीं सांगत नाहीं."

" रात्रीं आठ नऊ वाजतां पुन्हां हिच्याकडे यायचं ! काय ही बायको आहे कीं कोणी राक्षसी आहे. विलक्षण बाई बोआ ! नवऱ्या- ची, जातीची, गोताची कांहींच तिला भीति वाटत नाहीं. नवरा तरी कसा हा. त्यांतून मुसलमानभाई ! आपण इथें आलों तर काय प्रसंग गुदरेल आणि काय नाहीं." असे अनेक विचार त्याच्या मनांत आले. पण करतो काय, ' प्रसंग पडे बाका तो गद्धेकू कह्यना काका ' तशी त्याची स्थिति झाली. त्यानें येण्याचें कबूल केलें. थोड्याच वेळांत तो तेथून चालता झाला. नंतर जेवणखाणाची गोष्ट ! परंतु मित्राच्या संक- टापुढें त्याला भूक तहान सुचली कुठें !

४

आतां आपण पुन्हां एकदां परशुरामपंताकडे वळूं. हा गृहस्थ मुस- लमानी पेहेराव करून नबाबाशीं बुद्धिबळें खेळण्यास जात असे तो कोणच्या उद्देशानें हें वाचकास माहिती आहेच. कोणीकडून तरी नबाबणीची गांठ घेऊन कांहीं सुगावा लागल्यास बघावा हा त्याचा हेतु. नबाबीण ही येथेंच आहे, मेली नाहीं, तिचा खून कोणी केला नाहीं. ती गांवाहून परत आली ही हकीकत कशी त्याला कळली हें आतां सांगावयास नकोच. तो प्रसंग मला वाटतें परशुरा- मपंत यावज्जन्म विसरला नसेल. नबाबीण जीवंत असून गां- वांत आहे हें पाहिल्यावर परशुरामपंत खुनाच्या तपासाविषयीं अग- दींच निराश झाला. इतका वेळ त्याला खून कोणाचा झाला याबद्दल खात्री होती. आतां तीही खात्री खोटी ठरली, तेव्हां खूनही चकला

आणि खुनीही निसटला. यामुळें त्यास मनगटें चावण्याचा प्रसंग आला. पण तो पडला धीराचा तो कसचा डगमगतो ! तो कोचमन आणि खा-जदार या दोघांचा त्याला संशय होता तो कायमच होता. ह्मणून त्यानें **नबाबणी**ची एकदां गांठ घेण्याचा निश्चय केला. असा निश्चय करून त्याच दिवशीं ह्मणजे रविवारीं तो दुपारच्या वेळेस **नबाबाकडे** गेला. ते दिवशीं खेळांत यानें थोडीशी पड घेतली व **नबाबास** खुलवून सो-डला. **नबाब** आधींच शराबच्या रंगांत होते. आणि त्यांत आज इतके दिवस ज्यानें आपणांस हरवलें त्यावर जय मिळविला, मग काय विचा-रतां ! 'हायरे मेरे दोस्त, हायरे मेरे यार !' करून लागले त्याच्या गळ्यांत मिठ्या मारायला. व 'मंगलेव कुच चाहयेसो मंगलेव !' असें ओरडत सुटले. **परशुरामपंतानें** तेवढी संधि साधून त्यास आपली व **नबाबणी**ची मुलाखत करून देण्याचें दिलेलें वचन पुरें करावें ह्मणून मोठ्या युक्तीनें ह्मटलें. **नबाबभाई**च ते ! त्यांनीं लागलींच आपल्या नौकरा हातें बायकोस निरोप पाठविला. **नबाबीण यशवंतरावास** ला-वून देऊन नुकतीच स्वस्थ बसली होती ती तो निरोप ऐकून " जा येत नाहीं आतां ह्मणून सांग " असें मोठ्यानें ह्मणाली. चाकर निघून गेला. इतक्यांत काय तिच्या मनांत आलें ती उठली आणि **नबाबाच्या** बं-गल्यांत तो बसला होता तेथें जाऊन त्याला मला कशाला बोलावली ह्मणून विचारूं लागली. **नबावांनीं** कारण सांगितल्यावर तिनें हे कोण ह्मणून विचारलें. तेव्हां **परशुरामपंत** आपणच होऊन आपलें नांव गांव सांगूं लागला. एवढा डिटेक्टिव्ह तो पण त्यास धीरण राहिलें नाहीं. त्याचें बोलणें ऐकण्याबरोबर **नबाबणी**च्या चेहऱ्यावर जो कांहीं फेर-बदल झाला आहे तो वर्णन करतां येत नाहीं. तिनें त्याजकडे नीट न्या-हाळून पाहिलें. ती किंचित् चिंतातुर दिसली. एक मिनिटभर तिच्या मनांत कांहीं विचार झाल्यासारखें दिसलें. व ती लागलीच पूर्वस्थितीवर येऊन आपल्या नवऱ्याकडे वळून ह्मणते. " तुह्मीं बोलावणं पाठवलंत ह्मणून मी आलेंच नाहीं. पहिल्यानं मीं नाहीं येत ह्मणूनच निरोप पा-ठवला होता, पण मग मला आठवण झाली कांहीं ह्मणून लागलीच उठून आलें. आज सकाळीं मी आल्यापासून मी आपल्या **गुलनार**बद्दल सगळ्या माणसांना विचारून विचारून दमलें. कोणी दाद लागूं देत

नाहीं. मला संशय येतो तुमचा. तुह्मीं कुठें तरी तिला पळवली असावी. बोला कायतें."

**गुलनार** हा शब्द ऐकण्याबरोबर **परशुरामपंतांनीं** आपले कान सरसावले, व या नवराबायकोच्या संभाषणांतला एक शब्द देखील वांया जाऊं द्यायचा नाहीं असा त्यानें बेत केला. बाह्यतः असेंच दाखविलें कीं, आपण बुदबळांकडे पहात आहों.

"तुझी लवंडी **गुलनार** !" **नबाब** ह्मणतो, "मला काय ठाऊक ? कांहीं मी तिच्या पाळथीवर असतां ?"

"ती लटपट कांहीं कामाची नाहीं. तुमचं फार तिच्यावर लक्ष होतं. तुह्मींच तिला कुठें तरी ठेवली आहे. बोला मी गेल्यावर तिचं काय केलंत तें. तरी मीं त्या अवदसेला सांगितलं होतं कीं, तूं त्या बंगल्यांत अगदीं पाय देखील ठेवूं नको ह्मणून ! पण तिचं तरी काय चालतं तुह्मीं तिला मारली हांटली असली तर !"

"तूं आपल्याबरोबर नव्हती वाटतं नेलीस ?"

"नेली नव्हती ह्मणून तर तुह्मांला फावलं तिला पळवायला ! तुह्मांला पक्कं ठाऊक आहे कीं, मीं तिला नेली नव्हती. तुमच्या तैनातीतल्याच गाडींत बसून मी गेलें. माझी गाडी घोडा कोचमन् सारं तुह्मी घेऊन गेलां कुठें भटकायला मग मीं काय करूं. ते दिवशीं माझ्या गाडीवर आणखी माझ्या माणसांवरशी लहर फिरली होती !"

"कोणाची ? माझी ? मी कधीं तुझी गाडी घेतली होती ? आज किती दिवसांत बाहेर पडलं आहे कोण !"

"मला माझ्या कोचमनानं सांगितलंन् मीं आतां त्याला विचारलं तेव्हां."

"लुच्चा आहे तो ! कुठें तरी दारू पिऊन पडला असेल तो तेव्हां."

"बरं तें कांहीं असो. त्याचं काय मला करायचं आहे ! पण माझी **गुलनार** कुठें आहे तें सांगा."

"मला कांहीं ठाऊक नाहीं. मीं कांहीं तिला पाहिली नाहीं. गेली असेल कोणाबरोबर निघून. त्याचं काय मोठंसं ! ती आहे सुरेख ! तेव्हां—"

"एकून तुह्मी कांहीं सांगत नाहीं मला बऱ्या बोलानं. पाहून घे-

ईन मी सरकारापर्यंत जाईन याबद्दल. अस्सा प्रकार चालला आहे आतांशा किती दिवस ! "

असें ह्मणत ह्मणत रागानें पाय आपटीत ती चालती झाली.

हें संभाषण चाललें असतां **परशुरामपंत** मुकाट्यानें ऐकत होता. एकंदर संभापण होऊन **नबाबीण** निघून गेल्यावर तो आपल्याशींच विचार करतो. सांपडली ! आतां मख्खी सांपडली. **गुलनारचा** खून झाला, तो सिद्दी कोचमन आणि खाजदार यांनीं केला. करायला लावणार हा **नबाब.** या मूर्खाचें बायकोजवळ कांहीं चालत नाहीं, ती याला जुमानीत नाहीं, ह्मणून तिच्या लवंडीला मारून सूड उगवला. हेंच. शंका नको. मुसलमानभाई हा. याला बायकोचं वर्तन कांहीं आवडत नाहीं. तिच्यावर अंमल तर कांहीं चालत नाहीं. तेव्हां मग काय— हं, हं, आणखी याचं तिच्यावर लक्ष्यही होतं नाहीं का ! ठीक. आतां शंका कशाला पाहिजे; ती कबूल झाली नाहीं, टाका मारून झालं. काय विलक्षण प्रकरण ! पण शोध केला पाहिजे. आतां या वेळीं तर जावें. असा विचार करून त्यानें **नबाबाची** रजा घेतली. तो दारांतून बाहेर पडतो आहे तों **नबाबणीचा** एक नौकर त्याजवळ येऊन त्याला " आपल्याला बाईसाहेब बोलावताहेत " ह्मणून सांगूं लागला. **परशुरामपंतास** आणखी काय पाहिजे होतें ? तो लागलींच त्या गड्याबरोबर गेला. **नबाबणीच्या** समोर जाण्याबरोबर बसा वगैरे झाल्यावर **नबाबीण** ह्मणते " आपल्याला मीं पूर्वी कधीं पाहिलें असावें असें वाटतें. "

" आपण हिंडायफिरायला येतां व्याग्बेवर तेव्हां पाहिलं असेल बाईसाहेबांनीं. "

" नाहीं. नाहीं. तसं नाहीं. आपलं माझं बोलणं चालणं झालं असावं कुठें तरी नुकतंच. काल रात्रीं मी गांवदेवीकडे एका बंगल्यांत गेलें होतें तिथें आपण आलां होतां असं मला वाटतं. " हें बोलणें ऐकून **परशुरामपंताचा** अगदीं धीर सुटला; परंतु तसा कांहीं प्रकार न दाखवतां तो ह्मणतो " काय ! असं कसं होईल ! आपली चूक दिसते आहे. भूल पडली असेल दुसऱ्या कोणाला पाहिलं असेल आपण. गांवदेवी ती कुठें आहे तें मला ठाऊक देखील नाहीं. "

" आतां उगीच छपवाछपवी करण्यांत कांहीं तात्पर्य नाहीं. ती लावलेली दाढीच सांगते आहे आपण कोण आहां तें. "

हे शब्द ऐकल्यावर मात्र **परशुरामपंत** अगदींच मनांत चरकला. आजपर्यंत तो दिवसां असा पोपाख करून **नबाबा**कडे कधीं गेला नव्हता. आजच ही कुठून अवदसा आपल्याला आठवली असें त्याला झालें. शेवटीं होय नाहीं करीत त्याला सर्व गोष्ट कबूल करावी लागली. इतकेंच नव्हे पण आपण डिटेक्टिव्ह आहों हें दिखील त्याला नाकबूल करतां येईना. शेवटीं अगदीं फजिती झाली असें पाहिल्यावर कांहीं तरी बोलावयास पाहिजे ह्मणून तो ह्मणतोः—

" आपल्याला मी डिटेक्टिव्ह आहें असें कळलें होतें तर आपण मला बोलावून कशाला आणलें ? "

" एवढंच विचारायला बोलावून आणलं तुह्मांला कीं तुह्मीं त्या गांवदेवीच्या बंगलीवर जी पाळथ ठेवली होती ही काय ह्मणून ? मी आणखी **अनंतराव** तिथें भेटत होतों यावरून कांहीं आह्मी खोट्या नोटीबिटी तयार करतों कीं जुगार खेळतों असा कांहीं संशय पोलिसाला आला कीं काय ? "

" तसा कांहीं भाग नाहीं—"

" बरं कांहीं खूनबीन तिथें करतों असा संशय आला ? "

" हो. तसा कदाचित् आला असेल संशय. " **परशुरामपंत** आतां आपल्या शोधाच्या कामास या बोलण्यापासून फायदा होईल असें वाटून ह्मणतो.

" अस्सं. आत्तां तुह्मी जरा बेतावर आलां. पोलिसाला वाटलं कीं या बंगल्यांत खून झाला असावा. मला हें वाटलंच होतं. आणखी **अनंतरावा**वर माझा खून त्यान केल्याचा आरोप ठेवून त्याला तुरुंगांत टाकला. खासा रोजगार ! खूप पोलिस ! काय पण पोलिस ! यापेक्षां आमच्या संस्थानाची स्थिति शतपट बरी. "

" पोलिसाची चुकी झाली असेल, बाईसाहेब ! आपण एकदम इथून नाहींशा झालां यामुळं तसा संशय घेण्याला कारण झालं. "

" वा ! एकून एखाद्या माणसानं कुठें जातों काय जातों हें न सांगतां जावं मात्र, कीं पोलिसाला त्याच्यावर पाहिजे तो व्यूह—"

" त्यांत आणखी कित्येक गोष्टी होत्या हें विसरतां येत नाहीं. "

" बरं पण आतां मी जीवंत चांगली तुमच्या पुढें आहें, आतां तर कांहीं शंका नाहींना ? "

" नाहीं. " परशुरामपंत ह्मणतो " आपला खून झाला नाहीं ही गोष्ट अगदीं स्पष्ट आहे " " हें जर खरं आहे, " ती विलक्षण शहाणी नबाबीण त्याला विचारते " तर मग तुह्मी हीं सोंगं घेऊन आमच्या इथें बुद्धिबळें खेळण्याचा बहाणा करून कशाला येतां ? तुह्मी कदाचित् मला असं सांगाल कीं, मी गांवाहून परत येण्याच्या अगोदरच तुह्मी असं करायला लागलां होतां. पण कालरात्रीं तुह्मांला मी जीवंत आहें हें कळल्यावर आणखी आज कशाला आलां ? आमच्या इकडे खून केला असावा असं वाटून का येतां ? "

वास्तविक पहातां परशुरामपंताच्या मनांत तसा संशय आला होता खरा. तो आपल्या मनांत विचार करतो. नबाबाला बायको कोणच्या तऱ्हेची आहे हें पक्कं ठाऊक असून तो जेव्हां असा कानाडोळा करतो तेव्हां त्याचं कांहीं इच्यापुढें चालत नाहीं ही गोष्ट खरी. इच्यापुढें कांहीं चालत नाहीं तेव्हां हिला अन्य मार्गानें दुःख द्यावं असा त्याचा हेतु. हिची दासी गुलनार ही हिला ज्या त्या कामांत मदत करते तेव्हां तिला नाहींशी करावी. इमामभाईच ते! बायको तिला ठेवून गांवाला गेली असं कळल्याबरोबर फर्मावला हुकूम. नेली तिला त्या बंगल्यांत. आणखी टाकली मारून. गुन्हेगाराला फांशीं द्यायचा ह्मणजे जसा गुन्हा केल्या जागीं नेऊन केव्हां केव्हां फांशीं देतात त्याचप्रमाणे हें! काय शिताफी तिला मारून मग मुंडकं कापून धड समुद्रांत टाकायला सांगून——पण तें मुंडकं काय झालं ? मला वाटतं त्यानं असंच कुठें तरी लपवून ठेवलेलं असावं. नबाबणीला देखील मी ह्मणतों असाच संशय आलेला दिसतो आहे. तिच्या बोलण्याचा झोंक तर तसंच सांगतो खरा. इतका तो विचार करतो आहे तों नबाबीण ह्मणते:—

" कां ? बोलत कां नाहीं ? आमच्या बंगल्यांत येऊन यजमानाशीं सलगी करण्याचा हेतु काय ? हें पहा आतां लटपट कांहीं नको. तुह्मी डिटेक्टिव्ह आहां ही गोष्ट खास आहे. त्याबद्दल मला कांहीं

वाटत नाहीं. मी विचारतें तें सांगा ह्मणजे झालं. माझी **गुलनार** कुठें दिसत नाहीं. तिचा खून झाला असावा असं वाटतं का तुह्माला?"

"खून जर कोणाचा झाला असला तर मला वाटतं तो तिचाच झाला असावा."

"या असल्या टाळाटाळीच्या उत्तरांत कांहींच तात्पर्य नाहीं. मीं आपल्याला एक क्षणभर बसायला उठायला निराळा बंगला घेतला होता तिथें माझा कारभारी येत असे. मी एक दिवस नाहींशी झालें एवढ्यावरून तुह्मीं तर्क केलात कीं त्यानं माझा खून केला. काल मी गांवांहून परत आलें. मीं आपल्या दासीला ठेवून गेलें होतें. तिचा शोध करतां कुठें तिचा पत्ता लागत नाहीं. चाकरमाणसांना विचारतां तीं मी गेल्यापासून ती दिसलीच नाहीं ह्मणून ह्मणतात. तिकडे विचारलं तर कशीं उत्तरं मिळालीं तें ऐकलंतच.

"त्यांनीं कल्पना केली ती कांहीं खोटी नसेल. तुमची **गुलनार** फार सुरेख आहे. अन् त्यांतून ही मुंबई मग काय विचारतां! कोणी फुसलावली असली तर गेली असेल त्याच्याबरोबर निघून!"

"छे. नांव दिखील काढूं नका. ती अशी फुसलावून जायची नाहीं. ती मोठी वस्ताद आहे. आतां मला सांगायला शरम वाटते, आमच्या घरांतून तिला लाखों रुपये देतों, तुझ्याशीं लग्न लावतों असं दिखील ह्मणणं झालं होतं पण तिनं दाद दिली नाहीं."

"मग तिच्या हट्टाबद्दल त्यांना राग येऊन तिला त्यांनीं मरणाची शिक्षा दिली असेल."

"छत्! मला नाहीं तसं वाटत. त्यांतूनय् कोण जाणे बाई! पण छे. असं नाहीं व्हायचं."

"आपण जर मला एकंदर ती नाहींशी कशी झाली याची हकीकत सांगाल तर—"

"मला जी हकीकत माहिती आहे ती ही आहे. काल्च्याच्या मागल्या शनवारीं संध्याकाळीं अनंतरावानें मला कांहीं रुपये आणून दिले. मीं ते तसेच मी आपल्या कमरेला नेहमीं एक पिशवी बाळगतें त्या पिशवींत घालून ठेवले. पुढें मीं त्याला घेऊन आह्मी एक बंगला घेतला आहे तिथें गेलों. तिथें गेल्यावर मीं ते रुपये (नोटी) माझ्या पेटींत चोर-

कप्यांत घालून ठेवल्या. अनंतराव पलिकडल्या खोलींत होता त्याला कांहीं माहिती नव्हतं—"

"पण अनंतरावानं तुमच्याबरोबर तिथें गेलोंच नाहीं बंगल्यांत असं सांगितलंन्."

"खोटं तें. मीं रुपये ठेवले ते त्यानं पाहिले नाहींत, त्याला ते साहजिक सांपडले ही गोष्ट मात्र खरी. पुढें त्याचं माझं भांडण झालं. मीं त्याला चालता हो, तुझ्या चाकरीची मला गरज नाहीं ह्मणून सांगितलं. मी रागाच्या सपाट्यांत तिथून निघून गेलें. नोटी तशाच विसरलें. घरीं इथें आलें. त्याला पुन्हां तुझं मला दर्शन नको अशा अर्थाचं एक पत्र लिहिलं, तें दुसरे दिवशीं नेऊन देण्यासाठीं गुलनारजवळ दिलं."

"तें पत्र अनंतरावाला मिळालं असावं."

"मिळालं असलं तर तें तिनं दिलं असेल, नाहींतर पोष्टांत टाकलं असेल कोणीं तरी तिच्यापासून घेऊन. तें कांहीं सांगतां येत नाहीं मला, पण माझा जेव्हां लागलींच गांवीं जाण्याचा बेत झाला तेव्हां माझी तयारी वगैरे सारी गुलनारनंच केलीन्, आणखी मी तिला "इथेंच रहा मी आठ चार दिवसांत येतें असं सांगून गेलें."

"तर मग आपण त्या रात्रींच गेलां?"

"होय. मला जरूरीनं जायचं होतं. स्टेशनावर गेलें ती मी तिकडल्या गाडींतून गेलें. माझी गाडी घोडा, कोचमन वेळेला हजर नव्हते."

"तेंच. मला जी माहिती पाहिजे आहे ती हीच."

"मी जायला निघालें तेव्हां मला बरोबर न्या, मला इथें ठेवूं नका ह्मणून तिनं एकसारख्या विनवण्या चालवल्या होत्या. पण मीं तिचं ऐकलं नाहीं. आतां मात्र मला त्याबद्दल फार वाईट वाटतं आहे (सद्गदित होऊन) या आल्ला! काय झालं आहे तिचं!"

"पण आपण परत आल्यावर चौकशी केलीच असेलना? दरवाज्यावरच्या रखवालदाराला विचारलं विचारलं असेल कीं नाहीं ती केव्हां गेली कशीं गेली—"

"विचारलं. त्यांना कुणाला कांहीं ठाऊक नाहीं. त्यांत आणखी असं होतं कीं, गुलनार मागल्या बाजूच्या एका लहान दरवाज्यानं जात येत असे. त्याला कुलूप लावून त्याची किल्ली तिच्याजवळ ठेवली होती."

" बरं, आपली **गुलनार** नाहीं असं पहाण्याबरोबर सपाट्यास तुमच्या मनांत काय विचार आला एवढं सांगितलं तर—"

" भलतंच एखादं. " **नबाबीण** किंचित् राग दाखवून ह्मणते " तुह्मी आपले आतां काय तर्क करायचे ते करा. "

" तिला आपल्या नवऱ्याबद्दल संशय तर खास आला असावा, " **परशुरामपंत** आपल्याशींच ह्मणतो, पण त्यांचं नांव कसं घेईल ती— आतां आपल्याला जें काय माहिती आहे तें आपण सांगून पहावं का हिला? सांगावंच ह्मणजे ही जरा ज्यास्त मोकळेपणानं बोलली तर बोलेल."

" बरं, " **नबाबीण** हलकेच विचारते. " गेल्या आठवड्यांत कुठें एखादा खूनबीन झाल्याची कांहीं पोलिसांत वर्दी आहे?"

" होय. **अनंतरावानं** गांवदेवीकडे घेतलेल्या बंगल्यांत एक खून झाला आहे अशाबद्दल पोलिसाला पक्की माहिती आहे. त्या घराची तपासणी झाली त्यांत न्हाणी-घरांत फर्शी जरी अगदीं स्वच्छ धुऊन टाकली होती तरी रक्ताचे डाग वगैरे दिसून आले. ज्या इसमाचा खून केला, त्याच्या तोंडांत बोळा देऊन त्याला एका खुर्चीवर बसवला होता. त्या खुर्चीचं आतां कांहीं राहिलं नाहीं. बसण्याची ती वेतानं विणलेली जागा सगळी कापून टाकलेली आहे. रक्ताचे डाग वगैरे दिसूं नयेत ह्मणून खुर्चीचे हातबीत अगदीं रंधून टाकले आहेत. अन् माझी अगदीं खात्री झाली आहे कीं, त्या इसमाचा गळा कापून धड एकीकडे आणखी शीर एकीकडे असं केलं असावं. हत्यार बहुतकरून **तरवार**— "

हें **परशुरामपंताचं** बोलणं ऐकून **नबाबीणीचा** चेहेरा अगदीं फिक्का पडलासा दिसला, व ती " काय भयंकर कृत्य हें ! " असें पुटपुटून पुढें ह्मणाली:—

" अहो तुह्मी सांगतां हें सर्व ठीक आहे, पण मला अजून एका गोष्टीचा खुलासा कळला नाहीं. पोलिसाच्या मनांत प्रथमतः त्या गांवदेवीकडल्या घरांत शिरण्याचं कां आलं हें नाहीं नीट समजत. "

" आपला कारभारी आणखी आपण दोघं त्या घरांत एकाजागीं वेळ घालवतां हें ठाऊक असल्यामुळं, आणखी आपण एकाएकी नाहींशा झालां—"

" एवढ्यावरूनच पोलिस तिथें गेलं असेल असं नाहीं मला वाटत. आणखी कांहीं तरी कारण असावं."

परशुरामपंतानें असें पाहिलें कीं,आणखीही थोडी हकीकत सांगितली तरी हरकत नाहीं. तेव्हां तो ह्मणतो "कोणी दोघी गोवेंकरणींनीं स्वतां पाहिलेली हकीकत पोलिस कामगारास कळली तिचाही उपयोग झाला."

" दोघी गोवेंकरणींनीं ? "

" होय. गेल्या शनवारीं रात्रीं अकराच्या सुमारास कोणी एक गृहस्थ त्या दोघींना घेऊन ब्याक्बेवर चैनीनें हिंडण्यासाठीं जात होता. इतक्यांत वाटेंत गाड्यांच्या गर्दीमुळें विद्यारामभाईच्या वाडीजवळ कुठें त्याची गाडी उभी करावी लागली. तिथें त्यांनीं चमत्कार पाहिला तो असा, त्यांच्यापासून थोड्या अंतरावर एक मोठ्या श्रीमंती थाटाची गाडी होती; ती अगदीं आड उभी होती. गाडीला जोडी जोडली होती ती भली मोठी दणगट केप हॉर्सेसची होती; कोचमन् सिद्दीजातीचा होता. त्या गाडींतून एक भिकार पोषाख केलेला माणूस बाहेर पडला, आणि त्यानें एक भलें जंगी पोतें गाडींतून काढून आपल्या पाठीवर घेतलें. "

" काय चमत्कारिक गोष्ट ! मला नाहीं वाटत ही खरी असेल असं ! "

" खरी असावी. कारण त्यांनीं आणखी तो मनुष्य ब्याक्बेच्या बाजूला गेला हें दिखील सांगितलं. "

" अन् या त्यांच्या सांगण्यावरून तुह्मीं लागलींच तर्क बांधला कीं त्या पोत्यांत मुडदा असावा ह्मणून ! तो मुडदा असला तर सांपडता ह्मणजे बरं झालं असतं. "

" आणखी पुष्कळ सांगायचं आहे. तो मनुष्य समुद्रावर गेला तेव्हां त्याला तिघां गृहस्थांनीं पाहिला. त्या पोत्यांत काय आहे तें जाणण्याची त्यांना इच्छा झाली. ते त्याच्या पाठीमागें लागले. तो थोड्याच वेळांत पोतें टाकून पळाला. तो सांपडला नाहीं. पण पोतं उघडून पाहतां आंत खरोखरच मुडदा सांपडला. मुडदा बायकोचा होता. तिच्या पायाला दगड बांधले होते. "

" छे. फारच भयंकर बाई ! " नबाबिणीचें अंतःकरण क्षुब्ध होऊन ती ह्मणते: " मग ती बाई कोण काय याचा ठिकाणा लागला-च असेल; कोणी तरी तिला ओळखली असेल कीं नाहीं ? "

" नाहीं. कोणी ओळखली नाहीं. कारण मुडद्याचं मुंडकं कापून टाकलं आहे. तरी तो मुडदा मसाला वगैरे घालून, कुजूं नये अशी त-जवीज केली आहे. अजून जरी तें मुंडकं आमच्या हातीं लागलं तरी पत्ता लागेल; पण कुठलं सांपडायला ? मला तर वाटतं कीं तें अगदीं नाहींसं करून टाकलं असावं—वेळेस जाळलं दिखील असेल. "

" ते ऐकून नबाबीण एकदम बसल्या जागची उठली. तें पहा-ण्याबरोबर परशुरामपंतासही उठावें लागलें. तरी त्याला हें खास वा-टत होतें कीं, ही आपणास इतक्यांतच जा ह्मणून सांगणार नाहीं. नि-दान त्याची इच्छा अशी होती कीं, आणखी कांहीं वेळ बसून तिच्या तोंडूनच आपल्या नवऱ्याबद्दल संशय बोलवावयाचा. किंचित् वेळ गे-ल्यावर नबाबीण ह्मणते " छे. फार भयंकर गोष्ट सांगितलीत ही तुह्मीं. पण मीं जं तुह्माला विचारलं त्याचं तुह्मीं मला उत्तर नाहींच दि-लंत. ही सगळी हकीकत कळल्यावरून तुह्मी त्या अनंतरावाच्या बं-गलींतच कसे शोध करायला लागलां ? "

हकीकत सांगतां सांगतां परशुरामपंत बराच वाहवला होता ! त्या-मुळें आतां त्यास मागें घेतां येईना. " बाईसाहेब ! " तो ह्मणाला " डाक्टरनीं त्या प्रेताची परीक्षा केली तेव्हां असें सांगितलें कीं, ही बाई अफू खाणारी असावी. शिवाय मुडद्याचा पोषाख मुसलमानी होता. "

" बरं मग ! अफू खाणारी असली, आणखी मुसलमानी पोषाख असला ह्मणून काय झालं ? " नबाबीण मोठ्यानें ह्मणते. " तेवढ्याव-रून अशी कल्पना,-असं; असं. " ती मोठ्यानें हंसून ह्मणते—" मी अफू खात असतें हें पोलिसाला ठाऊक आहे. आणखी तेवढ्यावरून बांधला त्यांनीं तर्क ह्मणतां, कीं तें प्रेत माझंच असावं ! "

" नाहीं. अफू खाणं हें एक कारण होतं; शिवाय ती श्रीमंती था-टाची गाडी, ते थोरले भयंकर केप हॉर्सेस्—[ घोडे ] आणखी तो सिद्दी कोचमन. हें कांहीं संशयाला थोडं नव्हतं. त्यांत आणखी असं

कळलं कीं आपण कुठें दिसेनाशा झालां आहां.—आणखी—आपण आतां अगदीं खरं खरं सांगण्याबद्दल आग्रह धरला आहे ह्मणून सांगतों. माफी असावी.—"

" कांहीं हरकत नाहीं. चालूं द्या. "

" **अनंतरावा**चा आणखी आपला संबंध पुष्कळांना ठाऊक आहे. पोलिसानं सावधगिरीनं तपास करतां असं कळलं कीं, आपण गेल्या शनवारीं रात्रीपासून. कुठें गेला त्याचा पत्ता नाहीं. चाकर माणसं ह्मणालीं आपण गांवीं गेलां आहां. पण पोलिसाचा समज असा झाला कीं आपणांवर कांहीं तरी भयंकर प्रसंग गुदरला असावा. "

" आलं लक्ष्यांत, पण खून त्या गांवदेवीकडल्या बंगल्यांतच झाला असावा असं कां वाटलं ? "

" आपल्या खुनाविषयीं संशय आल्या वेळेपासून पोलिसाला असं वाटलं कीं, खून करणारा माणूस **अनंतराव** असावा. असे खून मत्सरानं होतात. पोलिसाची अशी समजूत झाली कीं, आपलं व **अनंतरावाचं** भांडण झालं असावं; ( अन् त्याप्रमाणें झालं असं आपण ह्मणतांच. ) त्या भांडणाचं फळ खून असावा, असं वाटलं. आपली एक जागीं भेटण्याची बंगली शोधून काढली. खून झाल्यापासून तीन दिवसांनीं एक डिटेक्टिव्ह त्या बंगलींत गेला, त्याच्या नजरेस त्या ठिकाणीं रक्ताचे डाग वगैरे पडले. त्यानं लागलींच त्या ठिकाणीं सक्त पहारा ठेवला. पहारेकऱ्यानें **अनंतरावास** नोटी खिशांत घालतांना पाहिलें. "

" ज्या डिटेक्टिव्हनं या गोष्टी केल्या, ज्याला या गोष्टी कळल्या ते तुह्मीच नव्हे का ? पोतं उघडून पाहिलं; त्या माणसाचा पाठलाग केला ते सारे तुह्मीच ? "

" होय. मीच. पण मी एकटा नव्हतों. मी त्यांत शिरलों तो अगदीं अवचित. " इतकें बोलून **परशुरामपंतानें** मागल्या शनवारची सर्व हकीकत कसकशा तऱ्हेनें घडली तें सर्व सांगितलें; व शेवटीं **यशवंतराव** स्वतां **अनंतरावास** पकडण्याच्या कामांत न जाणून कां होईना—पण कसा मदतगार झाला हेंही त्यानें सांगितलें. तो पुढें ह्मणाला " मींच त्याला **जोलरासाहबाकडे** पाठविला. आणि ह्या साहेबांनीं त्याला आपल्याकडे पाठविला असेंही मला समजलें आहे. आमचे साहेब आहेत

फार दयाळू. त्यांचा पहिल्यापासून आग्रह **अनंतरावाला** सोडून द्यावा, तो निरपराधी आहे, असा. पण आतां आपली व माझी भेट झाली त्यावरून मलाही वाटतें कीं, तो खराच निरापराधी आहे. चोरीचा दिखील आरोप त्याच्यावर ठेवतां येणार नाहीं. "

हें शेवटलें बोलणें मुद्दाम उकरून काढण्यासारखें होतें. मनांतला आशय हा कीं, **नबाबीण अनंतरावा**च्या अपराधाबद्दल काय ह्मणते तें पहावयाचें. पण ती बाई कसली वस्ताद ! तिनें त्यासंबंधीं एक अवाक्षर देखील काढलें नाहीं.

" तर मग एकून या चमत्कारिक धडाबद्दल गांवांत बभ्रा वगैरे झाला नाहीं याचें कारण आपला चतुरस्त्रपणा ! " **नबाबीण** हंसत हंसत त्या आपल्या मतानें फार चतुर डिटेक्टिव्हाकडे पाहून ह्मणते.

" होय बाईसाहेब. या एकंदर खटल्यांत मीं विलक्षण सावधगिरी राखली ह्मणूनच फार चांगलें झालें. मला वाटलेंच कीं आपण आणखी आपले यजमान यांच्यासारख्या बड्या बड्या मंडळीची विनाकारण—ही होण्याचा हा खटला. सावधगिरीच राखली पाहिजे. अन् आतां माझीं सहोणीं पहिलीं अनुमानं चुकलीं असं जेव्हां दिसलं तेव्हां तर त्या गोष्टीचा बभ्रा केला नाहीं हें फारच बरं झालं, असं मला वाटायला लागलं आहे. **अनंतरावा**चं काय, त्याला मोकळा सोडून दिला कीं झालं ! "

" बरं आमच्या चाकरमाणसांजवळ कांहीं चौकशी नाहीं केली वाटतं तुह्मीं ? "

" नाहीं. अजून नाहीं. अन् त्याला कांहीं कारणं आहेत. "

" माझ्या आलीं आहेत तीं कारणं लक्ष्यांत. तुह्माला असं वाटतं आहे कीं खून करणाराला त्यांची मदत मिळाली असावी. "

" बराबर. तोच माझ्या मनांतला विचार. अन् ह्मणून मीं त्यांच्यावर नजर ठेववली. "

" अन् तेवढ्याकरितांच हीं सोंगं ढोंगं करून इथें येत होतां वाटतं. पण यापुढें मला नाहीं वाटत तिकडे आपली गांठ घेतील असं. मग काय कराल ? "

" आतां काय. दुरून दुरून होईल तें होईल; पण आपण तरी

आपल्या लवंडीचा खून कोणी केला तें शोधून काढण्यांत मला मदत कराल. मी आपल्याला विचारतों एवढं सांगाल ? तिला अफू खाण्याची संवय होती का ?"

"मला कांहीं पक्कं ठाऊक नाहीं. पण असण्याचा संभव आहे. कारण माझी अफूची डबीबिबी तिच्याच स्वाधीन असे. संपली ह्मणजे आणीत असे तीच. माझ्या दृष्टोत्पत्तीस काहीं कधीं आलें नाहीं."

"आपल्याला तिचं धड दिसलं तरी ओळखायला येईल नाहीं ? मघाशीं सांगितलेलं तें धड अजून मसाला घालून जसंच तसंच ठेवलं आहे. आपण पहायला याल तर.—"

"मी !" **नबाबीण** ओरडून ह्मणते, "भलतंच एखादं. तुह्मांला वेडबीड तर नाहीं लागलं ? असं तें भयंकर धड एक क्षणभर तरी पहावेल का माझ्यानं, अन् त्यांतून मुंडकं नाहींच ह्मणतांना ?"

"तिच्या पायाला मेंदी लावलेली आहे. आणखी पाय मोठे सुंदर आहेत. नेहमींचा पहाणारा सहज ओळखील—शिवाय डाव्या खांद्यावर दोन तीळ आहेत.—पण आपण तिथें न येणें हें अगदीं साहजिक आहे. मी त्याबद्दल आपल्याला आग्रह करीत नाहीं. एक तर तें सांपडलेलं धड आपल्या लवंडीचंच अशाबद्दल माझी अगदीं खात्री झाली आहे. जरूर पडली ह्मणजे आपल्याखेरीज पुष्कळ मंडळी आहे. त्यांना नेऊन ओळखवूं. तितका वेळ थांबायला येईल. दुसरं असं मला वाटतं कीं, तुमच्या लवंडीचा जो खून झाला आहे हा तुमच्या नोकरांपैकीं कोणाच्या तरी हातून झाला आहे. आपली तिच्यावर इतकी अतोनात मर्जी आहे हें पाहून ते तिचा द्वेष करूं लागले असतील किंवा त्यांच्यापैकीं एखाद्याचें तिच्यावर प्रेम बसलेलं असून ती त्याला वश झाली नसेल. शिवाय ती त्या गांवदेवीकडे पुष्कळशी जाते येते हें पाहून त्याच्या मनांत काळं बेरं येऊन त्यानं तिचा खून केला असेल. ती कुठें जाते तो शोध ठेवून तिला तिथेंच नेऊन गुलामांनीं मारली. त्यांत आणखी संध्याकाळींच आलेल्या नोटी आपण तिच्याजवळ दिल्या असतील त्या उपटायला सांपडल्या तर पहाव्या हें पण एक त्यांच्या मनांत आलं असेल."

"हं ! हं ! मी नेहमीं तिच्या हातांत पांच पांच सात सात हजार

रुपये ठेवीत असे खरी ! मग एकूण तुमचं ह्मणणं असं कीं, माझ्या चाकरमाणसांपैकींच कोणी तरी—हां बरी आठवण झाली. मला स्टेशनावर जायला ते दिवशीं गाडी मिळाली नाहीं. तो कोचमन् आणखी खाजदार दोघेही कुठें नव्हते त्यावेळीं."

" अन् आपण कोचमनला विचारलं तर तो काय ह्मणतो कीं, मला धनीसाहेबांनीं दहा वाजतां बोलावलं होतं का ? खून झाला तो सुमार ११ वाजायच्या सुमाराला झाला. आणखी **नबाब**साहेब ह्मणतात कीं कोचमन् लुच्चा आहे खोटं बोलतो."

" **नबाब**साहेबांचं नांव घेतां ? हें काय हें भलतंच ! अशी गोष्ट कालत्रयीं दिखील व्हायची नाहीं. हें असलं बोलायचं असेल तर इथून उठा कसे ! त्यांना **गुलनार** आवडत नसे; तिच्यावर त्यांची मर्जी फार खप्पा होती, ह्मणून असं का कुठें होईल !"

" छे. छे. छे. अशी गोष्ट मी तोंडानं काढीन तरी कशी! **नबाबसाहेब** काय ! आपण काय. आपल्याविषयीं घेईल का कोणी संशय ? स्वप्नांत देखील ही गोष्ट नका आणूं. निदान आतां तरी नाहीं. पुढचं पुढें सांगवत नाहीं."

" असं व्हायचं नाहीं, पण बाई जर झालंच असलं तर मग—"

" ते चाकर जें काय करतील, बोलतील त्या सगळयांवर पोलिसाची पक्की नजर आहे. एक शब्द जायचा नाहीं आह्मांला कळल्याशिवाय!"

" बरं त्यांच्या बोलण्यांत खरोखरीच असं कांहीं आलं, कीं धनीसाहेबांच्या सांगण्यावरून आह्मीं **गुलनार**ला मारली तर मग—?"

"तर मग काय ? पोलिस त्यांना धरील. इंग्रज सरकारच्या राज्यांत कायद्यापुढें सगळे सारखे."

" अगबाई ! हें एक अरिष्टच ह्मणायचं !—पण पुरे झालं. मला आतां कंटाळा आला या गोष्टीचा. मी आतां स्वस्थ पडतें अंमळ. कांहीं जास्ती कमती नजरेस आलं तर मला पहिल्यांदा कळवल्याखेरीज बरीक, कांहीं करूं नका बरं का !" **नबाबीण** उठून हंसत हंसत ह्मणाली.

इतकें ती बोलल्यावर **परशुरामपंत** उठलाच; व सलाम ठोकून चालता झाला. त्याचा चेहरा आतां आनंदानें खुलल्यासारखा झाला होता.

वराच्या बाहेर पडतांना आपल्याशींच ह्मणतो " अगदीं आतां पुरा खुलासा झाला. जोल्रा साहेब आतां जर मजवर खुष होणार नाहींत, तर मग त्यांची हद्दच ह्मणावयाची ! आतांपर्यंत चूक झाली होती ख- री, पण ती आतां अगदीं भरून आली. नबाबानं त्या सिद्दीकोच- मनाला आणखी त्या खाजदाराला वळवून घेऊन आपल्या बायकोच्या लवंडीला मारवली यांत मुळींच शंका नाहीं. सरकारचं पोलिटिकल खातं जर मधें आलं नाहीं तर हा खटला एक भला जंगी होईल. ही बाई कांहीं त्याच्या सुटण्याकरितां खटपटी करणार नाहीं. आजपर्यंत आपण पुष्कळ स्त्रिया पाहिल्या, पुरुषही पाहिले, पण ही बाई कांहीं विलक्षण बोवा ! तिला लाज नाहीं, भीति नाहीं, कांहीं नाहीं. पण आतां आधीं साहेबाकडे गेलं पाहिजे. त्या कोचमनाला आणखी त्या खाजदाराला क्षणाचा देखील विलंब न करतां पकडलं पाहिजे. त्यांची जबानी घेऊं. ते कबूल जबाब देतील, अन् मग नबाबाचं पाहूं. अ- नंतरावाला आतां सोडून दिलाच पाहिजे. " अशाच तऱ्हेचा विचार करीत करीत परशुरामपंत आपल्या कामास चालता झाला.

५

नबाबणीच्या वरून यशवंतराव निघाला, तेव्हां दोन प्रहर उलटून गेली होती. तो त्या ठिकाणाहून जो निघाला तो वाटेनें आधीं यमुनेकडे जावें, कीं आधीं जेवणाखाण्याची तजवीज करावी, या वि- चारांत होता. यमुनेकडे गेलं असतां आपला भाऊ कुठें गेला आहे असा ती साहाजिकच प्रश्न करील आणि तिनें असा प्रश्न केला, ह्म- णजे तिला सांगावें काय ? बरें तिच्याकडे मुळींच न गेलें तर ? छे. सकाळपासून अनंतरावाची वार्ता नाहीं, शिवाय कालचं त्याचें फार चमत्कारिक वर्तन. या सगळ्या गोष्टी तिच्या मनांत उभ्या राहून, तिचें मन किती अस्वस्थ झालें असेल आणि किती नाहीं, याचा कांहीं नेम आहे ? ती अजूनपावेतों कदाचित् जेवलीही नसेल तिचा समा- चार घेतल्याखेरीज व तिचें समाधान केल्याखेरीज आपण अन्न घेणें हें अगदीं गैरशिस्त असें त्याचें मन त्याला सांगूं लागलें. इतकेंच नव्हे तर त्याचे पाय त्याला न जुमानतां यमुनेच्या घराकडे जाऊं लागले.

घरीं जाऊन पहातो तों माडीवर यमुना एकसारखी रडत बसली

आहे व ती सैंपाकीण बाई तिची समजूत करीत आहे असें त्याच्या दृष्टीस पडलें. याला पहाण्याबरोबर ती सैंपाकीण बाई पुढें आली व **यशवंतरावास** ह्मणाली, " बरं झालं बाई तुह्मी तरी आलांत. अहो आज सकाळपासून यांनीं रडण्याचा अगदीं कांहीं अनर्थ केला आहे. अजूनपर्यंत आंगधुणं नाहीं, खाणं नाहीं, पिणं नाहीं, कांहीं एक नाहीं. एकसारखं हें चाललं आहे कीं, माझ्या दादावर कांहीं तरी किचाट आलं आहे. आतां तो कांहीं मला कधीं दिसायचा नाहीं. मी त्यांना पुष्कळ सांगसांगून दमलें, पण त्यांचं रडणं कांहीं थांबत नाहीं. आतां काय करावं ? "

" पण " **यशवंतराव** कांहीं तरी बोलायचें ह्मणून बोलतो, "**अनंतरावा**वर कांहीं तरी किचाट आलं आहे असं वाटायला कारण तरी काय झालं ? " " तेंच मी त्यांना विचारतें आहें " ती बाई झटकन् ह्मणते. " पण त्या बाई कांहींच बोलत नाहींत. सकाळपासून—काल रात्रीपासून आतांपर्यंत घरीं आले नाहींत एवढंच कारण असलं तर त्यांत कांहींच अर्थ नाहीं. त्यांचं हें नेहमींचंच आहे. काय असेल तें असो. तुह्मी तरी आतां विचारा. हो बरी आठवण झाली, मधें कोणीशी एक चिठ्ठी आणून दिली ती पाहिल्यापासून तर त्यांचं मन फारच घांबरल्यासारखं झालं. "

" चिठ्ठी आणून दिली ! " **यशवंतराव** आश्चर्यानें विचारतो.

हा त्या बाईचा व **यशवंतरावा**चा संवाद चालला असतांना **यमुनेनें** एक शब्दही उच्चारला नव्हता, परंतु चिठ्ठीची गोष्ट निघाल्याबरोबर **यमुनेनें** एकदम ह्मटलें, " **यशवंतराव**, खरेंच सांगाहो कुठें आहे माझा दादा तो ! तुह्मी कुठें होतां सकाळपासून ? "

हे दोनही प्रश्न ऐकण्याबरोबर **यशवंतरावा**च्या मनांत काय आलें असेल याचा विचार वाचकांनींच करावा. सर्व खरी खरी हकीकत हिला कळली आहे कीं काय अशी त्याला शंका आली. जर तिला सर्व हकीकत कळली असेल तर आतां तिच्यापासून चोरून ठेवण्यांत कांहींच हंशील नाहीं. जर कळली नसेल, तर तिच्या मनाची ही अशी स्थिति झाली असतां ही विलक्षण गोष्ट सांगून तिच्या मनाची आणखी दुर्दशा करणे हें अतिशय गैरशिस्त होईल. असा तो मोठ्या बुचकळ्यांत प-

डला. पण झट्कन् ह्मणाला, " कां बरं ? असं कां विचारतां ? मी आतां ह्या विऱ्हाडाकडूनच आलों. आणखी काल रात्रीपासून **अनंतराव** कांहीं मला भेटला नाहीं. मग मला कांहीं माहिती असण्याचा संभव नाहीं." ते त्याचे शब्द ऐकून **यमुना** एकदम गाहिंवरली, आणखी एकदम मोठ्यानं ह्मणते, तुह्मी देखील मला फसवायला पहातांना ? "

हे तिचे शेवटले शब्द आणखी विशेषतः 'तुह्मी देखील' हा शब्द कोणत्या तऱ्हेनें उच्चारला गेला असेल, त्याबरोबर तिचें सर्व हृदय बाहेर येऊं लागलें असेल तें कसें इत्यादि गोष्टी शब्दांनीं वर्णन करून सांगणें अशक्य आहे. प्रत्यक्ष ते शब्द ऐकणारा **यशवंतराव** किंवा खरा रसिक वाचक या दोघांसच ते कळतील.

**यशवंतरावानें** ते शब्द ऐकण्याबरोबर त्याच्या डोळ्यांत पाणी आलें, तो सद्गदित झाला व एकदम ह्मणतो " कां बरं ? मी तुह्मांला फसवतों असें कां तुह्मांला वाटतें ! "

हा **यशवंतरावाचा** प्रश्न ऐकण्याबरोबर **यमुनेनें** कपाळाला आठी चढविली व त्या सैंपाकणीकडे साशंक पाहून ती ह्मणते " तुह्मी आतां त्या **नबाबाच्या** बंगल्याकडून नाहीं आला ? "

पाण्यांत ' ढेंकूळ टाकल्याबरोबर जसें तें एकदम विरघळतें तशी **यशवंतरावाची** स्थिति झाली व तो एकदम इंग्रजींत **यमुनेस** ह्मणाला. " होय, मग मी गेलों होतों खरा. तुह्मांला हें कसं कळलं मला कांहीं समजत नाहीं. मी सांगणार नव्हतों पण आतां सांगितल्याखेरीज गत्यंतर नाहीं; **अनंतरावावर** खरोखरीच थोडेंसें संकट आलेलें आहे. त्यांतून त्याची सुटका होणें हें त्याच्या त्या **नबाबणीच्या** हातांत आहे, ह्मणून तिची गांठ घेण्यास गेलों होतों. या सैंपाकीण बाईच्या देखत मला सगळी हकीकत सांगतां कशी येईल ? तुह्माला ही हकीकत कोणीं सांगितली ? " .

हें **यशवंतरावाचें** बोलणें ऐकून **यमुना** जरा गोंधळली;पण लागलींच तिनें ओंच्यांतून एक चिठी काढून **यशवंतरावापुढें** टाकली, त्यानें ती उघडून पाहिली तों त्यांत पुढील मजकूर होता. " तुझ्या भावावर फारच मोठें संकट आलेलें आहे हें पक्कें माहिती असून त्याची चाकरी आणखी— सारेंच मिळविण्याकरितां **यशवंतराव** झटतो आहे. तो यावेळीं **नबाब-**

णीच्या बंगल्यावर जाऊन बसला आहे ! हें त्याचें तुझ्यावरलें आणखी तुझ्या भावावरलें प्रेम ! हे सुधारक ! " हा मजकूर पाहून **यशवंतराव** अतिशय संतापला; व अक्षर ओळखावें ह्मणून ती चिठ्ठी पुनः पुनः वाचूं लागला. चिठी होती वेड्यावांकड्या बाळबोध अक्षरांनीं लिहिलेली. ती काय त्याला ओळखूं येणार ! ती वाचल्यानंतर तो तिच्याकडे एकसारखा पाहूं लागला. तिच्या पुष्कळ मनांत आलें कीं, सैंपाकीण बाईस खालीं लावून देऊन आपण याला सर्व हकीकत विचारावी; परंतु ती लोकमताला फार भिणारी होती. आपल्या शिकण्यामुळें, व फार उशीर होईपर्यंत अविवाहित राहण्यानें लोकनिंदा होते आहे तेवढी पुरे. परपुरुष येऊन त्याचा व हिचा एकांत होतो, अशी आणखी कंडी उठूं नये. त्यांतून काल रात्रींच **यशवंतरावा**बरोबर आपल्याला एकटेंच थेटरांत जाण्याचा व तेथून गाडींत परत येण्याचा प्रसंग आलेला; तेव्हां आणखी असा प्रसंग नको. असा विचार करून तिनें त्यास इंग्रजींतच ह्मटलें; " कांहीं हरकत नाहीं ही बाई इथें असली तरी; आपण इंग्रजींतच सर्व हकीकत सांगा. मला वाटतें सध्यांच्या प्रसंगीं ती समक्ष असणें हेंच इष्ट आहे. **अनंतराव** आहे कुठें ? त्याच्यावर काय संकट आलें आहे ! ती चिठ्ठी मघाशीं आल्यापासून मला अगदीं वेड्यासारखें झालें आहे. मी ती घेऊन कोटांत आपल्या मास्तरणीकडे जाण्याचा बेत करीत होतें. ह्मणजे ती कांहीं तरी मला युक्ति सुचवितीं. "

**यशवंतरावः**—बरं झालं तर मग मी वेळेवरच आलों. ही गोष्ट जितकी गुप्त राहील तेवढी बरी. आपण त्या मडमीकडे गेलां असतां ह्मणजे तिनें पहिली गोष्ट ही केली असती कीं, पोलिसांत वर्दी दिली असती अमुक मनुष्य सांपडत नाहीं त्याचा शोध लावा ह्मणून. या खेरीज तिनें काय केलें असतें !

**यमुनाः**—तें जाऊंद्या. पण **अनंतराव** कुठें आहे ?

**यशवंतरावः**—गाढवपणाची चुकी करून पोलिसानें त्याला पकडला आहे. काल रात्रीं गाडींत चढायच्या वेळीं ज्या गृहस्थानें हांका मारली तो पोलिसांतला होता. त्यानेंच त्याला पकडून दिला. आतां तो तुरुंगांत आहे.

**यमुने**ला ती सैंपाकीणबाई जवळ आहे हें भान न राहून ती मोठ्यानें व

एकदम मराठींत ह्मणतेः—"काय! माझा दादा तुरुंगांत आहे तुरुंगांत?" हे शब्द आणि दुःखाचा उमाळा हीं दोनही एकदमच बाहेर पडलीं. परंतु नशीबानें एवढें बरें झालें कीं, तिच्या तोंडून निघालेलें वाक्य जरी मराठी होतें, तरी मुद्याचा शब्द जो 'तुरुंग' त्या ऐवजीं इंग्रजींतील-च शब्द पडला होता.

तिच्या दुःखाचा तो उमाळा बाहेर पडण्याबरोबर यशवंतरावाच्या पोटांत अगदीं ढवळून आलें; व तिला पोटाशीं धरून तिची समजूत करावी ह्मणून त्याचे हात पुढें होण्यास सिद्ध झाले; परंतु लोकमताच्या भीतीचा जबरदस्त कोरडा बसल्याकारणानें ते जेथल्या तेथेंच बसले. दुःख गिळून यमुना विचारतेः—" असा त्यानं गुन्हा तरी कोणचा केला ह्मणून त्यांचं ह्मणणं आहे ? "

" तें कांहीं विचारूं नका. सांगायला दिखील मला शरम वाटते. काय शिंचं पोलिस आहे कीं आहे तरी काय? एक तर त्याच्यावर जिला त्यानं कधीं पाहिली देखील नाहीं अशा बाईचा खून केल्याचा आरोप आहे. चोरीचा—"

" वाहवा ! वाहवा ! " ओक्साबोक्शीं रडत यमुना मराठींत ह्मणते. " आणखी तुह्मीं माझ्यापासून हें चोरून ठेवलंत कालपासून !"

" मला असं वाटलं होतं कीं, सकाळ झाली नाहीं तों त्याची सुटका होईल आणखी मग ही गोष्ट मुळींच तुह्मांला कळायला नको. पण तसं झालं नाहीं, तरी मी अगदीं शपथपूरस्सर सांगतों, कीं पोलिसची चुकी पोलिसाच्या लक्ष्यांत आलेली आहे. त्याला आतां ते लवकर मोकळे करतील. पण तें सगळं त्यांच्या त्या तंत्रामंत्राप्रमाणें झालं पाहिजे एवढ्याकरितांच कायतो उशीर. "

" काय तरी बाई ! चुकून धरलेल्या माणसाला सोडायचा ह्मणजे दिखील का तंत्रन् मंत्र ! शिकस्त आहे झालं ! "

" ज्यांचा माल ह्मणून पोलिसाचा समज आहे त्या माणसाची कायती जबानी घ्यायची आहे. "

" कोणाचा माल ! "

" नबाबणीचा. जिच्या पाशांत सांपडल्यामुळें आज त्याच्या साऱ्या जन्माचं मातेरं झालं तिचा. तिच्याकडे मी आतां गेलों होतों तो एवढ्या-

च कामाकरितां. तिनं त्याला सोडवण्याचं वचन दिलं आहे. पोलिसांत कळवणार आहे कीं, माझा अनंतरावावर पुरा विश्वास आहे; त्यानें जे रुपये आमच्या भेटण्याच्या बंगलींतून घेतले ते मला देण्याकरतांच घेतले. तो कधींही पैशाची अफरातफर करणार नाहीं अशी माझी खात्री आहे."

"पण ती खरोखर असें करील का ? तुह्मांला वाटतं का ती असें कळवील ह्मणून ? मला नाहीं बाई येत तिचा विश्वास ! ती राक्षशीण आहे, राक्षशीण ! तुह्मालान् दादाला वाटत असेल कीं मला कांहीं ठाऊक नाहीं ह्मणून ! पण मला सारें ठाऊक आहे. माझ्या दादाला तिनें वेड लावलें. त्याला घर नको, दार नको, लगीन नको, बायको नको, असें वाटायला लागलें तें तिच्यामुळें. राक्षशीण, पक्की राक्षशीण आहे ती."

"माझा तिच्या शब्दावर विश्वास बसला नसता. पण सध्यांचा वेळच असा आहे कीं, तिला ह्मटल्याप्रमाणें केलं पाहिजे. नाहीं तर तिची सगळ्या जगभर छीः थूः होईल."

"तिला कसली आली आहे फजितीन् काय ? छे बाई ! दादाला सोडवण्याचा दुसरा कांहीं तरी उपाय योजावा. तिच्याकडून कांहीं व्हायचं नाहीं असं मला वाटतं. आणखी आपण पुनः तिच्याकडे मुळीं, मुळीं कसं तें जाऊं नये."

ह्या शेवटल्या वाक्यांत काय काय तरी प्रेमार्थ भरला होता ! तो एक यशवंतरावास किंवा यमुनेसच ठाऊक !

"काय ह्मणतां अनंतरावाला सोडवण्यासाठीं रदबदली करायला दिखील जाऊं नको तिच्याकडे ?"

"मग काय पुनः तिकडे जावं लागेल ?"

"मी निघून गेल्यानंतर तिनं काय केलं, तें समजण्याकरितां मला तिनं पुनः बोलावलं आहे रात्रीं ८ । ९ वाजतां ! माझ्या पाठोपाठ ती त्या साहेबाकडे पत्र पाठविणार होती."

"आणखी तुह्मी जाणार तिला भेटायला !"

"वास्तविकपणें गेलं पाहिजे. पण आपण नको ह्मणत असलां तर नाहीं जाणार."

"ठीक आहे, जा. पण मला आधीं हें सांगा कीं, कुणाचा खून केल्याचा त्याच्यावर आरोप आणला होता ?"

" मला वाटतं कीं खुद्द **नबाबणी**चाच खून केल्याचा त्याच्यावर आरोप होता. ती एकाएकीं मुंबईतून नाहींशी झाली, कुठें गेली कुणाला तपास लागेना. तेव्हां—पण आतां ती परत आली आहे त्याबरोबर अर्थातच आरोपाची इतिश्री झाली. "

" काय ह्मणतां ! नुसती **नबाबीण** नाहींशी झाली एवढ्यावरूनच त्याच्यावर तिच्या खुनाचा आरोप घातला ? "

" नाहीं. तेवढ्यावरूनच असें नाहीं. ती गेली त्याच दिवशीं ब्याक्बेवर एका बाईचा पोत्यांत घातलेला मुडदा पोलिसाला सांपडला. पोलिसाचा समज झाला कीं तो तिचाच असावा. "

" असा कसा समज झाला बाई ! कांहीं डोळे खायला का गेले होते त्यांचे ? "

" आतां मला नाइलाजामुळें स्पष्ट बोलावं लागतं आहे. पण सांगतोंच. त्या मुडद्याला मुंडकं मुळींच नव्हतं आणखी अंगावर वस्त्र ह्मणजे एक पांढरा कपडा गुंडाळला होता तेवढाच. "

" काय तरी विलक्षण बाई ! " हे शब्द उच्चारतांना तिला कांहीं अर्धवट स्मरण झाल्यासारखें वाटलें. **यशवंतराव** तितक्यांत ह्मणतोः—
" पण त्या गोष्टीशीं आपल्याला काय करायचं आहे ? मी आज सकाळीं त्या डिटेक्टिव्हाकडे—ज्यानं त्याला पकडला कीं नाहीं त्याच्याकडे—गेलों होतों. त्यानंच मला सांगितलंन कीं खुनाच्या आरोपांत कांहींच हंशील नाहीं. **अनंतरावा**वर फक्त आतां चोरीचा चार्ज आहे. तो त्या **नबाबणी**च्या एका शब्दानं दूर होणार आहे. तिच्याकडे तुह्मी जा. त्याच्या सांगण्याप्रमाणें मी गेलों होतों हें आतां सांगितलंच. आणखी रात्रीं जाईन. "

" तिकडे गेलांत, तिकडे गेलांत, इकडे आल्याला बराच वेळ झाला, मग जेवणखाण तरी केव्हां झालं ? " **यमुनेनें** मोठ्या मायेनें विचारलें.

" त्याचं काय; त्याला काय उशीर लागतो ! " **यशवंतरावानें** खुषीनें उत्तर दिलें. **यमुना** समजली. तिनें त्यास लागलींच सुचविलें कीं, जेवण झाल्याखेरीज आतां बाहेर जाऊं नये. खाणावळींत अशा वेळीं अवेळीं जाऊन जेवण्यापेक्षां हें बरं असा त्यानेंही विचार

केला. प्रथमतः ती स्वतां जेवणार नव्हती; दादा आल्याखेरीज जेवायचें नाहीं असें ती ह्मणाली; परंतु यशवंतरावाच्या आग्रहास्तव तिनें जेवण्याचें कबूल केलें. शिवाय, काय तें कळल्यामुळें आतां तिची काळजी थोडीबहुत दूर झाली. यमुना व सैंपाकीणबाई खालीं गेल्या. कांहीं वेळानें हाही सर्व प्रातर्विधि आटोपून स्नान केला. झोंपेंतून जागा होण्याबरोबर कामाला गेल्यामुळें त्याचें कांहीं एक झालें नव्हतें हें वाचकांच्या लक्ष्यांत असेलच. यमुनेचेंही स्नान झालें. बाईचें पिठलें व भात तयार झाला आणि दोघेंही जेवावयास बसलीं. त्या दोघांत परकी भाव नसल्यामुळें यमुना तेथें त्याचे समोरच जेवावयास बसली होती. जेवतांना मघांच्यापैकींच कित्येक गोष्टी पुनः निघाल्या. त्यांत यमुनेला ती दुष्टपणाची चिठ्ठी कोणी पाठविली असावी याविषयींही वाटाघाट चालली होती, पण पक्का निकाल कांहीं लागला नाहीं. यमुनेनें येवढेंच सांगितलें कीं, "कोणी एका पोऱ्यानं बाईच्या जवळ दिली अन् त्याला विचारणार त्या,तों तो पळून देखील गेला. " कोणी तरी दुष्टाव्यानं हें केलं असावं असं ह्मणूनच समाधान करून घेऊन मुकाट्यानं बसावं लागलं. जेवणखाण होतं आहे तोंच संध्याकाळ झाली. यशवंतराव यमुनेचें समाधान करून व तिला आश्वासन देऊन त्याचप्रमाणें आतां कांहीं रडणारबिडणार नाहीं असें तिच्यापासून वचन घेऊन व सैंपाकीणबाईला नीट खबरदारीनें राहण्यास सांगून घराच्या बाहेर पडला. त्याचा हेतु हा कीं आतां दोन तीन तास ब्याकबेवर कोठें तरी काढून आपलें क्षुब्ध झालेलें डोकें जरा शांत करून नंतर वेळ झाली कीं नबाबणीकडे जावें.

..................................................................

या दुनियेंत एकाच वेळीं अनेक गोष्टी होतात. आह्मी ज्या गोष्टी लिहितों त्या दुनियेंत घडण्याजोग्या असतील तरच लिहितों. तेव्हां आमच्या या कथानकांमधून देखील एकाच वेळीं घडणाऱ्या गोष्टी येणें अगदीं साहजिक आहे. यशवंतराव व यमुना यांचें जेवण चाललें असतांना त्याच वेळीं एक साहेब नबाबाच्या बंगल्यांत शिरला. साहेब ह्मटल्यावर काय विचारतां त्याची गांठ केव्हांच घेतली जायची. नबाबसाहेब आपल्या बग्गी गाडींत बसून हिंडायला निघण्याच्या बे-

तांत होते, तरी त्यांनीं साहेबमजकुराची गांठ घेतली. साहेबांनीं इकडे तिकडे कांहींएक न करितां सरळपणें पुढें लिहिल्याप्रमाणें आपलें काम कळविलें. "मी पोलिस अधिकारी आहें. मी आपल्याला पोलिस कोर्टांत आपल्या घरची दासी जी गुलनार तिला ओळखण्याकरितां यावें ह्मणून विनंति करायला आलों आहें. चलावें." नबाबसाहेब चट्कन् ह्मणतातः—"ठीक आहे. माझी गाडी तयार आहे. चला." नबाबसाहेब गाडींत चढले. साहेबमजकूर गाडींत चढण्यापूर्वी कोचमनाशीं कांहीं बोलले. गाडी चालू झाली. ती ग्रयांटरोडकडे चालली. थेटरावरून लंडनबारवरून जवळच्या सफेत गल्लींत वळली, व एका लहानशा बंगल्यापाशीं उभी राहिली. तेथें उभी राहण्याबरोबर नबाबसाहेब ह्मणतातः—"हें कुठलं पोलिसकोर्ट! हें नवीन पोलिसकोर्ट झालं आहे?"

"नाहीं. नबाबसाहेब" जोल्रा साहेब ह्मणतात. "प्रथम थोडेंसें इथें काम आहे तें करून नंतर मग आपल्याला मी पोलिस कोर्टांत नेईन. फार वेळ नाहीं लागणार इथें! उतरावें ह्मणजे झालें."

"मला कांहीं गर्दी नाहीं." नबाबसाहेब उतरतांना ह्मणतात.

साहेब दोघेही बंगल्याचा आवारांत शिरले. बंगल्यापाशीं गेल्यावर एका माणसानें आंतून दार उघडलें. दोघेही आंत गेले. जोल्रा साहेबानें एका खणाला पडदा लाविला होता तो झट्कन् मागें सारला व 'पहा' असा शब्द उच्चारला. तिथें पहातात तों नबाबाच्या दृष्टीस एक टेबल पडलें व त्या टेबलावर एक वस्त्राच्छादित मुडद्यासारखें कांहीं ठेवलेलें दिसलें. जोल्रासाहेब नबाबाकडे एकसारखा पहात होता, पण त्याच्या चेहऱ्यांत कांहीं फरक दिसला नाहीं. त्यानें एवढेंच ह्मटलें.

"हा मला वाटतं मुडदेखाना आहे. इथें खुनाचे किंवा दुसरे कसले सांपडलेले मुडदे ठेवीत असतात असं दिसतं."

"हें कसं आपल्याला समजलं?" साहेब विचारतो.

"कसं समजलं ह्मणजे? कांहीं तर्कावरून जाणतां येत नाहीं कीं काय?" नबाब उत्तर करतो.

**जोल्रासाहेबः**—बरं आपल्याला इथें येण्याची कां तसदी दिली आलं का आपल्या ध्यानांत?

**नबाबः**—होय. माझ्या घरांत एक लवंडी होती, तिचा मुडदा

ओळखण्याकरितां, असं आपण आधींच मला सांगितलं.

**जोल्रा०**—मुडदाच असं आपण कशावरून जाणलं ? मीं कांहीं मुडदा असं ह्मटलं नव्हतं.

**न०**:—नाहीं. आपण नाहीं ह्मटलं. पण मीं तर्क केला. ती नाहींशी झाली आहे हें मला कळलं होतं. आपण मला तिला ओळखण्याकरितां चला असं जेव्हां ह्मटलं, तेव्हां अर्थातच ती मेली असावी असा मीं तर्क बांधला. आपल्या ह्मणण्याप्रमाणें करावं आणखी आपली स्वतांची खात्री करून घ्यावी एवढ्याकरतां मी ताबडतोब निघालों. एकून तीच ही वाटतं ?

**जोल्रा०**:—तें कांहीं खात्रीनं समजत नाहीं, ह्मणून आपल्याला ही तसदी.

**न०**:—नुसती खात्रीच करून घ्यायची तर ती आमच्या नौकरा चाकरांकडून झाली असती. एवढं मला बोलावण्याचं कारण काय ?

**जो०**:—"नौकरा चाकरांना तिचा चेहरा काय तो ठाऊक. आणखी कांहीं—पण हें पहा" असें ह्मणून त्यानें तेथल्या एका नौकराला त्या मुडद्यावरील कपडा दूर करण्यास खूण केली.

मसाल्याचा काय गुण असेल तो असो. तो मुडदा अगदीं ताजाचा ताजाच दिसत होता. इतके दिवस होऊन गेले होते, पण **गुलनार** अगदीं आतांच दोन चार तासांपूर्वीं मारली गेली कीं काय असें वाटे. तो भयंकर देखावा पाहून **नबाबाचें** पहिलें शांतपण नाहींसें झालें. त्याचा चेहेरा फिकट झाला व तो आपल्याशींच पुढील शब्द पुटपुटला. "हुं शिर तोडून मारली अं! अरेरे काय भयंकर !"

"तीच ना ती ?" **जोल्रा**साहेब विचारतात; "आपल्याला भय वाटत नसलं तर जवळ जाऊन पहा."

"भय ?" **नबाब** ओरडतो "एः आपल्या तें स्वप्नीं देखील नांहीं. हा क्रूर प्रकार पाहून मन जरा अस्वस्थ मात्र झालं आहे. **गुलनारच्या** एका खांद्यावर दोन तीळ होते "हे पहा ते." **जोल्रा**साहेब ह्मणाले. **नबाब** मुडद्याजवळ गेला व न्याहाळून ह्मणतो. "खरंच. आणखी ही नखांची मेंदी दिखील दिसते आहे ! आमच्यांत चाल आहे मेंदी लावण्याची ! तीच. आमची **गुलनारच** ही. आमची खात्री आहे."

" बस्स झालं. आणखी काय पाहिजे. आतां आपण जरा पलिकडल्या खोलींत चला. "

**नबाबानें** रुकार दिला व दोघेही एका खोलींत गेले. तेथें दोन खुर्च्या ठेवल्या होत्या. खुर्चीवर बसतांना **नबाब** विचारतोः—" कांहीं कागदावर सही वगैरे घ्यायची आहे वाटतं ? "

" होय. पण त्याच्या आधीं कांहीं प्रश्न विचारायचे आहेत. " **जोलरानें** उत्तर दिलें.

" विचारा. विचारा. मी त्यांचीं उत्तरं देईन. पण मी प्रश्न विचारीन त्यांचीं उत्तरं आपण दिलीं पाहिजेत. **गुलनार**चा खून झालाना?"

" होय. आणखी तो दिखील फारच चमत्कारिक रीतीनं ! तरवारीनं तिचं शीर तोडून टाकलं. तिच्या अंगावरचे कपडे काढून टाकले होते. तिचं धड एका पोत्यांत घातलं होतं. तें पोतं ठ्यागूबेच्या तिथें मागल्या शनवारीं रात्रीं बारावर दोन वाजण्याच्या सुमाराला पोलिसाला सांपडलं. "

" एकून तुमच्या या सांगण्यावरून असं दिसतं कीं खून केला कोणी याचा कांहीं तुह्माला पत्ता नाहीं ? गुन्हेगार कांहीं तुह्माला सांपडले नाहींत ? "

" अगदीं पकडले नाहींत, पण त्यांचा माग आह्मांला लागला आहे. तेव्हां ते सांपडल्यासारखेच आहेत. बरं गुन्हेगार आपल्या चाकरांनौकरांपैकींच दोघे आहेत असं मीं आपल्याला सांगितलं तर आपण—"

" कोणचे दोघे बरं ते ? " **नबाबानें** विचारलें.

" सिद्दी जातीचा कोचमन आहे तो, आणखी त्याच्याच जोडीचा खाजदार. "

" ते माझ्या तैनातींतले नाहींत. बीबीसाहेबांच्या तैनातींतले आहेत. तेव्हां त्यांच्या सांगीवरून त्या दोघांनीं **गुलनार**चा खून केला असं का आपलं ह्मणणं ? " **जोलरासाहेबांनीं** झटकन् प्रश्न केला.

" छत् छत् काय विचारतां हें ?" **नबाब** किंचित् रागावून ह्मणतो. " **गुलनार** तर बीबीसाहेबांची मोठी प्यारी लवंडी. तिचा काय ह्मणून प्राण घेतील त्या ? ते दोघे—तो कोचमन आणखी खाजदार मोठे मादरचोद आहेत. तिच्या जवळचे पैसे उपटण्याकरितां किंवा ती आप-

त्या चाहाड्या सांगत असेल ह्मणून ह्मणा पण त्यांनीं आपणच तिचा खून केला आहे. बरं तुमचा जर त्यांच्यावर वहीम आहे, तर तुह्मीं अजून त्यांना पकडलें कां नाहीं ? ”

“ मला असं वाटलं कीं त्यांना पकडण्यापूर्वी आपल्याला विचारावं हें बरं ! ”

“ मला काय त्यांत विचारायचं ? त्यांच्यावर वहीम आहे तर त्यांना खुशाल पकडावं. माझा त्यांचा संबंध काय ? ”

“ बरं गेल्या शनवारीं रात्रीं आपण बिबीसाहेबांची ब्रूम कोचमन वगैरे घेऊन बाहेर गेला होतांना ? ”

“ कोणी आपल्याला सांगितलं असं ? मला वाटतं माझ्याकडे एक कोणी मी हैदराबादचा अमूक खान ह्मणून येत असे बुद्धळं खेळायला त्याचं हें कृत्य असावं. मला वाटलंच दोन चारदां कीं तो डिटेक्टिव्ह असावा ह्मणून. आजच मी त्याची बोळणी केली, पण बीबीसाहेब मजकडे आल्या तेव्हां तो तिथें होताच. मी त्यांच्या कोचमनाला घेऊन गेलों ह्मणून त्यांच्या बोलण्यांत आलं तें त्या गुलामानं ऐकून इकडे येऊन खबर दिली वाटतं. त्या गेल्या शनवारीं कुठें गांवाला जायला निघाल्या तेव्हां त्यांची गाडी घोडा, कोचमन वगैरे कोणी हजर नव्हतें तेव्हां मीच घेऊन गेलों होतों असा ह्याचा समज. मीं त्यांना पुष्कळ सांगितलं मीं कांहीं त्यांना नेलें नव्हतें ह्मणून पण त्यांची खात्री झाली नाहीं. त्या मादरचोदांनीं कांहीं तरी लबाडीनं सांगितलं, तेंच त्यांना खरं वाटतं आहे. माझी तर पक्की खात्री होती कीं त्या गुलामांनीं ती रात्र कुठें तरी गुत्यावर काढली; पण आतां असंयू वाटतं कीं त्यांनीं खून करण्यांत ती घालविली असावी तें अगदीं शक्य आहे.

“ बरं आपण त्या दिवशीं रात्रीं कुठें होतां हें आपल्याला सांगतां येईल ? ”

“ हा प्रश्न मात्र जरा चमत्कारिक आहे. मी तर अगदीं गोंधळांत पडल्यासारखा झालों. मी बहुतकरून बाहेर जातच नाहीं रात्रीं. अन् गेलोंच तर कांहीं त्याचीं टिपणं ठेवीत नाहीं. स्मरण–हो त्या रात्रीं मी सांगतों तुह्मांला आमचे **नबाबअल्ली बिल्लीखां** यांच्या इथें गाणं होतं, नवीन हिंदुस्थानची रंडी आली होती तिथें. त्यांच्या घरीं गेलों होतों.

बहुत अमीर जमले होते त्या रात्रीं."

"हरकत नाहीं. एकाची साक्ष मिळाली कीं पुरे."

"साक्ष? तर मग काय माझ्यावर तुमचा वहीम आहे कीं काय?" **नवाब** हंसत हंसत विचारतो. "मीं या लोकांना सांगून तिला मारवली, असं तुम्हांला वाटतं आहे कीं काय? हं हं कदाचित् तुमचा समज असा असेल, कीं मीं स्वतांच तिला मारली. **जोल्रा**साहेबांनीं नकारार्थी मान हालविली. त्यावर **नबाब** पुढें ह्मणतो. "तर मग मीं फक्त हुकूम केला असा आपला समज? असा जर आपला समज असेल तर मग मी त्या रात्रीं कुठें होतों न् काय होतों या गोष्टीच्या चौकशीचा तुम्हांला कांहींच उपयोग नाहीं. मी अपराधी नाहीं असें कांहीं त्याच्यावरून सिद्ध होणार नाहीं. ज्यांना तें काम करायला सांगितलं, त्यांना कसं करायचं काय करायचं हें सांगून आणखी पैसे देऊन मी पाहिजे त्या ठिकाणीं गेलों असतों ह्मणजे झालं. माझी तिथें जवळ असण्याची जरूरी काय?"

हें सर्व भाषण इतक्या शांत व धिम्मेपणानें झालें कीं, **जोल्रा**साहेबास पुन्हां या चमत्कारिक खटल्यांत चुकी झाली असें खास वाटलें. थोड्याच वेळापूर्वी **परशुरामपंत** त्याच्याकडे गेला होता व त्यानें त्याला आपलें व **नबाबणी**चें जें संभाषण झालें तें सर्व सांगितलें होतें. त्याच प्रमाणें आपण ( **परशुरामपंत** ) समक्ष असतां, **नबाब** व **नबाबीण** यांचा जो संवाद झाला तो इत्थंभूत निवेदन केला होता. आपलें स्वतांचें मत ह्मणजे **नबाब**च अपराधी असावा हेंही त्यानें ठांसून सांगितलें होतें. त्या सर्वांवरून **जोल्रा**साहेबाचीही **नबाब** गुन्हेगार असावा अशाबद्दल खात्री झाली; व तेव्हांच **नबाबाला गुलनार**च्या मुड्याजवळ आणून काय चमत्कार होतो तो पहाण्याविषयीं त्यानें निश्चय केला. पण तसा चमत्कार कांहीं एक झाला नाहीं. **नबाबा**चें त्या वेळचें वर्तन गुन्हा करणाऱ्याच्या वर्तनासारखें मुळींच दिसून आलें नाहीं, आणि आंतांच्या बोलण्याच्या तऱ्हेवरून तर **जोल्रा**साहेब गोंधळलाच. पलीकडच्या बाजूस लपून उभा राहून ऐकणारा **परशुरामपंत** तर तें **नबाबा**चें सरळ बोलणें ऐकून सोळा आणे मनांतल्या मनांत खजील झाला. "चला" **नबाब** साहजिक शांतपणानें पुढें

ह्मणतो. ' काय हा वेडगळ संशय ! गुलनारला मारण्यांत हेतु तरी काय असावा माझा तुह्मांला वाटतं ? ती आमच्या सगळ्या नौकरांत फार गरीब ! माझी तिच्यावर फार मर्जी होती. बिबीसाहेबांची तर ती जीव कीं प्राण ! एवढं बरीक खरं कीं आमचे इतर नौकर लोक तिला बरं बघत नसत. आणखी ह्मणतां त्याप्रमाणें खरोखर जर सिद्ध झालं कीं त्या दोघां मादरचोदांनींच तिला मारली, तर मला कांहीं आश्चर्य वाटणार नाहीं. कोचमन सुद्धां खाटिक आहे. खाजदार त्याचा भाऊ. त्यानं तिचा गळा धरला असेल सिद्ध्यानं तरवारीनं कापला. माझी अगदीं पक्की खात्री आहे. त्या दोघां चोरांना पकडून ते कबूल होईपर्यंत त्यांच्या अंगाला चाप लावा. त्या खेरीज ते कबूल दिखील व्हायचे नाहींत. माझी अगदीं सदर परवानगी तुह्मांला. मी किंवा बिबीसाहेब कोणी तुमच्या आड येणार नाहींत. " इतकें बोलून तो जरा थांबला व लागलींच पुढें ह्मणतोः—" आणखी कांहीं प्रश्न विचारायचे आहेत ? बोला. नसले कांहीं विचारायचे, तर मला रस्ता दाखवा. मी घरीं गेलों तर कांहीं एक बभ्रा करणार नाहीं. बिबीसाहेबांजवळ देखील बोलणार नाहीं. तुह्मी आपले लोक पाठवा बंगल्यावर आणि पकडा त्या चोरांना. मात्र बंगल्यावर गडबड करतां कामा नये. सगळं मुकाट्यानं झालं पाहिजे. " इतकें बोलून नबाब उठलाच.

नबाब उठल्यानंतर त्याला अडथळा करणें ह्मणजे त्याला पोलिसच्या ताब्यांत देणें होय. आतांपर्यंत ज्या चुका झाल्या त्यामुळें सावध झालेल्या जोलरासाहेबाच्यानें त्याला अडथळा करण्याचें धारिष्ट तर होईना. तेव्हां अर्थातच त्याला रस्त्यावर नेऊन गाडींत बसविणें भाग पडलें. नबाब गाडींत बसून चालता झाला; व जोलरासाहेब तेथेंच आपल्याशीं ह्मणतोः—" या परशुरामासारखा गद्धा मीं त्रिभुवनांत पाहिला नाहीं. त्याचं जर मीं ऐकलं नसतं तर त्या दोघां चोरांना केव्हांच पकडले असते ! "

६

पहिल्या प्रथम बेत केल्याप्रमाणें ब्याक्बेवर बराच वेळ हिंडून सकाळपासून झालेल्या मानसिक व शारीरिक श्रमामुळें क्षुब्ध झालेलें मस्तक

शांत करून घेऊन **यशवंतराव** नेमलेल्या वेळीं **नबाबणी**स भेटण्यासाठीं तिच्या बंगल्यावर जाण्यास निघाला. तो त्या बंगल्याच्या आवारांत शिरणार तोंच त्यांला **अनंतरावा**च्या घरच्या गड्यानें हांक मारिली. त्या गड्याला त्यावेळीं त्या ठिकाणीं पाहून **यशवंतराव** अगदीं चकित झाला; परंतु कारण जेव्हां कळलें तेव्हां त्याचें मन स्वस्थ झालें, तो गडी **यमुनेनें** दिलेलें एक पत्र घेऊन तेथें उभा राहिला होता. पत्र फार महत्त्वाचें; **यशवंतरावा**ची व **नबाबणी**ची गांठ पडण्यापूर्वीं तें त्याच्या हातांत गेलें पाहिजे होतें. **यशवंतरावा**च्या बिऱ्हाडीं त्याचा पत्ता लागेना तेव्हां नेमलेल्या वेळीं तो **नबाबणी**च्या बंगल्यांत शिरतांना खास भेटेल अशा तर्कावर **यमुनेनें** त्या सुमारास त्या ठिकाणीं जा, जाऊन उभा राहून तें पत्र **यशवंतरावास** देण्याविषयीं गड्यास सक्त ताकीद दिली होती. **अनंतरावाच्या** जाण्यायेण्यामुळें तो बंगला गड्यास माहीत होताच. त्या बेताप्रमाणें पत्र तर **यशवंतरावास** मिळालेंच. गड्यापासून हकीकत ऐकली, व पत्र घेतलें. गडी गेला. इतक्यांत **यशवंतरावा**च्या मनांत आलें कीं **नबाबणी**च्या समक्ष पत्र वाचण्यास फार पंचाईत पडेल तेव्हां काय आहे ते आधीं पाहून घ्यावें तें बरें. असा विचार करून त्यानें दारावरच्या कंदिलाखालीं जाऊन लखोटा फोडला व पाहतो तों एकांत एक दोन पत्रें आहेत. त्या दोहोंपैकीं वरचें त्यानें वाचून पाहिलें, तों त्यांत पुढील मजकूर होता: " आपण गेल्यानंतर मीं आज माझीं पत्रें पाहिलीं, तोंपर्यंत पत्रें फोडण्याचें देखील मला सुचलें नाहीं. त्या पत्रांत माझ्या एका मैत्रिणीचें पत्र आहे. तेंच या पत्रांसोबत पाठविलें आहे. त्यांत आपल्या उपयोगीं असा मजकूर आहे असें मला वाटतें. उपयोगी वाटल्यास लागेल तसा उपयोग करावा. **नबाबीण** दादाचा निरपराधीपणा शाबीत करायला कांकूं करील तर तिला " आपण थोडे दिवसांत मुंबई सोडून कोठें गेलां होतां असा प्रश्न विचारावा; आणि तिनें उत्तर दिल्यावर योग्य वाटल्यास सोबतच्या पत्रांत ज्या ओळींच्या खालीं मीं तांबड्या शाईच्या रेघा ओढल्या आहेत, त्या ओळी तिला वाचून दाखवाव्या. "

तें पत्र वाचून आतां दुसरें तो काढून पहाणार तोंच बंगल्यांतला एक शिपाई त्याला ' **बिबीसाहेब** बोलावताहेत ' ह्मणून सांगावयास

आला. मग कसलें वाचणें ! त्याणें दोनही पत्रें कोटाच्या खिशांत खुपसलीं व त्या गड्याच्या मागोमाग चालला. दोन प्रहरीं ज्या ठिकाणीं तिची त्याची गांठ पडली होती त्याच ठिकाणीं **नबाबीण** बसली होती, व त्याच ठिकाणीं त्यालाही नेलें.

याचें पाऊल आंत पडतें आहे तों **नबाबीण** ह्मणते: " मी केवढा वेळची वाट पहातें आहें तुह्मी याल ह्मणून. मी आज रात्रीं मुंबई सोडून जाणार ! "

" ठीक आहे. पण आपण **अनंता**च्या सुटकेबद्दल काय केलं ? "

" मीं कांहीं एक केलं नाहीं, इतकंच नाहीं; पण त्याची मला आत्तांपर्यंत एकदां दिखील आठवण झाली नाहीं. तुह्मांला त्या मूर्खाबद्दल एवढी कळकळ पाहून मला मोठं आश्चर्य वाटतं. "

" मला इतका वेळ असं वाटत होतं कीं तुह्मी त्याला संकटाच्या वेळीं सोडणार नाहीं. त्यांतून जेव्हां नुसती खरी हकीकत सांगायची आहे तेव्हां तर कांहींच हरकत नाहीं. "

" ती आपली मीं तुला उगीच आशा दाखविली होती. ह्मटलं तेवढंच मधाचं बोट लावलं ह्मणजे तूं इथें येशील संध्याकाळीं खचित. "

आधींच्या बोलण्यांतलें तुह्मी, आपण, वगैरे जाऊन त्याच्या जागीं 'तूं' आलेलें पाहून **यशवंतराव** फार आश्चर्यचकित झाला; त्याला रागही आला परंतु त्यानें तो गिळून व 'बखत पडे बांका तो गद्धेकु कह्मना काका' या ह्मणीचें स्मरण करून त्याप्रमाणें आचरण ठेवलें. तो तिच्या वरील बोलण्यावर ह्मणतो: 'काय ! असा आपला हेतु काय ? ज्याचा आजपर्यंत आपण पुरा नाश केला, त्या मनुष्यास अशा भयंकर संकटांत सोडून आपण मुंबई सोडून जाणार ह्मणतां काय ? ध्यानांत धरा तर मग. मीही अगदीं शपथपूर्वक सांगतों कीं—यांत तिळप्राय कमी पडणार नाहीं—मी तुह्मांला जाऊं देणार नाहीं. "

ती त्याची मुद्रा, तें अवसान, हें पाहून. **नबाबीण** त्याच्याकडे टकटक पाहूं लागली. तिनें आपले डोळे ढळूं दिले नाहींत. उलट किंचित् स्मित करून ह्मणते: " अहाहा ! मर्द असावा तर असा असावा. त्या **अनंता**च्या अंगांत इतकी जर तडफ असती तर माझं त्याच्यावरचं प्रेम ढळलं नसतं. तुझी ही तडफ पाहून माझं तुझ्यावर मन बसलं. आतां

तुझ्याकरितां मी त्याच्याबद्दल रदबदली करतें. बोल काय करूं? पोलिसाकडे कळवूं कीं मींच त्याला त्या नोटी घेऊन मी परत येईपर्यंत आपल्याजवळ ठेवायला सांगितलं होतं ह्मणून? मी तयार आहें तसं करायला. आणखी काहीं बतावणी करायला सांगत असलास तरी देखील करीन."

"खोटं बोलणं ह्मणजे आपल्याला कांहींच वाटत नाहीं हें मला आतां पुरं कळून चुकलं आहे; पण पत्रानं कळवण्यापेक्षां प्रत्यक्ष त्या साहेबाची आपण गांठ घेतली तर फार चांगलं होईल असं माझं ह्मणणं."

"साहेबाची गांठ घ्यायची! तोबा! आह्मी गोषांतल्या बायका! आह्मासारख्यांनीं त्या साहेबाची गांठ घ्यायची. भलतंच एखादं! शिवाय मी आज रात्रीं मुंबई सोडणार. तेव्हां आतां वेळ आहे कुठें?"

हें त्या **नबाबणीचें** बोलणें ऐकून **यशवंतराव** मनांतल्या मनांत हंसला व मनांतच ह्मणतो: "सारा गांव हिंडते ही गाड्याघोड्यांतून, आणखी साहेबाची भेट घ्यायला ह्मणते आह्मी गोषांतल्या! थट्टा आहे झालं जगाची!" पण आपण आग्रह धरला तरी कदाचित् ती भेटीला जाण्याची गोष्ट कबूल करणार नाहीं असें त्यानें पाहिलें, व हिच्यापासून कोणच्या तऱ्हेचें पत्र घेतलें असतां पोलिसची खात्री होईल याविषयीं किंचित् विचार करून तो मोठ्यानें ह्मणतो: "तर मग मी सांगेन त्याप्रमाणें पत्र लिहायला तुमची तयारी आहे?"

"होय. मी कबूल आहें खरी, पण त्याला एक अट आहे. ती इथें या कोचावर माझ्या शेजारीं बसून स्वस्थपणानें ऐकून घेशील तर सांगेन." असें ह्मणून तिनें आपला हात पुढें केला. **यशवंतरावानें** तिकडे लक्ष्यच दिलें नाहीं. तो ह्मणाला, "मी आहें येथून मला ऐकूं येईल. एका क्षणापूर्वी तुह्मीं मी ह्मणेन त्याप्रमाणें पत्र लिहिण्याचें कबूल केलें, आणि आतां मागें घेतांसें दिसतें. बोला काय तुमच्या मनांत आहे तें कळूंद्या एकदां मला. मीं काय केलें ह्मणजे तुह्मी त्याला या विनाकारण संकटांतून सोडवाल."

"तें करायचें एवढेंच कीं माझ्याबरोबर आपणय् मुंबई सोडायची! नाहीं ह्मणूं नको. मला ठाऊक आहे तूं काय ह्मणशील तें, तिच्याहीपेक्षां माझं तुझ्यावर फार प्रेम आहे. खरोखर सांगतें तुला बोल हो कीं नाहीं तें. मला आज इथून निघून गेलें पाहिजे."

" पण कां, मुंबई सोडून कां गेलें पाहिजे ? कांहीं पोलिस पकडील बिकडील अशी भीति वाटते आहे मनाला ? "

" पोलिसची भीति ? अन् मला ? ती काय ह्मणून ? मीं काय केलें आहे पोलिसचें ! मी कांहीं अनंताची साथीदारीण नाहीं. त्यानें नोटी चोरल्या त्या माझ्या स्वतांच्या होत्या. आपलाच माल आपण चोरला ह्मणून जर कांहीं गुन्हा ठेवला तर सांगवत नाहीं "

" आणि मीं आपल्याला कोणच्या गुन्ह्यावरून पकडतील याचें दिग्दर्शन करून दिलं तर ? "

" बोला बोला पाहूं काय आपली अक्कल धांवते ती ! "

" आपण स्वतां किंवा आपल्या चाकरांकडून गुलनारचा खून करिवला आहे असा गुन्हा आपल्यावर शाबीत झाला--"

" वाहवा ! वाहवा ! " नबाबीण मोठ्याथोरल्यानें हंसून ह्मणते " खूप केली. कोणीं आपल्याला असं सांगितलं ? "

" मला सांगितलं नाहीं कोणीं. माझा आपला एक तर्क आहे. "

" खूप तर्क आहे तुझा ! मूर्खपणा आहे ह्मण. कांहीं असो. काय पाहिजे ते तर्क कर तूं कीं पोलिसाला करूंदे. मी आज रात्रीं जाणार खरी ! "

' ठीक आहे. पण आधीं मी सांगतों त्याप्रमाणें स्याहा ह्मणजे झालं. "

" मी कांहीं लिहिणार नाहीं. " " अनंत निरपराधी आहे ह्मणून तुह्मी लिहून देत नाहीं ? " " मी कांहीं निराळंच करणार आहें. थोडेच दिवसांत पोलिसाला एक पत्र येईल, त्यांत असा मजकूर लिहिलेला असेल. ' मीं पांच हजारांच्या नोटी माझा कारभारी अनंत हा किती प्रामाणिक आहे हें पाहण्याकरितां एका पेटींत ठेवल्या होत्या त्या त्यानें उपटल्या-" हें मात्र यशवंतरावाच्यानें बिलकूल ऐकवेना. तो संतापानें वेडा होऊन ह्मणतो: " काय ! जेव्हां तूं माझ्या पायां पडून ' मला वांचीव ' ह्मणून ह्मणण्याची वेळ, तेव्हां तूं दिमाखाच्या गोष्टी सांगतेस ? मी शपथ वाहून सांगतों कीं, तूं मनांत आणलेली गोष्ट कधींही घडणार नाहीं. कारण मी तुला मुंबईच्या बाहेरच जाऊं देत नाहीं. आपल्या दासीचा खून केल्याबद्दल अगर करण्याबद्दल मी आत्तां पोलिसांत वर्दी देऊन तुला पकडवतों. "

"वाहवा !,, **नबाबीण** चमत्कारिक हंसून ह्मणते " किती उदार आणखी सभ्यपणाचं कृत्य ! "

" मी आत्तां पोलिस कमिशनरला किंवा **जोल्रा** साहेबाला वर्दी देतों. हा जातोंच."

" ठीक आहे जा. तूंय् पक्कं समजून ठेव. तूं माझ्या बंगल्यांत आहेस. मीं डोळा फिरवला कीं पुरे. तुझें चंदन उडून जाईल. आहेस कुठें ? "

तें तिचें बोलणें ऐकून **यशवंतराव** क्षणमात्र चरकला. मुसलमानभाई तिच्या सभोंवतीं. त्यांतून ही अवदसा अशी. तिच्या ह्मणण्यांत सत्यांश आहे हें तेव्हांच त्याच्या लक्षांत आलें, पण त्यानें बाह्यतः तसें कांहींही न दाखवितां तो चापून ह्मणतो:—" बरं. बरं. ही इंग्रेजी मुंबई आहे. मोंगलाई नव्हे, असल्या धमकवण्यांना मी भ्यायला. "

" बरं बरं ! मला तसं करायचं नाहीं ह्मणून; नाहींतर या क्षणीं दाखवून दिलं असतं. पण तुला असा विचार नाहीं वेड्या कीं जी माझी अगदीं जीव कीं प्राण लवंडी तिचा मीं खून केला ह्मण, कीं करवला ह्मण, पण तें सिद्ध होणार कसं न् त्याला पुरावा काय ? माझा तर अजून समज आहे कीं ती कांहीं मेली नाहीं. जीवंतच आहे. एक शिरावांचून मुडदा सांपडला आहे अशी बातमी मला लागली आहे. पण ती आमची **गुलनार**च कशावरून ? "

" तो मुडदा एका पोत्यांत घालून तुझ्या गाडींतून नेऊन तुझ्या चाकरांपैकींच कोणी तरी ब्याक्बेवर नेला अशी माहिती लागली आहे पोलिसाला. त्या चाकरांना पकडून जरा दबकावणी दिली कीं ते क्षणांत सगळा मजकूर सांगतील. "

" माझे चाकर ! तूं ह्मणतो आहेस तरी काय ? माझा तो कोचमन् आणखी तो खाजदार ते होय ? त्या गुलामांना मीं मघांशींच हांकून लावले. ते दिवशीं रात्रीं मी गांवाला जायला निघालें, अन् या चोरांचा पत्ता नाहीं. शेवटीं मला तिकडची गाडी घेऊन जावं लागलं स्टेशनावर. "

" **अनंतराव** इथें येऊन ते दिवशीं निराश होऊन गेला, आणखी—"

" हो ! हो ! बरी आठवण झाली. मीं ते दिवशीं जाण्यापूर्वी **गुलनार**जवळ त्याला देण्याकरितां एक पत्र दिलें होतें, तें पत्र दे-

ण्याकरितां ती त्याच्याकडे गेली, तेव्हां कदाचित् त्यानेंच तिला मारली असेल असंही ह्मणतां येईल. पक्का संभव आहे. कारण तें पत्रच—"

" हें तिचें बोलणें ऐकून **यशवंतरावास** दचकल्यासारखें झालें. हें एक नवीनच संकट उपस्थित झालें असें त्याला वाटलें. शिवाय ही चांडाळीण अवदसा, स्वतांच्या रक्षणाकरितां कोणचेंही कुभांड कोणावर ध्यायाला कमी करणार नाहीं. **नबाबीण** त्याच्या चेहेऱ्याकडे एकसारखी लक्ष लावून पहात होती. हेतु हा कीं, आपल्या बोलण्याचा याच्या मनावर काय परिणाम झाला हा जाणावा. ती थोड्याच वेळांत मोठ्यानें ह्मणतेः " पहा नीट विचार कर. तूं पोलिसात्रिलिसाकडे गेलास तर—आधीं इथून तुला मी जाऊंच देणार नाहीं ह्मणा तसं करणार असलास तर—पण माझी गाडी मात्र चुकेल. दुसरं तर कांहीं होणार नाहीं. तुझी फजीती होईल हें वर ! जा आतां पुरे झालं."

" मी जातों. पण तेवढं मी ह्मणतों त्याप्रमाणें पत्र तर लिहून द्याल ?" **यशवंतराव** विचारतो.

" हंः ती गोष्ट तर कालत्रयीं देखील होणार नाहीं. फार झालं तर एवढंच वचन देतें कीं, मी इथून गेल्यावर मघांशीं ह्मटल्याप्रमाणें पत्र लिहिणार नाहीं. "

**यशवंतरावानें** आपला ओंठ चावला. इतक्यांत एकदम त्याला **यमुनेच्या** पत्राची आठवण झाली. ती **अनंतरावाची** सुटका होण्याबद्दल कांहीं करीत नाहीं ह्मणाल्यास तिला " तूं गेल्या शनवारीं रात्रीं कुठें गेली होतीस ह्मणून विचारावें व मग तिला सोबतच्या पत्रांतील तांबड्या ओळींनीं खूण केलेला मजकूर वाचून दाखवावा " ह्मणून तिनें लिहिलें होतें. त्याच्या खिशांत तीं पत्रें होतीं व आतां इतर कांहीं मार्ग नाहीं असें पाहून त्यानें त्याप्रमाणें करण्याचा निश्चय केला. पण तसें करण्यापूर्वीं त्या पत्रांत मजकूर काय आहे व तो आपल्या तर्काप्रमाणें, व आपल्याला पाहिजे तसाच आहे कीं नाहीं हें आपण पहावें, नाहीं तर आणखी एखादी नसतीच चुकी होऊन भलतेंच लचांड उपस्थित होईल. तो उठला व ज्या खिडकीजवळ हंडी होती त्या खिडकीजवळ जाऊन थुंकून तोंड पुसण्याच्या मिषानें त्यानें रुमाल व पत्र काढलें व **नबाबणीकडे** पाठ करून त्यानें क्षणार्धांत

त्या पत्रांतल्या खूण केलेल्या ओळी पाहून घेतल्या. कर्मधर्मसंयोगानें हें बरें झालें कीं, त्याचवेळीं एक गडी गाडी केव्हां जोडायची ह्मणून तिला विचारायला आला. आपलें काम झाल्याबरोबर **यशवंतराव** पुन्हां थुंकल्यासारखें करून रुमालानें तोंड पुशीत परत आपल्या जागीं आला; व जणूं काय सहजच अशा रीतीनें त्यानें तिला पुढील प्रश्न केला. " बरं तें जाऊं द्या. आतां आपण **अनंता**चं नांव दिखील काढीत नाहीं. पण हें पहा त्या शनवारीं रात्रीं **अनंतरावाला** घालवून देऊन आपण कुठें गेलां होतां एवढं सांगा पाहूं ? त्याला फार दुःख झालं पहा ते दिवशीं. "

" दुःख झालं ? रड्याच तो. रडला देखील असेल. असो, आतां जरा आपण जेव्हां मऊ आलां तेव्हां आतां सांगतें मी, कीं मी इथून **वानऱ्याला** गेलें, तिथें माझा बंगला आहे तिथें एक दिवस होतें. तिथून इकडे न येतां परस्पर दादरावरून पुण्याला गेलें; तिथून एक दिवसांतच निघून माथेरानला गेलें. मला पाहिजे त्याप्रमाणें मी भटकत असतें. मला विचारणार कोण ? आपली माझी तुझ्यावर मर्जी ह्मणून तुला सांगतें इतकंच. मी **अनंताला** बोलावीत होतें चल ह्मणून, पण तो मेला दळ्या आलाच नाहीं. "

" पण मला वाटतं आपण पुण्याहूनच परवां आलांतना ? "

" नाहीं. पुण्यास गेलें. तिथें वाऱ्याचा उपद्रव फार आहे असं कानीं आलं तेव्हां दुसरेच दिवशीं निघालें तिथून. हो दुसरे दिवशीं रात्रीं निघालें. तिथून माथेरानाला गेलें. माथेरानाहून इकडे आलें. तूं कां विचारतो आहेस आणखी मी तरी वेड्यासारखी तुला इत्थंभूत हकीकत कां सांगतें आहें मला कळत नाहीं. चल मला उशीर झाला; सव्वादहा झाले. वेळ थोडा राहिला. "

" बरं मी सांगूं का ? आपण पुण्यास जाऊन काय केलें तें ? **गुलनार**चं शीर बरोबर नेऊन त्याची वाट लावावी हेंच तुझं काम होतं. "

**नबाबाणी**चा चेहेरा अगदीं पांढरा फटक झाला; व ती घोगऱ्या आवाजानें ह्मणते. " तूं वेडा तर नाहींस ? "

" मी हें पत्र वाचून दाखवतों हें ऐका. हें पुण्याचं आहे. " असें ह्मणून त्यानें **यमुनेनें** आपल्या पत्रासोबत पाठविलेलें पत्र उघडलें आणि

त्यांतील कांहीं मजकूर मोठ्यानें वाचून दाखविला. " आमच्या या भागाला एक फारच भयंकर गोष्ट झाली आहे ती ही मी तुला लिहितें. नुकतीच मला वाटतें बंडगार्डनच्या जवळ कांहीं कोळी आपलीं जाळीं काढीत होते, त्यांच्यापैकीं एकाच्या जाळ्यांत एक औरस चौरस हाताची सुंदरशी पेटी आली. त्यांनीं ती उघडून पाहिली तों तींत एका तरुण बाईचें शिर होतें. काय तरी बाई भयंकर कृत्य हें ! पण हें काम आमच्या पुण्यांतल्या कोणीं केलें असें नव्हे हो!" ती खून झालेली बाई कोण हें कांहीं कोणाला ओळखलें नाहीं. पण नाकांतल्या बुलाखीवरून ती मुसलमानीण असावी असा तर्क आहे."

नबाबीण कान देऊन ऐकत होती; व यशवंतरावाचें वाचन संपलें तरी ती त्याच्याकडे एकसारखी टकमकां पहात होती. तिनें एक शब्दही उच्चारला नाहीं. तो आतां काय बोलतो याचीच ती वाट पहात होती. " आलं का लक्ष्यांत ? आतां आपण मजजवळ दया कर आणि सोडीव ' असं ह्मटलं पाहिजे."

" कां बरं ! या भिकारड्या पत्रांत कांहीं तरी भिकार मजकूर लिहून आला आहे ह्मणून ? माझा तिथें कांहीं तरी संबंध आहे, असं का तुझं ह्मणणं ? "

" माझं ह्मणणं कांहीं कां असेना ! जोलरासाहेबांचं ह्मणणं पाहिलं पाहिजे. हें पुण्यास काल सांपडलेलं शीर गुलनारचं आहे असं सिद्ध करायला त्यांना मुळींच अडचण पडणार नाहीं. तुह्मी पुण्याला गेलां होतां. तुह्मीं आपल्या बंडगार्डनजवळच्या बंगल्यांत जाऊन राहिलां होतां. बंगल्यावरल्या चाकर लोकांच्या जबान्या घेतल्या ह्मणजे त्यांत खास असें निघेल कीं तुह्मी तिथें असतांना रात्रीं एकट्याच नदीच्या कांठाला गेलां होतां. हें काम तुह्मीं रात्रीं केलं यांत कांहीं शंका नाहीं."

" पुरे. पुरे. बोल बाबा मीं काय केलं ह्मणजे तूं मला मुकाट्यानं जाऊं देशील !" नबाबीण मोठ्यानं ह्मणते.

" पहिली गोष्ट ही. गुन्हा केल्याबद्दल कबूल जबाब लिहून द्या."

" बरं. बरं. माझी लवंडी—माझी गुलनार हिनं माझ्या नसत्या चहाड्या करण्याबद्दल मीं तिला शिक्षा दिली. तिची मान कापवली."

" चहाड्या करण्याबद्दल ? चहाड्या कोणाजवळ केल्या ?"

" कोणाजवळ ह्मणजे ? माझ्या नवऱ्याजवळ ! "

" बरं सांगितल्या तर सांगितल्या तुह्मी थोडीच नबाबसाहेबांची परवा बाळगतां आहां ? "

" मी त्यांची परवा बाळगीत नसलें ह्मणून ! या टवळीनं काय ह्मणून माझ्या कामांत पडावं ! माझा तिच्यावर अतिशय विश्वास आणखी तिनं असा विश्वासघात केल्यावर मी उगीच बरी राहीन ! रांडेनं माझीं पत्रं दिखील दिलींन्, त्यांना समजूं नये ह्मणून मी इथें आल्यावर मराठी दिखील शिकलें ल्याहायला. असं असतांना—अन् त्यांत काय ? गुलनारला दिखील पक्कं कळलं कीं आपल्या या गुन्ह्याबद्दल आपल्याला हीच शिक्षा योग्य. अन् त्याप्रमाणें तिनं निमूटपणें सोसली. त्यांत सरकारचा संबंध काय ? "

हें त्या राक्षसणीचें बोलणें ऐकून यशवंतरावाच्या आंगावर तर कांटा उभा राहिला. तो तिची ती क्रूर मुद्रा, त्या धमकावण्या वगैरे पाहून थक्क झाला. स्त्रीजात असून इतकी क्रूर, घातकी, दुष्ट व कर्मनष्ट अशी ही झाली तरी कशी ? इच्यासारखी दुसरी या त्रिभुवनांत देखील सांपडणार नाहीं. असें त्याला वाटलें. स्त्रिया ह्मणजे किती शुद्ध, किती सरळ व सात्विक ! असें असतां हीच चामुंडा कशी अशी झाली ? असो. तुळशीच्या बनांतही केव्हां केव्हां भांगेचें रोपडें उगवतें !

" माजिस्त्रेटानें प्रश्न विचारले ह्मणजे आपण अशींच उत्तरं द्याल नव्हे ? " तिच्याकडे एकसारखें पहात यशवंतरावानें विचारलें.

" प्रश्न विचारीपर्यंत मी जगेन तर कीं नाहीं ? मजजवळ असें एक जहालिम विष आहे कीं क्षणांत निकाल! पोलिस येतें आहे तों मी प्राण सोडतें आहें असें समज. पण मरतां मरतां 'गुलनारला मारून टाकण्यांत मला अनंतानें मदत केली असें ह्मणायला चुकायची नाहीं हें पक्कें जाणून ठेव. " यशवंतरावाला भान न राहून तो चवताळून तिच्या अंगावर निघाला, पण तितक्यांत त्यानें आपणास मागें घेतलें व तो तिला ह्मणाला: " लिहून देतां कीं नाहीं मी ह्मणतों तें ? "

" अनंतरावानें ते रुपये मला देण्याच्याच हेतूनें घेतले अशी माझी खात्री आहे असें लिहून देण्याचें कबूल केल्यास मला मुकाट्यानं जाऊं देशीलना ? "

" नाहीं आतां तितक्यानें होणार नाहीं. आपल्या गुन्ह्याबद्दल इत्थंभूत हकीकतीचा कबूल जबाब लिहून दिला पाहिजे, कारण न जाणों मघाशीं ह्मटल्याप्रमाणें इथून निघून गेल्यानंतर पाहिजे तसें पत्र पाठविलेंस तर काय घ्या ? "

" बरें पण मी जो कबूल जबाब लिहून देईन त्याचा मला पकडण्यासाठींच उपयोग होणार नाहीं अशाबद्दल हमी काय ?

" त्याची हमी माझें वचन. दुसरी कांहीं नाहीं. माझ्या हातून प्राणांतींही वचनभंग होणार नाहीं. याच्या पलीकडे कांहीं एक हमी नाहीं पाहिजे तर लिही नाहीं तर काय व्हायचं तें होईल. "

**नबाबीण** किंचित् हंसली. तिचे डोळे चक्क झाले; व ती आपल्याशींच पुटपुटली.

" अहाहा ! मर्द असावा तर असा असावा. मीं याची कशी सेवा केली असती ? "

**यशवंतरावानें** तिच्या पुढें दऊत लेखणी ठेवली व कागद दिला. तिनें मुकाट्यानें वेड्यावांकड्या अक्षरांनीं लिहिण्यास प्रारंभ केला. **यशवंतरावानें** मजकूर सांगितला. तो असाः—

" मुंबई सोडून जाण्याच्या वेळीं मला असें समजतें कीं, माझे कांहीं पैसे चोरल्याचा गुन्हा ठेवून माझा कारभारी **अनंतराव** यास पोलिसानें पकडलें आहे. तेव्हां तसा त्याजवर गुन्हा ठेवण्याचें कांहीं एक कारण नाहीं. माझा त्याच्यावर पूर्ण विश्वास आहे. त्याच्याजवळ याच्याहीपेक्षां मोठमोठाल्या रकमा मी ठेवीत असें. त्यांत कधींही त्याच्या हातून अफरातफर झाली नाहीं. सध्यां त्याच्याजवळ सांपडलेल्या नोटी त्यानें माझ्या स्वाधीन करण्याकरतां घेतल्या याबद्दल मला मुळींच शंका नाहीं. आतां त्या परत ब्यांकेंतच पाठवाव्या, नि **अनंतरावाची** सुटका करावी. "

याप्रमाणें लिहून झाल्यावर खालीं सही वगैरे करून तिनें तो कागद **यशवंतरावाच्या** स्वाधीन केला. त्यानें तो पुन्हां तिच्याजवळ देऊन तिच्याकडून आणखी उडदूंतही सही करून घेतली. न जाणों, सहीविषयीं शंका घेतली पोलिसानें तर ?

" हें पत्र उद्यां दोनप्रहरांनंतर तूं पोलिसांत पाठीव. त्याच्या आधीं

पाठवूं नको. तोंपर्यंत किती शोध केला तरी सांपडणार नाहीं, अशा ठिकाणाला मी जाऊन पोंचेन. ”

“ ठीक आहे. ते दोघे साथीदार कुठें गेले आहेत ? ”

“ त्यांची काळजी नको. ते पार झाले. ते आतां पुन्हां ब्रिटिश हद्दींत दिसणार नाहींत. ”

“ ठीक आहे. आतां हें दुसरें ल्याहा. ” असें ह्मणून त्यानें पुन्हां मजकूर सांगितला व तिनें लिहिला:

मी, **झोटिंगाबादची नबाबीण**, आपल्या राजीखुषीनें व अक्कलहुषारीनें आपल्या गुन्ह्याचा हा कबूल-जबाब लिहून देत आहें. माझ्या लवंडीचा प्राण घेतला तरी मला कोणी विचारणारें नाहीं, अशा समजावरून मीं आपल्या **गुलनार**चा खून करविला. तिचें धड मुंबईस व शीर पुण्यास सांपडलें. मी ज्या गृहस्थाला हा कबूल जबाब लिहून देत आहें, त्यानें याचा पाहिजे तसा उपयोग करावा. उगीच सूड घेण्याकरितां जर मी, माझा कारभारी व या गृहस्थाचा मित्र **अनंतराव**, याजवर कांहीं कुभांड घेतलें तर हा कागद हा गृहस्थ पोलिसाकडे पाठवील. **अनंता**कडे तिळमात्रही अपराध नाहीं. तो सर्वथा निर्दोषी आहे.’

“ याच्याखालीं सही करा. खातरी द्याला. ”

**नबाबणी**नें त्याप्रमाणें केल्यावर **यशवंतरावा**नें दोनही कागद नीट वाचून पाहिले, व आपल्या खिशांत घातले.

“ ठीक आतां मी येतों. ”

“ अन् तुला न जाऊं देतां, **गुलनार**प्रमाणेंच तुझी इथें चांदी उडवली तर ! नाहींतर मीच इथें आत्महत्या केली तर ! ” **यशवंतराव** उत्तर केलें:—तें कालत्रयींही आतां होत नाहीं. आतां मला मुकाट्यानें जाऊं देऊन आपल्या सुरक्षितपणाच्या तजविजीला लागावं तें चांगलं. अजून कुठें जायचें असेल पुण्यात्रिण्याकडे तर—( घड्याळ काढून पाहून )—तितका अवकाश आहे.

शेवटल्या बोलण्यानें **नबाबीण** भानावर आली व तिनें त्याला जाण्याविषयीं खूण केली. तरी तूं माझ्याबरोबर चल, माझें तुझ्यावर फार प्रेम आहे, इत्यादि आचरटपणाचीं भाषणें करण्यास तिनें कमी केलें नाहीं. शेवटीं शीव्याशापांची वृष्टिही झाली. आपलें काम झालें

आतां कांहींका वडबडेना ती, असा विचार करणारा **यशवंतराव** एकदम चालता झाला. तो घराच्या बाहेर पडेपर्यंत त्याच्या मनांत धाकधूकच होत होती. न जाणों, त्या अवदसेच्या बंगल्यावर तिच्या तावडींत आहों. बोलल्याप्रमाणें केलें तर काय करतां ? तिच्या अंगांत धारिष्ट नव्हतें असें स्वप्नींही यायला नको.—

बंगल्यांतून बाहेर पडल्यावर, आगगाडीचा वेग तरी निदान आपल्या अंगांत असता तर बरें झालें असतें, असें त्याला एक लक्ष वेळां वाटलें. ती सुखवार्ता **यमुनेला** कळविण्याची इतकी त्याला उत्सुकता झाली होती. तो धूम सपाट्यानें चालला होता. इतक्यांत गिरगांवांत आल्यावर मागून एका मनुष्यानें त्याच्या खांद्यावर हात ठेविला; " कोण मनुष्य हा ! " असा तिरस्काराचा प्रश्न मनांत उभा राहून त्यानें मागें वळून पाहिलें तों **अनंतराव** ! मग काय विचारतां ? **यशवंतरावानें** आनंदानें " सुटलास ? सुटलास एकदांचा ? " असें मोठ्यानें विचारलें.

" होय बाबा. " **अनंतराव** उत्तर करतो. " त्यांनीं पुष्कळ चुकलों, चुकलों, असें ह्मणून आह्मांला एकदां सोडून दिलें. इतक्या लवकर मी सुटेनसं नव्हतं वाटलं वाटतं तुला ? "

" नव्हतं. पण उद्यां तूं सुटणार अशाबद्दल माझी खात्री होती, अन् तसं सांगायलाच मी आतां **यमुनेकडे** चाललों होतों. "

" मी आतां घरीं गेलों होतों. तिनंच मला सांगितलंन् तूं **नबाबणीकडे** गेला आहेस ह्मणूंन. अन् ह्मणून मी आतां वाटेनं भेटशील ह्मणून त्याच बाजूला चाललों होतों. मला त्या मूर्खांनी पकडल्यावर तूं काय काय केलंस ? "

" कांहीं नाहीं. तूं कुठं आहेस वगैरे कांहींएक कोणाला कळूं दिलं नाहीं. "

" तें नकोरे मला. यजमानणीच्या इथें जाऊन काय केलंस ? ती काय ह्मणाली माझ्याविषयीं ? "

" **अनंतराव**, तूं इतका वेडा कशानं झालास ? अजून देखील तिच्याबद्दल तुझं वेड कसं जात नाहीं ? "

" कां बरं जावं ? तिनं इथें आल्यावर माझ्यावरचं अरिष्ट ऐकि-

त्याबरोबर जर माझ्या सुटकेची पोलिसाकडे जाऊन तजवीज केली तर—मी तर बोआ पुन्हां तिची गांठ घेऊन—"

"अरे वेड्या, तिनं तुला सोडवण्याकरितां खटपट केली नाहीं इतकंच नाहीं; पण तिनं तुझा जीव घेण्याची मलसत चालविली होती. आहेस कुठें ? कोणी तरी जाऊन जर तिला धमकावली नसती, तर तिनं पोलिसांत तूं चोर आहेस ह्मणून कळवलं असतं. पण आतां जाऊंदे रस्त्यांत नकोत या गोष्टी. आपण घरीं जाऊन मग बोलूं. तुला सारी हकीकत सांगतों मग."

त्याप्रमाणें ते **अनंतरावाच्या** घरीं गेले. **अनंतराव, यमुना** व **यशवंतराव** तिघेंही बसलीं. आतां **यमुना** आणि **यशवंतराव** एकमेकांस विशेष लाजत नाहींशीं झालीं. हकीकत ऐकण्याला उत्कण्ठित झालेला **अनंतराव** ह्मणाला:—"बोल. बोल काय झालं तें"

तेव्हां **यशवंतराव** ह्मणतो:–"तुझ्यावर खुनाचाही चार्ज होताना ?"

"होता पहिल्यानं. पण मग त्याचं नांव देखील कोणी घेतलं नाहीं."

"ठीकच आहे. कारण ज्या माणसाचा खून केल्याचा आरोप तुझ्यावर होता तें माणूस मुळीं जिवंत आहे. पण **गुलनारच्या** खुनाचा आरोप तुझ्यावर आला नाहीं हें कांहीं **नबाबणीच्यामुळें** नव्हे."

"**गुलनारचा** खून ?"

"होय. ज्या बंगलींत तुह्मी दोघं भेटत असां, त्या बंगलींत **गुलनारचा** खून झाला."

"काय ह्मणतो आहेस तरी काय ?"

"अरे बाबा तिचं शिर कापून खून केला." हें **यशवंतरावाचें** बोलणें ऐकून **यमुना** ह्मणते. "तें बन्नुताईचं पत्र वाचल्याबरोबर मला वाटलच."

**यशवंतराव** पुढें ह्मणतो:—"**गुलनारचं** शिर तोडून, तें पोत्यांत घालून एक मनुष्य तें खांद्यावर घेऊन समुद्रांत टाकण्याच्या बेतांत होता, इतक्यांत भिऊन पोतं टाकून पळून गेला."

"पण खून केला कोणी ?"

"तुमच्या यजमानणीचेच चाकर. तो सिद्दी कोचमन आणखी तो त्याचाच साथीदार सैस. हुकूम बाईसाहेबांचा. हें वाचा ह्मणजे स-

मजेल." असें ह्मणून त्यानें ते कागद त्याच्या पुढें टाकले. **अनंतरावानें** वाचले. वाचतांना त्याच्या चेहऱ्यावर जो फिकटपणा आला तो कांहीं वर्णन करतां येत नाहीं.

"हें कुठें लिहिलं हें ?" वाचून झाल्यावर **अनंतराव** विचारतो.

"तिच्या बंगल्यावर."

"तिच्यावर पोलिसचा संशय वगैरे आहे काय ?"

"कांहीं ठाऊक नाहीं" मध्यंतरीं बराच वेळ कोणी कांहींच बोललें नाहीं. बऱ्याच वेळानें **अनंतराव** एकदम गहिंवरून ह्मणतोः— "एकून तूं माझा प्राण वांचिवलास ह्मणायचा !"

"नाहीं बाबा. तें श्रेय सगळं इकडलं."

**यमुना** हंसून ह्मणतेः—इकडलं नाहींन् तिकडलं नाहीं. सगळी खटपट तिकडलीच आहे.

**यशवंतरावः**—असं कां ? तें पत्र वेळेवर आलं नसतं माझ्या हातीं, तर आह्मीं काय केलं असतं ?

**यमुनाः**—अन् बनुताईचं मुळींच पत्र नसतं आलं तर मीं तरी काय केलं असतं ?

**यशवंतरावः**—बरं तर. बनुताईला श्रेय द्या. तिच्या पत्रामुळं तर तुह्मांला भाऊ व मला माझा मित्र मिळाला ! तसं कां होईना ?

**अनंतरावः**—तें कांहीं असो. पण ही सारी खटपट कोणी केली तूंच ना?

**यशवंतरावः**—हो. वरची खटपट मीं केली खरी.

**अनंतरावः**—मग त्याबद्दल तुह्मांला बक्षीस दिलं पाहिजे.

**यशवंतरावः**—(त्याच्या बोलण्याचा झोंक न समजून हंसत हंसत) आण कुठें आहे तें !

**अनंतरावः**—अरे वा ! तूं तरी एक उतावळा नवराच दिसतोस मला ! चांगला सुमुहूर्त पाहून वाजत गाजत असं तें तुझ्या स्वाधीन करायचं.

**यमुनाः**—हें रे काय दादा हें असलं तुझं ? मीं आपली उठून जातें कशी !

**अनंतरावः**—कां बरं ! मी आतां तुझं नांव तरी घेतलं ? खाई त्याला खवखवे बाबा ! अन् त्याला काय झालं ? आज इतका आनंदाचा

दिवस ! तेव्हां थोडीशी थट्टा मस्करी झालीच पाहिजे.

**यमुना**:—पुरे झाली तुझी थट्टा. या असल्या थट्टेथट्टेनंच तर गळ्याशीं आलं.

**अनंतराव** !—काय आलं गळ्याशीं ? तुझ्या लग्नाचं होय ?

**यशवंतराव**:—जाऊंदे रे काय वात्रा तुला तरी नेहमीं तेंच. ही **बनुताई** कोण ही कोणाची ?

**यमुना**:—ही **बनुताई** माझी वर्गांतली मैत्रीण आहे. तिची प्रकृति बिघडली होती ह्मणून तिचा बाप चार दिवस तिला पुण्यास घेऊन गेला आहे. पहा काय त्या पोरीचं नशीब. बाप चांगला श्रीमंत ! आतां तिथें गेला आहे तर बंडगार्डनच्या त्या बाजूला निराळा स्वतंत्र बंगला घेऊन राहिला आहे. इस्टेट रगड. पैसा रगड. पोरीला सासरीं जाण्याचा त्रास नको ह्मणून घरजांवई केला. तो चांगला कॉलेजांत शिकत होता; पण एकाएकीं विषमज्वर होऊन आठ दिवसांत वारला. काय करतां आतां इथें ! बापाचा जीव कायतो पोरीवर ! त्याला स्वतांला मुलगा नाहीं. पोरगी एकटी. ती दोघे नवराबायको ह्मणत असतात नेहमीं, चांगलासा नवरा जर तयार होईल तर पोरीचं पुन्हां लग्न करून द्यायचं. थोडीशी इस्टेट द्यायची व थोडी आपल्या मागें बायकोला ठेवायची. आणखी बाकी सारी युनिव्हर्सिटीला बायकांना स्कॉलरशिपा देण्याकरितां ह्मणून देऊन टाकायची. अशी आहे हकीकत त्या आमच्या **बनुताई**ची. माझी न् तिची मोठी मैत्री !

अशाच तऱ्हेनें इतर गोष्टी बोलत बोलत त्यांची रात्र गेली.

* * * * * * * * * *

**परशुरामपंता**च्या घरीं **परशुरामपंत** एकटाच बसला होता. त्याच्या चेहेऱ्यावरून असें दिसत होतें कीं तो अगदीं मोठ्या खुषींत व आनंदांत आहे. मग काय, “ आपल्या हातीं घेतलेल्या कामांत आपल्याला खास सिद्धि आली, जो खून प्रत्यक्ष फ्रान्सच्या डिटेक्टिव्हांनाही सांपडला नसता, त्याचा आज आपण पुरा तपास लावून खुनी मनुष्यास चांगला पकडला, आतां आपणांस किती बक्षीस मिळतें तें पहावें, ” अशा विचारांत स्वारी होती कीं काय नकळे ! किंवा कदाचित् असेंही असेल कीं बक्षीस किती मिळणार हें पक्कें ठाऊकच. तेव्हां मि-

झालेल्या बक्षिसाचें पुढें आपण काय करावें व आपल्या थोडाबहुत तरी उपयोगीं पडलेल्या दमाजीला त्यापैकीं किती द्यावें किंवा त्याला हांकलून लावून आपणच सगळें घ्यावें या विचारांत स्वारी असावी. इतक्यांत दमाजी येऊन पुढें उभा राहिला. त्यास पहाण्याबरोबर आमचे परशुरामपंत एकदम ह्मणतातः—" ये बाबा. बैस. पण तूं यावेळीं आलास कसा इकडे ? बंगल्यावरूनच आलास का आतां ? "

" नाहीं. नाहीं. मी बिऱ्हाडीं जाऊन नेहमींचा पोषाख करून आलों. आतां पुढें कसं काय करायचं ? हें तर असं झालं. आपला आतां कांहीं संबंध उरला नाहींच ह्मणायचा. "

" ह्मणजे ! तूं हें ह्मणतो आहेस तरी काय ? संबंध सुटला काय ह्मणून ! तुला मी परत बोलावीपर्यंत तें घर सोडून यायचें नाहीं. माझं मी आपला पाहून घेईन. "

" होय. साहेब; पण मी तरी काय करूं ! मला आज संध्याकाळींच तिथून घालवून लावला. "

" घालवून लावला ! कोणी ! त्या नायकानं ! अस्सं. अस्सं. नबाबसाहेबांना नेले पकडून. तेव्हां आतां हाताखालची मंडळी पाहिजे तसा धांगडधिंगा घालताहेत वाटतं ? "

" नाहीं, साहेब. नबाबसाहेब आपल्या बंगल्यावर आहेत. त्यांनीं स्वतां मला गचांडी देऊन घराच्या बाहेर घालवून दिला ! "

" काय ! नबाब बंगल्यावर आला परत ! "

" होय, साहेब. त्यांनीं बंगल्यांत पाऊल टाकण्याबरोबर मी तिथें होतों तर मला पाहिला. अन् पाहिल्याबराबर ' जाव् मादरचोद ! या देशचा चाकर नाहीं आह्मांला पाहिजे' असं ह्मणून मला गचांडी दिली."

" त्या नबाबणीचं रांडेचं हें काम असावं. तिनं त्याला सांगितलं असेल. ही कांहीं अक्कल त्या माढवाची नाहीं. "

" नाहीं, हो. त्या दोघांची दुपारपासून गांठ देखील नाहीं. कोणी तरी दुसऱ्याचंच कृत्य असावं. "

" बरं त्या सिद्दी कोचमनाला आणखी त्या दुसऱ्या सैसाला तरी नेलेना पकडून ? "

" तें कांहीं मला ठाऊक नाहीं. पण ते दोघे आज दुपारपासूनच

नाहींसे झाले आहेत."

"जोलरासाहबांनीं त्यांना पकडले नाहींत, असं दिसतं तर मग.फार वाईट. इतकी दिखील अक्कल नसावी त्या गृहस्थाला !"

हे शब्द त्याच्या तोंडून बाहेर पडताहेत तोंच एक पोलिसचा शिपाई त्याचे दारांत आला व त्यानें "जोलरासाहेब खालीं गार्डींत उभे आहेत, त्यांनीं तुह्मांला बोलावलं आहे असा निरोप सांगितला." त्याबरोबर त्या शिपायला आलोंच मी, तूं खालीं चल असें ह्मणून लावून देऊन **दमाजी**कडे पाहून **परशुरामपंत** ह्मणतो. "सगळी घाण करून ची करून आत्तां मोठ्या थाटानं आह्मांला बोलवायला आले आहेत. तुला सांगतों, हे साहेब लोक कुचकामाचे. यांचा दिमाखच पाहून घ्यावा. आतां भेट झाल्याबरोबर कशी उडवतों पण ह्मणतोंस ! वरिष्ठ कांहींएक मनांत आणीत नाहीं. तुला देखील दाखवली असती मजा पण उगीच त्याला वाटेल कीं, आपली फजिती हा आपल्या चाकराचुकरांच्या देखत करतो; नाहीं तर—पण जा. तूं जा आतां पुनः केव्हां तरी ये. आतां मी जाऊन या गृहस्थाची खूप पच्ची करून अजून सगळं काम सुधारून घेतों. तूं कां घांबरतोस ? मी आहें ना ?" **दमाजी** चालता झाला. आतां साहेबांची व यांची गांठ पडल्यावर खरोखर कोण कोणाची उडवील याबद्दल त्याचे मनांत शंकाच नव्हती. त्याच्या पाठोपाठ **परशुरामपंत**ही खालीं आला व **जोलरासाहेबां**च्या व्हिक्टोरिएंत समोरच्या लहान जागीं अवघडत बसला, पण गाडी चालू लागल्याबरोबर किंचित् धैर्य आणून तो ह्मणतोः—त्या मुसंड्यानं दाद लागूं दिली नाहीं असं दिसतं ! कांहीं तरी थाप देऊन धूळ टाकली वाटतं डोळ्यांत !

"या सर्व कृत्यांत एकंदर अथपासून इतिपर्यंत अजागळासारखी वागणूक करून सगळी घाण केलीस तूं. एखादा नवशिक्यामुद्धां तुझ्यापेक्षां चांगली अक्कल दाखवता, इतकं असून वर नाक करून आचरटपणानं बोलतोस तेव्हां आतां तुला काय ह्मणावं ! पहिल्यांनं त्या बिचाऱ्या सभ्य गृहस्थाला धरायला लावलंस. मी आत्तांच त्याला सोडून देऊन आलों ह्मणा !"

"पण त्याला सोडून द्यायला मींच सांगितलं.".

" तुझ्या सांगण्यावर मीं थोडंच कांहीं केलं आहे. मला पहिल्या-पासून पक्कं ठाऊक होतं कीं, त्याच्याकडे कांहीं एक गुन्हा नाहीं. आतां एवढंच होवो कीं त्यानं पोलिसावर अब्रू घेतल्याची फिर्याद न करावी. नबाबाच्या बोलण्यावरून तर अगदीं स्पष्ट झालं कीं त्या लवंडीचा खून त्या दोघां चोरांनीच केला. "

" पण मीं देखील तेंच सांगितलं होतं ! "

" हो; पण त्यांना शेवटपर्यंत पकडूं नका ह्मणून ह्मणणारा दिखी-ल तूंच. तूंच ह्मणालास कीं त्यांना पकडण्याची योग्य वेळ आली कीं मी तुह्मांला कळवीन. ते तर मादरचोद आतां पळाले ! "

" त्यांना पकडायला तो किती वेळ लागतो ? "

माझी तर खात्री आहे कीं, ते आतां सांपडणं महा कर्म कठिण. मीं हुकूम बिकूम दिले आहेत. पण ते पळाले तर काय करणार ! वेड्या वेड्या कल्पना केल्या, भलत्याच जागीं संशय घेतले आणखी सगळा पाजीप-णा झाला. तो **अनंत** झाला, नंतर **नबाब** झाला. आतां **नबाबणीचं** नांव घे झालं. ह्मणजे संपलं. "

" तिचं नांव घेतलं तर माझ्या मतानं फारशी चूक होणार नाहीं. मला वाटतं तुह्मी तिला शोधायला गेलांत तर ती दिखील आतां सांपडे-ल कीं नाहीं कोणाला ठाऊक ! "

हें बोलणें होत आहे तों. ते एका पोलिसकोर्टाजवळ आले. तेथेंच **जोल्रा**साहेबांस जावयाचें होतें.

" ठीक आहे ! ठीक आहे ! आतां आपण जा पाहिजे तर तिचा शोध करा. " **जोल्रा**साहेब गाडींतून उतरतां उतरतां ह्मणतो. " पण एवढं ध्यानांत धरा कीं, यापुढें डिटेक्टिव्ह सर्विसचा आणखी आपला कांहीं संबंध नाहीं. तुला डिसमिसच करीत नाहीं; पण तुझी कमिशनर-च्या ऑफिसांत क्लार्काच्या जागेवर नेमणूक केली जाईल. "

" मग येवढी ही कशाला पाहिजे ! मला तीस पसतीस रुपड्या कुठें पाहिजे तिथें मिळवतां येतील. इथें नाहींच नाहींतरी माझ्या गुणां-ची पारख व्हायची ! मी आतां संस्थानांत जातों ह्मणजे पहा किती माझ्या गुणांचं चीज होतं तें ! "

इतकेंच बोलणें झालें. **जोल्रा**साहेबांनीं त्याच्या बोलण्याकडे ति-

ळप्राय लक्ष दिलें नाहीं. ते चालते झाले. आणि **परशुरामपंत** आपले गुण घेऊन घरीं आले !

**नबाब** साहेब होते तसेच राहिले. **नबाबीण** कोणीकडे गेली हें कोणास कळलें नाहीं. तर्क मात्र अनेकांचे अनेक झाले. **यशवंतराव** निघून गेल्यानंतर एवढेंच झालें कीं, **नबाबणी**च्या बंगल्यांतून एक मोंगल पोरगा एका पाकिटानिशीं पुण्याच्या गाडीनें हैद्राबादेकडे गेला ! सिद्दी कोचमन व सैस यांना जो पैसा तें अघोर कृत्य करण्याबद्दल मिळाला होता, तो वांटून घेण्यांत त्यांची मारामारी होऊन कोचमनानें सैसाचा खून केला व तो ज्या ठिकाणीं गेला होता तेथें त्या खुनाबद्दल फांशीं गेला.

**परशुरामपंत** कुठल्याशा एका संस्थानांत जाऊन सगळ्यांत मोठे पोलिस अधिकारी झाले व त्यांस बराच पगार मिळूं लागला. **दमाजी** त्यांजबरोबर गेला नाहीं, त्यानें मुंबईस पोलिसांत नोकरी पतकरिली. पुण्यास शीर सांपडल्याची हकीकत **जोल्रा** साहेबांस कळली फार उशीरां. तेव्हां **नबाबीण** कोठून येते ! त्यानें आपल्याकडून शोध केला पण व्यर्थ ! **अनंतराव** आतां अगदीं शुद्धीवर आला. **नबाबणी**संबंधानें त्याचें वेड अगदीं गेलें; तो सुस्थितींत राहूं लागला इतकेंच नव्हे तर त्यानें **बनुताई**स वैधव्यास्थितींतून काढून सुखसमुद्रांत आणून सोडल्याचें श्रेय घेतलें.

**यमुना** व **यशवंतराव** यांचा विवाह होऊन तीं सुखपर्वताच्या धवलगिरीवर राज्य करूं लागलीं.

**यमुना** व **बनुताई**, **यशवंतराव** व **अनंतराव** हीं चार मंडळी एकाच ठिकाणीं राहून सदैव सुधारणेच्या गोष्टींत कायावाचामनसा अविश्रांत श्रम करूं लागली.